
गतिमान शिक्षणातून समाजपरिवर्तन

# विचार भारती

वर्ष : ४८ । अंक : १
एप्रिल – मे २०१८



वादळातुनी झेप घेतली ध्येय पतंगाने
तूफानाशी झुंज घेतली कुणी आनंदाने
यशवंताचे यशोगीत हे मूर्तिमंत गाणे
निर्धाराची निश्चल निष्ठा त्याग मागते आहे



# लोकगंगेचा महापूर







# विचार भारती

■ संस्थापक
**मा. डॉ. पतंगराव कदम**
एम.ए., एल.एल बी., पीएच.डी.

■ विचारभारती समिती :
**प्रा. डॉ. शिवाजीराव कदम** (अध्यक्ष)
**डॉ. विश्वजित कदम** (सदस्य)
**श्री. व. भा. म्हेत्रे** (सदस्य)
**डॉ. म. शि. सगरे** (सदस्य)
**प्राचार्य डॉ. के. डी. जाधव** (सदस्य)
**डॉ. उत्तम भोईटे** (सदस्य)

■ संपादक
**प्रा. मिलिंद जोशी**

■ संपादन सहकार्य
**प्रा. गिरीश झांबरे**
**रवींद्र बेडकिहाळ**

■ मुखपृष्ठ-मांडणी
**प्रदीप खेतमर**, आर्ट ॲडव्हर्टायझिंग, पुणे

■ **पत्रव्यवहार**
संपादक,
विचारभारती कार्यालय,
एरंडवणे, पुणे - ४११०३८
स्थिरभाष : ०२०-२५४५१६७६
ई-मेल : vicharbharati38@gmail.com

■ मुद्रणस्थळ
**भारती प्रिंटिंग प्रेस**, एरंडवणे,
पुणे-४११०३८.

■ **वार्षिक वर्गणी रु. १००/-**

■ या मासिकात व्यक्त झालेल्या विचारांशी संपादक व संस्थेचे पदाधिकारी सहमत असतीलच असे नाही.

■ **विचारभारती । एप्रिल - मे २०१८**
■ **वर्ष : ४८ । अंक : १**

# अ नु क्र म णि का

## संपादकीय
**प्रा.मिलिंद जोशी । २**

●

## माध्यमांचे अभिवादन
**सकाळ : ४ / लोकमत : ६ / महाराष्ट्र टाइम्स : ९ / लोकसत्ता : १०**
**पुढारी : १४ / सामना : १९ / पुण्यनगरी : २१ / तरुण भारत : २३**
**महासत्ता : २५ / चित्रलेखा : २७**

●

## स्मरण साहेबांचे
**राही भिडे : ३० / राजा माने : ३२ / मल्लिका अमरशेख : ३३**
**डॉ. आनंद पाटील : ३४ / डॉ. जयसिंगराव पवार : ३७**
**कांचन अधिकारी : ३९**

●

## आठवणीतले साहेब
**पृथ्वीराज चव्हाण : ४० / डॉ. प्र. चिं. शेजवलकर : ४२**
**डॉ. अनिल पाटील : ४३ / अनंत दीक्षित : ४४**
**डॉ. महादेव सगरे : ५१ / सिंधुताई सपकाळ : ५२**

●

## स्मरणगंध साहेबांचा
**सतीश राऊत : ५४ / सुनील चव्हाण : ५८ / व.भा. म्हेत्रे : ६०**
**ॲड. संजय पेंढारकर : ६३ / डॉ. उत्तम भोईटे : ६४**
**डॉ. आनंद भालेराव : ६७ / राजश्री वडके : ६९**
**प्रा. संजय ठिगळे : ७२ / बाळकृष्ण यादव : ७४**
**नितीन माने : ७६ / अनिल दांडेकर : ७८**
**डॉ. महेश शितोळे : ८० / डॉ. कल्याणी दिवेकर : ८२**

●

## अखेरच्या प्रवास
**रजाअली पिरजादे : ८४**

**प्रा.मिलिंद जोशी**
संपादक

# संपादकीय

# साहेब, सर्वांना पोरके करून असे का गेलात?

**साहेब, तुमचं असणं आमच्यासाठी खूप महत्त्वाचं होतं. ते अस्तित्वाशी जोडलेलं होतं. तुम्ही ऊर्जेचा अखंड स्रोत होता. ती ऊर्जा सर्वांपर्यंत कशी पोहोचेल, यासाठी तुम्ही उत्सुक असायचा. तुमचं रागावणं जितकं कडक, तितकंच प्रेमानं पाठीवरून हात फिरवणं अधिक बळ वाढविणारं आणि मायेची पखरण करणारं असायचं. साहेब पाठीशी आहेत, याचा केवढा आधार सर्वांना असायचा. तो आधारच आता नाहीसा झालाय. साहेब, काय तुमचा तो रुबाब! तुमच्या येण्याची नुसती चाहूल जरी लागली तरी सारं वातावरण आनंदून जायचं. गाड्यांचे ताफे यायचे. सुरक्षा अधिकाऱ्यांची धावपळ उडायची. शिट्ट्या वाजायच्या. माणसांचा गराडा पडायचा. माणसांच्या त्या गर्दीतही साहेबांचं आपल्याकडे लक्ष आहे, याचा दिलासा सर्वांना मिळायचा. तो दिलासाच हरवलाय. साहेब, सर्वांना पोरके करून असे का गेलात?**

जानेवारी महिन्यात साहेबांच्या वाढदिवसानिमित्त ‘विचार भारती’चा विशेषांक काढला. त्याचे प्रकाशन वहिनीसाहेबांच्या हस्ते झाले. त्याला वाचकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. त्याच संपादकाला दोनच महिन्यात साहेबांचा स्मृती अंक काढावा लागणे, या सारखे दुर्दैव ते कोणते?

९ मार्च २०१८ रोजी संध्याकाळी भारती विद्यापीठाचे संस्थापक कुलपती डॉ. पतंगराव कदम साहेब यांच्या दुःखद निधनाची वार्ता आली. काळजाचा ठोका चुकला. मावळत्या सूर्याच्या साक्षीने एक कर्तृत्वसूर्य मावळला. सोनसळच्या सोनहिऱ्याने चिरनिद्रा घेतली. आपल्या कुशीत वाढलेल्या लाडक्या सुपुत्राच्या निधनाने कृष्णा, कोयना, येरळा या नद्यांचे कंठ दाटून आले. लाखांचा पोशिंदा गेला. भारती विद्यापीठाचा आधारवड कोसळला. महाराष्ट्राचा कंठमणी गेला. सारेच सैरभैर झाले. साहेबांच्या जाण्यामुळे आपण पोरके झालो. आपले पितृछत्र हरपले असेच त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या सर्वांना वाटत होते. डोळ्यांतले पाणी थांबता थांबत नव्हते. कुठे धावावे हेच समजत नव्हते.

साहेब आजारी असल्याची वार्ता येत होती. साहेबांना विश्रांतीची गरज आहे अशी मनाची समजूत घालत, साहेबांच्या भेटीची आस मनात बाळगत सारेच स्वतःला बजावत होते, साहेब सर्वांना भेटण्यासाठी नक्की परत येतील, पण नियतीने सर्वांच्या भावनांशी क्रूर खेळ केला. बातमी आली ती साहेबांच्या निधनाचीच. आपल्या कुटुंबातला वडीलधारा माणूस गेल्यावर सांत्वन कुणी कुणाचे करायचे? ती रात्र अशीच अस्वस्थतेत गेली. साहेबांच्या सहवासातले सारे क्षण, आठवणी मनात गर्दी करीत होत्या. अंतःकरण गलबलून जात होतं.

सकाळी सात वाजता साहेबांचं पार्थिव बंगल्यावर आणण्यात आलं. त्यापूर्वी हजारोंच्या संख्येनं लोक बंगल्याबाहेर येऊन थांबले होते. ॲम्ब्युलन्स घरासमोर थांबताच सर्वांनीच इतका वेळ आवरलेला बांध फुटला. आदरणीय मोहनराव कदम दादा, डॉ. शिवाजीराव कदम सर, वहिनीसाहेब, बाळासाहेब, ताईसाहेब यांना भेटण्याचं धाडस होत नव्हतं. सर्वांवर आभाळच कोसळलं होतं. बंगल्यातल्या ज्या दिवाणखान्यात साहेबांना भेटण्यासाठी, त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी हजारो लोक येत होते, त्याच दिवाणखान्यात साहेबांना मृत्युशय्येवर शांत झोपलेले पाहून मनात विचित्र कालवाकालव होत होती. साहेबांना इतक्या शांतपणे झोपलेलं कुणी, कधीच पाहिलेलं नव्हतं.

बंगल्याच्या बाहेर जनसागर लोटला होता. येणाऱ्या प्रत्येकाला साहेबांनी त्याला आयुष्यात कसं उभं केलं, संकटांच्या आणि कसोटीच्या काळात कशी पाठराखण केली, जगण्याचं बळ कसं दिलं, मायेनं मदत कशी केली, हे पुन्हापुन्हा आठवत होतं आणि गहिवरून येत होतं.


साहेबांचं पार्थिव बंगल्यावरून भारती भवनकडे निघालं. एरवी दिमाखात उभे असलेले भारती भवन त्या दिवशी खूप उदास, भकास वाटत होतं. सर्वांच्या लाडक्या साहेबांचं पार्थिव जेव्हा या इमारतीच्या प्रवेशद्वारात ठेवण्यात आलं, तेव्हा त्यांच्या खडतर जीवनप्रवासाचे साक्षीदार असणाऱ्या




या इमारतीच्या दगड-विटांनाही पाझर फुटला. साहेबांवर जिवापाड प्रेम करणाऱ्या माणसांचे लोंढे तिथेही थांबत नव्हते. धनकवडी शैक्षणिक संकुलात साहेबांचे पार्थिव येण्यापूर्वीच तिथला परिसर असंख्य शोकाकुल लोकांनी भरून गेला होता. ज्या परिसरात साहेब येणार आहेत असं म्हटलं की सर्वांना विलक्षण आनंद व्हायचा, साहेबांच्या येण्यानं वातावरण चैतन्यानं भारून जायचं, त्या परिसराची मनोवस्था काय झाली असेल? अश्रूंतून आणि हुंदक्यांतून लाडक्या साहेबांच्या जाण्यामुळे आलेलं रितेपण सर्वजण व्यक्त करीत होते. आमच्या अंतःकरणाच्या गाभाऱ्यातला देवच गेला, अशी सर्वांची भावना झाली होती.

पलूस-कडेगाव मतदारसंघातल्या माणसांची अवस्था सांत्वनापलीकडची होती. सामान्य माणसांच्या कल्याणासाठी सर्वस्व पणाला लावणारा, अनंत हातांनी मदतीसाठी तत्पर असणारा आणि जिवाला जीव लावणारा जिवाभावाचा नेता गेला, अशीच सर्वांची भावना झाली होती. अंत्यसंस्काराच्या वेळी लोकगंगेला अक्षरशः पूर आला होता. भारती भवनला सहजतेने भेटणाऱ्या साहेबांच्या जवळ जाणं सुद्धा शक्य नव्हतं. तेव्हा जाणवलं, साहेब किती दूर गेले आहेत ते! ती हुरहुर मनात दाटत होती. जड अंतःकरणाने सर्वांनी साहेबांना निरोप दिला. साहेबांनी केवळ संस्था उभ्या केल्या नाहीत, त्यांनी माणसं उभी केली. त्यांचे संसार सावरले. अडचणीत असणाऱ्या माणसांचे दुःख त्यांना पाहावयाचे नाही. अशा माणसांना तत्परतेने मदत करण्यासाठी ते उत्सुक असायचे. या हाताने केलेली मदत साहेबांनी कधी त्या हाताला कळू दिली नाही. साहेबांना सत्ता मिळाली, पद मिळाले पण त्यामुळे त्यांच्यातल्या साधेपणाला कधीही बाधा आली नाही. साध्या, रांगड्या, उमद्या व्यक्तिमत्त्वामुळे त्यांचे कर्तृत्व झळाळून निघायचे. राजकारणात आणि समाजकारणात त्यांच्या उमद्या स्वभावाचे सहज दर्शन घडायचे. त्यांचे रांगडे, उत्स्फूर्त, आतून आलेले भाषण काळीज हलवून टाकायचे. जनसामान्यांशी इतके एकरूप झालेले लोकनेतृत्व आजच्या काळात पाहायला मिळणे खरोखरीच कठीण आहे. स्व. यशवंतरावजी चव्हाण, यशवंतरावजी मोहिते आणि वसंतदादा पाटील यांचा सामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून समाजकारण करण्याचा वारसा त्यांनी राजकारणात समर्थपणे पुढे चालविला. छत्रपती शिवाजी महाराज, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी विचारांची कास धरताना परिवर्तनासाठी कृतीला साहेबांनी नेहमी प्राधान्य दिले. साहेबांच्या निधनाने एक ध्यासपर्व संपले.

साहेब, तुमचं असणं आमच्यासाठी खूप महत्त्वाचं होतं. ते अस्तित्वाशी जोडलेलं होतं. तुम्ही ऊर्जेचा अखंड स्रोत होता. ती ऊर्जा सर्वांपर्यंत कशी पोहोचेल, यासाठी तुम्ही उत्सुक असायचा. तुमचं रागावणं जितकं कडक, तितकंच प्रेमानं पाठीवरून हात फिरवणं अधिक बळ वाढविणारं आणि मायेची पखरण करणारं असायचं. साहेब पाठीशी आहेत, याचा केवढा आधार सर्वांना असायचा. तो आधारच आता नाहीसा झालाय. साहेब, काय तुमचा तो रुबाब! तुमच्या येण्याची नुसती चाहूल जरी लागली तरी सारं वातावरण आनंदून जायचं. गाड्यांचे ताफे यायचे. सुरक्षा अधिकाऱ्यांची धावपळ उडायची. शिट्ट्या वाजायच्या. माणसांचा गराडा पडायचा. माणसांच्या त्या गर्दीतही साहेबांचं आपल्याकडे लक्ष आहे, याचा दिलासा सर्वांना मिळायचा. तो दिलासाच हरवलाय. साहेब, सर्वांना पोरके करून असे का गेलात?





## माध्यमांचे अभिवादन!

# सकाळ

महाराष्ट्राच्या राजकीय नकाशात पतंगराव कदम यांनी स्वतःचे स्वतंत्रपणे नाव कोरले. त्यांच्या राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील यशाच्या मोजमापाच्या फूटपट्ट्या व्यक्तिपरत्वे बदलत राहतील. मात्र एक निश्चित, जे त्यांच्या संपर्कात आले, त्यांच्या आयुष्याचे अनेक अर्थाने सोने झाले. आपल्या विटा, पलूस, कडेगावच्या परिसरातील हिरवे शिवार असो वा या भागातील वाढलेला शैक्षणिक प्रगतीचा आलेख, त्याला पतंगरावांचा परीसस्पर्श लाभला आहे. स्वातंत्र्यानंतरच्या महाराष्ट्राच्या जडणघडणीच्या यशवंतराव - वसंतदादांच्या कालखंडाशी नाते सांगणारा एक कर्तृत्ववान नेता हरपला आहे. राज्याच्या राजकारणातील दिलखुलास नेत्याचे एक पर्व संपले...

भिलवडी-कडेगाव ते पुणे-दिल्लीपर्यंतचा भारती विद्यापीठाचा मोठा पसारा ज्यांनी अनुभवला आहे, त्यांना भारती परिवाराची म्हणून काही वैशिष्ट्ये जाणवली असतील. शिपायाच्या डोईवरची गांधी टोपी किंवा तिथला सर्व स्टाफ हा आपला... गावाकडचा वाटतो. पिढीजात दारिद्र्य वाट्याला आलेले, दुष्काळ आणि निसर्गाच्या आपत्तीच्या सतत झळा सोसलेल्या, कष्टकरी कुटुंबातून मोठ्या जिद्दीने शिक्षण घेत शिकलेल्या हजारो मुलांना भारती विद्यापीठाने शिक्षणाचा प्रकाश दिला. त्यांची आयुष्ये उजळून निघाली. कित्येक पिढ्या ज्यांचे राहणीमान बदलले नाही अशा लाखो कुटुंबांचे राहणीमान बदलून गेले.... ते सारे झाले पतंगरावांनी उभ्या केलेल्या संस्थांच्या परीसस्पर्शाने.

साठ वर्षांपूर्वीच्या एका कोरडवाहू शेतकरी कुटुंबाच्या दहा मुलांच्या संसाराची अवस्था काय असेल, हे सांगण्यासाठी ऐतिहासिक साहित्यसामग्रीची, अभ्यासाची गरज नाही. स्वातंत्र्यापूर्वीचा संपूर्ण भारतच अशा दैन्य-दारिद्र्यात जगत होता. मात्र त्या परिस्थितीतून बाहेर पडून आपण, आपले कुटुंब आणि आपला परिसर बदलला पाहिजे असा ध्यास घ्यायची ऊर्मी विशी-पंचविशीच्या तरुणाच्या मनात येणे ही गोष्ट दुर्मीळच. एरवी रयत शिक्षण संस्थेत शिक्षक म्हणून त्यांचे आयुष्य चारचौघांसारखे चांगलेच गेले असते. मात्र विद्येच्या माहेरघरात... पंडितांच्या गल्लीत, सदाशिवपेठेत स्वतःची शिक्षणसंस्था काढावी, तिला 'भारती विद्यापीठ' असे नाव द्यावे असे वाटण्यासाठीच मुळी भरारी घेण्याचे अंगभूत बळ असणारा पिंड असावा लागतो. संधी मिळाली की आपल्या माणसांसाठी भरभरून केले पाहिजे, हे ब्रीद नेहमीच पतंगरावांनी ठेवले. वसंतदादांच्या सहवासातून त्यांनी ही गोष्ट घेतली होती. यशवंतराव चव्हाण, यशवंतराव मोहिते यांच्यासारख्या महाराष्ट्राच्या शिल्पकारांकडून त्यांनी संस्थात्मक कार्याचे बळ जाणले होते.

१९८५ पासून दोन वेळच्या पराभवाचा (पाच वर्षांची एकच टर्म) अपवाद वगळता पतंगराव नेहमीच विधानसभेत राहिले. आमदार म्हणून आणि पुढे आघाडी शासनाच्या काळात मंत्री म्हणून त्यांनी सर्व टॉपची आणि साधारणही अशी दोन्ही प्रकारची खाती सांभाळली. 'भावी मुख्यमंत्री' म्हणून ते जाहीरपणे मोकळेपणाने स्वतःचा उल्लेख करायचे. कधी कधी त्यांच्या 'या' पदाबद्दल पक्ष आणि पक्षाबाहेरच्या मंडळींकडून खोचकपणे टिप्पणी केली जायची. मात्र त्यांनी ती कधी मनावर घेतली नाही. पतंगरावांच्या यशाचे मोजमाप त्यांनी किती पदे भूषवली, किती संस्था उभ्या केल्या, यापेक्षा त्यांनी ज्या परिस्थितीतून त्या केल्या, या फूटपट्टीवर झाले पाहिजे. पतंगरावांनी संस्था उभ्या करताना रात्रीचा दिवस केला. सत्ता नसतानाही त्यांनी मंत्रालयाचे उंबरठे झिजवले आणि सत्ता असतानाही



मंत्रिपदाची मिजास न करता स्वतः फायली घेऊन ते सहकारी मंत्र्यांच्या, सचिवाच्या दारात हक्काने फाईल क्लिअर करण्यासाठी गेले. तोच मोकळेपणा त्यांनी एखाद्याचे काम करतानाही दाखवला. पालकमंत्रिपदाच्या पंधरा वर्षांच्या काळात त्यांनी आपले निवासस्थानच कार्यालय केले. अधिकाऱ्यांना सकाळपासून त्यांच्या बंगल्यावर हजेरी लावायला लागे. लोकांची कामे होणे महत्त्वाची.. तिथे प्रोटोकॉल उपयोगाचा नाही असे त्यांचे त्यावरचे मत ते जाहीरपणे मांडायचे. पतंगरावांनी माणसे उभी केली आणि कोसळलेल्या माणसांचेही आधारवड झाले. प्रत्येक गोष्ट जाहीरपणे बोलणाऱ्या पतंगरावांनी त्याबद्दल मात्र नेहमी मौन पाळले. मंगला बनसोडे, नामदेव ढसाळ, काळू-बाळू, सिंधूताई सपकाळ अशा कितीतरी जनमानसातील परिचितांसाठी पतंगराव अज्ञात असे आधारवड राहिले आहेत. फी सवलतीसाठी येणारे शेकडो विद्यार्थी त्यांना जाहीर सभासमारंभात गाठत. तो पोर कोण कुठला, याची आस्थेने खांद्यावर हात टाकून चौकशी करणारे पतंगराव नेहमी दिसत. त्याच्या अर्जावर पतंगरावांची सही झाली की त्याचे काम झालेले असे.

पतंगराव ज्या कालखंडात घडले, तो कालखंड आता संपला आहे. सर्व क्षेत्रांपुढे नवी आव्हाने आहेत. राजकारणात दिलदारपणा, मोकळेपणा लुप्त होत आहे. ग्रामीण महाराष्ट्राची शिक्षणाची निकडही आता वेगळ्या स्वरूपात पुढे येत आहे. शिक्षणक्षेत्रापुढची आव्हाने तर जागतिक झाली आहेत. शब्दाला जगणारे कार्यकर्ते आता दुर्मीळ झाले आहेत. मी आणि माझे कुटुंब आणि त्यासाठी राजकारण यात कुणालाच वावगे वाटत नाही. अशा कालखंडात पतंगरावांसारखी व्यक्तिमत्त्वे वेगळी आणि उठून दिसणारी. मातीशी नाते सांगणारी.... आईपुढे मोकळे व्हावे तसे समाजापुढे मोकळे होणारे पतंगराव आता दिसणार नाहीत. त्यांच्या अस्सल गावरान वक्तृत्वाचा फड आता रंगणार नाही. औदुंबरच्या डोहाला साक्षी ठेवून काँग्रेसच्या प्रचाराचा नारळ आता फुटला तरी तिथे रंगणारी पतंगराव आणि आर.आर. पाटील यांच्या रसरशीत वक्तृत्वाची मैफल दिसणार नाही. त्या दोघांनी नेहमीच एकमेकांचा 'बंधू' असा उल्लेख केला. महाराष्ट्राच्या राजकीय पटावरील हे दोघे ज्येष्ठ आणि कनिष्ठ बंधू आता आपल्यात नाहीत. कनिष्ठ बंधू आधी गेला, आता ज्येष्ठ. राज्याच्या राजकीय अवकाशात या दोन ताऱ्यांचे नसणे सांगलीला पुढची अनेक वर्षे सतत जाणवत राहील.

**सकाळ, पुणे**
**शनिवार १० मार्च २०१८**

# दिलखुलास नेता





## माध्यमांचे अभिवादन!

# लोकमत

### वसंत भोसले

काम नेटाने करण्यास त्यांचे कायम प्राधान्य असायचे. ते आमदार असोत की नसोत, मंत्री असोत किंवा नसोत; शिक्षणक्षेत्रातील कार्यात केव्हाही खंड पडणार नाही, याची नेहमीच दक्षता ते घेत राहिले. खेड्या-पाड्यांतील मुला-मुलींना शिक्षण देण्यासाठी जे काही करता येईल, त्यासाठी कष्ट घेण्याची त्यांची नेहमीच तयारी असायची. झाड पडल्यावर कळते की, ते किती उंच होते.

पतंगराव कदम यांच्या वाढदिवसाच्यानिमित्ताने (दि. ८ जानेवारी २०१८) दूरध्वनी केला. तोच नेहमीचा उत्साह, तोच प्रेमाचा ओलावा, तोच जिव्हाळा! ''वसंतराव, मित्राला कसल्या शुभेच्छा देताय, त्या तर कायमच आहेत, बोला!''

पतंगराव कदम नावाच्या वादळाच्या मुखातून ऐकलेले ते शेवटचे शब्द! ८ जानेवारीचा आपला वाढदिवस एखाद्या लहान मुलाप्रमाणे हौसेने शुभेच्छा स्वीकारीत साजरा करणारे ते व्यक्तिमत्त्व होते. त्यांचा तो खेळकरपणा एखाद्या मुलासारखा वाटे. सार्वजनिक काम करताना नेटाने पुढे राहणारे ते कणखर नेतृत्व वाटे. शिक्षणाविषयी तरी ते वेगळेच पतंगराव होते. त्यांच्या राजकारणाविषयी नेहमीच चर्चा होते; पण ते खरे शिक्षणप्रचारक होते. कोल्हापूरचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुरेश शिपूरकर गेल्याच आठवड्यात भेटले होते, तेव्हा पतंगराव कदम यांच्या प्रकृतीचा विषय निघाला. अखंड धडपडणारा शिक्षणप्रचारक, राजकारणी आणि समाजसेवक अशा अवस्थेतून जातो आहे, असे सांगत ते म्हणाले, ''सोनसळसारख्या खेड्यातून पुण्यात येताना हा माणूस उराशी स्वप्नच घेऊन आला होता. हडपसरच्या साधना विद्यालयात मी काम करायचो. सन १९६५-६६ ची गोष्ट असेल. सोनसळचा कदम नावाचा तरुण पोऱ्या आला आहे. तो ड्रॉइंगचा शिक्षक म्हणून कार्यरत राहील, असे सांगण्यात आले. आमच्याशी बोलताना ते 'मी एक दिवस मोठा होणार आहे. शिक्षणसंस्थाच काढणार आहे. आयुष्यभर शिक्षकी पेशा करणार नाही. राजकारणात उडी मारणार आहे,' असे नेहमी म्हणत. हे ऐकून थोडेसे चमत्कारिकच वाटायचे; कारण त्यांना कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नव्हती. मात्र यशवंतराव मोहिते यांनी परिवहनमंत्री असताना त्यांची एस.टी. महामंडळाच्या संचालकपदावरच नेमणूक केली. त्यांनी हडपसर विद्यालय सोडले तसे आम्ही त्यांच्या वाढत्या व्यक्तिमत्त्वाकडे पाहतच राहिलो.''

सुरेश शिपूरकर यांच्याशी बोलतानाची ही आठवण आणि पत्रकार म्हणून गेली तीस वर्षे त्यांना जवळून पाहताना त्यांची सातत्याने चाललेली धडपड पाहिली की, ते एक वादळच होते, आता ते शमले आहे, असेच म्हणावे लागेल. प्रचंड उत्साह, नेहमी कामात राहणे, नेहमी धावत राहणे, राजकारण करीत असताना गावचे हित, जिल्ह्याचे हित पाहणे याबरोबरच राज्याचे राजकारण ते करीत आले. विद्यार्थिदशेत फीमध्ये दीड रुपया सवलत मिळावी म्हणून बत्तीस वेळा प्राचार्यांच्या दालनात जाऊन आलेले ते आता वर्षाला भारती विद्यापीठाच्या १८८ शाळा, विद्यालये आणि महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना



# पतंगराव नावाचे वादळ शमले



साडेचार कोटी रुपयांची फी-सवलत देत होते. त्यांनी डॉक्टरेट केली. भारती विद्यापीठ शिक्षणसंस्थेला अभिमत विद्यापीठाचा दर्जा मिळाल्याने ते संस्थापक-कुलपती झाले. ते पद तहहयात होते. ते सहा वेळा आमदार झाले. अठरा वर्षे मंत्री म्हणून महाराष्ट्रभर काम करीत राहिले.

हा सर्व चमत्कार डॉ. पतंगराव कदम यांच्यासारख्या एका व्यक्तीकडून कसा होऊ शकतो, याचे मला नेहमीच कोडे पडले होते. 'माझ्या संस्थेत नोकरीला घेताना मी एक कप चहाच्या मिंद्यात आहे, असे कोणीही सांगावे,' असे ते जाहीरपणे आव्हानात्मक बोलत राहायचे. एवढे प्रचंड धाडस कोठून यायचे, माहीत नाही. १९९५मध्ये ते निवडणुकीत हरले. दुसऱ्या दिवसापासून पुन्हा आपल्या कामाला लागले. 'निवडणुका येतात, जातात. हार-जित व्हायचीच. इंदिरा गांधी हरल्या होत्या, तेथे या पतंगरावाचे काय?' असा सवाल करीत 'परत निवडणूक येऊ द्या, लढवायची, जीवनाच्या अखेरपर्यंत ही लढाई चालूच राहणार,' असे ते म्हणायचे. १९९९ मध्ये काँग्रेसमध्ये फूट पडली. 'काँग्रेस विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस' अशी त्यांच्या मतदारसंघात मुख्य लढत होती. कृष्णा नदीवरील औदुंबरच्या दत्तमंदिराच्या परिसरात प्रचाराचा नारळ फोडला जात होता. पतंगराव कदम यांचे त्या वेळचे भाषण हे त्यांच्या राजकीय, सार्वजनिक जीवनाचा मथितार्थ सांगणारे होते. 'अरे, एक निवडणूक हरलो म्हणून काय झाले? एका लुगड्यावर बायको म्हातारी होत नाही, तिला वारंवार लुगडे घ्यावे लागते,' असे ते बिनधास्त बोलत होते. 'ही लढाई जिंकणार आणि मागची चूक पुन्हा होऊ देणार नाही. परत हा पतंगराव पराभवाचे तोंड पाहणार नाही,' असे सांगत त्यांनी सभा जिंकली. त्यानंतर पुन्हा त्यांनी पराभव पाहिला नाही.

**जयंतराव टिळकांचा सल्ला**
**अन् दहा हत्तीचे बळ**

पुण्यात एका बोळातील एका खोलीत भारती विद्यापीठ सुरू केले. तेव्हा त्यांना हिणवले जायचे की, बोळातील विद्यापीठ, बोळातच संपणार! तेव्हा ते अस्वस्थ झाले. केसरीवाड्यात जयंतराव टिळक यांना भेटायला गेले. त्यांना लोकांच्या प्रतिक्रिया सांगितल्या. टिळक म्हणाले, ''लोकांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत काम करत राहा.'' तसेच केले. विद्यापीठ नावारूपाला आले. ते 'अभिमत'ही झाले. ते एका शिक्षकापासून कुलपती झाले. जयंतराव टिळक यांचे निधन झाले, तेव्हा ते कोल्हापूरचे पालकमंत्री होते. जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक चालली होती. ते बोलत होते. एकाने कानात त्यांना जयंतराव टिळकांच्या निधनाची वार्ता सांगितली. त्यांनी त्याच क्षणी सभा तहकूब केली, श्रद्धांजली वाहिली आणि तडक पुण्याकडे जाण्याची तयारी केली. हेलिकॉप्टर मागविले. हेलिकॉप्टर साताऱ्यात पोहोचले. त्यांनी तेथे ते उतरविले आणि तिथून ते टिळक यांच्या अंत्यसंस्कारास पोहोचले.

या सर्व गडबडीच्या प्रवासाविषयी त्यांना एकदा विचारले, तेव्हा त्यांनी मागे वळून आठवण सांगितली, ''भारती विद्यापीठ काढल्यावर लोक जे बोलत होते, तेव्हा विद्यापीठ बंद करून शिक्षकी पेशाच करावा, असे वाटण्याइतपत नैराश्य आले होते; पण 'लोकांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष कर, काम करीत राहा,' हा जो सल्ला त्यांनी दिला, त्या वेळी मला दहा हत्तींचे बळ आल्यासारखे वाटले. आयुष्यात त्यांचा एकच सल्ला मला उत्तुंग शिखरावर घेऊन जाण्यास मार्गदर्शक ठरला. त्यांना मी कसा विसरू?'' अशी त्यांची मागे वळून पाहण्याची पद्धत होती.

सांगलीतील अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. उमेश जोशी यांचे वडील पतंगरावांच्या वर्गात होते. एकदा मंत्री असताना ते भेटायला गेले. सांगलीच्या माधवनगर रस्त्यावरील उमेशच्या दवाखान्यासमोर जाताच त्यांना बघून जणू आपणच चौथीच्या वर्गात आहोत, अशी त्यांनी मिठी मारली आणि दोघेही अरे-तुरे बोलत दहा मिनिटांसाठी आलेले, पण तासभर गप्पा मारल्या.

पतंगरावांच्या राजकारणाची चर्चा होते. मात्र ते खरे शिक्षणप्रचारक होते. काम नेटाने करण्यास त्यांचे कायम प्राधान्य असायचे. ते आमदार असोत की नसोत, मंत्री असोत किंवा नसोत; शिक्षणक्षेत्रातील कार्यात केव्हाही खंड पडणार नाही, याची नेहमीच दक्षता ते घेत राहिले. खेड्या-पाड्यांतील मुला-मुलींना शिक्षण देण्यासाठी जे काही करता येईल, त्यासाठी कष्ट घेण्याची त्यांची नेहमीच तयारी असायची. आता जाणवते झाड पडल्यावर कळते की, ते किती उंच होते. तसे आता जाणवते आहे.

**लोकमत,**
**१० मार्च २०१८**





# कर्तबगार नेता

डॉ. पतंगराव कदम यांच्या निधनाने एक स्वयंभू नेता काळाच्या पडद्याआड गेला आहे. राजकारणाची आणि शिक्षणाची कोणतीही कौटुंबिक पार्श्वभूमी नसताना या दोन्ही क्षेत्रांत आपला ठसा उमटविणारे पतंगराव कदम यांची वाटचाल थक्क करायला लावणारी आहे. एखाद्या आडगावात जन्मून, प्रतिकूल परिस्थितीचा सामना करीत शिक्षण घेत, वयाच्या विशीतच विद्यापीठ स्थापनेचे स्वप्न केवळ उराशी न बाळगता ते प्रत्यक्षात आणणे ही बाब तशी अशक्य कोटीतील; परंतु पतंगरावांनी अशक्य ते शक्य करून दाखविले. समाजकारण आणि राजकारण करताना शिक्षणाची कास धरून त्याच्या खासगीकरणाचे आगळे प्रारूपच पतंगरावांनी विकसित करून दाखविले. या खासगीकरणाला आज तद्दन बाजारू स्वरूप प्राप्त झाले असून, चांगले आणि करिअर घडवू शकणारे शिक्षण ही पैसेवाल्यांची मक्तेदारी बनू पाहत आहे. या पार्श्वभूमीवर पतंगरावांनी केलेले शैक्षणिक कार्य जाणून घ्यायला हवे. ‘भारती विद्यापीठा’ची स्थापना त्यांनी केली, तेव्हा त्यामागे केवळे पैसे कमावण्याची प्रेरणा नव्हती. साठच्या त्या दशकात शिक्षणाचा विस्तार झालेला नव्हता. बहुसंख्य विद्यार्थ्यांसाठी गणित आणि इंग्रजी हे विषय म्हणजे कर्दनकाळ होते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मदत व्हावी म्हणून पतंगरावांनी या विषयांसाठी पूरक परीक्षा सुरू करीत ‘भारती विद्यापीठा’ची मुहूर्तमेढ रोवली. हळूहळू त्यांच्या संस्थेचा विस्तार होत गेला. शाळा, महाविद्यालये, व्यावसायिक अभ्यासक्रम आणि अभिमत विद्यापीठ अशी चढत्या भाजणीने प्रगती होत गेली. राजकारणातही काँग्रेसचा सदस्य, आमदार, मंत्री, वजनदार नेते अशी त्यांची प्रगती होत गेली. शिक्षणक्षेत्रात पूरक अशी धोरणे घेण्यासाठी त्यांना राजकारणात असल्याचा नक्कीच फायदा झाला. त्यांनी विनाअनुदान तत्त्वावरील व्यावसायिक महाविद्यालये जशी काढली, तशीच खेड्यात, दुर्गम आदिवासी भागांत शाळाही काढल्या. बेरोजगार तरुणांनाही हात दिला. समाजकारण, राजकारण आणि शिक्षणाचे अर्थकारण यांचा समतोल साधण्याची किमया त्यांना साधली. म्हणूनच या तिन्ही क्षेत्रांत ते यशस्वी झाले. ते रोखठोक बोलत. त्याचा फटकाही काही वेळा त्यांना बसला. मात्र, अंतर्यामी ते मृदू होते. त्यामुळेच शैक्षणिक संस्थांचे, बँकांचे आणि मुख्यतः माणसांचे एवढे मोठे जाळे ते विणू शकले. त्यांच्या जाण्याने एका कर्तबगार नेत्याला महाराष्ट्र मुकला आहे.

**महाराष्ट्र टाइम्स,**
**सोमवार, १२ मार्च २०१८**



माध्यमांचे अभिवादन!

## महाराष्ट्र टाइम्स

राजकारणाची आणि शिक्षणाची कोणतीही कौटुंबिक पार्श्वभूमी नसताना या दोन्ही क्षेत्रांत आपला ठसा उमटविणारे पतंगराव कदम यांची वाटचाल थक्क करायला लावणारी आहे. एखाद्या आडगावात जन्मून, प्रतिकूल परिस्थितीचा सामना करीत शिक्षण घेत, वयाच्या विशीतच विद्यापीठ स्थापनेचे स्वप्न केवळ उराशी न बाळगता ते प्रत्यक्षात आणणे ही बाब तशी अशक्य कोटीतील; परंतु पतंगरावांनी अशक्य ते शक्य करून दाखविले.





## माध्यमांचे अभिवादन!

## लोकसत्ता

खाते कोणतेही असो, त्यावर आपली भक्कम पकड निर्माण करणे हे त्यांचे वैशिष्ट्य. शिक्षणाचे खासगीकरण होऊ लागल्यावर दर्जा वाढवत नेत, त्याचा पुरेपूर फायदा मिळवणारे पतंगराव हे एक दूरदृष्टीचे व्यक्तिमत्त्व होते. बोलण्यात खास सांगलीचा खमंगपणा, कोणालाही मित्रत्वाचा दर्जा बहाल करणारा, खुसखुशीतपणे टिप्पणी करणारा, राजकारणात विरोधकांशी सरळ दोन हात करणारा, पण तरीही मैत्र टिकवून ठेवणारा असा हा विरळा माणूस निघून जाणे म्हणूनच दुःखकारक.

# रांगडा आणि उमदा

ज्या काळात शिक्षणक्षेत्र हे अजिबातच उत्साहवर्धक नव्हते, त्या काळात याच क्षेत्रात काम करण्याची जिद्द ठेवणे वेडेपणाचे होते, हे माहीत असूनही पतंगराव कदम यांनी तेच केले. शिक्षकी पेशातील अनुभव घेतल्यानंतरही त्यांच्या या जिद्दीत जराही फरक पडला नाही. उलट, काही करून दाखवायचेच असेल तर याच क्षेत्रात करायला हवे, असे त्यांना वाटत होते. सत्तरच्या दशकात महाराष्ट्रातील शिक्षणाचे खासगीकरण झालेले नव्हते, पण पतंगरावांनी पुण्यात पहिली शाळा काढून आपल्या स्वप्नाची मुहूर्तमेढ रोवली. पतंगराव हे एक अजब रसायन होते. अतिशय उमदा, रांगडा आणि उत्साही असा हा माणूस. संस्था सुरू करायची, तर तिचे नाव ठेवतानाही पतंगरावांची दृष्टी सहज लक्षात येते. नाव ठेवले भारती विद्यापीठ. संस्थेचे कार्यालय अवघ्या शंभर चौरस फुटांचे. पण स्वप्न खरेखुरे विद्यापीठ स्थापन करायचे. म्हणायला हे सगळे खूप सोपे, पण प्रत्यक्षात ते किती अवघड, हे शिक्षणक्षेत्रातल्या कुणालाही सहज समजू शकणारे. राजकारण हा त्यांचा पिंड, पण त्यामागे मदत करण्याचा भाव अधिक. राजकारणात येऊन कुणाला तरी काहीतरी मदत करता येते, याचे त्यांना खूप अप्रूप असायचे. पुणे विद्यापीठाच्या अधिसभेच्या बैठकीत पतंगराव ज्या हिरिरीने भाग घ्यायचे आणि आपला मुद्दा मांडायचे, ते







पाहिल्यावर या माणसाकडे काहीतरी वेगळे करून दाखवण्याची कमालीची इच्छा आहे, हे सहज लक्षात यायचे. भारती विद्यापीठाची स्थापना करून पहिली शाळा काढणाऱ्या पतंगरावांना आपण एक प्रचंड मोठे, खरेखुरे विद्यापीठ निर्माण करणार आहोत, हे नक्की माहीत होते. पतंगरावांना माणसांची पारख फार छान होती. प्रत्येकाकडे असलेले गुण त्यांना आधी दिसायचे. अशी फौजच्या फौज तयार करून त्यांनी आपली संस्था नावारूपाला आणली. त्यांच्या कार्यालयात सतत वर्दळ असायची. त्यांनाही अशी अवतीभवती माणसे आवडायची. प्रत्येकाला त्याची अडचण समजावून घेऊन जे शक्य असेल ते करण्याचे आश्वासन देणारे अनेक जण असतात. पण पतंगराव या सगळ्या गोष्टी मेंदूत नोंदवून ठेवायचे. त्यामुळे बरीचशी कामे करताना, त्यांना सगळा इतिहास माहीत असायचा. सांगली जिल्ह्याचा विकास हे त्यांचे ध्येय. सांगलीतला कोणताही माणूस पतंगरावांकडे आला की, त्यांच्या डोळ्यांत वेगळाच ममत्वाचा भाव असायचा. सांगलीतल्या कितीतरी जणांना भारती विद्यापीठाची दारे सताड उघडी ठेवून, शिक्षणाची गंगा त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याचे त्यांचे काम म्हणूनच अधिक महत्त्वाचे. शिक्षणाच्या क्षेत्रातील धंदेवाईकपणा, तेथील भ्रष्टाचार याबद्दल सतत चर्चा सुरू असतानाही, पतंगरावांनी मात्र आपल्या संस्थेचा दर्जा सतत वाढता कसा राहील, याकडे अधिक लक्ष दिले. देशातील एक प्रतिष्ठित आणि दर्जेदार शिक्षणसंस्था म्हणून भारती विद्यापीठाचे नाव घेतले जाते, ते त्यामुळे. मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत अनेकदा हातातोंडाशी आलेला घास गमवावा लागला, तरीही नाराज न होणारे आणि मंत्रिमंडळाच्या यादीत नावच नसताना, अगदी ऐनवेळी ते समाविष्ट करण्यासाठी आवश्यक असणारे राजकीय शहाणपण त्यांच्याकडे होते. खाते कोणतेही असो, त्यावर आपली भक्कम पकड निर्माण करणे हे त्यांचे वैशिष्ट्य. शिक्षणाचे खासगीकरण होऊ लागल्यावर दर्जा वाढवत नेत, त्याचा पुरेपूर फायदा मिळवणारे पतंगराव हे एक दूरदृष्टीचे व्यक्तिमत्त्व होते. बोलण्यात खास सांगलीचा खमंगपणा, कोणालाही मित्रत्वाचा दर्जा बहाल करणारा, खुसखुशीतपणे टिप्पणी करणारा, राजकारणात विरोधकांशी सरळ दोन हात करणारा, पण तरीही मैत्र टिकवून ठेवणारा असा हा विरळा माणूस निघून जाणे म्हणूनच दुःखकारक.

**लोकसत्ता,**
**सोमवार, १२ मार्च २०१८**



माध्यमांचे अभिवादन!

**लोकसत्ता**

दिगंबर शिंदे

जे पोटात तेच ओठात अशी त्यांची ओळख होती. त्यांचा स्वभाव धाडसी होता. राज्याच्या आणि देशाच्या राजकारणातही ते मोकळ्या आणि उमद्या मनाचे नेते म्हणून ओळखले जात. भारती विद्यापीठाची स्थापना केल्यानंतर आणि विद्यापीठाचा वटवृक्ष बहरल्यानंतर त्यांनी अनेक गरीब-गरजू विद्यार्थ्यांना मदत केली.

# खिशात ३८ रुपये आणि उरात 'विद्यापीठा'चे स्वप्न...

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी अनंत आव्हानांचा सामना करावा लागतो. त्यातच इंग्रजी आणि गणित या विषयांची धास्ती दूर व्हावी यासाठी कुणा तज्ज्ञाचे मार्गदर्शनही लाभत नाही. हे सगळं अनुभवल्यावर आपणच एक 'विद्यापीठ' काढावं ज्यात ग्रामीण विद्यार्थ्यांच्या आकांक्षांची पूर्ती होऊ शकेल, असं स्वप्न पतंगराव कदम यांनी उरात बाळगलं. त्यावेळी त्यांचं वय होतं अवघं १८ वर्षांचं आणि खिशात होते अवघे ३८ रुपये!

डॉ. पतंगराव कदम यांचं मूळ गाव सोनसळ. शे-दीडशे उंबऱ्यांच्या या गावात केवळ एकशिक्षकी शाळा आणि तीही चौथीपर्यंत होती. पुढील शिक्षणासाठी १० ते १२ किलोमीटरची पायपीट रोजचीच ठरलेली. हे सारं पतंगरावांनी पार पाडलं. कशीतरी सातवीपर्यंत शाळा झाली. पुढे काय, असा प्रश्न होता. याच वेळी कुंडलच्या वसतिगृहात राहून शिकण्याची व्यवस्था होऊ शकते ही माहिती मिळाली. घरच्यांनी तांबटकाकांच्या या वसतिगृहात शिक्षणासाठी ठेवले.

सोनसळला वस्ती झाल्यापासून पहिला मॅट्रिक होण्याचा बहुमान पतंगरावांनी पटकावला. याच वेळी किर्लोस्करवाडीच्या एका कार्यक्रमात कर्मवीर भाऊराव पाटील यांनी, 'तरुणांनी



स्वतः कमवून शिकावे,' असा संदेश दिला. मग याच संदेशानुसार 'कमवा आणि शिका' या योजनेतून अर्धवेळ नोकरी करीत पतंगरावांनी पदवीचे शिक्षण घेतले.

शिक्षण कार्यासोबतच समाजकारणाचीही उपजत प्रेरणा होतीच. यातून राजकीय क्षेत्रात प्रवेश झाला. त्यातून एसटी महामंडळाचे सदस्यपद मिळाले. याचा लाभ घेत अख्खा महाराष्ट्र पिंजून काढला. 'गाव तेथे एसटी' ही संकल्पना राबवण्यासाठी पुढाकार घेतला. त्याच जोडीने 'भारती विद्यापीठा'च्या माध्यमातून शैक्षणिक संस्थांचे जाळे विणण्याचे ठरविले. बेधडक आणि खरे ते बोलण्याचे काही तोटे होतात. मात्र, पतंगरावांनी हा धोका कायम जोपासला. यामुळेच मुख्यमंत्रिपदाने अनेकदा हुलकावणी दिली, तरी जे खाते वाट्याला येई त्यात वेगळे काहीतरी करून दाखवायची दिलदार वृत्तीही त्यांनी बाळगली होती. एरवी दुर्लक्षित असलेले वनखाते मिळाले तर त्याचाही फायदा सांगलीला करून दिला. देशातील सातवी वन अकादमी सुरू करण्यात त्यांचे प्रयत्न सत्कारणी लागले.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हास पवार पतंगराव यांच्याबरोबरच्या आठवणींना उजाळा देताना म्हणाले की, पतंगरावांचा आणि माझा सन १९६४ पासूनचा संबंध राहिला. भारती विद्यापीठाचे साम्राज्य उभे करण्यात त्यांनी घेतलेले कष्ट मी पाहिले आहेत. राजकारणात असताना त्यांनी अनेक गोरगरिबांना नेहमीच मदत केली. ते अनेकांचा आधार होते. 'जे पोटात तेच ओठात' अशी त्यांची ओळख होती. त्यांचा स्वभाव धाडसी होता. राज्याच्या आणि देशाच्या राजकारणातही ते मोकळ्या आणि उमद्या मनाचे नेते म्हणून ओळखले जात. भारती विद्यापीठाची स्थापना केल्यानंतर आणि विद्यापीठाचा वटवृक्ष



बहरल्यानंतर त्यांनी अनेक गरीब-गरजू विद्यार्थ्यांना मदत केली. ग्रामीण भागाशी त्यांची नाळ जोडली असल्यामुळे या भागातील विद्यार्थ्यांना कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते, याची त्यांना कल्पना होती. मंत्री असतानाही ते उतारवयातील वृद्ध व्यक्तींना भेटून त्यांना ते सातत्याने मदत करत असत. अथक प्रयत्न आणि कष्टाच्या जोरावर त्यांनी राजकारणात, समाजकारणात आणि शिक्षणक्षेत्रात ठसा उमटविला.

**लोकसत्ता,**
**शनिवार, १० मार्च २०१८**



माध्यमांचे अभिवादन!


## पुढारी

डॉ. प्रतापसिंह जाधव,
मुख्य संपादक

त्यांचे राजकारणापेक्षाही भारती विद्यापीठावर जास्त प्रेम होते. कारण, अशिक्षित समाजाला शिक्षण देऊन समाजाच्या अभिजन वर्गाबरोबर आणायचा त्यांचा पहिल्यापासून ध्यास होता. सामाजिक सुधारणा आधी आणि राजकारण नंतर, हा त्यांचा बाणा होता. त्यांनी राजकारण केले ते समाजाच्या व्यापक हितासाठी आणि विकासासाठी; पण राजकारणातही त्यांनी कोणाशीही वैयक्तिक शत्रुत्व बाळगले नाही. राजकारण हे तेवढ्यापुरते असते, पण माणसाच्या स्नेहाची नाती अभंग असतात, हे त्यांनी ओळखलेले होते.

# कर्तबगार, धडाडीचे नेतृत्व

काळजाच्या गाभ्यापासून घातलेली 'मित्रवर्य' ही हाक आता मला पुन्हा कधीही ऐकू येणार नाही. शिक्षणप्रेमी राजकारणी, कर्तबगार नेते, मित्रांमधले मित्र डॉ. पतंगरावजी कदम अनंतात विलीन झाले. राज्याच्या राजकारणातला एक जिद्दी, विधायकतेचा ध्यास असलेला नेता हरपला. माझे दिलदार आणि अजातशत्रू स्नेही हे जग सोडून गेले, माझी वैयक्तिक जीवनात मोठी हानी झाली. ते माझे समवयस्क. दोघांचाही जन्म १९४५ मधला. आम्ही नेहमी भेटत असू, बोलत असू. प्रत्येक वेळी 'मित्रवर्य' अशी हृदयाच्या गाभ्यापासून प्रेमळ ते हाक मारत असत. दोघांचाही जनसंपर्क अफाट. माणसं जोडण्यात विशेष रस. ते राजकारणात यशस्वी होत गेले, तर आमचा 'पुढारी' मी महाराष्ट्रभर आणि महाराष्ट्राबाहेरही नेला. ''बाळासाहेब, भारती विद्यापीठ तुमचं आहे आणि दैनिक 'पुढारी' माझा आहे,'' असे ते मला नेहमी म्हणायचे. त्यांचे राजकारणापेक्षाही भारती विद्यापीठावर जास्त प्रेम होते. कारण, अशिक्षित समाजाला शिक्षण देऊन समाजाच्या अभिजन वर्गाबरोबर आणायचा त्यांचा पहिल्यापासून ध्यास होता. सामाजिक सुधारणा आधी आणि राजकारण नंतर, हा त्यांचा बाणा होता. त्यांनी राजकारण केले ते समाजाच्या व्यापक हितासाठी आणि विकासासाठी; पण राजकारणातही त्यांनी कोणाशीही वैयक्तिक शत्रुत्व बाळगले नाही. राजकारण हे तेवढ्यापुरते असते, पण माणसाच्या स्नेहाची नाती अभंग असतात, हे त्यांनी ओळखलेले होते. २०१४च्या निवडणुकीत मोदींची मोठी लाट होती. त्यातही त्यांनी आपले स्थान अढळ राखले. असे असूनही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी त्यांचा स्नेहभाव होता. तो त्यांनी अखेरपर्यंत जपला.



एस.टी. महामंडळाचे संचालक म्हणून पतंगरावजी काम करू लागले. तेव्हापासून त्यांच्याशी माझा परिचय. त्यांनी अत्यंत धाडसाने एस.टी.चा संपूर्ण राज्यभरात विस्तार केला. 'गाव तिथे एस.टी.' असे टार्गेट समोर ठेवून अगदी खेडोपाड्यांतही एस.टी. बस नेली. बहुजन समाजातील





तरुणांना एस.टी. महामंडळात नोकऱ्या मिळवून दिल्या. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या सकारात्मक बहुजनवादी विचारांचे संस्कार झालेल्या पतंगरावजींना शिक्षणक्षेत्रात भरीव काम करायचे होते. शिक्षण हेच प्रगतीचे खरे साधन आहे, हे त्यांनी ओळखले होते; मात्र एखादी शाळा किंवा महाविद्यालय सुरू करून तेवढ्यावरच थांबतील ते पतंगरावजी कसले! त्यांनी सरळ विद्यापीठच स्थापन केले. तेही विद्येचे माहेरघर समजल्या जात असलेल्या पुण्यात, अगदी सदाशिव पेठेत. गुणग्राहकता, माणसांची अचूक पारख आणि गतिमान काम ही त्यांची स्वभाववैशिष्ट्ये. त्यामुळे त्यांनी भारती विद्यापीठाचा राज्यभर विस्तार तर केलाच; पण देशातही अनेक ठिकाणी विद्यापीठातर्फे महाविद्यालये सुरू केली.

लोकनेते (कै.) वसंतरावदादा पाटील यांनी विनाअनुदानित तत्त्वावर अभियांत्रिकी आणि वैद्यकीय महाविद्यालये सुरू करण्यास परवानगी देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. दादांचा तो निर्णय पतंगरावजींनी सर्वार्थाने प्रत्यक्षात आणला. त्यांनी कला, वाणिज्य, शास्त्र महाविद्यालये सुरू केलीच; परंतु अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन शास्त्र आदी व्यावसायिक शिक्षण देणारी महाविद्यालये ठिकठिकाणी सुरू केली. त्यासाठी सुसज्ज अशा इमारती उभ्या केल्या. साधनसुविधांच्या बाबतीत कधी कमतरता ठेवली नाही. त्यामुळे त्यांनी सुरू केलेली महाविद्यालये गुणवत्तेच्या बाबतीतही गेल्या पन्नास वर्षांत सतत अग्रेसर राहिली.

सांगली जिल्ह्यातील आजच्या कडेगाव तालुक्यातील सोनसळ हे पतंगरावजींचे गाव. या छोट्याशा गावातून, सामान्य कुटुंबातून पुढे आलेल्या पतंगरावजींनी मोठ्या कष्टाने शिक्षण घेतले. त्यांनी गरिबी अनुभवलेली होती. त्यामुळे गोरगरिबांची दुःखे काय असतात, त्याची त्यांना जाणीव होती. त्यामुळे त्यांनी भारती विद्यापीठाची दारे बहुजन समाजातील गोरगरिबांच्या मुला-मुलींकरिता सदैव खुली ठेवली. त्याकरिता प्रसंगी स्वतः तोशीस सोसून त्यांनी किमान चार पिढ्या शिक्षणाच्या माध्यमातून घडवल्या. त्यांना स्वतःच्या संस्थेत नोकऱ्या दिल्या. शासनयंत्रणेत जाण्यासाठी प्रोत्साहन दिले. मदत केली. सर्वसामान्यांची मुले शिकूनसवरून मोठी झाली पाहिजेत हा त्यांचा ध्यास होता.

सहकारक्षेत्राबद्दलही त्यांना मोठी आस्था होती. सहकारावर आधारित शेतीमाल प्रक्रिया उद्योग उभे करण्याचे महत्त्व त्यांनी जाणले होते. त्यामुळे त्यांनी अगदी सुरुवातीच्या काळातच भारती सहकारी बँक, भारती सहकारी बझार, भारती सहकारी मुद्रणालय सुरू केले. त्यांच्या कडेगाव-पलूस विधानसभा मतदारसंघात सहकारी

तत्त्वावर साखर कारखाना, सूतगिरण्या, दूध संघ अशा संस्था उभ्या केल्या. अनेक संकटांतही त्यांनी या संस्थांचा कारभार नेटका कसा होईल, याकडे कटाक्षाने लक्ष पुरवले. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना कारखान्याच्या माध्यमातून मदत केली.

पुढे सहकारमंत्री म्हणून काम करताना त्यांनी सांगली जिल्ह्यासह राज्यातील सहकारी संस्थांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले. उद्योगमंत्री म्हणून जबाबदारी सोपवली जाताच, उद्योगांच्या वाढीकडे लक्ष दिले. नाशिक, नगर, कोल्हापूर, पुणे आणि परिसरातील औद्योगिक प्रगतीस त्यांनी चालना दिली. दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट अशा संकटांनी शेतकरी अनेकदा संकटात सापडतो. राज्याचे मदत आणि पुनर्वसन खाते सांभाळत असताना पतंगरावजींनी अशा संकटग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासनातर्फे शक्य तेवढे सगळे प्रयत्न केले. नुकसानभरपाई देण्यासाठी धाडसाने निर्णय घेतले आणि ते अमलातही आणले.

अत्यंत स्पष्ट आणि परखड बोलणारे म्हणून पतंगरावजींची ओळख होती. राजकारणातही ते त्याच बिनधास्तपणे वावरले. बोलत राहिले. आत एक, बाहेर एक असले राजकारण त्यांना कशी जमले नाही. जे पोटी, तेच ओठी अशी त्यांची रीत होती. जे पटले ते अगदी उघडपणे बोलायचे. त्यात कोणताही अवमान करायचा नाही, असा त्यांचा खाक्या. त्यामुळे 'मी असे बोललोच नव्हतो' असे ते कधी म्हणाले नाहीत. शाब्दिक कसरती कधी केल्या नाहीत. त्यांचे उत्तुंग कार्य, त्यांची पक्षावरील अविचल निष्ठा आणि स्पष्टवक्तेपणा यामुळे काँग्रेस पक्षात त्यांचा अगदी दिल्लीपर्यंतही दबदबा होता. लोकसभा, विधानसभा, महापालिका, पंचायत समिती किंवा ग्रामपंचायत अशा निवडणुका त्यांनी ताकदीने लढवल्या. कोणतीच निवडणूक त्यांनी कधी कमी महत्त्वाची मानली नाही. त्यांनी कार्यकर्त्यांना ताकद दिली. उमेदवारांच्या पाठीशी ते ठामपणे उभे राहिले. त्यामुळे काँग्रेसमधील राज्यभरातील हजारो कार्यकर्त्यांना त्यांचा आधार वाटत असे.

कोणतेही काम हे गतीने आणि दर्जेदार झाले पाहिजे, असा त्यांचा आग्रह असायचा. एखाद्या कामाचे भूमिपूजन त्यांनी केले, तर ते पूर्ण होईपर्यंत त्यांचा सतत पाठपुरावा सुरू असे. कामे रेंगाळत पडलेली त्यांना चालत नसत. कामात कोणते अडथळे आहेत, ते कसे दूर करता येतील, यासाठी ते अधिकाऱ्यांच्या मदतीने प्रयत्न करीत असत. ते अडथळे दूर होईपर्यंत स्वस्थ बसत नसत. शासकीय यंत्रणेकडून कामे करून घेण्याचे त्यांचे कौशल्य कौतुकास्पद होते. आस्था, जिव्हाळा, आपुलकी आणि कामावरील निष्ठा यामुळे पतंगरावजींचे काम शासकीय यंत्रणेत कधी अडून राहत नसे. अधिकारी त्यांचे काम तत्परतेने करीत. स्वतः मंत्री असतानाही कामाची फाईल घेऊन ते मंत्रालय किंवा सचिवालयातील संबंधित खात्यात जात. अधिकाऱ्यांना कामाचे महत्त्व पटवून देत.

भारती विद्यापीठाची त्यांनी जेव्हा स्थापना केली, त्यावेळी प्रस्थापित शिक्षणक्षेत्रात काहीशी खळबळ उडाली होती. अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. सुरुवातीच्या काळात त्यांना विरोधाला, टीकेलाही सामोरे जावे लागले होते; मात्र बहुजन समाजातील या तडफदार नेत्याने माघार घेतली नाही. स्वीकारलेले व्रत कधी अर्ध्यावर सोडले नाही. घेतला वसा कधी टाकून दिला नाही. दैनिक 'पुढारी'ने एक अत्यंत प्रभावी माध्यम या नात्याने पतंगरावजींच्या प्रत्येक विधायक उपक्रमात पाठबळ दिले. प्रोत्साहन दिले. त्याची जाणीव पतंगरावजींनी आवर्जून ठेवलेली होती.

मला येथे क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी यांचीही आठवण येते. शेतकरी, कष्टकरी, धरणग्रस्त, बहुजन समाज यांच्यासाठी नागनाथअण्णांनी उभ्या केलेल्या लढ्यात आणि कार्यातही दैनिक 'पुढारी' सातत्याने त्यांच्यासोबत राहिला. त्यामुळे नागनाथअण्णांनीही दैनिक 'पुढारी'वर मनःपूर्वक प्रेम केले. दैनिक 'पुढारी' वाचल्याशिवाय त्यांचा दिवस सुरू होत नसे. पतंगरावजींनीही दैनिक 'पुढारी'वर असेच प्रेम केले.

पतंगरावजी यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत धीरोदात्त होते. त्यामुळे राजकारणात अनेक संकटे आली, तरी ते कधी डगमगले नाहीत. निवडणुकांतील जय-पराजयाने ते कधी खचून गेले नाहीत. मी त्यांना पहिल्यांदा व्याकूळ झालेले पाहिले, ते त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव अभिजित याच्या अपघाती मृत्यूच्या वेळी. तो तडाखा त्यांना अगदी जिव्हारी लागला होता. त्यावेळी अत्यंत भावविव्हल झालेले पतंगरावजी आजही मला आठवतात. नियतीने दिलेला तो घाव भरून निघणे अशक्य होते. त्यातून सावरतानाही ते मनातून ढासळून गेले. आज ते स्वतः नाहीत, ही पोकळी कशी भरून काढायची?

माझी आणि त्यांची अनेकदा भेट होत असे. त्या वेळी ते मला 'काय म्हणता मित्रवर्य...?' असे आवर्जून विचारत असत. त्यांची माझी अखेरची भेट कोल्हापूर येथे डॉ.डी.वाय. पाटील यांच्या घरी झाली. प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष अशोकराव चव्हाणही त्यावेळी उपस्थित होते. दि. ८ जानेवारीस म्हणजे त्यांच्या वाढदिवसादिवशी शुभेच्छा देण्यासाठी मी फोन केला होता. त्यावेळी फोनवर बोलणे झाले ते अखेरचेच. एक अत्यंत जवळचा, दिलखुलास स्वभावाचा आणि उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचा मित्र गेल्याचे मला दुःख आहे. त्यांचे चिरंजीव डॉ. विश्वजित कदम अत्यंत शांत, संयमी आहेत. भारती विद्यापीठाचे कार्यवाह म्हणून गेली काही वर्षे ते अतिशय समर्थपणे काम करीत आहेत. युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष म्हणूनही त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. पतंगरावजींच्या विचारांची आणि कार्याची ऊर्जा त्यांना सदैव मिळत राहणार आहे. राजकीय, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात ते वडिलांचा वारसा समर्थपणे चालवतील, याची मला खात्री आहे; पण पतंगरावजी कदम नावाचे एक अनोखे रसायन या पृथ्वीतलावरून कायमचे निघून गेले आहे, ही जाणीव मात्र अस्वस्थ करून सोडणारी आहे.

**दै. 'पुढारी'**
**१२ मार्च २०१८**

# असा माणूस होणे नाही

डॉ. पतंगराव कदम यांचे सांगली जिल्ह्यातील सोनसळ हे गाव. ८ जानेवारी १९४४ मध्ये डॉ. पतंगराव कदम यांचा जन्म झाला. त्यांचे वडील श्रीपतराव कदम प्रगतशील शेतकरी होते. आपली सर्व मुले उच्चशिक्षित व्हावी अशी त्यांची आणि डॉ. कदम यांच्या मातोश्रींची इच्छा होती. थोरले चिरंजीव मोहनराव यांनी कडेगाव येथील सोसायटीमध्ये सेक्रेटरी म्हणून नोकरी केली. त्यामुळे घरखर्चाला थोडाफार हातभार लागला. डॉ. पतंगराव यांचे चौथीपर्यंतचे शिक्षण गावात झाल्यानंतर त्यांनी शिरसगाव येथे सातवीपर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी हायस्कूल शिक्षणासाठी कुंडलमधील क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या बोर्डिंगमध्ये प्रवेश घेतला. 'कमवा आणि शिका' या योजनेंतर्गत त्यांनी अकरावी पर्यंतचे शिक्षण घेतले. कुंडलच्या बोर्डिंगमधील तांबटकाका यांनी सोनसळच्या या हिऱ्याला पैलू पडण्याचे महत्त्वाचे काम केले. त्या काळात डॉ. पतंगराव यांच्या मनावर क्रांतिसिंह नाना पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा ठसा उमटला. याचा प्रभाव डॉ. कदम यांच्या संपूर्ण जीवनशैलीवर दिसून येतो. मॅट्रिक झाल्यावर डॉ. पतंगराव यांनी साताऱ्याच्या शिवाजी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. एफवाय बीए झाल्यावर त्यांनी टिचर्स डिप्लोमा केला. घरची परिस्थिती ओळखून त्यांनी पुण्याचा रस्ता धरला. हडपसरला शिक्षकाची नोकरी पत्करली. डोक्यावर पत्र्याची पेटी आणि





माध्यमांचे अभिवादन!

## पुढारी

डॉ. पतंगराव कदम यांनी समाजकारणासाठी राजकारणात उडी घेतली. आमदार म्हणजे काय, मंत्री कसा असतो, तसेच आमदार व मंत्र्यांची कामे काय असतात, लोकांची कामे कशी करायची, हे त्यांनी दाखवून दिले. मतदारसंघाबरोबर त्यांनी जिल्ह्यातील विकासाला चालना दिली. विकासकामात त्यांनी कधी द्वेषभावना दाखवली नाही.



खिशात अकरा रुपये घेऊन त्यांनी पुण्याला प्रस्थान केले. शिक्षकाची नोकरी करीत गरीब मुलांसाठी काहीतरी करावे, या उद्देशाने आपले निवडक साथीदार लोकांना घेऊन १० मे १९६४ मध्ये भारती विद्यापीठाची स्थापना केली.

**भारती विद्यापीठ नावाचे आभाळ**

ग्रामीण भागातील मुले इंग्रजी आणि गणितामध्ये कमी पडतात, यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे, असे डॉ. कदम यांना वाटले. त्यांनी या अवघड विषयांच्या परीक्षा भारती विद्यापीठामार्फत सुरू केल्या. विद्येच्या माहेरघरात म्हणजे पुण्यात भारती विद्यापीठाचा बोर्ड लागला, त्या वेळी अनेकांनी टीकाही केली, परंतु पतंगराव डगमगले नाहीत. त्या काळात जवळपास १५०० परीक्षा केंद्रे सुरू झाली. इंग्रजी व गणित विषयांच्या परीक्षार्थींची संख्या जवळपास दोन लाखांवर गेली. १९६९ मध्ये भारती विद्यापीठाच्या विस्ताराला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. ज्येष्ठ नेते बाळासाहेब देसाई यांनी डॉ. पतंगरावांची जिद्द आणि धडपड पाहून त्यांना जागा दिली. या ठिकाणी शंकरराव मोरे विद्यालय सुरू करण्यात आले.

हळूहळू पुण्यात भारती विद्यापीठाचा पसारा वाढत गेला. १९७८ मध्ये भारती विद्यापीठाला उच्च शिक्षणासाठी परवानगी मिळाली. या काळात डॉ. कदम यांनी चार महाविद्यालये सुरू करून एक नवीन विक्रम प्रस्थापित केला. भारती विद्यापीठाचे नाव गल्लीपासून दिल्लीपर्यंत गेले.

**जीवनातील सर्वोत्कृष्ट क्षण**

भारती विद्यापीठाचे वाढते साम्राज्य आणि गुणवत्ता पाहून १० मजली इमारतीला परवानगी मिळाली. १९८४ मध्ये पुण्यातील पहिली १० मजली इमारत म्हणून भारती विद्यापीठाचे नाव कोरले गेले. याच काळात महाराष्ट्र शासनाने धनकवडी येथे भारती विद्यापीठाला ७० एकर जागा दिली. त्या ठिकाणी मेडिकल, डेंटल, इंजिनिअरिंग कॉलेज आणि भारती हॉस्पिटलची उभारणी करण्यात आली.

**भारती विद्यापीठाच्या शाखांचा विस्तार**

'गतिमान शिक्षणातून समाज परिवर्तन' हे ध्येय मनात ठेवून वयाच्या १९ व्या वर्षी कदम यांनी भारती विद्यापीठाची स्थापना केली. गेल्या ५४ वर्षांमध्ये भारती विद्यापीठ ही अग्रगण्य संस्था म्हणून गणली जात आहे. विद्यापीठाच्या माध्यमातून पूर्व प्राथमिक ते पीएचडीपर्यंतचे शिक्षण देणाऱ्या १८० शैक्षणिक शाखा आहेत. धनकवडी, एरंडवणे, दिल्ली, नवी मुंबई, सांगली, कोल्हापूर, कडेगाव, पलूस या शहरांत १० शैक्षणिक संकुले आहेत. हजारो विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत. विशेष करून गोरगरिबांच्या मुला-मुलींसाठी मोफत शिक्षण दिले जाते, हे खास वैशिष्ट्य. सामान्य लोकांच्या विद्यार्थ्यांची वर्षाला कोट्यवधी रुपयांची फी माफ केली जाते. कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकीय, दंतचिकित्सा, व्यवस्थापन, औषध निर्माणशास्त्र, आयुर्वेद, होमिओपॅथी, नर्सिंग, हॉटेल व्यवस्थापन, विधी, सामाजिक शास्त्रे, समाजकार्य, वास्तुरचनाशास्त्र, पर्यावरणशास्त्र, शारीरिक शिक्षण, दृश्य कला, कृषी, जैविक तंत्रज्ञान, नेत्रविद्या, श्रवणशास्त्र, छायाचित्रकला आदी अभ्यासक्रम भारती विद्यापीठात शिकविले जातात.

**एसटी बोर्डावर निवड, हजारो युवकांना नोकऱ्या**

दरम्यानच्या काळात डॉ. कदम यांची जिद्द, चिकाटी व कामाचा आवाका पाहून यशवंतराव मोहिते यांनी त्यांना एसटी बोर्डचे मेंबर केले. डॉ. पतंगराव यांनी एसटीचे रुपडे बदलले. गाव तिथे एसटी सुरू केली. ग्रामीण भागातील आणि विशेष करून सांगली जिल्ह्यातील हजारो बेरोजगार युवकांना एसटीमध्ये नोकऱ्या लावल्या. याच काळात त्यांनी सांगलीचा स्वतंत्र विभाग सुरू केला. सांगली, विटा व कडेगावला आधुनिक बसस्थानक बांधले. दळणवळण वाढल्याने कडेगाव, पलूस तालुक्यांची बाजारपेठ फुलली.

**समाजकारणासाठी राजकारण**

डॉ. पतंगराव कदम यांनी समाजकारणासाठी राजकारणात उडी घेतली. आमदार म्हणजे काय, मंत्री कसा असतो, तसेच आमदार व मंत्र्यांची कामे काय असतात, लोकांची कामे कशी करायची, हे त्यांनी दाखवून दिले. मतदारसंघाबरोबर त्यांनी जिल्ह्यातील विकासाला चालना दिली. विकासकामात त्यांनी कधी द्वेषभावना दाखवली नाही. सिंचन योजना सुरू व्हाव्यात म्हणून त्यांनी सतत प्रयत्न केले. कडेगाव व पलूस तालुक्यांची निर्मिती करून विकासाला वाव दिला. मतदारसंघातील, जिल्ह्यातील रस्ते एकमेकांना जोडले. अनेक गावांत पिण्याच्या पाण्याची सोय केली. मतदारसंघात शैक्षणिक व आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यांच्यामुळे हजारो मुली शिक्षण घेताना दिसत आहेत. राजकारणात राहून मतदारसंघासाठी एवढे काम करणारा दुसरा नेता महाराष्ट्रात नाही.

**पुढारी,**
**शनिवार, १० मार्च २०१८**

# सडेतोड, परखड आणि सरळमनाचा माणूस

सडेतोड, परखड आणि तितकाच सरळ मनाचा माणूस म्हणजे डॉ. पतंगराव कदम. त्यांचे निधन सर्वांनाच चटका लावून गेले. प्रचंड कष्ट करण्याची तयारी, उत्साह आणि बऱ्यावाईट प्रसंगांना सामोरे जाण्याची त्यांची हातोटी हे त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण गुण होते. एक शिक्षक, विद्यापीठाचा कुलपती, आमदार, मंत्री असा त्यांचा शून्यातून विश्व निर्माण करणारा प्रवास थक्क करणारा आहे. सांगलीतल्या सोनसळसारख्या खेड्यातून स्वतःच्या हिमतीवर पतंगरावांनी पुण्यासारख्या सांस्कृतिक राजधानीत, विद्येच्या माहेरघरात भारती विद्यापीठाचा बुलंद गड उभा केला. एका खोलीत सुरू केलेल्या शाळेचा पसारा आज देश-विदेशांत पसरला आहे. झपाटल्यासारखे काम करणे हा पतंगराव कदम यांचा स्थायी स्वभाव. एवढे प्रचंड संस्थात्मक कार्य करून आणि राजकारण करूनही पतंगरावांना शत्रू नाहीत. तोंडाने फटकळ असले तरी अत्यंत सरळ मनाचा माणूस अशी ख्याती असल्यामुळे सारेच त्यांच्यावर प्रेम करायचे. सांगली जिल्ह्यातील पूर्वीचा भिलवडी-वांगी आणि सध्याचा पलूस-कडेगाव हा पतंगराव कदमांचा विधानसभा मतदारसंघ. सात वेळा निवडून आलेल्या पतंगरावांनी एक वेळ पराभवाचा धक्काही पचवला. राज्याच्या मंत्रिमंडळात उद्योग, महसूल, शिक्षण, वन, पुनर्वसन अशी अनेक खाती सांभाळताना पतंगरावांनी कधी सामान्य माणसाशी नाळ तुटू दिली नाही. अखेरपर्यंत पतंगराव काँग्रेसशी एकनिष्ठ राहिले. राष्ट्रवादीच्या स्थापनेनंतर सांगली जिल्ह्यातील मातब्बर नेते काँग्रेस सोडून गेले. प्रकाशबापू पाटील, पतंगराव कदम असे चारदोन नेते काँग्रेसमध्ये राहिले. मात्र, त्याही परिस्थितीत पतंगरावांनी अपूर्व यश मिळविले. राजकारण करतानाही पतंगरावांनी सर्वपक्षीय नेत्यांशी प्रेमाचेच






माध्यमांचे अभिवादन!

**सामना**

राजकारण निवडणुकीपुरते करावे असे सतत सांगणाऱ्या पतंगराव कदमांना आजकाल सतत बदलत चाललेल्या राजकीय निष्ठा मात्र कायम अस्वस्थ करायच्या. लबाड आणि खोटे बोलणे पतंगरावांना कधी जमले नाही. हा त्यांचा गुण लबाड लोकांच्या स्वार्थी राजकारणात दुर्गुण ठरला. साधा, स्वच्छ, सरळ मनाचा, फटकळ पण खरे बोलणारा नेता म्हणजे पतंगराव कदम.




संबंध ठेवले. कोणत्याही खात्याचे मंत्रिपद भूषवताना त्यांनी कधीच पक्षीय अभिनिवेश ठेवला नाही. त्यामुळे सर्वांनाच ते आपले मंत्री वाटायचे. पुण्यात येऊन त्यांनी पाच–पंचवीस वर्षांत भारती विद्यापीठ उभारले. भारती विद्यापीठाच्या कर्तृत्वाला सीमा उरल्या नाहीत. पुण्यात शंभर वर्षांचा इतिहास सांगणाऱ्या शिक्षणसंस्था आज किती विस्तारल्या आणि भारती विद्यापीठ किती विस्तारले, याचा विचार केला गेला पाहिजे. पतंगरावांचा दिलखुलास स्वभाव आणि जबर इच्छाशक्ती यामागे आहे. आयुष्यभरात पतंगराव कदम यांनी कोणाचा दुस्वास केला नाही. बरे–वाईट प्रसंग पचवले, पण कोणाबद्दल कधी कटुता मनात ठेवली नाही. आपला मुलगा अभिजितचा मृत्यू त्यांनी धीराने पचवला. निवडणुकीच्या रणांगणात पतंगरावांवर विरोधकांनी पाठीमागून वार केले. मात्र, पतंगरावांनी याचा बदला किंवा सूड कधीच घेतला नाही. संधी मिळूनसुद्धा पतंगरावांनी कोणावर पाठीमागून वार केला नाही. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाने मात्र सदैव त्यांना हुलकावणी दिली. राज्यात जेव्हा जेव्हा मुख्यमंत्रीबदलाचे वारे वाहू लागत, त्या प्रत्येक वेळी काँग्रेसश्रेष्ठी पतंगरावांच्या नावाचा विचार करत असल्याची बातमी हमखास असे, मात्र ऐनवेळी त्यांचे नाव मागे पडायचे. एवढे होऊनही त्यांनी काँग्रेस पक्षाशी मात्र कधीही प्रतारण केली नाही. 'भान ठेवून योजना आखणारा आणि बेभान होऊन योजना राबवणारा माणूस म्हणजे पतंगराव कदम' असे सार्थ वर्णन जयंतराव टिळक यांनी केले होते. पतंगराव कुठल्या खात्याचे मंत्री नाहीत तर आम माणसाचे मंत्री राहिले. 'भारती अभिमत विद्यापीठाचा तहयात कुलपती' ही पतंगरावांची स्वतःची आवडती पदवी. राजकारण निवडणुकीपुरते करावे असे सतत सांगणाऱ्या पतंगराव कदमांना आजकाल सतत बदलत चाललेल्या राजकीय निष्ठा मात्र कायम अस्वस्थ करायच्या. लबाड आणि खोटे बोलणे पतंगरावांना कधी जमले नाही. हा त्यांचा गुण लबाड लोकांच्या स्वार्थी राजकारणात दुर्गुण ठरला. साधा, स्वच्छ, सरळ मनाचा, फटकळ पण खरे बोलणारा नेता म्हणजे पतंगराव कदम. असाच लौकिक आर.आर. पाटलांनी मिळविला होता. पतंगराव आबांना धाकटा भाऊ मानत असत. आज पतंगरावांच्या निधनाने आबांचीही आठवण येते. सांगलीत दिलदार नेत्यांची आज खूप कमी भासते आहे.

**सामना,**
**सोमवार, १२ मार्च २०१८**



# कोसळलेल्या माणसांचा आधारवड



माध्यमांचे अभिवादन!

**पुण्यनगरी**

गेल्या काही महिन्यांपासून डॉ. पतंगराव कदम अधूनमधून आजारी असायचे. त्यांच्या नेहमीच्या दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर या आजारातून ते बाहेर येतील, असा विश्वास होता; परंतु नियतीच्या मनात काहीतरी वेगळेच होते. कायम हसरा असणारा नेता एकदम असा रुग्णशय्येवर पडून राहणे कमालीचे वेदनादायी होते. पतंगरावांचे वय जाण्याचे नव्हते. गेल्या विधानसभा निवडणुकीच्या वेळीच त्यांनी ही आपली शेवटची निवडणूक असल्याचे जाहीर करून राजकीय निवृत्तीचे संकेत दिले होते; परंतु थेट जीवनातून त्यांनी घेतलेली 'एक्झिट' मात्र सर्वांनाच हुरहुर लावून गेली आहे. एक साधा शिक्षक ते स्वतः स्थापन केलेल्या विद्यापीठाचा कुलपती, सहकारी संस्थांचा संस्थापक, राज्याच्या मंत्रिमंडळात विविध खात्यांच्या कारभारावर ठसा उमटवणारा नेता अशी त्यांची बहुअंगी ओळख होती. ते लाखोंचे पोशिंदे होते. कुणी किती संस्था स्थापन केल्या, यापेक्षा कोणत्या परिस्थितीतून येऊन संस्था स्थापन केल्या आणि त्या कशा चालवल्या, याला जास्त महत्त्व असते. सभेत उभे राहिले की पतंगरावांचे एक वाक्य ठरलेले असायचे, ते म्हणजे 'विश्वाची उत्पत्ती झाल्यापासून गावचा पहिला पदवीधर मीच.' त्यात त्यांचा बडेजाव नव्हता, तर हा विश्वास होता, सामान्य कष्टकरी पोराने एका कष्टकऱ्याच्या मनात पेरलेला. एका शेतकऱ्याच्या पोटी जन्म घेतलेला मुलगा स्वकर्तृत्वाने शिक्षक होतो. ३८ रुपये खिशात असताना अवघ्या १८व्या वर्षी विद्यापीठ स्थापन करण्याचे स्वप्न पाहतो. स्वप्न सर्वच पाहतात; परंतु त्यांच्या पूर्णतेसाठी फार कमी लोक स्वप्नांचा पाठलाग करतात. पतंगराव तसे नव्हते. विद्यापीठ स्थापन करून त्या विद्यापीठाचे ते कुलपतीही झाले.

पतंगरावांनी भारती विद्यापीठ कधी स्थापन केले, हे कुणीही सांगेल; परंतु हा माणूस एसटीचे पैसे वाचवायला सोनसळमधून कुंडलला चालत जायचा. एसटी चुकली म्हणून या माणसाने विट्याच्या पाण्याच्या टाकीवर रात्र काढली होती. दहा बाय दहाच्या खोलीत भारती विद्यापीठाची स्थापना झाली. या विद्यापीठाच्या आज देश-विदेशात १८० संस्था आहेत. या सर्वांवरून पतंगरावांची जिद्द, कष्ट आणि दूरदृष्टी दिसते. डॉ. पतंगराव कदम यांचे मूळ गाव सोनसळ. शे-दीडशे उंबऱ्यांच्या या गावात केवळ एकशिक्षकी शाळा आणि तीही चौथीपर्यंत होती. सोनसळला वस्ती झाल्यापासून पहिला मॅट्रिक होण्याचा बहुमान पतंगरावांनी पटकावला. याच वेळी किर्लोस्करवाडीच्या एका कार्यक्रमात कर्मवीर भाऊराव पाटील यांनी, 'तरुणांनी स्वतः कमवून शिकावे,' असा संदेश दिला. याच संदेशानुसार 'कमवा आणि शिका' या योजनेतून अर्धवेळ नोकरी करत पतंगरावांनी पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले. एका खासगी शिक्षणसंस्थेत नोकरी लागली; परंतु स्वप्न

पिढीजात दारिद्र्य वाट्याला आलेले, दुष्काळ आणि निसर्गाच्या आपत्तीच्या सतत झळा सोसलेल्या, कष्टकरी कुटुंबातून मोठ्या जिद्दीने शिक्षण घेत शिकलेल्या हजारो मुलांना भारती विद्यापीठाने शिक्षणाचा प्रकाश दिला. त्यांची आयुष्ये उजळून निघाली. कित्येक पिढ्या ज्यांचे राहणीमान बदलले नाही, अशा लाखो कुटुंबांचे राहणीमान बदलून गेले. ते सारे झाले पतंगरावांनी उभ्या केलेल्या संस्थांच्या परीसस्पर्शाने.



मोठे होते. ते त्यांनी पूर्ण केले. शिक्षणाबरोबरच त्यांना समाजकारणाचीही आवड होती. सांगली जिल्हा हा वसंतदादांचा जिल्हा. तिथे त्यांच्याशिवाय राजकीय पान हलत नव्हते. अशा काळात पतंगरावांनी काँग्रेसची उमेदवारी मागितली. ती न मिळाल्याने त्यांनी बंडखोरी केली. अवघ्या २०० मतांनी पराभव झाला. त्यामुळे स्वस्थ न बसता पुन्हा तयारी करून ते विधानसभेत पोहोचले. त्यानंतर सातत्याने ते विधानसभेत येत राहिले. राजकारणाची सुरुवात बंडखोरीने झाली, तरी पतंगरावांनी नंतर मात्र आपली निष्ठा कायम काँग्रेसवरच ठेवली. काँग्रेसचे काही काळ प्रदेशाध्यक्ष होण्याची संधी त्यांना मिळाली; परंतु ती अल्पकाळच होती. पतंगराव स्वतःचा उल्लेख 'भावी मुख्यमंत्री' असा करायचे. त्याचा त्यांना पक्षातून त्रास झाला. पक्षांतर्गत विरोधक तयार झाले. महाराष्ट्रात जेव्हा केव्हा मुख्यमंत्री बदलण्याची चर्चा सुरू व्हायची, तेव्हा प्रत्येक वेळी पतंगराव यांचे नाव मुख्यमंत्रिपदासाठी सर्वांत पुढे असायचे; परंतु ऐनवेळी दुसऱ्याचेच नाव पुढे यायचे, तरी पतंगराव कधीही नाराज झाल्याचे दिसले नाही. पतंगराव काँग्रेस नेते तर होतेच; शिवाय त्यांना राजकारणाचे विद्यापीठ म्हणून संबोधले जात होते. राजकारणात यशामागून यश मिळत असताना गावची कामे करणे त्यांनी कधी सोडले नाही. सध्या खासगी शिक्षणक्षेत्रात अवाढव्य फीची चर्चा होते. पतंगराव यांचे विद्यापीठही खासगीच आहे. इतक्या मोठ्या पदांवर जाऊनही आपण कोणत्या परिस्थितीत शिक्षण घेतले, याची त्यांना जाण होती. परिस्थितीमुळे शिक्षणाची दारे कोणालाही बंद होऊ नयेत, याची ते काळजी घेत. दातृत्व व कर्तृत्व यांचा संगम त्यांच्याकडे होता. एकीकडे भारती विद्यापीठाचे कुलपती आणि त्याच वेळी रयत शिक्षणसंस्थेच्या कार्यकारिणीचे सदस्य अशी दोन्ही परस्परविरोधी पदे ते लीलया सांभाळायचे आणि दोन्ही संस्थांना न्याय द्यायचे. पिढीजात दारिद्र्य वाट्याला आलेले, दुष्काळ आणि निसर्गाच्या आपत्तीच्या सतत झळा सोसलेल्या, कष्टकरी कुटुंबातून मोठ्या जिद्दीने शिक्षण घेत शिकलेल्या हजारो मुलांना भारती विद्यापीठाने शिक्षणाचा प्रकाश दिला. त्यांची आयुष्ये उजळून निघाली. कित्येक पिढ्या ज्यांचे राहणीमान बदलले नाही, अशा लाखो कुटुंबांचे राहणीमान बदलून गेले. ते सारे झाले पतंगरावांनी उभ्या केलेल्या संस्थांच्या परीसस्पर्शाने.

पतंगरावांच्या सहकारातील कामाची चर्चा कमी होते. त्यांनी बँक, सूतगिरण्या, साखर कारखाने स्थापन केले. या सर्व संस्था उत्तम चालवल्या आहेत. त्यांच्या ६०व्या वाढदिवसानिमित्त ते म्हणाले होते. ''मला सांगलीत भव्यदिव्य रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करायचे आहे.'' तो शब्द खरा करण्यासाठी केवळ एकच वर्ष लागले. त्यांच्या कामाचा धडाकाच असा होता. २००५ मध्ये ६१व्या वाढदिवसाच्या वेळी त्यांनी ५० एकरांवरील वैद्यकीय महाविद्यालयाचा पाया खोदला. १२ वर्षांत त्या जागेवर १०० कोटी रुपयांचा वैद्यकीय महाविद्यालयाचा परिसर फुलला आहे. महसूल, सहकार, वन, मदत आणि पुनर्वसन अशी महत्त्वाची खाती सांभाळत महाराष्ट्राच्या उभारणीत त्यांचे भरीव योगदान होते. त्यांची काँग्रेसवरची निष्ठा इतकी मोठी होती की, त्यांना जेव्हा लीलावतीत दाखल केल्याचे कळले, तेव्हा सोनिया गांधी स्वतः त्यांची भेट घेण्यासाठी लीलावतीला आल्या. काँग्रेसच्या हायकमांडशी चांगले संबंध असतानाही त्याचा त्यांनी कधीच गैरवापर केला नाही. पुण्यातल्या हिंजवडीत आज मोठ्या दिमाखात उभे असलेले 'आयटी पार्क' पतंगरावांच्या दूरदृष्टीचे साक्षीदार आहे. त्यांचे अनेकांशी मतभेद झाले. विचार पटले नाहीत; परंतु सर्व मित्रपक्ष आणि विरोधी नेत्यांशी त्यांचे वेगळेच संबंध होते. एक मनमिळावू नेता अशी पतंगरावांची ओळख होती. एखाद्यावर टीका करताना तो किती मोठा आहे, याची ते भीडभाड जशी बाळगत नसत, तसेच एखाद्याचे कौतुक करताना आपल्या पक्षातले कोण काय म्हणेल, याची पर्वा त्यांना नसायची. त्यामुळे शरद पवार यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याचे काय चुकले, असे जाहीरपणे सांगताना त्यांच्यासारख्या नेत्याची कुवत असूनही त्यांना पंतप्रधानपद मिळाले नाही, असे ते बिनधास्त सांगून टाकायचे. सत्ता असतानाही मंत्रिपदाची मिजास न करता स्वतः फायली घेऊन ते सहकारी मंत्र्यांच्या, सचिवाच्या दारात हक्काने फाईल क्लिअर करण्यासाठी जायचे. तोच मोकळेपणा त्यांनी एखाद्याचे काम करतानाही दाखवला. लोकांची काम होणे महत्त्वाचे, तिथे 'प्रोटोकॉल' उपयोगाचा नाही, असे त्यांचे ठाम मत होते. याबाबत त्यांच्यापुढे बॅ. अ. र. अंतुले यांचा आदर्श होता. पतंगरावांनी माणसे उभी केली आणि कोसळलेल्या माणसांचेही आधारवड झाले. प्रत्येक गोष्ट जाहीरपणे बोलणाऱ्या पतंगरावांनी त्याबद्दल मात्र नेहमी मौन बाळगले. पतंगरावांना 'पुण्यनगरी'ची विन्रम आदरांजली!

**पुण्यनगरी,**
**१२ मार्च २०१८**

# कर्मयोगी डॉ. पतंगराव कदम

कुणाही माणसाला एका जन्मात शक्य नाही असे प्रचंड काम करणारा प्रतापी महापुरुष म्हणजे डॉ. पतंगराव कदम. शुक्रवारी रात्री मुंबईच्या लीलावती रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला आणि सोनसळचा सोनहिरा पंचत्वात विलीन झाला. एखादा माणूस गेल्यावर दुःख हे होतेच पण तोच माणूस सुपरमॅन असेल आणि त्याच्या प्रत्येक वृत्तीला मानवतेचा स्पर्श असेल, तर त्या दुःखाला परिसीमा नसते. म्हणूनच डॉ. पतंगरावांच्या निधनाने महाराष्ट्र हळहळतो आहे आणि सोनहिरा खोऱ्यात घराघरात हुंदका फुटला आहे. पतंगराव कदम नावाच्या कर्मयोग्याला आपण कायमचे पारखे झालो, याची वेदना व्यक्त होते आहे. ज्या गावात शाळा नाही, पाणी नाही, शेती पिकत नाही, दुष्काळ, टंचाई पाचवीला पुजलेली आहे, अशा गावात शेतकरी कुटुंबात व्यवस्थेशी व परिस्थितीशी झुंजत एक मुलगा शिकला. गावातील पहिला पदवीधर झाला, पुण्यात गेला. रयतच्या शाळेत शिक्षक म्हणून त्याने सुरुवात केली आणि वयाच्या विसाव्या वर्षी दहा बाय दहाच्या एका पत्र्याच्या खोलीत 'भारती विद्यापीठ' असा फलक लावून या माणसाने विद्येचे माहेरघर पुणे येथे विद्यापीठाची स्थापना केली. त्या वेळी अनेक लोक हसले, कुचेष्टा झाली पण ज्यांची ध्येये मोठी असतात, स्वप्ने अफाट असतात आणि त्यामागे धावण्याची ऊर्जा अचंबित करणारी असते, अशा पैकीच हा वीस वर्षांचा मुलगा होता. पतंगरावांनी केवळ डोळ्यांत न मावणारी स्वप्ने पाहिली नाहीत तर ती प्रत्यक्षात साकारली. म्हणून पुण्यातच नव्हे देशभर आणि देशाबाहेरही भारती विद्यापीठ आणि ते उभे करणाऱ्या डॉ. पतंगरावांचा डंका पिटला जातो आहे. पतंगरावांनी जे उभे केले आहे ते पाहिले की, ही एका जन्मातील कामगिरी वाटत नाही. पतंगरावांना गतीचे, भव्यतेचे आणि उंचीचे वेडच म्हणावे लागेल. सांगली असो वा दिल्ली, भव्य सुसज्ज गगनचुंबी, देखणी इमारत आणि शैक्षणिक संकुल म्हणजे भारती विद्यापीठ हे समीकरणच बनून गेले आहे. त्यामागे डॉ. कदम आणि त्यांच्या कुटुंबीयांची अथक धडपड आहे. भारती विद्यापीठाला नुकतीच ५० वर्षे पूर्ण झाली. विद्यापीठाचा प्रचंड कारभार आहे. लक्षावधी विद्यार्थी शिकत आहेत. तितकेच शिकून बाहेर पडले. सुमारे १५-२० हजार शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर भारती विद्यापीठाच्या सेवेत आहेत आणि इतका प्रचंड कारभार असताना डॉ. पतंगराव कदम या माणसाने शिक्षणाबरोबरच राजकारण, समाजकारण साधत उद्योग, व्यापार, सहकार, शेती, बँकिंग, आरोग्यसेवा यामध्ये जे काम केले आहे, तेही अफलातून आहे. त्यांच्या सार्वजनिक कामाची सुरुवात एस.टी.चे बोर्ड मेंबर अशी झाली. तेथे त्यांनी झपाटून काम केले. आपपरभाव किंवा वैर वगैरे न ठेवता कुणाच्याही संकटात धावून जाणे हा त्यांचा स्थायीभाव



## माध्यमांचे अभिवादन!

## तरुण भारत

पतंगरावांनी केवळ डोळ्यांत न मावणारी स्वप्ने पाहिली नाहीत तर ती प्रत्यक्षात साकारली. म्हणून पुण्यातच नव्हे देशभर आणि देशाबाहेरही भारती विद्यापीठ आणि ते उभे करणाऱ्या डॉ. पतंगरावांचा डंका पिटला जातो आहे. पतंगरावांनी जे उभे केले आहे ते पाहिले की, ही एका जन्मातील कामगिरी वाटत नाही. पतंगरावांना गतीचे, भव्यतेचे आणि उंचीचे वेडच होते असे म्हणावे लागेल. सांगली असो वा दिल्ली, भव्य सुसज्ज गगनचुंबी, देखणी इमारत आणि शैक्षणिक संकुल म्हणजे भारती विद्यापीठ हे समीकरणच बनून गेले आहे. त्यामागे डॉ. कदम आणि त्यांच्या कुटुंबीयांची अथक धडपड आहे.



होता. मोठी दानत असलेला नेता अशीही त्यांची ख्याती होती. पुणे परिसरातील एका प्राध्यापकाचा शोधनिबंध जागतिक परिषदेसाठी निवडला गेला होता. तो वाचण्यासाठी त्यांना निमंत्रण होते, पण विदेशी जाण्यासाठी पुरेसे पैसे नाहीत म्हणून ते इच्छा असूनही परिषदेला जाणार नव्हते. वृत्तपत्रात ही बातमी आली होती. डॉ. कदमांच्या वाचनात ती आली. दुसरे दिवशी सकाळी ते त्यांच्या घरी पोहोचले आणि त्यांनी रकमेची पूर्तता केली. अडचणीत असलेल्यांना ते सढळ हस्ते मदत करत. भारती विद्यापीठ व सोनहिरा उद्योगसमूहात नोकरीला लावत असत. नोकरी लावणे हा अनेकांचा व्यवसाय आहे, पण कदमांनी आपल्या मतदारसंघात आणि राज्यात अनेकांना निरपेक्ष रोजगार दिला. 'एक नया पैसा न घेता नोकरी देणारा नेता' अशी त्यांची ओळख आहे. पतंगराव कदम यांच्यावर यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, यशवंतराव मोहिते यांचे संस्कार होते. आमदार होताना आणि आमदारकी राखताना त्यांना नेहमीच संघर्ष करावा लागला. भिलवडी वांगी मतदारसंघातून ते सात वेळा निवडून आले. राज्याच्या मंत्रिमंडळात अनेक खाती त्यांनी सांभाळली. ते शरद पवार, शंकरराव चव्हाण, सुशीलकुमार शिंदे आणि सुधाकरराव नाईकांच्या मंत्रिमंडळात होते. त्यांना मुख्यमंत्रिपदाची संधी मिळायला हवी होती. काँग्रेस नेतृत्वाने तसा त्यांच्यावर अन्यायच केला. त्यांची ही एकच इच्छा अपुरी राहिली.

अनेक मुलामुलींना फी माफ, पुस्तके-वह्या मोफत, एस.टी. पाससाठी मदत... रुग्णांना उपचारासाठी मदत, कदमांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत केली नाही असा भिलवडी वांगीत माणूस नाही. कदमांनी कधी जातीयता किंवा पक्षीयता बाळगली नाही. कुणीही त्यांच्याकडे काम घेऊन गेला की, ते करण्यासाठी ते कामाला लागत. इतकी मोठी सत्ता, संस्था आणि व्याप असूनही हा माणूस लोकांना थेट भेटत असे. पतंगरावांनी फोन उचलला नाही किंवा पीए मार्फत फोन घेतला असे कधीही होत नसे. लोकसभेला ते सांगलीतून उभे राहणार अशी चर्चा होती. अलीकडच्या काळात आर.आर. पाटील, मदन पाटील यांचे निधन झाले. त्या पाठोपाठ डॉ. कदमांचे निधन हा काँग्रेसला, सांगली जिल्ह्याला, रचनात्मक काम करणाऱ्या अनेकांना धक्का होता. सोनिया गांधी रुग्णालयात येऊन त्यांची विचारपूस करून गेल्या, यातच त्यांचे दिल्लीच्या राजकारणातले वजन स्पष्ट होते. त्यांच्या यशात त्यांच्या मातोश्री, बंधू व कुटुंबीयांचाही मोठा वाटा आहे. एकत्र कदम कुटुंब आणि कुटुंबीयांचे ध्येय हे डॉ. कदम यांचे कौशल्य होते. तीच त्यांची शक्ती होती. डॉ. कदम यांनी आपल्या राजकीय वाटचालीत अनेक मैलाचे दगड पार केले. ताकारी-म्हैसाळ टेंभू योजनेचे पाणी जोपर्यंत सांगली जिल्ह्यातील दुष्काळी भागाला हिरवेगार करेल आणि गरिबांच्या घरातील मुलेमुली शिकून ज्ञानाचे झेंडे उंचावतील, तेथे तेथे डॉ. कदम यांचे नाव निघेल. त्यांचे 'तरुण भारत'शी अतिशय स्नेहाचे संबंध होते. 'तरुण भारत'च्या कार्यक्रमाला, सांगली आवृत्तीच्या वर्धापदिनाला ते आले नाहीत असे होत नसे. यंदा ते आले नाहीत तेव्हाच मनात पाल चुकचुकली. त्यांच्यासारखी माणसे क्वचितच जन्माला येतात. आपल्या कामाची छाप ठेवून जातात. सोनसळच्या या सोनहिऱ्याला, कर्मयोग्याला भावपूर्ण श्रद्धांजली.

**तरुण भारत,**
**१२ मार्च २०१८**

# सांगलीचा स्वयंप्रकाशी सोनहिरा

केवळ सांगली जिल्ह्यातीलच नव्हे तर संपूर्ण दक्षिण महाराष्ट्राचे आशास्थान व उमदे नेतृत्व म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पतंगराव कदम यांचे निधन खरोखरच जनसामान्यांना हळहळ वाटायला लावणारी यातनादायक घटना आहे. सोलापूरचे सुशीलकुमार शिंदे, सिंधुदुर्गचे नारायणराव राणे यांच्याप्रमाणेच स्वकर्तृत्वाने आपले अढळ स्थान निर्माण करणारे स्वयंभू नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेल्याने सामान्यजन निराधार झाल्यावाचून राहणार नाहीत.

यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय वारसदार म्हणून ज्याप्रमाणे शरद पवारांनी आपली राजकीय कारकीर्द आकाराला आणली, त्याचप्रमाणे भूतपूर्व खानापूर तालुक्यातील सोनसळ या छोट्या गावात जन्मलेल्या पतंगरावांनी यशवंतराव मोहिते यांचा राजकीय वारसा पुढे नेतानाच अनेक सामाजिक विकास प्रकल्प उभारले व सर्वांशी प्रेमाने संबंध प्रस्थापित करीत महाराष्ट्र मंत्रिमंडळातील एक प्रभावी मंत्रीच नव्हे तर मुख्यमंत्रिपदाचे दावेदार ही ओळख निर्माण केली. राजकीय पदे येतजात राहतील पण स्वतःच्या कामाने इतर अनेकांना व्यवसाय व पोटाला दाम पुरवणारे लाखाचे पोशिंदे दुर्मीळ असतात. अशा दुर्मीळ नेत्यांपैकीच पतंगराव हे एक स्वयंप्रकाशी नेतृत्व होते.

अत्यंत तरुण वयापासून त्यांनी सार्वजनिक जीवनाला प्रारंभ केला.





माध्यमांचे अभिवादन!

## महासत्ता

पतंगरावांनी यशवंतराव मोहिते यांचा राजकीय वारसा पुढे नेतानाच अनेक सामाजिक विकास प्रकल्प उभारले व सर्वांशी प्रेमाने संबंध प्रस्थापित करीत मंत्रिमंडळातील एक प्रभावी मंत्रीच नव्हे तर मुख्यमंत्रिपदाचे दावेदार ही ओळख निर्माण केली. राजकीय पदे येत-जात राहतील, पण स्वतःच्या कामाने इतर अनेकांना व्यवसाय व पोटाला दाम पुरवणारे लाखाचे पोशिंदे दुर्मीळ असतात. अशा दुर्मीळ नेत्यांपैकीच पतंगराव हे एक स्वयंप्रकाशी नेतृत्व होते.




सुरुवातीस माध्यमिक विद्यालयातील शिक्षकी पेशापासून सुरुवात करून एसटी महामंडळाचे सदस्य असताना त्यांनी सोनसळ परिसर व खानापूर तालुक्यातील अक्षरशः शेकडो लोकांना नोकऱ्या लावल्या. त्याच दरम्यान त्यांनी डेअरी स्थापन करून फार मोठ्या आर्थिक उलाढालीतून समाज समृद्ध करायचे काम केले. विशेष म्हणजे सांगली जिल्ह्याच्या राजकारणात पतंगरावांचे बंधू मोहनराव हेच प्रामुख्याने आघाडीवर होते. पतंगराव अंतर्गत गटबाजीत सहसा कधीच सामील झाले नाहीत. तटस्थ राहून सहकार क्षेत्रात सोनहिरा साखर कारखाना व शिक्षणक्षेत्रात भारती विद्यापीठाच्या माध्यमातून आपल्या कर्तबगारीने त्यांनी जे पर्वतप्राय काम उभे केले आहे, तीच त्यांची खरी ओळख आहे. सांगलीतील भारती विद्यापीठाचे अद्ययावत रुग्णालय त्यांच्या कामाची पावती देत उभे आहे. भारती विद्यापीठाच्या अनेक भव्य वास्तू त्यांच्या कामाच्या साक्षीदार बनून उभ्या आहेत.

पुण्यासारख्या उच्चभ्रूंचा शिक्षणाचा अड्डा असलेल्या शहरात पुणे विद्यापीठाशी स्पर्धा करणारे भारती अभिमत विद्यापीठ आज उभे आहे. एका खेडूत तरुणाने मारलेली ही भरारी अलौकिक नाही, असे कोण म्हणेल? विशेष म्हणजे केवळ माध्यमिक विद्यालय काढून समाधान न मानता त्यांनी वैद्यकीय शिक्षणाची व अभियांत्रिकी शिक्षणाची महाविद्यालये स्थापन करून ग्रामीण विद्यार्थ्यांना तंत्रविज्ञानात प्रवेश मिळवून दिला, हे त्यांचे योगदान कोणालाही नाकारता येणार नाही. आज खेड्यापाड्यातील मुले प्रसंगी जमिनी गहाण ठेवून पदवीधर, द्विपदवीधर होत आहेत. पण वशिल्याअभावी निराधार होऊन फिरत असताना त्यांना पतंगरावांच्या विविध संस्थांमध्ये काम मिळाले. गरजू आणि सुशिक्षित घरात समृद्धी नांदू लागली. त्यांच्या कर्तबगारीचेच हे फळ होते.

वसंतदादा पाटील व राजारामबापू पाटील या दोन परंपरागत राजकीय वर्चस्वाच्या घराण्यात सांगलीचे राजकारण विभागले होते. पतंगरावांनी दोन्ही मातबरांशी समान अंतर आणि सलोखा ठेवून कोणाशीही वैर न पत्करता स्वतःचे राजकीय स्थान निर्माण केले व आपल्या क्षेत्रात स्वयंभू तेजाने ते शेवटपर्यंत तळपत राहिले. त्यांची कोणाबरोबर सहसा दुश्मनी निर्माण झाली नाही. अनेकदा मुख्यमंत्रिपदाने त्यांना हुलकावणी दिली, तरीही त्यांच्यात कधी कडवटपणा निर्माण झाला नाही. आता ते सर्व संपले असले तरी सांगली जिल्ह्याचा राजकीय इतिहास पतंगराव श्रीपतराव कदम यांच्या उल्लेखाशिवाय पूर्ण होऊच शकणार नाही.

आर.आर. आबांच्या दुर्दैवी निधनानंतर तशाच एका स्वयंप्रकाशी नेतृत्वाचा दुर्दैवी अस्त झाला आहे. गेल्या जानेवारीत त्यांच्या जन्मदिनानिमित्तदेखील ते प्रकृति अस्वास्थ्यामुळे सांगलीला येऊ शकले नव्हते. अलीकडे सार्वजनिक सभासमारंभातही ते सहसा दिसत नसत. त्यांच्या आजारपणाची चर्चा दबक्या आवाजात चालू होती. शेवटी त्यांना अतिदक्षता विभागात हलवल्याची बातमी आल्यावर परिस्थितीचे गांभीर्य लोकांना समजले, तरीही शेवट इतका जवळ आला असेल असे कधीच कोणाला वाटले नव्हते. ७३व्या वर्षी त्यांच्या सफल जीवनयात्रेची सांगता झाली आहे. त्यांच्या पश्चात सांगली जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाची तर अपरिमित हानी झालीच आहे, पण हजारो कष्टकरी व चाकरमानी लोकांना आपण निराधार झाल्यासारखे वाटत आहे. आम्ही त्यांच्या पुण्यस्मृतींना विनम्र भावाने वंदन करीत आहोत...

**महासत्ता,**
**१२ मार्च २०१८**

# जिंदादिल नेता रसिकराजा दाता

पतंगराव कदम यांच्या निधनामुळे महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक क्षेत्राची फार मोठी हानी झालीय. एक माणूस किती फिरत राहतो आणि किती लोकांच्या मदतीसाठी धावून जातो, याचे उदाहरण म्हणून पतंगराव कदम यांच्याकडे पाहता येते. त्यांच्या अचानक जाण्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील अनेक लोकांना आपला आधार गमावल्यासारखे वाटू लागलेय. पतंगराव हे खऱ्या अर्थाने जिंदादिल माणूस होते. पुण्यात शैक्षणिक साम्राज्य आणि मुंबईच्या राजकारणात वर्चस्व निर्माण केलेले पतंगराव मनाने कधीच शहरी झाले नाहीत आणि पुण्या-मुंबईतही त्यांनी कधी शहरी नाटकीपणा केला नाही. गावाकडचा अघळपघळ माणूस म्हणूनच ते वावरले. जे पोटात तेच ओठात येई आणि रांगडेपणामुळे त्यांची साधी बैठकही मैफल बनून जाई. एका अत्यंत सामान्य कुटुंबात जन्मलेला मुलगा स्वकर्तृत्वावर किती उंच भरारी घेऊ शकतो, हे पतंगरावांनी दाखवून दिले. हे सगळे करताना कुठे लांड्या-लबाड्या नाहीत, की कुणाची फसवणूक केली नाही. जे काही केले, समाजाकडून घेतले ते दामदुपटीने समाजाला देत राहिले. सांगली जिल्ह्यातल्या सोनसळसारख्या दुष्काळी भागातील एका शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. गाव छोटे असल्यामुळे गावात शिक्षणाची सोय नाही. अशा परिस्थितीत शाळेत जाण्यासाठी ते रोज पाच किलोमीटरची पायपीट करीत. कृष्णाकाठी आता पहिले कुंडल उरले नाही. या कुंडल






माध्यमांचे अभिवादन!

## चित्रलेखा

**ज्ञानेश महाराव**

लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले. सार्वजनिक कामांमध्ये ठसा उमटवलाच, परंतु अडीअडचणीत असलेल्या लोकांनाही त्यांनी नेहमी मदत केली. त्यांच्या जगण्याला उभारी दिली. सामान्यातला सामान्य माणूस त्यांच्याकडे गेला, मग तो त्यांच्या पक्षाचा असो किंवा नसो, पतंगरावांनी त्याला कधी नाराज करून परत पाठवले नाही. कोणत्याही प्रश्नाचा जागेवर निकाल, ही त्यांची कार्यशैली होती. ती त्यांच्या स्वभावाला साजेशीच होती. त्यांच्या निधनामुळे केवळ त्यांच्या कुटुंबीयांचे किंवा मतदारांचेच नव्हे, तर सामान्य माणसाचे मोठे नुकसान झाले आहे.

गावच्या वसतिगृहात राहून त्यांनी मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. गावातील ते पहिलेच मॅट्रिक. त्याचमुळे प्रत्येक भाषणात सांगायचे की, 'पृथ्वीची उत्पत्ती झाल्यापासूनचा गावातला पहिला मॅट्रिक आणि पहिला ग्रॅज्युएट मीच!' त्यांचे असे भाषण ऐकणे ही पर्वणी असायची. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेत त्यांनी प्रवेश घेतला आणि 'कमवा आणि शिका' योजनेच्या माध्यमातून शिक्षण घेतले. १९६१ मध्ये ते पुण्यात आले. रयतच्याच एका हायस्कूलमध्ये अर्धवेळ शिक्षक म्हणून नोकरी करतानाच त्यांनी पुणे विद्यापीठातून कायद्याची पदवी घेतली. '१९८०च्या दशकातील शैक्षणिक प्रशासनातील प्रशासकीय समस्या' या विषयावर डॉक्टरेट मिळवली. त्याच्या खूप आधी म्हणजे, वयाच्या विशीत असताना त्यांनी १९६४मध्ये भारती विद्यापीठाची स्थापना केली. 'पुण्यात आलो आणि जिथे एक खडा मारला, तर तो दहा विद्वानांना लागतो, अशा सदाशिव पेठेतल्या एका दहा बाय दहाच्या खोलीत विद्यापीठाची स्थापना केली,' हे पतंगरावांच्या तोंडून ऐकणे म्हणजे बहार असायची. भारती विद्यापीठाने हळूहळू प्रगती केली आणि राज्यातील एक प्रमुख शिक्षणसंस्था म्हणून ते नावारूपाला आले. गेल्या ५३ वर्षांत संस्थेची प्राथमिक ते पदव्युत्तर; तसंच वैद्यकीय, अभियांत्रिकी अशा विविध क्षेत्रांतील अभ्यासक्रम शिकवणारी १८० शाळा-कॉलेजेस असून, त्यात तब्बल दीड लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सुमारे वीस हजार कर्मचारी संस्थेत आहेत. पतंगराव पहिल्यांदा १९९०मध्ये राज्याचे शिक्षण राज्यमंत्री बनले. पुढे सुधाकरराव नाईक, शरद पवार, विलासराव देशमुख, सुशीलकुमार शिंदे, अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण या सर्व मुख्यमंत्र्यांच्या मंत्रिमंडळात पतंगराव कायम राहिले. १९९५च्या निवडणुकीतील पराभव हा त्यांच्या आयुष्यातील अपवादात्मक पराभव म्हणता येईल. परंतु त्या वेळी राज्यात शिवसेना-भाजप युतीचे सरकार सत्तेवर आल्याने पतंगरावांचे फारसे काही बिघडले नाही. १९९९ ते २००४ या काळात त्यांनी उद्योग, वाणिज्य, संसदीय कामकाज मंत्रिपदाची जबाबदारी सांभाळली. नोव्हेंबर २००४ मध्ये ते सहकार, मदत आणि पुनर्वसनमंत्री आणि शालेय शिक्षणमंत्री बनले. मार्च २००९मध्ये अशोक चव्हाण मंत्रिमंडळात ते वनमंत्री झाले. १९ नोव्हेंबर २०१० रोजी त्यांच्याकडे वन, मदत आणि पुनर्वसन ही खाती आली. कोणतेही खाते असले किंवा जबाबदारी असली तरी, नाराजी आणि थयथयाट न करता त्यांनी ती जबाबदारी पार पाडली. त्यांच्या सांगलीच्या विटा तालुक्यातील मतदारसंघात पाण्याचा प्रश्न महत्त्वाचा होता. मतदारसंघातील जनतेला पाणी योग्य तऱ्हेने मिळते की नाही, याकडे त्यांचे बारीक लक्ष असायचे. लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले. सार्वजनिक कामांमध्ये ठसा उमटवलाच, परंतु अडीअडचणीत असलेल्या लोकांनाही त्यांनी नेहमी मदत केली. त्यांच्या जगण्याला उभारी दिली. सामान्यातला सामान्य माणूस त्यांच्याकडे गेला, मग तो त्यांच्या पक्षाचा असो किंवा नसो, पतंगरावांनी त्याला कधी नाराज करून परत पाठवले नाही. कोणत्याही प्रश्नाचा जागेवर निकाल, ही त्यांची कार्यशैली होती. ती त्यांच्या स्वभावाला साजेशीच होती. त्यांच्या निधनामुळे केवळ त्यांच्या कुटुंबीयांचे किंवा मतदारांचेच नव्हे, तर महाराष्ट्र काँग्रेसचेही मोठे नुकसान झालेय. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हावेत, अशी पतंगरावांची कर्तबगारी होती.

त्यांच्याकडे मनाचा मोठेपणा प्रचंड होता. माझ्या पत्रकारितेचे कौतुक होते. 'त्या 'आजकाल'चे पुनर्मुद्रण (रिप्रिंट) करतोय, ते थांबवण्यासाठी पैसे द्या,' अशा ब्लॅक मेलर पत्रकारांचे सांगावे त्यांच्याकडे मध्यस्थामार्फत आले होते. ते त्यांनी कर नाही तर डर कशाला म्हणत उडवून लावले. त्याची माहिती देऊन ते मला म्हणाले, ''तुम्हाला तुमच्या लेखणीची किंमत किती आहे, ते ठाऊक आहे का?'' मी गप्प बसलो. मनात म्हणालो, ''तुमचं गेलेलं मुख्यमंत्रिपद!'' मग तेच म्हणाले, ''अहो, त्या ब्लॅकमेलरना पैसे दिले असते, तर माझे दोन-अडीच कोटी गेले असते. इथून पुढं कायबी लिवा, पण तुमची कमाय होईल, असं लिवा!'' त्यांना आपल्या गेलेल्या मुख्यमंत्रिपदापेक्षा माझी काळजी अधिक होती; तीही मनापासून. २०१२मध्ये 'बालगंधर्व' नारायणराव राजहंस यांची १२५वी जयंती होती. त्या निमित्ताने मी आमच्या 'ओम नाट्यगंधा संस्थे'तर्फे संगीत 'सौभद्र' नाटक दुरुस्त आणि संपादित करून रंगभूमीवर त्यातील 'बालगंधर्वांची सुभद्रा' बालगंधर्वांची गायकी गळ्यात असलेल्या विक्रांत आजगावकर या गुणी गायक-नटाने सादर केली. या 'सौभद्र'चे मी त्या वर्षात महाराष्ट्रभरात ५० प्रयोग केले. त्यात







रत्नागिरी, कोल्हापूर आणि सांगली असा दौरा होता. सांगलीत विष्णुदास भावे नाट्यगृहामध्ये प्रयोग होता. कोल्हापूरहून सांगलीला येत असताना पतंगरावांचा फोन आला. त्यांचा मुलगा विश्वजित याने मदन पाटील यांच्याशी जुळवून घेऊन सांगली महानगरपालिकेची निवडणूक जिंकली होती. विश्वजित कदम यांच्या या विजयी खेळीचे कौतुक मी 'आजकाल'मधून केले होते. त्याबद्दल बाप म्हणून धन्यवाद देण्यासाठी त्यांनी मला फोन केला होता. मी त्यांना सांगलीच्या 'प्रयोगाला या' म्हणून सांगितले. ''कार्यक्रम ठरलेत, वेळ मिळाला तर १५-२० मिनिटांसाठी येतो,'' म्हणाले. पण ते येणार नाहीत अशीच माझी खात्री होती. तरीही त्यांच्यासाठी पहिल्या रांगेतली सीट ठेवली होती. नाटकाची सुरुवात माझ्या नारदाच्या भूमिकेनेच होती. 'झाली उपवर श्रीकृष्णाची भगिनी सुभद्रा...' ही 'साकी' गात असताना मी प्रेक्षागृहातील पहिल्या रांगेत पाहिले. पतंगराव नव्हते. थोडा नाराज झालो. कारण सहकलाकारांना ते येणार असल्याचे सांगितले होते. साकी गाऊन मी अर्जुनला (गिरीश परदेशी) बघून विंगेत गेलो आणि ५ मिनिटांनी 'राधाधर मधुमिलिंद' हे पद गात रंगमंचावर आलो. समोर पाहतो, तो पहिल्या रांगेत पतंगराव! आनंदाने त्यांना गात गातच नमस्कार केला. ते हसले, पण नमस्कार करणारा कोण, ते त्यांना समजले नाही. त्यांनी आपल्या सेक्रेटरीला मला बोलवण्यासाठी रंगमंचावर पाठवले. त्यांना व्यवस्थापकाने मी नारदाच्या भूमिकेत रंगमंचावर असल्याचे सांगितले. ते सेक्रेटरीने पतंगरावांना सांगितले. त्यानंतर पतंगराव नाटक समरसून पाहू लागले. पहिला अंक दीड तास चालणार होता. म्हणून अर्ध्या तासानंतर पहिल्या प्रवेशाचा ब्लॅक आउट होताच, नाटक थांबवून पतंगरावांना रंगमंचावर बोलावले. त्यांना धन्यवाद दिले. त्यांनी माझे आणि कलावंतांचे भरभरून कौतुक केले. माझ्या पत्रकारितेबद्दलही प्रेक्षकांना सांगितले; आणि माझ्या कानात म्हणाले, ''आता अख्खे नाटक पाहूनच जातो.'' नाटक सुरू झाले. मध्यंतरात पतंगराव रंगमंचावर आले आणि आमच्यातलेच एक होऊन फोटो काढून घेतले. त्यांना सुभद्रेप्रमाणेच कृष्ण (संदीप राऊत), रुक्मिणी (पूजा कदम), बलराम (कुशल कोळी) आणि राक्षस (मयुरेश कोटकर) यांच्याही भूमिका आवडल्या होत्या. ऑर्गनवादक (आरती गोसावी) आणि तबलावादक (आदित्य पानवलकर) यांचेही त्यांनी कौतुक केले. मला म्हणाले, ''इथेही तुम्ही पत्रकाराला साजेशी अशी नारदाचीच भूमिका केलीत.'' सगळे हसले. त्यांना म्हणाले, ''ओ हसू नका. हा मोठा पत्रकार आहे, पण नाटकी असेल असे कधी वाटले नव्हते,'' असे म्हणत त्यांनी माझ्या हाती पाकीट दिले. खांद्यावर हात ठेवून म्हणाले, ''पत्रकार-संपादक म्हणून नाही, नाटकवाला म्हणून घ्या. जिथे घाटा येईल, तिथे वापरा. नुकसान करून घेऊ नका.''

३ मार्चला तुकाराम बीजला मी १०५ वर्षांपूर्वी रंगमंच गाजवणारे बाबाजीराव राणेलिखित मराठीतील पहिले ओरिजिनल नाटक 'संगीत संत तुकाराम' हे नव्याने रंगमंचावर आणले. त्याची माहिती मी पतंगरावांना दिली होती. संतोष पवार यांनी दिग्दर्शित केलेले नाटक त्यांना पाहायचे होते. तुकोबा-शिवराय यांच्या भेटीची महती सांगणाऱ्या या नाटकात तुकोबा सदेह वैकुंठाला जात नाहीत, परंतु, विक्रांत आजगावकर यांचा संत तुकाराम पाहण्यापूर्वीच पतंगराव आपला देह सोडून गेले. हा दोघांच्याही कार्यक्षेत्राबाहेरच्या स्नेहाचा पुरावा आहे.




## स्मरण साहेबांचे!

### राही भिडे

**राजकारणात महत्त्वाकांक्षा असते. ती पूर्ण करण्यासाठी नेते प्रयत्नांची शिकस्त करीत असतात. आपल्या प्रतिस्पर्ध्यावर मात करण्यासाठी वेगवेगळ्या राजकीय खेळी केल्या जातात. टीका टिप्पणी केली जाते. एकमेकांचे पाय खेचण्याचे प्रकार होत असतात. पतंगरावांनी असे कधीच केले नाही, म्हणून ते वेगळे ठरतात.**

राजकारणात राहूनही अत्यंत मोकळ्या मनाने स्नेहसंबंध जपणारा, बेरकेपणाने राजकीय खेळी करीत दुसऱ्यावर कुरघोड्या न करणारा, आपल्या तरुण मुलाच्या अकाली मृत्यूचे दुःख मनात ठेवून कर्तव्य बजावणारा आणि राजकारणाकडे खिलाडूवृत्तीने पाहणारा एक सहृदयी लोकनेता असे ज्याचे वर्णन करावे लागेल, त्या डॉ. पतंगराव कदम यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या निधनाच्या वृत्ताने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला. राजकारणी म्हणून कोणी कधी त्यांच्यावर टीकेचा भडिमार केला नाही. विरोधकांच्या मनातही कधी त्यांच्याबद्दल द्वेषाची अथवा वैमनस्याची भावना निर्माण झाली नाही. असे सर्वांना हवेसे वाटणारे नेतृत्व, शिक्षणक्षेत्रातील एक कर्तृत्ववान नेता महाराष्ट्राने गमावला, याचे दुःख आहे. अल्पकाळाचा परिचय असला, तरी प्रदीर्घ काळाचे संबंध असल्याप्रमाणे त्यांचे वागणे आपुलकीचे असे. त्यांच्या परखड आणि मोकळ्या स्वभावाचा, त्यांच्यातील मनाच्या मोठेपणाचा मी स्वतः तसेच 'पुण्यनगरी' वृत्तपत्र समूहाचे संस्थापक मालक मुरलीधर ऊर्फ बाबा शिंगोटे व माझ्या सहकाऱ्यांना अनुभव आला आहे. त्यांच्या अकाली निधनाने त्यांच्याशी आमचा जो संबंध आला, त्या सुखद आठवणी जाग्या झाल्या.

वृत्तपत्रात काम करीत असताना खूप सजगता असावी लागते. खूप सतर्कता असावी लागते. बातमी देताना अथवा कोणाबद्दल लेख लिहिताना, त्यांच्यावर अन्याय होणार नाही, त्याचे चारित्र्यहनन होणार नाही, याकडे विशेष लक्ष द्यावे लागते. क्वचित कधी नजरचुकीने एखादी बातमी येते. ती प्रसिद्ध होते आणि मग व्यवस्थापनाला आणि संपादकांना त्या व्यक्तीचा रोष सहन करावा लागतो. नंतर दिलगिरी व्यक्त करावी लागते. ती दिलगिरी वृत्तपत्रात छापावी लागते. एकदा असेच झाले. पतंगरावांचे सुपुत्र विश्वजित यांच्या संदर्भात चुकीची किंबहुना वाईट पद्धतीने लिहिलेली बातमी 'पुण्यनगरी'त प्रसिद्ध झाली आणि पतंगरावांसह संपूर्ण कदम कुटुंबीय आमच्यावर संतापले. त्यांनी आमच्याशी संबंध तोडले. शिंगोटे बाबांना जेव्हा हे कळले, तेव्हा त्यांनाही राग आला आणि पतंगरावांचा संताप योग्य आहे, असे घडतेच कसे, असे म्हणत त्यांनी पतंगरावांची भेट घेऊन दिलगिरी व्यक्त करण्याचा निर्णय घेतला. प्रत्यक्ष बाबाच भेटायला येत आहेत, हे सांगताच पतंगरावांनी वेळ निश्चित केली. मी, माझे सहकारी साहाय्यक सरव्यवस्थापक राजेश वरळेकर आणि बाबा पतंगरावांकडे गेलो. बाबांनी पतंगरावांना भेटताच दिलगिरी व्यक्त केली आणि पुढे बाबा काही बोलण्याआधीच पतंगरावांनी त्याकडे दुर्लक्ष केले. बाबांना भारती विद्यापीठाच्या परिषद सभागृहात घेऊन गेले. तिथे डॉ. शिवाजीराव कदम यांच्यासह संचालक मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. त्यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन बाबांचा सत्कार केला. चौथी शिकलेल्या एका गरीब शेतकऱ्याने वृत्तपत्र समूहाचे एवढे साम्राज्य उभे केले आहे, या कर्तृत्ववान माणसाला



त्रिवार वंदन केले पाहिजे, अशा शब्दांत बाबांचा गौरव केला. तसेच 'मी स्वतः मॅट्रिकपर्यंतच शिकलो. पुण्यात अनवाणी आलो आणि एवढे मोठे भारती विद्यापीठ उभे केले, तेव्हा आपण दोघे एकच आहोत, वेगळे नाहीत,' असे सांगून बाबांचा हात धरून वर उंचावला. आम्ही सर्वजण त्यांच्या या प्रेमळ स्तुतीने भारावून गेलो. एवढा संवेदनशील मनाचा राजकीय नेता मिळणे विरळाच. त्यांनी आमच्या प्रति जी स्नेहभावना व्यक्त केली, ती दृढ करण्याचे ठरवूनच आम्ही तिथून निघालो.

राजकारणात महत्त्वाकांक्षा असते. ती पूर्ण करण्यासाठी नेते प्रयत्नांची शिकस्त करीत असतात. आपल्या प्रतिस्पर्ध्यावर मात करण्यासाठी वेगवेगळ्या राजकीय खेळी केल्या जातात. टीका टिप्पणी केली जाते. एकमेकांचे पाय खेचण्याचे प्रकार होत



# सहृदयी लोकनेता

असतात. पतंगरावांना पण महत्त्वाकांक्षा होती. दिल्लीतील पक्षश्रेष्ठींच्या भेटीगाठी करून त्यांनी आपली मुख्यमंत्री बनण्याची महत्त्वाकांक्षा व्यक्त केलेली होती; पण मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत असलेल्या अन्य नेत्यांशी अत्यंत खिलाडूवृत्तीने चांगले संबंध जोपासले होते. 'नारायण राणे यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करावा, यासाठी त्यांचेही प्रयत्न आहेत आणि ते मुख्यमंत्री झाले, तर त्यांना माझे समर्थन असेल,' असे पतंगराव मोकळेपणाने, उघडपणे सांगायचे. असा दिलखुलासपणा आणि मनाचा मोठेपणा राजकीय नेत्यांमध्ये मिळणे तसे कठीणच. धूर्तपणा व बेरकीपणा हे राजकारण्यांना चिकटलेले गुण पतंगरावांमध्ये कधीच दिसले नाहीत. अनेकदा मी हसत हसत त्यांना म्हणायचे, ''विलासराव, सुशीलकुमार, पृथ्वीराज बाबा मुख्यमंत्री झाले. तुमचं काय? मला तुमची आठ कॉलम हेडलाईन करायची आहे. 'पतंगराव कदम झाले मुख्यमंत्री' अशी हेडलाईन मला कधी मिळणार?'' त्यावर 'लवकरच मिळेल' असे खुशीत सांगायचे. पत्रकारांशी त्यांचे खूप चांगले जिव्हाळ्याचे संबंध असायचे. ते आक्रमक फटकेबाजी करीत. त्या फटकेबाजीला असलेली विनोदाची झालर आणि लोकांना खिळवून ठेवण्याची मिश्किल टोलेबाजी कायम स्मरणात राहील.

आईवडिलांचे ऋण आपण फेडले पाहिजे, त्यांच्या प्रति कृतज्ञता दाखविली पाहिजे, यावर पतंगरावांचा कटाक्ष होता. यशस्वी तरुणांच्या मातांचा सन्मान करण्याचा समारंभ ते आयोजित करीत आणि आपल्या दिवंगत आईची तस्वीर असलेले स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करीत. अशाच एकाच समारंभाला मी त्यांच्या मूळ गावी पलूसला गेले होते. पोलीस अधिकारी, आयएएस अधिकारी, सैन्यातील अधिकारी अशा विविध क्षेत्रांत अधिकारपदांवर गेलेल्या तरुणांवर त्यांच्या मातांनी चांगले संस्कार केल्यामुळे ते घडले. त्यामुळे मातांचा सत्कार करण्याची कल्पना त्यांनी प्रत्यक्षात आणून आपल्या महाविद्यालयांतील तरुण-तरुणींसमोर आदर्श ठेवला आहे. या सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी पतंगरावांनी बोलावले आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक पैलू दिसून आला. असे पतंगराव. ते जरी आज आपल्यात नसले, तरी त्यांच्या सहवासात अनुभवलेल्या अनेक प्रसंगांच्या आठवणी कायम राहतील.



स्मरण साहेबांचे!

# पतंगरावजी, आगंतुक जाणं बरं नव्हं...

राजा माने

पडत्या काळात मदतीला येणाऱ्या कुठल्याही माणसाचा तुम्हाला कधीच विसर पडत नसायचा. उलट माणूस लहान की मोठा, हे न पाहता त्याच्या घरी जाऊन त्याने केलेल्या सहकार्याची तोंड भरून कृतज्ञता व्यक्त करणे ही तुमची खासियत. डोंगराच्या कपारीतून अनेक खाचखळगे पार करीत खळखळ वाहणाऱ्या धबधब्यासारखा तुमचा स्वभाव. प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होताना प्रत्येक क्षणी निर्भेळ प्रेम, माणुसकी आणि सच्चेपण जतन करणारा आपल्यातला माणूस भेटायचा. साहेब, तुमच्यातला तो माणूस आता आम्ही कुठे शोधायचा... पतंगरावजी, असं आगंतुक निघून जाणं बरं नव्हं...

इंद्रलोकचा स्टार रिपोर्टर यमके (अर्थात एमके आमीर खानच्या पीकेचा डुप्लिकेट यमगरवाडीचा मनकवडे) आज दुःखी अंतःकरणाने महागुरू नारद कोणती असाईनमेंट देणार याची प्रतीक्षा करीत होता. नेहमी व्हॉट्सॲपवर आदेश देणाऱ्या नारदांनी त्याला थेट व्हॉट्सॲप कॉलिंगच केले... महागुरू काही बोलण्याच्या आधीच यमके बोलू लागला... ''गुरुदेव, आज मी तुमची कुठलीच असाईनमेंट घेणार नाही. उलट आज माझंच तुम्हाला मागणं आहे... आमचा जिवाभावाचा माणूस आगंतुक स्वर्गलोकी निघून गेला आहे. त्यांनाच माझं पत्र पोहोच करा आणि आमच्या मनाची घालमेल त्यांच्यापर्यंत पोहोचवा!'' नारदांनी क्षणात यमकेची भावना कुणाबद्दल आहे हे ओळखले. कुलपती स्वर्गीय डॉ. पतंगराव कदम यांना पत्र पोहोच करून शिष्याची इच्छा पूर्ण करण्याचा शब्द दिला. यमकेनेही लगोलग आयपॅडवर विद्युत गतीने बोटे फिरवित आपल्या भावनांना वाट करून दिली... अन् आपले पत्र पूर्ण केले..

आदरणीय प्रिय पतंगरावजी, प्रेमपूर्वक साष्टांग नमस्कार, काय लिहू साहेब? हे असं आगंतुक अन् माझ्यासारख्या लाखो स्नेह्यांना चटका लावून स्वर्गलोकी निघून जाणं बरं नव्हं... अहो, मिसरुडही फुटलं नव्हतं तेव्हा विद्यानगरी पुण्यात तुम्ही एका पत्र्याच्या दहा बाय दहाच्या खोलीलाच भारती विद्यापीठ या फलकानं सजवलं... सोनसळच्या मातीत गरिबीने दिलेल्या प्रत्येक चटक्याला तुम्ही समाजाचे दुःख हलकं करणाऱ्या दागिन्यात रूपांतरित करीत गेलात. यशवंतराव मोहिते भाऊंचे बोट धरून उभ्या महाराष्ट्रात एस.टी. महामंडळाची प्रतिष्ठा वाढवित गेला. लोकनेते वसंतदादांच्या विरोधी गोटात काम करूनही दादांवरचा लळा कधी कमी होऊ दिला नाही. लोकनेते राजारामबापूंचंही प्रेम जतन करण्यात कधी कमी पडला नाहीत. १९९५ साली विधानसभा निवडणुकीत तुम्ही पराभवाचं तोंड पाहिलं. पण पुन्हा फक्त मुसंडीच मारली नाही तर महाराष्ट्राच्या राजकारणात सदैव 'भावी मुख्यमंत्री' हे मानाचं बिरुद घेऊनच लोकसंग्रह विस्तारत गेलात. मला आठवतं, १९९९च्या निवडणूक प्रचारात भिलवडी परिसरात एका तरुणाने स्वतःच्या रक्ताने तुमचे नाव लिहून तुम्हाला विजयाची खात्री दिली होती. त्या वेळी अश्रूंनी भरलेले तुमचे डोळे आजही आमच्या डोळ्यांसमोर येतात. अरे-तुरे बोलणे हा तर तुमचा स्वभावच! मंत्रालय असो वा मतदारसंघ, मंत्री असो वा अधिकारी, अरे-तुरे बोलून 'जय हो' म्हणण्याची तुमची शैली आमचा ऊर भरून टाकायची. आलेला माणूस रिकाम्या हातानं जाणार नाही, याची काळजी तुम्ही सदैव वाहत आलात. पडत्या काळात मदतीला येणाऱ्या कुठल्याही माणसाचा तुम्हाला कधीच विसर पडत नसायचा. उलट माणूस लहान की मोठा, हे न पाहता त्याच्या घरी जाऊन त्याने केलेल्या सहकार्याची तोंड भरून कृतज्ञता व्यक्त करणे ही तुमची खासियत. डोंगराच्या कपारीतून अनेक खाचखळगे पार करीत खळखळ वाहणाऱ्या धबधब्यासारखा तुमचा स्वभाव. प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होताना प्रत्येक क्षणी निर्भेळ प्रेम, माणुसकी आणि सच्चेपण जतन करणारा आपल्यातला माणूस भेटायचा. साहेब, तुमच्यातला तो माणूस आता आम्ही कुठे शोधायचा... पतंगरावजी, असं आगंतुक निघून जाणं बरं नव्हं...

# मैत्रीची बांधिलकी



स्मरण साहेबांचे!

मल्लिका अमरशेख

मित्र जिवाभावाचे आणि त्यांचे चटका लावून जाणारे मृत्यू. महाराष्ट्राचे माजी ज्येष्ठ मंत्री पतंगराव कदम आणि नामदेव ढसाळ यांची जीवश्च कंठश्च मैत्री राजकीय-सामाजिक क्षेत्रात अनाकलनीय असण्याचे कारण नव्हतेच कारण दोघांचा स्वभावधर्म एकच! सगळ्यांप्रति असलेला जिव्हाळा, आपुलकी, प्रेम, अवघ्या जनांबद्दलचा कळवळा आणि म्हणूनच त्यांचे मित्रप्रेम बंधुप्रेमापेक्षा जास्तच म्हणावे लागेल. पतंगरावांनी शिक्षणसंस्थांचे जाळे पसरवून अवघ्या मऱ्हाठीच्या पोरांना सकल शहाणे करण्याचा वसा घेतला.

मुख्यमंत्रिपदाची आस मनी, स्वप्नी घेणारे खूप आणि त्यासाठी राजकारण करणारेही खूप. फक्त एक पतंगराव असे होते की, मुख्यमंत्री होण्याची पूर्ण कर्तबगारी व कुवत असूनही केवळ त्यासाठी हीन राजकारण न करता त्यांनी शिक्षणसंस्था आणि मित्रपरिवार वाढवला. ही नक्कीच विलक्षण गोष्ट. कदाचित हीन व खालच्या पातळीचे राजकारण न जमणे यामुळेच नामदेव व त्यांचे एवढे जमले! माणसाच्या मृत्यूनंतर सर्व संपते, पण नामदेव गेल्यानंतर इतर अनेकजण तोंडदेखले दुःख व्यक्त करून निघून गेले ते परत न येण्यासाठीच पण पतंगरावांचे मित्रप्रेम अत्यंत निकोप आणि दृढ राहिले.

नामदेव गेल्यावरही ते घरी आले. तेवढेच नाही तर मित्राच्या स्वभावाची माहिती असल्यामुळे आमच्या घरची चूल विझू नये यासाठी त्यांनी अनेक प्रकारे मदत केली. कधी नामदेवची पुस्तके कॉलेजसाठी घेऊन तर कधी इतर प्रकारे. प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे त्यांनी या निरलस आणि मित्रप्रेमाची मायाळू पाखर मित्र गेल्यावरही कायम ठेवली. पतंगरावांचा हा स्वभाव, त्यांचे संवेदनक्षम मन आणि मैत्रीची बांधिलकी जपणाऱ्या हृदयाची साक्ष देणाराच म्हणावा लागेल.

हे किती निष्ठुर सत्य आणि दुर्दैवी योगायोग आहे की, तिन्ही जिवलग मित्र कॅन्सरनेच गेले. नामदेव आणि आता पतंगरावही व नामदेवचा पतंगरावांइतकाच जिवाभावाचा सखा दिलीप चित्रे. हे दिग्गज आणि माणुसकी जपणारे लोक या आजाराने जातात, तरीही चंद्रावर जाणाऱ्या व अवकाशात भराऱ्या मारणाऱ्या मानवाला अजून या जीवघेण्या आजारावर उपाय सापडत नाही हे केवढे दुर्दैव आहे!

नामदेव ढसाळ आणि पतंगरावांचे मित्रप्रेम अत्यंत निकोप आणि दृढ राहिले. नामदेव गेल्यावरही ते घरी आले. तेवढेच नाही तर मित्राच्या स्वभावाची माहिती असल्यामुळे आमच्या घरची चूल विझू नये यासाठी त्यांनी अनेक प्रकारे मदत केली. कधी नामदेवची पुस्तके कॉलेजसाठी घेऊन तर कधी इतर प्रकारे. प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे त्यांनी या निरलस आणि मित्रप्रेमाची मायाळू पाखर मित्र गेल्यावरही कायम ठेवली.





# स्मरण साहेबांचे!

डॉ. आनंद पाटील



# मांज्याविना पतंगाची
# गगनभरारी

**पतंगाची गगनभरारी' हे भारती विद्यापीठाचे संस्थापक पतंगराव कदम यांच्या 'विचार भारती' गौरवांकासाठी पस्तीस वर्षांपूर्वी मी लिहिलेल्या लेखाचे शीर्षक होते. त्याच्या मागे 'मांज्याविना' हे विशेषण या पतंगाची दोरी काल तुटल्याचे कळताच आठवले. जिल्हा वेगळा असला तरी स्वातंत्र्यानंतरच्या भारतातील आमचे 'मराठा राजघराणे' एकच होते. त्याचे नाव 'पुरोगामी'.**

'पतंगाची गगनभरारी' हे भारती विद्यापीठाचे संस्थापक पतंगराव कदम यांच्या 'विचार भारती' गौरवांकासाठी पस्तीस वर्षांपूर्वी मी लिहिलेल्या लेखाचे शीर्षक होते. त्याच्या मागे 'मांज्याविना' हे विशेषण या पतंगाची दोरी काल तुटल्याचे कळताच आठवले. जिल्हा वेगळा असला तरी स्वातंत्र्यानंतरच्या भारतातील आमचे 'मराठा राजघराणे' एकच होते. त्याचे नाव 'पुरोगामी'. महाराष्ट्राच्या इतिहासात कुठेही सापडणार नाही, ते फक्त रयत शिक्षण संस्थेच्या दप्तरात शोधावे लागेल. त्याचे नाव 'लेब्राट'. हा शब्दही इंग्रजी शब्दकोशात सापडणार नाही. सातारच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमधील 'कमवा व शिका' या योजनेतील आर्थिक दलित सवर्ण विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तिधारक अस्पृश्य मागासवर्गातील विद्यार्थ्यांनी सुप्त जातिभेद व प्रेम या द्वंद्वातून दिलेली ती पदवी होती. सवर्ण काम करून शिकत, त्यांना 'बेसकाट' (बी.सी. स्कॉलरशिपवाले) म्हणत. सगळे एकाच मेसमध्ये एकाच पंगतीत जेवत. याच योजनेत सांगली जिल्ह्यातील छोट्या सोनसळ या गावच्या गरीब शेतकऱ्याच्या घरातील 'पतंग्या' माझ्या आधी पाच वर्षांपूर्वी इंटरपर्यंत शिक्षण घेत होता. त्या काळी 'इंटर' ही सर्वांत कठीण परीक्षा. हरहुन्नरी 'पतंग्या' नेमका त्याच परीक्षेत नापास झाला. नापास विद्यार्थ्याला पुन्हा श्रमयोजनेत प्रवेश नव्हता. मात्र आधाराला नव्या हायस्कूलवर नोकरी मिळायची. पतंग गावी न परतता वाडिया कॉलेमध्ये T.D. करून पुण्याजवळच्या हडपसरच्या साधना विद्यालयात शिक्षक झाला.

या 'लेब्राट' पतंगाच्या अनेक आठवणी त्यांचे वर्गमित्र व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या उपस्थितीत रयत शिक्षण संस्थेत आजन्म सेवा करण्याची शपथ घेतलेले माझे हायस्कूलमधील शिक्षक आर. के. शिंदे सर सांगायचे. त्या आठवल्या म्हणजे मला नेहमी एक तुलना कराविशी वाटते. आयर्लंडमधील एक गरीब कामगार लंडनमध्ये नोकरीला होता. अट्टल दारुड्या. त्याची पत्नी घर चालवायला गीत-संगीताचे कार्यक्रम करायची. अशा घरातला बर्नार्ड शॉ तिला आर्थिक मदत करण्यासाठी कथा, कादंबरी, संगीत-नाटक वगैरेंची परीक्षणे लिहून पुढचे शिक्षणही घेत होता. पुढे नामवंत 'डावा' नाटककार झाल्यानंतर तो एका मुलाखतीत म्हणाला, ''मला माझ्या भाल्याने तुमच्या शेक्सपिअरला गदागदा हलवायचा आहे. नियतीने मला इंग्लंडला काहीतरी शिकवाय जन्माला घातला आहे.'' तसेच काहीतरी या खेडूत 'पतंग्या'ला पुण्याजवळ नेताना नियतीच्या मनात असावे. पुण्यात कॉलेज होती. त्यात बहुजन शिकत होते पण पुण्यातच नव्हे तर जवळपास शंभर मैलांच्या अंतरावर बहुजनांचे कॉलेज नव्हते. अशा पेशवाई प्रभावाच्या क्षेत्रात या पतंग्याला भन्नाट कल्पना सुचायच्या. सहकारी पतपेढी काढली. भाड्याच्या खोलीत हायस्कूल सुरू केले आणि साधना विद्यालयात हडपसरला नोकरी. हे ज्यांना माहीत नाही त्यांना 'डॉ. पतंगराव कदम' हे कॉमिक बुक हनुमानाच्या मिथकासारखेच वाटेल.

या रांगड्या गड्याची सदाशिव पेठेतील वन बेडरूम किचन फ्लॅटमधील माझी पहिली भेट मनावर स्पष्ट कोरली आहे. १९६७मध्ये मला गुरुवर्य बॅरि. पी.जी. पाटील सरांनी पुण्यातील 'रानडे वक्तृत्व' स्पर्धेत भाग घ्यायला कराडच्या सद्गुरू गाडगे महाराज कॉलेजमधून पाठवले. पुढे त्यांच्याच नावाच्या 'वसंत व्याख्यानमालेत' भाषण द्यायचा योग यावा, हादेखील चमत्कारच. अशा चमत्काराच्या मालिका पतंगरावांच्या परिघातील लोकांच्या आयुष्यात घडल्या आहेत. ते स्वतः महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या सेवेतील केंजळे नावाच्या मित्राच्या फ्लॅटमध्ये राहत होते. 'पीजी' सरांच्या नेहमीच्या गांधीवादी धोरणाप्रमाणे त्यांनी मला दोन ओळीचे पत्र देत म्हटले, 'कॉलेजला खर्च नको. आपला लेबरस्कीमचा पतंग्या आहे सदाशिव पेठेत. त्याच्या खोलीत राहा.' पतंगरावांच्या

नावाला हळूहळू 'राव' जोडले जात आहे, हे त्यांना माहीत नव्हते. छोटी पतसंस्था व एक हायस्कूल मित्रांच्या मदतीने काढण्याचे धाडस त्यांनी केले होते. हे एक आश्चर्यच. त्यांची रांगडी भाषा, शिव्यांची फोडणी, पांढरा विजार-शर्ट, साधी चप्पल, गुरूंच्या नावाचा एकेरी उल्लेख, आपण थोर पुरुष होणार ही भाषा त्या वेळी शोभणारी नव्हती. हा राकटपणा आणि पुरुषार्थाची 'रगेल' भाषा परवापर्यंत तशीच होती. एस.टी. महामंडळाचे ते सदस्य झाले आणि भारती विद्यापीठाचा, शिक्षणसंस्थेचा संस्थापक राजकारणाच्या आखाड्यात उतरला. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी जो मार्ग टाळला होता, तीच बिकट वाट त्यांच्या शिष्याने निवडली.

प्राचार्य एम.एस. सगरे नेहमी सांगतात, सहवासात आलेले हितचिंतक, उपकारकर्ते आणि आपल्या संस्थेचे सेवक यांच्या सुखदुःखात सामील होणारा त्यांच्या सारखा 'नेक' नेता माझ्या पाहण्यात नाही. त्यातील एक 'आदर्श' प्राचार्य राष्ट्रपती पदक मिळवणारे अप्पासाहेब पानवळ हे होते. हा दुवा मला १९८५ साली इंग्लंडला जाण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे अनुदान मिळवताना उपयोगी पडला. पुण्याच्या शिक्षण संचालकांकडे दाद लागत नाही म्हणून मी मुंबईला गेलो. मंत्रालयात वेगळेच काम होते. सहज समोर दिसले म्हणून आमदार डॉ. कदम साहेबांना गाठले. 'ए.बी. पाटील' हे नाव पानवळ सरांच्यामुळे त्यांच्या लक्षात होते. त्यांनी मला लगेच शिक्षण-सचिवांच्या समोर उभे केले. तेव्हाचा संवाद असा,

''साहेब, हा शेतकऱ्याचा पोरगा इंग्लंडला जातोय. तुमच्या पुण्याचा शिक्षण संचालक -''

''अहो साहेब. आत या बसा,'' सचिवांची, उभे राहूनच विनंती.

''हा काम करून शिकलेला हुशार मुलगा,'' पतंगराव.

''अर्जाची प्रत?'' सचिवांनी विचारले.

त्या काळात फोटोकॉपी मला माहीत नव्हती. फोटोस्टॅट तर दूरच. काम होईपर्यंत थांबतो असे आमदारांनी सांगितल्यामुळे सचिवांनी पुण्याला फोन लावला आणि लवकरच पाच हजार रुपये (इंग्लंडहून परतल्यानंतर) मिळाले.

कुठलाही गर्व नाही, बोलण्यात आडपडदा, कृत्रिम ढोंग नाही. काम करण्याची हातोटी आणि लोकसंग्रह या जोरावर अनेक पराभव या 'खऱ्या मराठा' नेत्याने पचवले. मराठा आमदार मंत्री होताच त्याला दोन रोग जडतात. स्वजातविसर आणि सांस्कृतिक प्रसारमाध्यमभय. या दोन्हीवर पतंगराव आणि त्यांचे बंधू शिवाजीराव यांनी कशी मात केली, याचेच नवल वाटते. विद्यापीठ अनुदान मंडळाचे माझ्या साहित्यावरील गोव्यातील मडगावच्या चौगुले कॉलेजला मंजूर झालेले अनुदान असेच झारीतील शुक्राचार्यांने अडवले होते. शिवाजीरावांनी फोन करताच धनादेश मार्गस्थ झाला. काम करवून घेण्याची भावांची पद्धत एकच.

मी गोवा विद्यापीठात सतरा वर्षे असल्यामुळे त्यांचे संबंध फारसे आले नव्हते. वनमंत्री असताना कर्मवीर भाऊराव पाटील यांचे नातू, प्रसिद्ध लेखक अजित पाटील यांच्या 'चंदनाची पाऊले' या अप्रतिम घरगुती आठवणींच्या प्रकाशनाचा सोहळा रयत शिक्षण संस्थेने त्यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केला होता. वक्त्याचा मान मला दिला होता. त्याच दिवशी साताऱ्यात इतिहास परिषदेचे उद्घाटन नामदारांच्या हस्ते होते. ते पुस्तकाची फीत कापून लगेच निघून जाणार असल्याचे मला कळले. बत्तीस वर्षांपूर्वी लेब्राटच्या आठवणींचे माझे शीर्षक 'पतंगाची गगनभरारी' किती द्रष्टेपणाचे होते, हे मला त्यांना ऐकवायचे होते. एकाच मंचावर दोन लेब्राटांची अशी भेट कर्मवीरांच्या चरित्रग्रंथाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने व्हावी, हा खरोखर दुग्धशर्करा योग होता. मंत्रीमहोदयांनी पुस्तकाचे वेष्टण काढले. जिव्हाळ्याने थोडे बोलले. त्यांचे भाषण संपताच ते खाली बसायच्या आधीच मी धाडसाने म्हणालो,

''नामदारसाहेब, मी आपल्यानंतर पाच वर्षांनी इथेच 'लेब्राट' होतो. माझे भाषण ऐकल्याशिवाय कृपया...''

खरोखर हा राठ आणि ताठ वनमंत्री थांबला. केवळ माझे भाषण ऐकून पोकळ स्तुती केली नाही. अल्पपरिचयही वाचला होता. मुंबईला जमेल तेव्हा यायला सांगितले. माझ्या अल्पपरिचयाची प्रत नंतर पीएकडे दिली. पुढचे नाट्य आपल्या संस्कृतीवर वेगळा प्रकाश टाकणारे आहे. सह्याद्रीवर ते गृहमंत्री आर.आर. पाटील यांच्या समवेत शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ घेऊन तासगावचा साखर कारखाना वाचवण्याची विनंती करायला तेव्हाच्या मुख्यमंत्र्यांकडे जाणार होते. मलाही त्यांनी बरोबर घेतले. साहित्य-संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदासाठी अर्ज करायचा सल्ला दिला होता. तेथे त्यांनी माझा अर्ज समक्ष मुख्यमंत्र्यांना द्यायला लावताना म्हटले, ''हा आपला कोल्हापूरकडचा चांगला लेखक आहे. तुलनाकार म्हणून जगभर मान्यता आहे. साहित्य-संस्कृती मंडळाच्या अध्यक्षाची जागा दोन वर्षे मोकळी..''

मा. मुख्यमंत्र्यांनी फक्त एकदाच मला नखशिखांत न्याहाळले. मख्ख चेहऱ्याने मान वळवून अर्जावर सही केली आणि कागद शिपायाकडे सरकवला.

लगेच शिष्टमंडळाविषयी वनमंत्र्याने वापरलेले एक वाक्य ऐकून 'सह्याद्री'च्या भिंतीच नव्हे तर कडे कोसळल्यासारखे मला वाटले. तासगावच्या साखर कारखान्याला शासनाने कर्ज द्यावे, ही मागणी होती. त्यासाठी सर्व पक्षांच्या संमतीचे पत्रही आणले होते. पण मुख्यमंत्री मात्र 'पाहू', 'चर्चा करू' अशी गुळगुळीत भाषा करीत होते. अखेर वनमंत्र्याने सिंहासारखी डरकाळी फोडली,

''नक्की काय ते आत्ता लिहून द्या, निवडणूक तोंडावर आलीय. आता या लोकांना दिलासा दिला नाही तर शिमगा करावा लागेल इलेक्शननंतर..''

झालेही तसेच. माझे मित्र नंतर म्हणू लागले, काँग्रेसने महामंडळे मोकळी ठेवली आणि सत्तेतून मुक्त झाले. मांज्याविना पतंग मात्र अभिमत विद्यापीठात उंच भरारी घेत होता. पतंगरावना आमच्या अरण्यानंद शिक्षण, साहित्य व संस्कृती प्रतिष्ठानचे प्रयोग दाखवायला न्यायचे राहून गेले, याचे दुःख मोठे आहे. 'झाले बहु, होतीलही बहुत नेते, पण याच्यासारखा 'लेब्राट' हाच!' त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

# सह्याद्रीच्या कोंदणातील सोन-हिरा!



स्मरण साहेबांचे!

डॉ. जयसिंगराव पवार


डॉ. पतंगराव गेले! ते त्यांच्या चाहत्यांना असा गुंगारा देऊन जातील असे वाटले नव्हते. त्यांच्या जाण्याची वार्ता येताच सारा सोनहिरा परिसर दुःखात बुडून गेला. आपल्या घरातीलच वडीलधारी माणूस गेल्याचे दुःख घराघरात झाले. आपल्या डोईवरचे जणू छत्रच नाहीसे झाले, अशी शोकाकुल भावना सर्व भागात पसरली.

माझे गाव तडसर. पूर्वीच्या खानापूर तालुक्यातील. १९५०मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांनी माझ्या गावी त्या पंचक्रोशीतील पहिले हायस्कूल काढले. त्या हायस्कूलमध्ये शिरसगाव, सोनसळ, सोनकिरे, चिंचणी, अंबक, वांगी, कडेगाव आदी १५-२० गावांची मुले येत. पतंगराव यांचे सोनसळ गाव आमच्या तडसरच्या शिवधडीचे गाव; पण पतंगराव कुंडल हायस्कूलमध्ये गेले. क्रांतिसिंह नाना पाटील यांचे एक सत्यशील कार्यकर्ते तांबटकाका यांच्या बोर्डिंगमध्ये दाखल झाले. तिथेच ते मॅट्रिक झाले! पतंगराव यांच्या शब्दात 'मानवाच्या निर्मितीपासूनचा सोनसळ गावातील पहिला मॅट्रिक!'

पतंगरावांवर पहिला बालपणीचा संस्कार आईचा झाला. त्या काळात खेड्यात मोठे दारिद्र्य असायचे. दुष्काळात निम्मा गाव उपाशी राहत असे. अशा उपाशी कुटुंबाला त्यांच्या आई ज्वारी वाटायच्या. जीव वाचवायच्या. पतंगरावांवर सामाजिक जाणिवेचा पहिला संस्कार असा झाला. गोरगरीब समाजासाठी आपण काही करायचे असते, तो आपल्या कर्तव्याचाच भाग आहे, हा तो संस्कार होता.

दुसरा मोठा दूरगामी संस्कार झाला तो कर्मवीरांच्या रयत शिक्षण संस्थेचा. पतंगराव यांनी मॅट्रिकनंतरचे शिक्षण 'रयत'च्या 'कमवा व शिका' या स्वावलंबनाची व कष्टाची दीक्षा देणाऱ्या योजनेतून पूर्ण केले. पतंगराव यांनी आपल्या पुढील कार्याची प्रेरणा कर्मवीरांच्या कार्यातून घेतली. त्यांनी त्यांना गुरुस्थानी मानले; पण कर्मवीरांचे गुरू होते राजर्षी शाहू छत्रपती! डॉ. पतंगराव यांनी या दोन माहात्म्यांची शैक्षणिक परंपरा, तिचे पाइक बनून

पतंगरावांनी आपल्या भागाचे रूपडेच बदलून टाकले आहे. वसंतदादांनी घाटाखालची कृष्णा नदीच उचलून घाटावर आणली; पण शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचविली ती पतंगरावांनी. आज तुम्ही सोनहिरा परिसरात गेलात, तर २५ वर्षांपूर्वी जिथे कुसळाशिवाय काही येत नव्हते तिथे उसाचे मळे डोलताना दिसतील. साखर कारखान्याचा परिसर तर रात्रीचा विजेच्या दिव्यांनी उजळून निघत असतो. कुक्कुटपालन, सूतगिरण्या, सहकारी बँका, पतपेढ्या, रुग्णालये, पेट्रोलपंप, गाड्या, मोटारसायकली या सर्वांनी हा परिसर आज गजबजून गेला आहे. पतंगराव या परिसराचे खरेखुरे भाग्यविधाते ठरले आहेत!



समृद्ध केली! 'रयत'वर त्यांची भक्ती शेवटपर्यंत राहिली. सढळ हातांनी मदत करून 'रयत'चे ऋण फेडले.

भारती विद्यापीठ हा तर महाराष्ट्राच्या इतिहासातील एक महान चमत्कार आहे. ५० वर्षांपूर्वी १९ वर्षांचा, बहुजन समाजाचा, फाटक्या खिशाचा एक तरुण पुण्यात १०x१० च्या एका खोलीत 'भारती विद्यापीठ' नावाच्या संस्थेची स्थापना करतो काय अन् त्याच विद्यापीठाची १० मजली (पुण्यातील पहिली) इमारत उभी करतो काय! एवढेच नव्हे, तर विविध शाखांनी बहरलेले प्रचंड शैक्षणिक संकुल उभारतो काय! हे सारेच चकित करणारे आहे! आज या संस्थेत पारंपरिक मेडिकल शिक्षणाशिवाय इंजिनिअरिंग, डेन्टल, मॅनेजमेंट या शाखांत हजारो तरुण-तरुणी आधुनिक शिक्षण घेताहेत. एकूण ५ लक्ष विद्यार्थी, १८० शाखा!

हे सर्व अद्‌भुत पाहिल्यावर इस्रायलच्या नोबेल विजेत्या अदा योनाथ यांनी थक्क होऊन पतंगराव यांच्या पायाला हात लावून नमस्कार केला आणि त्या म्हणाल्या, ''पतंगराव, तुम्ही म्हणजे मोठा चमत्कारच आहे! महाराष्ट्रातच नव्हे, तर देशात, जगात असे कुठे घडलेले नाही!''

सत्तर वर्षांपूर्वी कडेगावची एक मुलगी सायकलने आमच्या हायस्कूलला येत असे. आज त्याच कडेगावचा पतंगराव यांनी तालुका बनविला अन् तिथे आपल्या मातोश्रींच्या नावाने मुलींचे उच्च शिक्षणाचे एक मोठे संकुल उभारले असून, ३,००० विद्यार्थिनी शिक्षण घेताहेत! तेही मोफत! जेवण-खाण, राहणे, पुस्तके-वह्या, फी, एस.टी. पास सर्व काही भारती विद्यापीठाचे! हे सर्व पतंगरावच करू जाणे. ग्रामीण भागातील आपल्या मुलींनी शिकले पाहिजे ही एकच आस त्यामागे होती.

पतंगराव यांचे सर्व व्यवहार लोकांविषयीच्या ममत्वावर चालत असत; पण असे नेते विरळ असतात. सुदैवाने ते महाराष्ट्राला बाळासाहेब देसाई व वसंतदादा यांच्या रूपाने लाभले. त्यांच्याप्रमाणेच पतंगराव यांची सामान्य माणसाच्या सुखदुःखाशी नाळ जुळली होती. स्वाभाविकच त्यांच्या लोकव्यवहारात कधी बाळासाहेब, तर कधी वसंतदादा डोकावत. अडलेला-नडलेला, परिस्थितीने गांजलेला माणूस पतंगरावांकडे गेला अन् त्याचे काम झाले नाही, असे कधी होत नसे. फीसाठी शिक्षण थांबलेला विद्यार्थी त्यांच्याकडे गेला अन् निराश होऊन परतला असे कधी झाले नाही. सोनहिरा परिसरातील शेकडो तरुणांना पतंगराव यांनी भारती विद्यापीठात सामावून घेतले. त्यांच्यावर मायेचे छत्र धरले. ते त्यांचे जणू कुटुंबप्रमुखच बनले. पंचक्रोशीत असे कधी घडले नव्हते. जिथे मॅट्रिक झालेला विद्यार्थी दिसत नव्हता, तिथे शेकडो इंजिनिअर, डॉक्टर, संगणकतज्ज्ञ, प्राध्यापक, वकील उदयास आले. नवा समाज उदयास आला होता आणि ही सर्व किमया पतंगराव यांची होती! शून्यातून विश्व निर्माण करण्याची!

पतंगरावांनी आपल्या भागाचे रुपडेच बदलून टाकले आहे. वसंतदादांनी घाटाखालची कृष्णा नदीच उचलून घाटावर आणली; पण शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचविली ती पतंगरावांनी. आज तुम्ही सोनहिरा परिसरात गेलात, तर २५ वर्षांपूर्वी जिथे कुसळाशिवाय काही येत नव्हते तिथे उसाचे मळे डोलताना दिसतील. साखर कारखान्याचा परिसर तर रात्रीचा विजेच्या दिव्यांनी उजळून निघत असतो. कुक्कुटपालन, सूतगिरण्या, सहकारी बँका, पतपेढ्या, रुग्णालये, पेट्रोलपंप, गाड्या, मोटारसायकली या सर्वांनी हा परिसर आज गजबजून गेला आहे. पतंगराव या परिसराचे खरेखुरे भाग्यविधाते ठरले आहेत!

सोनसळ हे चौरंगीनाथाच्या डोंगराच्या कुशीतील गाव. हा डोंगर म्हणजे सह्याद्रीची पूर्वेकडील शेवटची रांग. या रांगेतून, चौरंगीनाथाच्या पायापासून पतंगराव यांचा आवडता ओढा - सोनहिरा उगम पावतो. एखाद्या ओढ्याचे एवढे काव्यात्म्य नाव इतरत्र कुठे आढळत नाही. पावसाळ्यात दुथडी वाहणारा, उन्हाळ्यात कोरडा पडणारा; पण आता पतंगराव यांनी त्यात कृष्णेचे पाणी आणून बारमाही वाहता केला आहे. असा हा सोनहिरा पतंगराव यांच्या कार्याची नेहमीच आठवण देत राहील. खुद्द पतंगरावही सह्याद्रीच्या कोंदणातील एक 'सोनहिराच' होते!

पतंगराव म्हणजे मूर्तिमंत जिद्द! प्रचंड महत्त्वाकांक्षा बाळगून भव्य-दिव्य स्वप्ने पाहणारा अन् ती प्रत्यक्षात साकार करणारा माणूस! ध्येयनिष्ठेने वेडा झालेला माणूस. सतत अस्वस्थ राहिलेला; पण तेवढाच चैतन्यमयी वाटणारा माणूस. आमदार झाला, मंत्री झाला, शिक्षणसम्राट झाला, तरी अखेरपर्यंत माणुसकीस पारखा न झालेला माणूस. राजकारणी व पारदर्शीपणा म्हणजे ३६चा आकडा! पण इथे पतंगराव तर १०० टक्के पारदर्शी! छक्केपंजे नाहीत. बोलणे - वागणे सारेच पारदर्शी! हातचे राखून व्यवहार नाही. फटकळपणा वाटावा इतका स्पष्टवक्तेपणा!

गंमत म्हणजे त्यांचे सर्व स्वाभाविक असायचे. त्यात कृत्रिमता नाही आणि हे सर्व पतंगराव यांना जमायचे, याचे कारण त्यांचे मन एखाद्या लहान मुलाप्रमाणे निर्व्याज, निष्कपट व निष्पाप होते. पतंगराव यांच्या व्यक्तिमत्त्वामधील ते लहान मूल मोठे लोभसवाणे होते. हेवा वाटावा इतके!

पतंगराव यांच्या यशस्वी वाटचालीत त्यांच्या कुटुंबीयांचा मोठा वाटा आहे. ज्येष्ठ बंधू मोहनराव यांनी त्यांच्या मतदारसंघातील राजकारणाची आघाडी सांभाळली, तर कनिष्ठ बंधू डॉ. शिवाजीराव यांनी भारती विद्यापीठाच्या शैक्षणिक आघाडीचे संवर्धन केले. श्रीमती विजयमालाताईंनी पुत्रवियोगाचे दुःख बाजूला ठेवून पतंगराव यांना समर्थ साथ दिली. त्यांच्या मदतीला पतंगराव यांचे दुसरे पुत्र डॉ. विश्वजित उच्चविद्याविभूषित होऊन पुढे आले.

पण आता पतंगराव नाहीत. आधारवडच कोसळला आहे. या पार्श्वभूमीवर कदम कुटुंबीयांना भारती विद्यापीठाची धुरा वाहायची आहे. भारती विद्यापीठ पुढे जोमाने चालविणे, हे एक आव्हानच आहे. पतंगराव यांच्या आमच्यासारख्या चाहत्यांना खात्री आहे की, शिवाजीराव, विजयमालाताई व विश्वजित हे आव्हान स्वीकारतील.

# दुसऱ्यांचे टेन्शन दूर करणारा अवलिया



## स्मरण साहेबांचे!

**कांचन अधिकारी**

> शेवटी मला कुणी तरी भारती विद्यापीठाच्या ऑडिटोरियमची माहिती दिली. मी पतंगरावांना तत्काळ फोन लावला व कार्यक्रमाची संकल्पना सांगितली. त्यांनाही ती खूप आवडली. लगेचच त्यांनी भारती विद्यापीठाच्या डीनना फोन केला आणि हॉल रिकामा कधी आहे, ते विचारले व त्याच क्षणी मला कार्यक्रमास परवानगी दिली. मला म्हणाले, ''तू जरूर तिथे कार्यक्रम कर'' व आपल्या डीनना सांगितले, ''हा माझा कार्यक्रम आहे.''

पूर्वीच्या काळी ज्या काही लोकांनी काँग्रेसची धुरा अंगावर घेतली, ते सर्व लोक कट्टर काँग्रेसी असत. यातीलच एक प्रमुख नाव म्हणजे पतंगराव कदम. पतंगराव कदमांकडे कुणी काही मागितलं तर 'नाही' म्हणायची भाषा बोलणं त्यांना माहीतच नव्हतं. काँग्रेसची एक खासियत म्हणजे त्यांचे पर्सनल फोन नंबर ते स्वतः देत असत आणि हे वर सांगायचे की, काहीही लागले तरी मला पर्सनली तत्काळ फोन करायचा आणि त्याप्रमाणे माझ्या माहितीतील बरेचसे काँग्रेसी तसे वागायचे देखील. पण आताच्या राज्यात तशी परिस्थिती दुर्दैवाने नाही. आपले पर्सनल नंबर ते देतही नाहीत आणि काम करायचे तर दूरच राहिले. असो.

प्रिया तेंडुलकर हिच्यावर आधारित 'तें ची प्रिया' या ललिता ताम्हाणेलिखित पुस्तकाचं प्रकाशन आम्हाला पुण्यात करायचं होतं. त्यासाठी आम्ही पुण्यातील काही ऑडिटोरियम पाहत होतो. पण सर्वांचं बुकिंग अगोदरपासूनच झालं होतं. पुस्तक प्रकाशनाबरोबर प्रियाच्या लेखांचं अभिवाचन करायचं असंही ठरलं होते. कार्यक्रमाचं स्वरूप खूपच छान होते. अगदी प्रियाच्या आठवणींना उजाळा देणारं होतं. निर्मिती सावंत या कार्यक्रमासाठी खास पुण्यात येत होती. मी या कार्यक्रमाची जबाबदारी अंगावर घेतल्यामुळे बऱ्याचशा ठिकाणी चौकशी केली. पण सर्वच ठिकाणी काही ना काही घडत होतं. शेवटी मला कुणी तरी भारती विद्यापीठाच्या ऑडिटोरियमची माहिती दिली. मी लगेचच पतंगरावांना तत्काळ फोन लावला व कार्यक्रमाची संकल्पना सांगितली. त्यांनाही ती खूप आवडली. लगेचच त्यांनी भारती विद्यापीठाच्या डीनना फोन केला आणि हॉल रिकामा कधी आहे, ते विचारले व त्याच क्षणी मला कार्यक्रमास परवानगी दिली. मला म्हणाले, ''तू जरूर तिथे कार्यक्रम कर'' व आपल्या डीनना सांगितले, ''हा माझा कार्यक्रम आहे. हॉलचं भाडं घ्यायचं नाही. शिवाय स्टेज डेकोरेट करून द्यायचं व सर्व काही कांचनताई सांगतील, त्याप्रमाणे करायचं.'' मी खूपच खूश झाले. ललिताला सांगितले की स्थळाची सोय झाली. प्रियाचा मोठा फ्लेक्स आणि इतर कार्यक्रमाच्या गोष्टी तू येताना आण. प्रियाच्या कविता, कथा मी, निर्मिती सावंत आणि इतर काही कलाकार सादर करणार होतो. आम्ही सर्व हॉल पाहून घेतला. सरांनी तर हॉलला डेकोरेशन करायला सांगितलं. काही पाहुणे बोलावले होते, पण हॉल खूप मोठा होता. त्यामुळे रिकामा वाटू नये म्हणून शेवटी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनाच बसवले होते. कार्यक्रमाला स्वतः पतंगराव हजर राहिले व अतिशय शिस्तीत, कार्यक्रम पार पाडला. कार्यक्रमानंतर अल्पाहारही ठेवण्यात आला होता. कार्यक्रमानंतर माझ्या डोक्यावरचं टेन्शन निघून गेलं. पतंगराव साहेबांचं हे असं असायचं. दुसऱ्याच्या डोक्यावरचं टेन्शन उतरवल्याशिवाय तो माणूस राहणार नाही. कार्यक्रम इतका सुंदर झाला की, असे इतरही काही कार्यक्रम तुम्हाला आमच्या ऑडिटोरियममध्ये करायचे असल्यास आम्हाला कधीही सांगा, असं त्यांनी सांगितलं.

पतंगरावांचा पर्सनल फोननंबरही माझ्याजवळ असायचा, पण त्याचा गैरवापर आम्ही कधीच केला नाही. केवळ काही सांगायचं असेल तर आणि तरच याचा वापर होत असे. लोकांच्यात रमणारा, लोकांचा माणूस, अजातशत्रू, लोकनायक होते पतंगराव कदम. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो!





आठवणीतले साहेब

# बेधडक, गतिशील नेता

**पृथ्वीराज चव्हाण,**
माजी मुख्यमंत्री

**दर आठवड्याच्या कॅबिनेटच्या बैठकीत पतंगरावांनी आपल्या मागण्या आणि योजनांसाठी प्रचंड ताकद लावलेली पाहिली आहे. ते केवळ पलूस-कडेगाव या मतदार-संघापुरता विचार करत नव्हते. त्यांना सांगली जिल्ह्याच्या प्रत्येक भागाची नस माहिती होती. तिथले प्रश्न माहिती होते. त्यामुळे त्यांच्याकडे मतदारसंघातीलच नव्हे तर सबंध जिल्हा आणि राज्यातील लोक गाऱ्हाणी घेऊन यायचे. तेही प्रत्येक प्रश्न मतदार- संघातील समजून तळमळीने सोडवायचे. हे का शक्य होते, याचा विचार करताना पतंगराव आज कुठे आहेत, यापेक्षा ते कुठून आले आहेत, हे जास्त महत्त्वाचे ठरते.**

महाराष्ट्राच्या राजकारणातील धडाडीचे, प्रामाणिक आणि अतिशय गतिमान नेतृत्व म्हणजे डॉ. पतंगराव कदम. ते माझ्या मंत्रिमंडळाचा अतिशय महत्त्वाचा हिस्सा राहिले. राज्यात सुशासन, विकासासोबत पारदर्शी कारभार करण्याच्या मोहिमेत नेहमी खंबीरपणे उभे राहिले. दुष्काळी स्थितीला पुरून उरले. पतंगराव हे नेते म्हणून जितके मोठे, तितकेच सर्वसामान्य माणसांचा आधार म्हणूनही लोकप्रिय ठरले. राजकारण, शिक्षण, सहकार, क्रीडा, सांस्कृतिक अशा सर्व क्षेत्रांमध्ये पतंगरावांनी आपले योगदान दिले होते....

पतंगरावांची बेधडक वृत्ती मला आवडत होती. जे असेल ते तोंडावर बोलून ते रिकामे होत. जे आपल्या हातून होणार आहे, त्याला होय म्हणा आणि जे जमत नाही, त्याला सरळ नकार द्या, ही राजकारणातील दुर्मीळ गोष्ट पतंगरावांनी सुरुवातीपासूनच जपली. त्यांच्या या स्वभावाला कुणी दोष म्हणत असेल, मात्र मला हा राजकीय जीवनातील अतिशय महत्त्वाचा गुण वाटतो. तो जपण्यासाठी पतंगरावांनी राजकीय फायदा-तोट्यापेक्षा तत्त्वांचा नेहमी विचार केला आहे. भारती विद्यापीठाचे कुलपती, महाराष्ट्रातील महत्त्वाच्या खात्याचे मंत्री राहिलेल्या या माणसाचे पाय मातीत राहिले. ही साधी गोष्ट नाही.



मी कऱ्हाडचा अन् पतंगराव लगतच्या सोनसळ गावचे. त्यांच्या एकूण वाटचालीचा मी साक्षीदार आहे. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री म्हणून मी सूत्रे हाती घेतल्यानंतर पतंगरावांसोबत अधिक काळ आणि अधिक जवळून काम करता आले. एखाद्या कार्यकर्त्याप्रमाणे ते विकासकामांच्या फायली क्लिअर करण्यासाठी धडपडत असताना मी पाहिले आहे. टेंभू उपसा सिंचन योजना, म्हैसाळ, ताकारी योजना असतील किंवा ऊस दरासह अन्य प्रश्न असतील, पतंगरावांनी नेहमीच लोकहिताला पहिले प्राधान्य दिले. दर आठवड्याच्या कॅबिनेटच्या बैठकीत पतंगरावांनी आपल्या मागण्या आणि योजनांसाठी प्रचंड ताकद लावलेली पाहिली आहे. ते केवळ पलूस-कडेगाव या मतदार-संघापुरता विचार करत नव्हते. त्यांना सांगली जिल्ह्याच्या प्रत्येक भागाची नस माहिती होती. तिथले प्रश्न माहिती होते. त्यामुळे त्यांच्याकडे मतदारसंघातीलच नव्हे तर सबंध जिल्हा आणि राज्यातील लोक गाऱ्हाणी घेऊन यायचे. तेही प्रत्येक प्रश्न मतदार-संघातील समजून तळमळीने सोडवायचे. हे का शक्य होते, याचा विचार करताना पतंगराव आज कुठे आहेत, यापेक्षा ते कुठून आले आहेत, हे जास्त महत्त्वाचे ठरते.

एका सामान्य शेतकरी कुटुंबातील मुलगा, राजकारणाचा कुठलाही वारसा



नसताना या उंचीवर पोहोचतो, यामागे प्रचंड इच्छाशक्ती आणि कामाचा झपाटा आहे. पुण्यातील एका खोलीत शाळा सुरू करायची, त्याला 'भारती विद्यापीठ' नाव द्यायचे आणि ते स्वप्न साकार करण्यासाठी झपाटून काम करायचे, ही त्यांची धडपड मला नेहमीच प्रेरणादायी वाटत आली आहे. भान ठेवून योजना आखा आणि बेभान होऊन त्या राबवा, ही पतंगरावांची खासियत. त्यातूनच सोनहिरा खोऱ्याचे नंदनवन करण्यात त्यांनी मोठे यश मिळविले. सोनहिरा साखर कारखाना, सूतगिरणी, भारती विद्यापीठाच्या कित्येक शाखा पतंगरावांच्या कार्यकर्तृत्वाची साक्ष देणाऱ्या आहेत. सहकारी चळवळीभोवती संकटांचे फास आवळत असताना पतंगरावांच्या संस्था अतिशय भक्कमपणे उभ्या होत्या. त्याला कारण होते पतंगरावांनी घालून दिलेल्या वाटेवरून त्या संस्था चालत होत्या. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील यांच्या स्वप्नातील महाराष्ट्र, त्यांच्या स्वप्नातील सहकार पतंगरावांनी जवळून अनुभवला होता. ते बाळकडू जणू त्यांनी आपल्या संस्थांमध्ये उतरवले. राज्यातील सहकारी संस्था वाचविण्यासाठी पतंगरावांची धडपड अद्वितीय राहिली. सहकारमंत्री असताना त्यांनी सहकार टिकावा म्हणून काही कटू वाटणाऱ्या उपाययोजना केल्या. त्याचे गोड फळ आज काही संस्था चाखताहेत.

मी महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद स्वीकारल्यानंतर मंत्रिमंडळात खातेवाटपाची चर्चा सुरू होती. पतंगराव कदम ज्येष्ठ मंत्री होते. त्यांनी आतापर्यंत महसूल, सहकार, शिक्षण, मदत व पुनर्वसन, उद्योग, जलसंधारण, पाटबंधारे अशा महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या होत्या. त्या त्या खात्याला पतंगरावांनी न्याय दिला होता. त्यावर छाप उमटवली होती. दिल्लीतील चर्चेनुसार पतंगरावांकडे वनमंत्री आणि मदत व पुनर्वसन खात्याची धुरा सोपविण्यात आली. परंतु, अधिक महत्त्वाचे खाते द्यायला हवे होते, असे त्यांच्या कार्यकर्त्यांना वाटले. पण पतंगरावांना वन खाते मिळाले हे वरदान ठरले. महाराष्ट्राचे वन खाते पतंगरावांनी चर्चेत आणले. त्यांनी कुंडल येथे फॉरेस्टची ॲकॅडमी आणली. त्याला काहींनी विरोध केला, पण पतंगराव रेटून काम करायचे. ते इथेही त्यांनी केले.

**शब्द हाच अध्यादेश**

पतंगराव कदम यांच्याकडे मदत आणि पुनर्वसन खाते होते. त्यांचा खात्याचा पूर्वानुभव जबरदस्त होता. राज्यात दुष्काळी स्थिती होती. पतंगरावांच्या अध्यक्षतेखाली दर मंगळवारी उपसमितीची बैठक व्हायची. त्यात महत्त्वाचे निर्णय घेऊन पतंगराव बुधवारच्या मंत्रिमंडळ बैठकीसमोर मांडायचे आणि मी तातडीने त्याला मंजुरी द्यायचो. सायंकाळी पाच वाजता अध्यादेश जारी झालेला असायचा. त्या काळात दहा लाख जनावरे आम्ही छावणीत सांभाळली. एकावेळी ५,२०० टँकरने पाणीपुरवठा केला. याच काळात साखळी बंधाऱ्यांची योजना पुढे आली. एकावेळी आम्ही ओढ्यावरील दीड हजार साखळी बंधाऱ्यांची उद्घाटने केली.

त्यांच्या जाण्याने काँग्रेस पक्षाइतकेच महाराष्ट्रातल्या सामान्य माणसांचे नुकसान झाले आहे.



आठवणीतले साहेब

# पुणे आणि मुंबई विद्यापीठातले योगदान

डॉ. प्र. चिं. शेजवलकर

सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात डॉ. पतंगराव कदम यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. इतकेच नव्हे तर त्यांचे योगदान विद्यापीठातील ध्येयधोरणात झाले होते. माझी आणि त्यांची आधीपासूनच जवळीक होती. पण मी आणि ते एकाच वेळी विद्यापीठात कार्यरत असल्यामुळे डॉ. पतंगराव कदम यांचे विद्यापीठातील कार्य मला जवळून पाहता आले. पतंगराव पुणे विद्यापीठाच्या सर्वोच्च अशा कार्यकारिणीचे सभासद होते. पतंगराव अभ्यासपूर्ण अशी आपली मते मांडत. त्यांच्या मतांचा आदर केला जाई. विद्यापीठाला पोषक असेच त्यांचे धोरण असे. शिवाय विद्यार्थ्यांच्या हिताला बाधक ठरेल अशा कोणत्याही ठरावाला ते विरोध करीत. ग्रामीण आणि गरीब विद्यार्थ्यांच्याबद्दल त्यांना विशेष सहानुभूती होती. सर्वोच्च कार्यकारिणीची जेव्हा पुन्हा निवडणूक आली तेव्हा, मी विद्यापीठात मतदार असल्यामुळे, त्यांना मदत करण्याचे भाग्य मला मिळाले. त्यामुळे आम्ही अधिकच जवळ आलो.

पतंगरावांनी भारती विद्यापीठासाठी दोन गोष्टी पुणे विद्यापीठाच्या माध्यमातून यशस्वीरीत्या साध्य केल्या. पहिली गोष्ट म्हणजे इतर व्यवस्थापन संस्थांमध्ये एम.बी.ए. अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांची निवड होत असे, त्यामध्ये ग्रामीण विद्यार्थ्यांना स्पर्धेत निवडून येता येणे शक्य होत नसे. कारण खेड्यातून आलेल्या विद्यार्थ्यांचे इंग्रजी कमी पडत असे. आणि मुलाखतीच्या वेळी किंवा गटवार चर्चेत भाग घेताना ग्रामीण विद्यार्थी मागे पडत असत. पतंगरावांच्यामुळे भारती विद्यापीठाला ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी एक वेगळी तुकडी काढता आली. त्याचा फायदा गरीब व ग्रामीण विद्यार्थ्यांना मिळाला. या विद्यार्थ्यांसाठी एम.बी.ए. साठी असलेली फी पतंगराव यांनी कमी ठेवली होती. त्याचवेळी भारती विद्यापीठाचा दिल्ली येथे एक एम.बी.ए.चा वर्ग असावा, हा त्यांचा आग्रह त्यांनी कार्यकारिणीला पटवून दिला. आणि त्याप्रमाणे भारती विद्यापीठाची सुरुवातीला एक तुकडी आणि नंतर दोन तुकड्या अशा दिल्ली येथे काढण्यात आल्या. मी स्वतः दिल्ली येथे समितीचा अध्यक्ष म्हणून गेलो होतो. आणि तेथील वातावरणात भारती विद्यापीठाच्या एम.बी.ए. ला चांगला प्रतिसाद मिळेल हा अहवाल मी अध्यक्ष असलेल्या समितीने दिला होता. खरे म्हणजे पुणे विद्यापीठाचा हा एक ऐतिहासिक निर्णय होता. पुणे विद्यापीठाचे दिल्ली येथे एम.बी.ए. चे वर्ग उत्तम रीतीने चालू झाले. तेथील अनेक विद्यार्थ्यांना या निर्णयाचा फायदा झाला. या नंतरची घौडदौड म्हणजे पतंगरावांनी मुंबई विद्यापीठाच्या मॅनेजमेंट कौन्सिलमध्ये निवडणुकीत जिंकून येण्यासाठी भाग घेतला. मी मूळचा मुंबईचा असल्यामुळे तेथील अनेक सभासद माझ्या ओळखीचे होते. त्यांनी मला मुंबईला नेले आणि त्यामुळे तेथील अनेक सभासदांना आम्ही दोघे भेटू शकलो. विशेष म्हणजे येथेही पतंगराव निवडणुकीत यशस्वी झाले. आणि मुंबई विद्यापीठाच्या कार्यकारिणीचे सभासद झाले.




मात्र पुढील काही दिवसांत ते महाराष्ट्र सरकारमध्ये कॅबिनेट मिनिस्टर झाले. आणि त्यामुळे मुंबई आणि पुणे विद्यापीठातील मॅनेजमेंट कौन्सिलचे सभासदत्व त्यांना सोडून द्यावे लागले. एक मात्र खरे की, पुणे विद्यापीठातील त्यांचे योगदान विद्यार्थ्यांना उपयुक्त आणि सकारात्मक असे होते. पुणे विद्यापीठात मॅनेजमेंट कौन्सिलमध्ये काम करता करता त्यांनी, एवढा सगळा व्याप सांभाळून, स्वतः पीएच.डी. चा अभ्यास सुरू केला आणि यशस्वीरीत्या तो पूर्णही केला. पतंगराव कदम ज्या ज्या कार्यक्षेत्रात गेले, तेथे त्यांनी अविस्मरणीय कार्य केले. हे अभिमानाने सांगावेसे वाटते.

# ‘रयत’ समूहाचा बापमाणूस गेला



आठवणीतले साहेब

**डॉ. अनिल पाटील**

पतंगराव कदम यांच्या जाण्याने रयत शिक्षण संस्थेत न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्याशिवाय मॅनेजिंग कौन्सिलची बैठक, त्यांच्याशिवाय ‘रयत’चा शताब्दी महोत्सव, अण्णांची जयंती, पुण्यतिथी हे कार्यक्रम होणार, ही सल आम्हाला बोचत राहणार आहे. ‘रयत’चा बापमाणूसच नियतीने हिरावून घेतला आहे. १९७८ ला मॅनेजिंग कौन्सिलमध्ये ते सदस्य झाले. शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या प्रगतीचाच विचार केला.

१९५८ मध्ये किर्लोस्कर कारखान्यात कर्मवीर अण्णा विक्री व्यवस्थापक म्हणून नोकरी करत होते. या कारखान्याच्या सुवर्ण महोत्सवात अण्णांच्या भाषणाने प्रभावित झालेले पतंगराव कदम १९६०ला ‘रयत’च्या ओढीने साताऱ्यात आले. छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये ‘कमवा व शिका’ योजनेत प्रवेश घेतला. बॅ.पी.जी. पाटील यांच्या शिफारशीने पुढे त्यांनी पुण्यात उच्चशिक्षण घेतले. ‘रयत’मध्येच त्यांनी ७० रुपयांवर नोकरी केली. पिंपरी, गरोडा, कडगाव, मावळ, मांजरी, वाघे हायस्कूल (मुंबई) येथे प्रभारी मुख्याध्यापक म्हणून त्यांनी काम केले.‘एनडीए’त महाराष्ट्राचा टक्का वाढण्यासाठी त्यांच्या आग्रहाचा चांगला परिणाम झाला. भारती विद्यापीठाइतकेच ‘रयत’वर त्यांचे प्रेम होते. रयत शिक्षण संस्थेच्या प्रगतीसाठी डॉ. पतंगराव कदम यांनी सढळ हाताने मदत केली. कोट्यवधी रुपयांची मदत कोणत्याही अटीविना त्यांनी केली. हजारो अनोळखी अडल्या–नडलेल्यांना केलेल्या मदतीची तर मोजदादच नाही. गरजवंताला मदत करण्याची धारणा त्यांनी अखंड जोपासली.

Rayat Shikshan Sanstha,Satara

Founder



भारती विद्यापीठाइतकेच ‘रयत’वर त्यांचे प्रेम होते. रयत शिक्षण संस्थेच्या प्रगतीसाठी डॉ. पतंगराव कदम यांनी सढळ हाताने मदत केली. कोट्यवधी रुपयांची मदत कोणत्याही अटीविना त्यांनी केली. हजारो अनोळखी अडल्या-नडलेल्यांना केलेल्या मदतीची तर मोजदादच नाही. गरजवंताला मदत करण्याची धारणा त्यांनी अखंड जोपासली.

काळाच्या पुढे एक पाऊल चालणारा हा नेता होता. विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळावे, ही त्यांची इच्छा होती, त्यामुळे भारती विद्यापीठाच्या माध्यमातून उत्तम दर्जाचे शिक्षण त्यांनी मिळवून दिले. ते जेव्हा मंत्री होते, तेव्हा ‘रयत’च्या शाखांना एकाचवेळी मंजुरी दिली होती. माझ्या वडिलांना ते मोठ्या भावासारखे मानत. साताऱ्यात आले की हटकून ते आमच्या घरी येत. पूर्वी दारात उभी असणारी त्यांची गाडी पाहण्यासाठी अख्खी गल्ली गोळा होत असे.

डिसेंबर २०१७च्या पहिल्या आठवड्यात पतंगराव कदम यांची भेट झाली होती. रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी वर्षाच्या नियोजनाची तयारी सुरू होती. डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात आम्ही पुन्हा भेटणार होतो; पण ही भेट नियतीलाच मान्य नव्हती. २ मार्च रोजी पुण्यात शरद पवारांसोबत बैठक झाली. ही बैठक पार पाडून साताऱ्याकडे परतत असतानाच मला वाटेत शरद पवारांचा फोन आला. पतंगराव कदमांची प्रकृती चिंताजनक असल्याचे त्यांनी सांगितले. दुसऱ्या दिवशी ३ मार्च रोजी मी शरद पवार यांच्यासोबत लीलावती रुग्णालयात पतंगराव कदमांच्या प्रकृतीची चौकशी करायला गेलो होतो, दुर्दैवाने अल्पावधीत आजार वाढला होता. नियतीने डाव साधलाच. फारच कमी वेळात आजार बळावल्याने काहीच होऊ शकले नाही, याची सल बोचत आहे.





# आठवणीतले साहेब

■ अनंत दीक्षित

यशवंतराव चव्हाण म्हणत असत, ''खऱ्या शिक्षणाचा अर्थ समजून घेतला पाहिजे. पुस्तके वाचून येणारे ज्ञान म्हणजे शिक्षण, असे समजण्याची प्रथा आहे. काही अंशी ती बरोबर आहे, पण पुरेशी नाही. शिक्षित व्यक्तीला स्वत:भोवती घडणाऱ्या घटना आणि जगामध्ये घडणाऱ्या इतर गोष्टी यांची संगती लावता आली पाहिजे. त्या घटनांचा योग्य अर्थ समजून घेता आला पाहिजे. त्या घटनांचा माणसांवर व समाजावर होणारा परिणाम समजून घेता येईल व समजावून देता येईल, अशी स्थिती तयार होणे यालाच शिक्षण म्हणता येईल.''

कृष्णाकाठी यशवंतरावांचे बालपण गेले. पतंगराव कदम यांचीही जडणघडण कृष्णाकाठी झाली. कृष्णाकाठच्या समग्र कर्तृत्वाने पतंगरावांच्या मनाची मशागत केली. आयुष्यभर डोंगराएवढी कामे केली. सांगली, सातारा परिसरातल्या देशभक्तांनी, स्वातंत्र्यसैनिकांनी, विचारवंतांनी व परिस्थितीने संस्कार केले. प्रतिकूलतेशी झुंज देऊन अनुकूल परिस्थिती निर्माण करण्यातच माणसाचे कर्तृत्व मानले जाते. कर्तृत्वाला विचारांचा पाया असेल तर समाजनिष्ठ कामे उभी राहतात. पतंगराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी हीच वाट चोखाळली. एकेकाळी महिना ७० रुपये पगारावर पतंगरावांनी नोकरी केली. हडपसरला रयत शिक्षण संस्थेच्या साधना विद्यालयात शिक्षक म्हणून काम केले. अपार मेहनत केली. भारती विद्यापीठाची शिखरे आज दिसतात, ती एकदम उभी राहिली नाहीत. त्यासाठी पहिले पाऊल टाकावे लागले. घाव सोसले, यशापयश पचविले. हा प्रवास रोमहर्षक आहे. भारती विद्यापीठाने अनन्यसाधारण स्थान कसे निर्माण केले? पूर्वप्राथमिक, प्राथमिक, पदवी-पदव्युत्तर, संशोधन विद्याशाखा असा हा संसार कसा थाटला? १८०पेक्षा अधिक संस्थांची स्थापना कशी केली? अशा प्रश्नांचा शोध घेताना पतंगरावांना केंद्रस्थानी ठेवूनच हा पसारा उलगडावा लागतो.

अनेक क्षेत्रांत पतंगरावांनी काम केले. राजकारण, शेती, सहकार, बँकिंग, क्रीडा, कला, विज्ञान-तंत्रज्ञान, लोकपरंपरेचे जतन असा प्रचंड व्याप उभा केला. प्रत्येक कामात जीव ओतला. माणसे उभी केली. भारती विद्यापीठ म्हणजे मराठी माणसांचा आधारवड ठरला. पतंगरावांनी राजकारण लोकांच्या गरजांशी सुसंगत ठेवले. एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध व विसाव्या शतकाचा पूर्वार्ध या पिढीच्या उशाशी होता, महात्मा फुले, सावित्रीबाई ते कर्मवीर भाऊराव पाटील अशी परंपरा होती. त्याच दिशेने वाटचाल केली. कार्यकर्ते घडविले. शिक्षणसेवकांची फळी निर्माण केली. सामाजिक उपक्रमांना बळ दिले, हजारो मुला-मुलींचे पालकत्व निभावले. अगदी अलीकडेदेखील मुलींना शाळेत पाठविण्याची खेड्यापाड्यातील पालकांची तयारी नसे. पालकांच्या मनावर ओझे असायचे. भारती विद्यापीठ परिवाराने संवेदनशीलतेने ही मानसिकता समजून घेतली. मुलींना कर्तबगारीचे आकाश मोकळे केले.

पतंगरावांचा जन्म ८ जानेवारी १९४४ ला सोनसळ येथे झाला. पूर्वीच्या सातारा आणि आत्ताच्या सांगली जिल्ह्यात हे गाव आहे. सोनसळच्या पश्चिमेला चौरंगीनाथाचे प्रसिद्ध देवस्थान आहे. चौरंगीनाथाच्या डोंगरातून एक जलप्रवाह उगम पावला. त्याची ओढ विलक्षण वेगवान असते म्हणून त्याला 'ओढा' म्हणतात. या ओढ्याच्या काठावरील प्रदेशाला 'सोनहिरा खोरे' म्हणतात. सोनसळ हे उगमाजवळचे पहिले गाव आहे. येथे उदगिरी देवीचे स्थान आहे. तेच ग्रामदैवत. सोनसळजवळच सागरेश्वर मंदिर आहे. सागरेश्वराची खिंड ओलांडून खाली उतरल्यावर कृष्णेचे खोरे लागते. महात्मा गांधींच्या १९४२ च्या लढ्याची धग याच खोऱ्यात क्रांतीचा वणवा होऊन वावरली.

देशमुक्तीसाठी ग्रामीण नेतृत्वाने व कार्यकर्त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यसंघर्षात कर्तबगारीची पाने लिहिली. शेतकरी-कष्टकरी समाज स्वातंत्र्याच्या रणांगणात उतरला. अनेकांनी त्याग केला. पतंगरावांचा जन्म शेतकरी कुटुंबात झाला. वडील वारकरी होते. शेतात कष्ट करून त्यांनी मुलांना घडविले. सोनसळच्या मराठी शाळेत पतंगरावांच्या शिक्षणाचा श्रीगणेशा झाला. ते १९४९ साल होते. इनामदारांच्या वाड्यातल्या एका खोलीत शाळा भरत असे. पहिली ते चौथी शिक्षण तेथे झाले. सोनसळजवळच शिरसगाव आहे. तिथे चौथी ते सातवीपर्यंतचे शिक्षण झाले. रोज पायी चालत जावे लागे. मैल-दोन मैल चालत जाऊन शिक्षण घेणे हा ग्रामीण महाराष्ट्राचा त्या वेळी शिरस्ता होता. पावसाळ्यात मोठीच अडचण व्हायची. त्या वेळी ग्रामीण मुलामुलींची अडथळ्याची शर्यत शाळेला जाण्यापासूनच सुरू होत असे. सातवीच्या परीक्षेला तेव्हा फार महत्त्व असायचे. या परीक्षेचे केंद्र गावोगावी नसायचे. ते तालुक्याच्या गावी किंवा मोठ्या गावच्या शाळेत असे. विटे हे गाव त्या वेळी सातवीचे परीक्षा केंद्र होते. तिथे पतंगरावांनी सातवीची परीक्षा दिली. आठवीत कुंडलला आले. तेथे क्रांतिसिंह नाना पाटील बोर्डिंग

# लाखांचा पोशिंदा गेला...



होते. या बोर्डिंगात राहिले. कुंडलच्या प्रतिनिधी हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेतले. येथेच त्यांच्यातील सार्वजनिक कार्यकर्त्याचे पैलू उमलू लागले. लक्ष्मणराव किर्लोस्करांचे निधन झाले. त्या वेळी शालेय विद्यार्थी असलेल्या पतंगरावांनी त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले. प्रतिनिधी हायस्कूलमध्ये असताना पतंगरावांना वक्तृत्वाचा झरा खुणावू लागला. डिबेटिंग सेक्रेटरी म्हणून ते निवडून आले. शाळेत भाषण करू लागले. त्या वेळचे शाहीर, शिक्षक, स्वातंत्र्यलढ्यातील लढवय्ये यांच्या भाषणांचा त्यांच्यावर प्रभाव पडला. १९५९ ला पतंगराव एस.एस.सी. झाले. एस.एस.सी. होणारे सोनसळचे ते पहिले विद्यार्थी होते. एस.एस.सी ला पहिल्याच प्रयत्नात पास होणे त्या वेळी मोठे यश मानले जात असे.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारा येथे उभ्या केलेल्या शिवाजी कॉलेजमध्ये पतंगराव ११वी नंतरचे शिक्षण घेण्यासाठी दाखल झाले. 'कमवा आणि शिका' योजनेत काम केले. स्वावलंबी पिढ्या या योजनेने घडविल्या. त्या बॅ. पी.जी. पाटील यांचे ते आवडते विद्यार्थी होते. रयतमधील त्या वेळच्या वातावरणानेही कर्मवीरांच्या निःस्पृह कामांची प्रेरणा मनावर बिंबवली. कर्मवीरांनी सामाजिक परिवर्तनाची प्रयोगशाळाच रयतच्या रूपाने महाराष्ट्राला दिली. याच काळात आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धांचे फड पतंगरावांनी जिंकले. पुढे पुणे विद्यापीठातून पदवीधर झाले.

सोनसळसारख्या हजारभर वस्ती असणाऱ्या गावातून हा तरुण विद्येच्या माहेरघरी पुण्यात आला. ना कोणी ओळखीचे, ना पाळखीचे! वाडिया कॉलेजमधून ते टीचर्स डिप्लोमा (टी.डी.) झाले. शिक्षकाची नोकरी मिळण्यास त्या वेळी बी.एड. ला टी.डी. हा एक पर्याय होता. टी.डी.होऊन पतंगरावांनी हडपसर येथील साधना विद्यालयात अर्धवेळ शिक्षकाची नोकरी मिळवली. शाळेतल्याच एका वर्गात पतंगराव राहत. वय त्या वेळी केवळ १८ होते. नेमणूक अर्धवेळ शिक्षकाची असली तरी काम मात्र त्यांनी पूर्णवेळ केले. प्रशासकाची भूमिका, खात्याची कामे करण्याची रीत, शिक्षणाचा गाभा, शिक्षकांची परिस्थिती असे अनेक पैलू या काळात अभ्यासले.

तरुणपणी स्वप्नं पडतातच. स्वप्न पाहणे, प्रत्यक्षात उतरविणे आणि नवी स्वप्ने पाहणे यातच कर्तबगारीची बीजे संभवतात. आपण काहीतरी केले पाहिजे असे वाटणे ही स्वप्नाची पहिली पायरी असते. काय करायचे आणि कसे करायचे, याचा उलगडा न होणे ही त्या वयाची स्वाभाविकता असते. पाठोपाठ आदर्श कल्पना प्रत्यक्षात उतरविण्याचा भास होऊ लागतो. भासाला जाणिवेचे रूप द्यावे लागते. जाणिवा कृतीला आकार देतात. पतंगरावांच्या बाबतीत ऐन तारुण्यात असेच घडले. एकदा पुण्यात राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये (एन.डी.ए.) बाळासाहेब देसाईचे भाषण झाले. ते भाषण ऐकून पतंगरावांच्या विचारचक्राला गती मिळाली. बाळासाहेब म्हणाले, ''पुण्यात राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी आहे, पण या प्रबोधिनीत महाराष्ट्र कोठे आहे?''

या प्रश्नाभोवती पतंगरावांच्या मनाचा भोवरा फिरू लागला. कारणांचा शोध सुरू झाला. प्रश्नांचे उत्तर जाणवू लागले. तो काळ ग्रामीण तरुणांसाठी खडतर होता. कोणत्याही क्षेत्रात संधी मिळणे सोपे नव्हते. महानगरात बहुतेक संधी एकवटल्या होत्या. एस.एस.सी. सारख्या परीक्षेला ६०% गुण एखाद्याला मिळाले तर त्याला मोठा कर्तबगार मानले जात असे. राज्यातील अनेक शाळा आपले निकाल चांगले लागावेत याकरिता अनेक विद्यार्थ्यांना गणित, इंग्रजी सोडून अकरावीत बसायची सूचना देत. गणित व इंग्रजी कळण्यासाठी फार प्रचंड बुद्धिमत्ता लागते, असे वातावरण त्या काळी ग्रामीण महाराष्ट्रात होते. इंग्रजीची तर विद्यार्थ्यांच्या मनावर मोठी दहशत असे. अनेक विद्यार्थी इंग्रजी, गणित विषय सोडून एस.एस.सी. परीक्षा देत. अकरावीचे हे वास्तव ग्रामीण पालक आणि विद्यार्थी बिनबोभाट स्वीकारीत. काही ठिकाणी निवडक विद्यार्थ्यांसाठी काही शिक्षक गणित व इंग्रजीचे क्लासेस घेत. त्यासाठी दहा रुपये दर महिन्याची फी असे. ती अनेकांना परवडत नसे. या पार्श्वभूमीवर बाळासाहेब देसाईंनी जाहीरपणे विचारलेला प्रश्न पतंगरावांच्या मनात घोळत होता. पतंगरावांनी आपल्या परीने विचार केला. प्रश्नाचे उत्तर मिळो अथवा न मिळो, उत्तराची दिशा शोधणे त्यांनी महत्त्वाचे मानले. मुलांना गणित, इंग्रजीमध्ये चांगले गुण पडत नाहीत आणि त्यामुळे त्यांना निराशा येते हे उमगले. स्पर्धात्मक परीक्षेत महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील तरुणांना जर उतरावयाचे असेल, तर त्याला इंग्रजी व गणिताचे शिक्षण देण्याची व्यवस्था उभी करण्यावर भर दिला पाहिजे, या विचाराने पतंगरावांना झपाटले. तो काळ असा होता की, स्वातंत्र्य मिळून उणीपुरी २० वर्षेदेखील झालेली नव्हती. मात्र बोलण्याची भाषा, वेशभूषा यातूनही माणसांची वर्गवारी केली जात असे. इंग्रजी बोलता येणारा प्रत्येक माणूस ज्ञानीच आहे असे वाटायचे. ज्ञान आणि शहाणपण यातील फरक सामान्यांना फारसा लक्षात येत नसे. वास्तविक कोणतीही भाषा नदीसारखीच असते. वाहतेपण आणि नवेपण माणसाला जीवनदायी असते. तरीही इंग्रजीचा पोकळ दबाव होता. भाषेला जसे व्याकरण आवश्यक असते, तसे माणसाला अंतःकरण जरुरीचे असते, असे एकदा महात्मा फुलेंनी स्पष्ट केले होते. ही भूमिका घेऊन पतंगरावांनी इंग्रजी व गणित शिक्षणाची व्यवस्था उभी करण्याचा संकल्प केला. अकलूजच्या सदाशिवराव माने विद्यालयाचे मुख्याध्यापक आनंदराव पाटील यांना कल्पना सांगितली. दोघेही एकत्र आले. आणखी काही सहकारी जोडले. राष्ट्रीय विकासप्रक्रियेत ग्रामीण मुले मागे राहू नयेत, ही त्यामागे तळमळ होती. इंग्रजी, गणिताचे शिक्षण देणारे विद्यापीठ उभे करावे अशी कल्पना पतंगरावांच्या मनात आली. पण काम सोपे नव्हते. अडचणीचा मोठा डोंगर तरीही संस्था काढण्याचा निर्णय घेतला. संस्था नोंदणीसाठी किमान ११ सदस्य त्या वेळी आवश्यक असत. पतंगरावांनी काम सुरू केले. पुण्याच्या कसबा पेठेत १० मे, १९६४ला भारती विद्यापीठाची रीतसर स्थापना झाली. रहाळकर मंदिराच्या वरच्या मजल्यावरील एका खोलीत संस्था सुरू झाली. एका

मंदिरात ज्ञानमंदिराची सुरुवात झाली. शाळेच्या खोलीचे भाडे दरमहा ३०/- रुपये ठरले. खोलीबाहेर ‘भारती विद्यापीठ’ असा फलक लागला. तो पाहून अनेकांनी खिल्ली उडविली. अवमानकारक शेरेबाजी केली. बोळात सुरू झालेले विद्यापीठ बोळातच संपणार असे भाकीतही केले. परंतु बाळासाहेब भारदेंसारख्यांनी धीर दिला. विद्यापीठ स्थापन करणाऱ्यांना परंपरा नव्हती. आर्थिक बळ नव्हते. ११ रुपये देणारे ११ लोक तरी सुरुवातीला मिळतील की नाही, अशी शंका होती. जिद्द व चिकाटी मात्र होती. सार्वजनिक काम करताना कार्यनिष्ठा, बुद्धिमत्ता लागतेच. शिवाय समाजपरिवर्तनाची आस आवश्यक असते. हा संस्कार सोबतीला होता.

पुण्यात पहिली बैठक झाली. बैठकीत पतंगराव कदम, आनंदराव पाटील, मुकुंद पवार, शं.मा. डिंगणे, बा. ग. पवार, ना. गो. निलाखे, व. भा. म्हेत्रे उपस्थित होते. शिक्षकांनीच भारती विद्यापीठाची जन्मगाथा लिहिली. नियोजित संस्थेचा आराखडा बैठकीत मांडला. संस्थेचे आजीव सदस्य होण्यासाठी पहिले अकरा रुपये पतंगरावांनी दिले. संस्थेचे पहिले आजीव सदस्य तेच झाले. बैठकीतच साधना विद्यालयाचे शं. मा. डिंगणे यांनी नारळ वाढवून संस्था स्थापन झाल्याचे जाहीर केले. सर्वांच्या संमतीने ‘भारती विद्यापीठ’ हे नाव ठरले. ‘गतिमान शिक्षणातून समाजपरिवर्तन’ हे संस्थेचे उद्दिष्टही ठरले.

विद्यापीठाचे नाव ठरविताना पतंगरावांनी सहकाऱ्यांशी विचारविनिमय केला. ‘भारती’ हा शब्द सर्व भारतीयांचे प्रतिनिधित्व करणारा आहे. कोणाही सामान्य माणसाला कळणारा आहे. उच्चारायला सोपा आहे. शिवाजी विद्यापीठ असे नाव देताना शिवछत्रपतींच्या प्रेरणेबरोबरच तो कोणालाही सहज उच्चारता येईल असाच असावा, असा विचार यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब देसाई आदींनी केला होता. भारती याचा अर्थ हे विश्वविद्यालय सर्व भारतीयांचे आहे असा पतंगराव अनेकदा सांगतात.

कलाशिक्षक बा. ग. पवार यांनी संस्थेचे बोधचिन्ह तयार केले. सर्वांना आवडले.




मंजूर केले. बोधचिन्हाचा बाह्याकार गरुडासारखा आहे. त्या खाली गोलाकार भाग आहे. ते विश्वाचे प्रतीक आहे. मध्ये भारताचा नकाशा आहे. गोलाकार भागाच्या दोन्ही बाजूस झेपावणारे पंख आहेत. पंखांमध्ये ‘भारती विद्यापीठ’ ही अक्षरे आहेत. ज्ञानाचे अधिष्ठान असलेले पुस्तक गोलाखाली आहे. गणित व विज्ञानाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पुस्तकावर अणूचे प्रतीकात्मक चिन्ह आहे. विद्यापीठात शिकणारी युवाशक्ती हीच या देशाची अणुशक्ती आहे असा या बोधचिन्हामागचा अभिप्रेत आशय आहे. विद्यापीठ पुण्यात सुरू झाल्याने बोधचिन्हावर ‘पुणे’ ही अक्षरे आहेत. ५३० अ, कसबा पेठ, पुणे या भाड्याच्या जागेत सुरू झालेले विद्यापीठ आज देशाच्या राजधानीतही डौलाने उभे आहे. भारत सरकारने १९९६ साली भारती विद्यापीठाला ‘अभिमत विद्यापीठ’ दर्जाही दिला.

विद्यापीठाच्या प्रारंभी ‘अध्यक्ष’ कोण असावे, याचा विचार सुरू झाला. पतंगरावांची बाळासाहेब देसाई, राजारामबापू पाटील, बॅ. पी. जी. पाटील यांच्याशी चर्चा झाली. प्रत्येकजण विविध जबाबदाऱ्यांमध्ये आधीच गुंतलेले होते. बोरगावचे आमदार आत्माराम बापू पाटील एकेकाळचे यशवंतराव चव्हाणांचे सहकारी होते. मुंबई कायदेमंडळावर स्वातंत्र्यपूर्व काळात कऱ्हाडमधून निवडून आले होते. त्यांना पतंगराव, आनंदराव पाटील व मुकुंद पवार भेटले. त्यांनी यशवंतराव मोहितेंचे नाव सुचविले. खानापूरचे आमदार बी. एस. पवार यांना घेऊन पतंगराव मुंबईत यशवंतराव मोहितेंना भेटले. कोणत्याही सार्वजनिक प्रकल्पाचा प्रारंभ कितीही छोटा असला तरी विकासाची झेप किती अमर्याद असू शकते, याचे उदाहरण म्हणून भारती विद्यापीठाकडे पाहता येते. नेतृत्वगुणसंपन्नता आणि समाजनिष्ठा यांच्या संगमावरच हे विद्यापीठ उभे राहिले. या वेळी झालेला संवाद महत्त्वाचा आहे. यशवंतराव मोहितेंनी तो अनेकदा सांगितला, तो असा :-

पतंगराव : आम्हाला आपल्याशी बोलायचं आहे. आम्ही सांगली जिल्ह्यातून आलो आहोत. आमचा आजपर्यंत अनुभव असा आहे की, ग्रामीण शाळांमध्ये इंग्रजी व गणित हे विषय नीट शिकवले जात नाहीत. या विषयात जर मुलांना यश मिळाले नाही तर या विद्यार्थ्यांना आयुष्यात यश मिळणे कठीण जाईल. त्यासाठी काहीतरी करायला पाहिजे, असे मनात आहे.

यशवंतराव : मला तुमचे म्हणणे पटते. जागतिक भाषेवर आपल्या मुला-मुलींचे प्रभुत्व पाहिजेच. विचारांची देवाणघेवाण होण्यास जगात इंग्रजीची मदत होते. शिवाय गणितात अद्ययावत ज्ञान मिळविल्याशिवाय भावी पिढी पुढे जाणार कशी? तुमची कल्पना काय आहे?

पतंगराव : गणित-इंग्रजीचे ज्ञान शाळेत ज्यांना नीट मिळत नाही, त्यांच्यासाठी एक मध्यवर्ती संस्था आम्ही पुण्यात स्थापन केली



आहे. 'भारती विद्यापीठ' असे नाव संस्थेला दिले आहे. राज्यभरातील शिक्षकांची संस्थेत टपालाद्वारे मदत घ्यायची. आणि विद्यार्थ्यांचे गणित-इंग्रजीचे ज्ञान अद्ययावत करायचे, असे ठरविले आहे.

यशवंतराव : चांगले आहे. माझ्याकडून तुम्हाला काय मदत अपेक्षित आहे? माझ्याकडे पैसे मागण्यासाठी आला असाल तर तुमची निराशा होईल. माझ्याकडे कवडी नाही. मी ती देणारही नाही.

पतंगराव : नाही. आम्ही आपल्याकडे पैसे मागण्यासाठी आलो नाही. फक्त मार्गदर्शन करा. आपण संस्थेचे अध्यक्ष व्हावे अशी आमची विनंती आहे.

यशवंतराव : माझ्याकडून पैसा मिळणार नाही ही माझी भूमिका अखेरपर्यंत पाळली गेली पाहिजे. सामाजिक-वैचारिक परिवर्तन घडवायचे असेल तर संघटन हवेच. सामान्य माणसाच्या हिताची काळजी वाहणारी तरुण पिढी जर आपण घडवू शकलो नाही तर सर्व काही व्यर्थ आहे असे मी मानतो. शैक्षणिक क्षेत्रात काम करण्याची दिशा वेगळी असते. निदान असायला पाहिजे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या तालमीत तयार झालेले तुम्ही तरुण शिक्षक आहात ही सर्वाधिक मौलिक गोष्ट आहे. सामान्य माणसाच्या कल्याणाचे हितचिंतन करणारी वैचारिक संघटना तुम्ही शिक्षणातून उभी करू शकलात, तर महाराष्ट्राचे पाऊल पुढे पडेल. एखादा-दुसरा माणूस गुणसंपन्न होण्याला महत्त्व असतेच. पण गोरगरीब असलेल्या महाराष्ट्राचे पाऊल पुढे पडणे यालाच इतिहास घडविणे म्हणतात. 'तरुण वयात असलेल्या पतंगरावांनी मला जो शब्द दिला तो अखेरपर्यंत पाळला,' असे भाऊंनी वारंवार जाहीरपणे सांगितले.

विद्यापीठातर्फे गणित व इंग्रजीच्या परीक्षा घेण्याचे काम सुरू झाले. सुरुवातीला अहमदनगर जिल्ह्यातून चांगला प्रतिसाद मिळाला. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष शंकरराव काळे व उपाध्यक्ष बाळासाहेब विखे पाटील होते. त्यांनी संपूर्ण जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी परिपत्रक काढले. विद्यार्थ्यांचा, शिक्षकांचा, पालकांचा चांगला प्रतिसाद मिळू लागला. जागोजागी शिक्षक सदस्य निवडणे, आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांशी संवाद करणे, परीक्षांचा प्रचार करणे, राज्यभर प्रवास अशी कामे वाढू लागली. पतंगरावांनी रयतमधील शिक्षकाच्या नोकरीचा राजीनामा देऊन पूर्णवेळ भारती विद्यापीठाचे कार्यवाहपद स्वीकारले. एका प्रकारे ही जोखीमच होती. धाडसी निर्णय होता. पहिल्याच वर्षी ग्रामीण विद्यार्थ्यांच्या व शाळांच्या प्रतिसादाने उत्साह वाढला. वर्षअखेरीस हिशेब पूर्ण झाले. पहिल्या वर्षाअखेरीस खर्च वजा जाऊन सहा हजार रुपये शिल्लक राहिले. परिणामी १९६५ ला भारती विद्यापीठ स्वत:च्या जागेत गेले. ४३४, सदाशिव पेठ, पुणे हा नवा पत्ता. या कार्यालयातच पतंगराव राहू लागले. रात्रंदिवस ते विद्यापीठाचेच काम करीत. पतंगराव एकखांबी तंबू म्हणून कार्यरत झाले. शिपायापासून कार्यवाहपदापर्यंतची कामे पतंगराव करीत. कामाचा कमीपणा त्यांना कधी वाटला नाही. सातारा येथील सायन्स कॉलेजचे प्राचार्य भास्करराव पाटील भारती विद्यापीठाचे उपाध्यक्ष झाले. आनंदराव पाटील यांना कार्याध्यक्ष केले.

उगमाजवळ नदी लहान असते, नंतर पात्र विकसित होते. भारती विद्यापीठाची वाटचाल तशीच राहिली. पोषक वातावरण तयार होत राहिले. ग्रामीण भागातला एक तरुण पुण्यासारख्या शहरात नवी शिक्षणसंस्था काढतो याचे अप्रूपही होते. पुढे काही वर्षांनी पुण्यातच शिवाजी मराठा शिक्षण संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी समारंभाला यशवंतराव चव्हाण प्रमुख पाहुणे होते. वसंतदादा होते. यशवंतराव म्हणाले, ''पतंगराव कदम या तरुणाने घेतलेली झेप लक्षवेधक आहे समाजसुधारणेचे शिक्षण हेच मूळ आहे, हे सूत्र आपल्यापेक्षा पतंगरावांनी अधिक उत्तम राबवले. ग्रामीण भागातून येऊन ग्रामीण विद्यार्थ्यांना आवश्यक असलेली शिक्षणाची किल्ली त्यांना समजली.'' पतंगरावांशेजारी या समारंभात शरद पवारही होते.

गणित-इंग्रजीच्या परीक्षेचा उपक्रम रुजत आला. कामाचा आणखी विस्तार महत्त्वाचा वाटू लागला. पहिला उपक्रम म्हणून शंकरराव मोरे विद्यालयाची स्थापना केली. या शाळेची पार्श्वभूमी लक्षात घ्यावी लागेल. त्या वेळी वसंतराव नाईकांचे मंत्रिमंडळ होते. यशवंतराव मोहिते सहकारमंत्री होते. पतंगरावांच्या कार्यक्षमतेवर भाऊंचा मोठा विश्वास होता. अखेरपर्यंत तो राहिला. एके दिवशी भाऊंनी पुण्यात सर्किट हाउसच्या हिरवळीवर बैठक घेतली. राज्यातील सहकारी चळवळीतले नेते-कार्यकर्ते व परिवर्तनक्षम विचार असणाऱ्यांची ही बैठक होती. पतंगरावही होते. शंकरराव मोरेंचे स्मारक पुण्यात करावे, अशी कल्पना भाऊंनी मांडली. त्यांच्या वैचारिक भूमिकेचा व कृतिशीलतेचाही आढावा घेतला. शंकररावांना बहुजन समाजाविषयी कळकळ वाटायची. 'महाराष्ट्राचे पुरोगामी लोकनेते' अशी त्यांची देशभर प्रतिमा होती. शेतकरी

कामगार पक्षाचे ते संस्थापक सदस्य होते. पुण्यातून १९६२ला त्यांनी लोकसभेची निवडणूक लढवली. ते निवडून आले. ते शिवाजीनगरमध्ये राहत असत. त्यांचा पुतळा शिवाजीनगरातच उभा करावा अशी सूचना भाऊंनी मांडली. १९६२च्या निवडणुकीत शंकररावांच्या पुण्यातील प्रचारकामात एक कार्यकर्ता म्हणून पतंगराव कार्यरत होते. शिवाय विधानसभेत त्याच वर्षी रामभाऊ म्हाळगी विरुद्ध स. गो. बर्वे अशी लढत झाली. पतंगरावांनी काँग्रेस कार्यकर्ते म्हणून बर्वेंचा प्रचार केला. काँग्रेसचे दोन्ही नेते विजयी झाले.

बैठकीत पुतळ्याची कल्पना मान्य झाली. समितीच्या अध्यक्षपदी भाऊ व सचिवपदी पतंगराव असा निर्णय झाला. पुण्याचे नामवंत शिल्पकार खेडकर यांनी अर्धपुतळा तयार करून दिला. १ मे १९६९ला यशवंतराव चव्हाणांच्या हस्ते समारंभपूर्वक अनावरण झाले. या प्रसंगी यशवंतरावजी म्हणाले, ''शंकरराव मोरे म्हणजे बुद्धिवादाची तळपती तलवार होती. महाराष्ट्रात मोरे यांच्यापूर्वीही समाजवाद लिहिला-वाचला गेला. परंतु समाजवादासाठी संघटना बांधून सामान्यांपर्यंत समाजवाद नेण्याचे श्रेय शंकरराव मोरे यांनाच आहे.''

अनावरण समारंभानंतर काही दिवसांनी यथावकाश स्मारक समितीची आढावा बैठक झाली. कामाचा अहवाल सचिव या नात्याने पतंगरावांनी मांडला. लक्षात असे आले की, काम पूर्ण झाल्यानंतरही बरीच रक्कम शिल्लक आहे. त्यासंबंधी चर्चा झाली. शिल्लक निधीतून वैचारिक व्यासपीठ निर्माण करावे अशी भूमिका भाऊंनी मांडली. पतंगरावांनी वेगळी कल्पना मांडली. वैचारिक व्यासपीठ आणि त्याचा भविष्यकाळ आज कोणीच सांगू शकणार नाही, असे पतंगरावांनी म्हटले. त्याऐवजी शंकररावांचे कायमस्वरूपी स्मारक करावे, त्यांच्या नावाचे एक विद्यालय जर भारती विद्यापीठाने उभे केले तर शंकरराव मोरेंचे नाव सतत एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंतचे कायमचे प्रवाही राहील, असा आग्रह पतंगरावांनी मांडला.

पतंगरावांनी शंकरराव मोरे विद्यालयाचे काम सुरू केले. शिक्षणखात्याकडे परवानगी मागितली. परवानगी मिळणे कठीण होते पण चिकाटीने परवानगी मिळवली. काळ गुंतागुंतीचा होता. शाळांना परवानगी सहजासहजी मिळत नसे. गरवारे हायस्कूलनंतर पुण्याच्या पश्चिम भागात एकही माध्यमिक विद्यालयच नव्हते. पश्चिम भागातील झोपडीवासीयांना शिक्षणाची सुविधाच नव्हती. झोपड्यांमध्ये मागास मुले मोठ्या प्रमाणावर असत. भारती विद्यापीठाला विद्यालयाची परवानगी मिळाली तरी जागा नव्हती. पैसाही नव्हता. पुरेसे मनुष्यबळ नव्हते. एरंडवणे भागातील एका भाड्याच्या जागेत शंकरराव मोरे विद्यालय १० जून १९६८ ला सुरू झाले. शंकरराव मोरे यांच्या पुतळ्यासाठी जमा केलेल्या निधीतून जो पैसा उरला, त्यातून हायस्कूलसाठी लागणारे साहित्य खरेदी झाले. प्रारंभी बी.आर. येरी मुख्याध्यापक होते. त्यानंतर जून १९६९ पासून जून १९८३ पर्यंत दे. मु. महादार यांनी मुख्याध्यापक पदाची जबाबदारी सांभाळली. त्यांनी विद्यालय उभे करण्यात सिंहाचा वाटा उचलला. भारती विद्यापीठाचे पहिलेच विद्यालय असल्याने बऱ्याच अडचणी आल्या. पुण्यात त्या वेळी ५०-६० शाळा होत्या. नव्याने शाळा द्यायच्या नाहीत, अशी भूमिका होती. मधुकरराव चौधरी शिक्षणमंत्री व सुंदरराव सोळंके उपशिक्षणमंत्री होते. त्या वेळी शिक्षण उपसंचालकपदी आवळे होते. पतंगरावांना माहिती समजली की, सुंदरराव सोळंकेंच्या अध्यक्षतेखाली बैठक व्हायची आहे. त्यात 'भारती'ला जागा देण्याचा निर्णय होऊ शकतो. त्यानुसार पतंगरावांनी आपली भूमिका मांडली. त्यानंतर जागा मिळाली. महसूलमंत्री बाळासाहेब देसाईंनी मोरे विद्यालयासाठी एरंडवणेत ३ एकर ३५ गुंठे जागा मंजूर केली. ९ फेब्रुवारी १९६९ ला जागा संस्थेच्या ताब्यात मिळाली. तातडीने शाळेचे बांधकाम केले. पाच खोल्या महिनाभरात बांधल्या. जून १९६९ ला विद्यालय सुरू झाले. शाळेचा उद्घाटन समारंभ अर्थातच बाळासाहेब देसाईंच्या हस्ते झाला. त्या वेळच्या पुण्याचे स्वरूप पाहता शाळेची जागा फार दूरवर होती. सरोजिनीअक्का बाबर तर म्हणायच्या, ''कोण येणार इतक्या लांब ... शाळेसाठी?'' पण सर्वांनी प्रयत्न केले. प्रथम एक पत्र्याचे शेड बांधले. पहिल्या वर्षी शाळेत ३६ मुलांचा पट होता. पाहता पाहता विद्यार्थीसंख्या १० हजारांवर गेली. छोट्या छोट्या माणसांच्या कर्तव्यनिष्ठेतून कोणत्याही समाजाची धारणा होत असते, हाच विचार या कामाच्या मुळाशी होता. विस्ताराने वेग घेतला. या विस्ताराचा एक प्रदीर्घ इतिहास आहे. संघर्ष आहे. कोणतीही गोष्ट सहजासहजी झाली नाही. आज भारती विद्यापीठाच्या इमारती असंख्य आहेत. प्रत्येक इमारतीचा दिमाख आहे. विद्यार्थ्यांची व शिक्षकांची सोय हा मुद्दा केंद्र मानून इमारती बांधल्या. प्रत्येक इमारतीचे एक स्वतंत्र आत्मचरित्र लिहिता येईल एवढा हा मोठा विषय आहे. सरकारी यंत्रणा, सहकारी शिक्षक, पालक, समाज, कायदे, नियम अशा अनेक घटकांचा एक वेगळा ताळेबंद मांडता येईल, असा हा इतिहास आहे. लोकसहभाग व समाजाचे पाठबळ याबरोबरच पतंगरावांची जिद्द हाच प्रत्येक इमारतीचा पाया आहे.

'भारती भवन' ही १० मजली इमारत पुण्यात आज दिमाखात उभी आहे. हाही एक रोमहर्षक प्रवास आहे. अलका टॉकीजशेजारी असलेला प्लॉट दूरदर्शीपणे वेळीच खरेदी केला. पुण्यातील पहिली दहा मजली इमारत पतंगरावांनी उभी केली. संस्था सुरू करताना ज्या तरुणाकडे फक्त ४० ते १०० रुपये एवढेच भांडवल होते, त्याने केवढ्या देखण्या इमारती उभ्या केल्या. ११ ऑक्टोबर १९८१ ला त्या वेळचे अर्थमंत्री रामराव आदिक यांच्या हस्ते व ऊर्जामंत्री जयंतराव टिळक यांच्या अध्यक्षतेखाली समारंभपूर्वक भारती भवनचे उद्घाटन झाले. फर्ग्युसनचे प्राचार्य बाळ गाडगीळ, विठ्ठलराव गाडगीळ यांनीही पतंगरावांच्या दृष्टीचे कौतुक केले. या प्रकल्पाला विरोधही झाला. काहीजण न्यायालयात गेले. उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय असा संघर्ष प्रवास झाला. कोणाबद्दलही किल्मिष न बाळगता पतंगराव झुंजले. यशाचे नवे सोनेरी पान लिहिले गेले.

'भारती भवन'च्या उद्घाटन समारंभात पतंगराव म्हणाले, ''शिक्षणसंस्था पूर्वी

राजाश्रयाखाली उभ्या राहत व चालत. आता लोकशाहीत शिक्षणसंस्थांना लोकाश्रयाखाली काम करावे लागते. दानशूर व्यक्ती, उद्योगपतीही पाठबळ देतात. पण सरकार जनतेतून निवडले जाते. त्यामुळे शासनाचीही मदत शिक्षणसंस्थांना मिळते. परंतु आता शिक्षणसंस्था आश्रित असता कामा नयेत. स्वावलंबी शिक्षणसंस्थाच यापुढे समाजाला दिशा दाखवू शकतील. लोकांनी बोलत राहावे. आपण मात्र आपल्याला पटेल त्यानुसार काम करीत जावे. संस्थेत जर आर्थिक स्वयंपूर्णता असेल तर नव्या योजना कल्पनेनुसार पूर्ण करण्याचे स्वातंत्र्य राहते.''

कसबा पेठेतील एका बोळात भाड्याच्या खोलीत १९६४ला स्थापन झालेले विद्यापीठ प्रशस्त व सुंदर वास्तूत दाखल झाले. पुढे १९९६ला भारती विद्यापीठाला भारत सरकारने 'अभिमत विद्यापीठ' म्हणून मान्यता दिली. १ मे १९९६ पासून 'भारती भवन'मध्ये कुलगुरूंचे कार्यालय सुरू झाले. पतंगरावांच्या कर्तृत्वाचे निशाण फडकू लागले.

कोणत्याही संस्थेविषयी किंवा व्यक्तीविषयी लोकसमजूत काही वेळा महत्त्वाची असते. त्यालाच प्रतिमा म्हणतात. पतंगरावांनी जाणीवपूर्वक स्वत:ची प्रतिमा बांधण्याचा काही प्रयत्न केला नाही. काम करताना पावले उमटतील हीच त्यांची भूमिका. त्यातून मनाचा तोल रांगडा. सतत कामात राहण्याचा स्वभाव. आयुष्यभर जेवढी कामे केली, त्याची सुरुवात शिक्षणसंस्थेतून झाली. शिक्षणाच्या झऱ्यातूनच पुढची लोककार्ये उभी राहिली. कर्तबगारी सिद्ध झाली. त्यामुळे इतर राजकारण्यांसारखी स्थिती पतंगरावांची कधी झाली नाही. म्हणजे सत्ता गेली की पोकळी निर्माण झाली असे कधी झाले नाही. त्याचप्रमाणे केवळ सत्तेतूनच भारती विद्यापीठाच्या कामांची उभारणी झाली असेही नाही. शिक्षक-शिक्षिकांचा जो अफाट परिवार उभा केला, त्यातूनही संस्था सशक्त झाली. कामाचा एवढा डोंगर उभारताना श्रेयासाठी मागे वळून पाहायलाही सवड उरली नाही. गावोगावी, माळामाळावर भारती विद्यापीठाने नवे जग उभे केले. गोरगरिबांना आधार दिला. शालेय शिक्षणासाठी पतंगरावांना खूप कष्ट घ्यावे लागले. सोनहिरा खोऱ्यात बरीच पायपीट करावी लागली. गावकऱ्यांचेही कष्ट त्यांना त्या वयात जाणवत असत. ''कुंडलच्या हायस्कूलमधून एकदा घरी परत येत असताना मित्रांना ते म्हणाले, मी आमदार झाल्यावर सोनसळला रस्ता करून घेणार. त्यावरून एस.टी. धावणार.'' भविष्यात हे बोल खरे ठरले. यशवंतराव मोहिते राज्याचे सहकारमंत्री असतानाच त्यांनी पतंगरावांना आमदारकीची उमेदवारी मिळावी यासाठी प्रयत्न केले. यश आले नाही. भारती विद्यापीठाचा संसार वाढतच होता. कामं करावीत तर पतंगरावांनी, अशी पश्चिम महाराष्ट्रभर धारणा तयार झाली. हा माणूस प्रतिकूलतेला चिकाटीने तोंड देत होता.

१९६८मध्ये एस.टी. महामंडळाचे सदस्य नेमण्याची प्रक्रिया सुरू होती. महामंडळाला शिस्त लावण्याचे काम पतंगराव करू शकतील असा विश्वास यशवंतराव मोहितेंना होता. त्यांनी पतंगरावांची एस.टी. बोर्डाचे सदस्य म्हणून नेमणूक केली. पतंगरावांनी कामाचा झपाटा तिथेही सिद्ध केला. सर्व एस.टी. कामगारांमध्ये त्यांनी आदराचे स्थान संपादन केले. 'गाव तिथे एस.टी.', 'तालुका तेथे स्टँण्ड' आणि 'जिल्हा तेथे विभागीय कार्यालय' ही संकल्पना राबवली. खेडोपाडी एस.टी. पोहोचवली, रस्ते केले, ग्रामीण दळणवळण सुधारले, गावोगावी स्टॅण्ड शेड उभ्या केल्या.

एस.टी. महामंडळाचे सदस्य म्हणून पतंगरावांनी या पदाला महाराष्ट्रात सामाजिक प्रतिष्ठा दिली. प्रवाशांनी केवळ हात दाखवला तरी त्या काळी राज्याच्या अनेक भागात एस.टी. थांबत असे. एस.टी.चा सांगली विभाग अस्तित्वात नव्हता. या विभागाला मान्यता मिळविण्याचे काम पतंगरावांनी केले. प्रत्येक जिल्ह्यात एस. टी. कामगार संघटनांना, कर्मचाऱ्यांना पतंगराव आवर्जून भेटत. अनेकदा रात्री ते विभागीय कार्यालयातच झोपत असत. एस्.टी.चे प्रवासी हेच पहिले प्राधान्य त्यांनी मानले. अधिकारी-कर्मचारी यांच्यात संवाद ठेवला. सांगलीच्या एस.टी. विभागाचे उद्घाटन त्या वेळचे केंद्रीय अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास वसंतदादा पाटील, शंकरराव चव्हाण, यशवंतराव मोहिते, राजारामबापू पाटील, परिवहन मंडळाचे मुख्य व्यवस्थापक पी. जी. साळवे उपस्थित होते.

पुणे विद्यापीठ, सहकारी चळवळ, शेतकऱ्यांचे प्रश्न, साहित्य-संस्कृती, वनीकरण, राजकारण, महिलांचे सबलीकरण, क्रीडा, ग्रामीण गरिबी निर्मूलन, न्याय्य पाणीवाटप, पाटबंधारे प्रकल्प, सामाजिक प्रश्न, विधिमंडळ अशा अनेक क्षेत्रांत पतंगरावांनी खूप कामे केली. हा सगळा प्रवास म्हणजे महाराष्ट्राच्या एका लोकगाथेचा दस्तऐवज आहे. रीतसर इतिहास लिहिण्याचा एक व्यापक प्रकल्प अभ्यासकांना यातून हाती घेता येईल.

अंत:करणातील निर्मळ हेतू लोकांना एकमेकांशी जोडतो. याचा अनुभव म्हणजेच पतंगरावाचा जीवनप्रवास आहे. शिस्तबद्धता, दृष्टिकोन, सुसूत्रता, समन्वय, निर्णय घेण्याची कुवत आणि माणसांचे मूल्य एवढे गुण असल्याशिवाय भारती विद्यापीठासारखी संस्था उभी राहत नसते. राजकारणी तसे अनेक आहेत. शिक्षणसंस्थाही अनेक आहेत. परंतु जीवनाच्या लढाईत जे लोक हरत असतात, त्यांच्या मनाचा तळ गाठण्याची क्षमता शिक्षणाने निर्माण करावी अशी अपेक्षा असते. एखाद्या हमालाचा मुलगा प्राध्यापक करण्यापासूनची कामे भारती विद्यापीठाने केली. परिवर्तनाचा वारा वाहता ठेवला. शिक्षणात पैशापेक्षा जिज्ञासा आणि नवनिर्माण मोलाचे असते, असे सांगणारी उदाहरणे उभी केली. महाराष्ट्रात जे महापुरुष होऊन गेले, त्यांच्याइतके उंच कोणालाच होता येणार नाही. पण निदान त्या वाटेने चालण्याची हिंमत दाखवावी लागते. अशांचीही एक परंपरा आहे. त्यासाठी अनेकांनी घाव सोसले. कृष्णेकाठी वाढलेल्या पतंगरावांनी हाच मार्ग अवलंबला. त्यामुळेच यशवंतरावांच्या नंतर कृष्णेकाठी वाढलेल्या सह्याद्रीला महाराष्ट्रात मानाचे पान आहे, याची नोंद इतिहासाने केली आहे.

महाराष्ट्रात 'लाखाचा पोशिंदा म्हणूनच पतंगरावांना ओळखले जाते.' शिक्षणाने



आठवणीतले साहेब

डॉ. महादेव सगरे
सहकार्यवाह, भारती विद्यापीठ

# अखेर भविष्य खरे ठरले

१९६७ साली पुणे विद्यापीठात रिसर्च स्टुडंट म्हणून फिजिक्स विभागात संशोधनाचे काम करीत असताना शनिवार, रविवार डॉ.पतंगराव कदम यांना भेटण्यासाठी न्यू इंग्लिश स्कूल समोरच्या बोळातील ऑफिसमध्ये जात असे. एके दिवशी डॉ.पतंगराव कदम, श्री.फडतरे व मी शेंगा खात लक्ष्मी रोडवर फिरत असताना रस्त्यावरील एका ज्योतिषासमोर थांबलो. फडतरे व मी दहा पैसे देऊन गंमत म्हणून आमचे भविष्य (पोपटाकडून चिठ्ठी उचलून) ऐकत होतो. तितक्यात मध्येच डॉ.पतंगराव कदम यांनी आपला हात भविष्य पाहण्यासाठी पुढे केला. त्यांच्या एका हाताला करंगळी अर्धी असल्याने ज्योतिषाने त्यांचे भविष्य सांगण्यास सुरुवात केली. ज्योतिषाने डॉ.पतंगरावांना सांगितले की, ''तुम्हाला दोन-तीन महिन्यांमध्येच मोठे पद मिळणार आहे. शिवाय चार चाकी वाहनही मिळणार आहे.'' त्यानंतर आम्ही एकमेकांची चेष्टा करीत परत आलो.

खरोखरच पुढील तीन महिन्यांमध्ये डॉ.पतंगराव कदम हे स्टेट ट्रान्स्पोर्ट बोर्डाचे (एस.टी.) मेंबर झाले आणि त्यांना इम्पोर्टेड सरकारी गाडी मिळाली. बोर्ड मेंबर म्हणून महाराष्ट्रभर दौरे करत 'रस्ता तेथे एस.टी.' याची त्यांनी महाराष्ट्रभर अंमलबजावणी केली. हजारो लोकांना नोकऱ्या मिळवून दिल्या आणि 'खरोखरच अखेर भविष्य खरे ठरले.'

माणसात मूलभूत बदल शक्य होत असतात, हे त्यांनी आपल्या कामातून सिद्ध केले आहे. शिवाय शिक्षण कधीही संपत नाही हे मूल्य त्यांनी आयुष्यभर जोपासले. एका माणसाने आयुष्यात किती कामे करावीत, याचे एक चित्रस्थान माणसाच्या मनात असते. पतंगरावांनी केलेली कामे पाहता त्याचा आवाका म्हणजे एक 'जगातले आश्चर्य' ठरेल. कोणाही लेखकाने प्रदीर्घ कादंबरी लिहावी एवढा हा जीवनपट आहे. शिक्षणातल्या उणिवा अथवा शिक्षणासाठी सल्ले देणाऱ्यांची संख्या कमी नसते. प्रत्यक्ष पावले टाकणाऱ्यांची संख्या मात्र बरीच कमी असते. याचे कारण म्हणजे समाजात जे चांगले आहे, गुणवान आहे, त्याची बेरीज करण्याची धमक असावी लागते. पतंगरावांनी भारती विद्यापीठाचे काम सेवा म्हणून उभे केले. सहकार, शेती, पाणी, उद्योग, आरोग्य, दळणवळण, वनीकरण अशा अनेक क्षेत्रांमध्ये प्रचंड मोठी कामे त्यांनी केली. भारतामध्ये १२५च्या वर अभिमत विद्यापीठे आहेत. त्यात भारती विद्यापीठ सर्वांत मोठे विश्वविद्यालय आहे. आशिया खंडातील अत्यंत देखण्या आणि उपयुक्त शैक्षणिक संकुलांची बांधणी भारती विद्यापीठाने केली आहे. समाजजीवनाचा बदलता संदर्भ विचारात घेऊन अभ्यासक्रमाला आधुनिक चेहरा दिला. ज्या काळात फक्त कला आणि वाणिज्य महाविद्यालये संख्येने जास्त होती, त्या काळात फार्मसी कॉलेज, केमिकल इंजिनिअरिंग कॉलेज, केमिकल टेक्नॉलॉजी, टेक्निकल केमिस्ट्री अशा दालनांना भारती विद्यापीठाने चालना दिली. सामाजिक कामाचा भाग म्हणून परित्यक्ता आणि पीडित महिलांसाठी संस्था काढल्या. लघुउद्योग वसाहती उभारल्या. कुक्कुटपालन, नळपाणी योजना, विद्यार्थी दत्तक योजना, मुलींसाठी आय.टी.आय. अशी फार मोठी यादी देता येईल. शिवाय रयत शिक्षण संस्था आणि कर्मवीर बापुजी साळुंखे यांच्या नेतृत्वाखालील विवेकानंद संस्थेशीही पतंगरावांचा ऋणानुबंध होता. बार्शीसारख्या तुलनेने छोट्या गावात कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्याशी आणि त्यांच्या शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाशीही पतंगरावांचा घट्ट स्नेह होता. पुस्तकपेढी, ग्रंथालये, प्रयोगशाळा, क्रीडा संकुले, पतसंस्था, द्राक्ष प्रक्रिया उद्योग, कृषी महाविद्यालये, वाणिज्य महाविद्यालये, आधुनिक सुविधांनी सुसज्ज असलेली इस्पितळे असे एक विराट जगच पतंगरावांनी निर्माण केले. संस्थेची संख्यात्मक वाढ होत असताना गुणवत्तेचा तराजू काटेकोरपणे लक्षात घेतला. शिक्षकांच्या निवडीपासून त्या त्या क्षेत्रातील प्रज्ञावंतांची नावे जर पाहिली तर माणसे पारखण्याची पतंगरावांची कुशाग्रता लक्षात येते. संस्थांमागून संस्था केवळ संख्येसाठी निर्माण न करता समाजनिष्ठेचा मुद्दा घेऊन पतंगराव कदम हे नाव महाराष्ट्राच्या विकासाचे एक सन्मानचिन्ह आहे. या कर्तबगारीची अनेक पाने महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी पेललेली आहेत. त्यांचे पुण्याह वाचन करून प्रेरणा घेणे आणि कामासाठी सिद्ध होणे हीच पतंगरावांना खरी आदरांजली.



आठवणीतले साहेब

# आईच्या काळजाचा कुलपती गेला...

## सिंधुताई सपकाळ

**त्यांनी भराभर स्वत:च्या हाताने पत्र लिहिले. माझ्या मुलीची क्षणात जबाबदारी स्वीकारली. दोन तास स्टेशनवर बसून आलेल्या माझ्या मुलीला भारती विद्यापीठाने मायेचे छत्र दिले. तेव्हा मला पुण्यात घर नव्हते. मायेची माणसे नव्हती. ओळखीचे असे कोणीच नव्हते, त्या वेळी पतंगरावांनी माझ्या मुलीला पदरात घेतले. तिला एम.एस.डब्ल्यू.करण्यासाठी महाविद्यालयात प्रवेश मिळवून दिला. तिचा राहण्याच्या, खाण्याच्या खर्चाचा भार भारती विद्यापीठाने उचलला म्हणून मी निश्चिंत मनाने अनेक अनाथांची आई होऊ शकले.**

पतंगराव गेले आणि आईचे काळीज असणारा कुलपती गेला. त्यांच्या जाण्याने माझी वैयक्तिक खूप मोठी हानी झाली आहे. माझ्या आयुष्यात मी दुर्दैवाचे दशावतार पाहिले. सत्त्वपरीक्षा घेणाऱ्या परिस्थितीने मला खूप काही शिकवले. हसऱ्या, गोंडस बाळाला कोणीही सहज उचलून घेते. गरज असते ती आईवडिलांनी नाइलाजास्तव तर कधी बेफिकिरीने टाकून दिलेल्या मुलांना मायेच्या पदराखाली घेण्याची. अनाथ मुलांचे मातृत्व स्वीकारण्याचा वसा मी घेतला. पण हे व्रत सोपे नव्हते. गाय माझ्या मुलीची माय झाली. म्हणून अनेक अनाथांची माय होण्याचे मी ठरवले.

ज्या वेळी मी पुण्यात आले, तेव्हा माझी मुलगी ममता लहान होती. मी तिला पुण्याच्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष प्रतापराव गोडसे यांच्याकडे सांभाळण्यासाठी दिले होते. यामागे कारण एकच होते की, मी अनाथांची माय व्हायचे ठरवले होते. पोटची मुलगी जवळ असेल तर माझ्यातली आई चुकेल आणि आईचे काळीज स्वत:च्या मुलीवरच जास्त प्रेम करेल, अशी भीती वाटत होती. म्हणून मी त्यांच्याकडे तिला सांभाळण्यासाठी दिले होते. त्यांनी तिची खूप काळजी घेतली. अगदी पोटच्या पोरीसारखे तिला वाढवले. बी.ए.पर्यंत शिक्षण दिले. बी.ए.च्या पुढे तिची शिकण्याची खूप इच्छा होती. पण सेवासदन ठेवायला तयार नव्हते आणि ममताला पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करायचे होते. माझी आर्थिक ऐपत नव्हती. मुलीने खूपखूप शिकावे असे वाटत होते, पण मला समोर रस्ताच दिसत नव्हता.

तो दिवस मला अजूनही स्पष्ट आठवतो. मी पतंगरावांना भेटायला गेले. आज माझे बऱ्यापैकी नाव झाले आहे. समाज मला 'माई' म्हणून आदराने स्थान देतो. त्या वेळी मी एवढी लोकांना माहिती नव्हते. प्रसिद्धीचे वलयही माझ्या पाठीमागे नव्हते. त्यामुळे मी पतंगरावांना माहीत असण्याची शक्यताच नव्हती, पण त्यांच्या कानावर माझ्या कामाची माहिती गेलेली होती. मी भीतभीतच त्यांना भेटायला गेले. माझे डोळे पाणावले होते. मी पतंगरावांना माझी अडचण सांगितली. माझी मुलगी वयाने मोठी आहे. सेवासदनमध्ये पुढच्या शिक्षणासाठी तिला ठेवायचे नाही असे ठरवलेले आहे. मला अनाथ मुलांच्या संगोपनाची जबाबदारी घ्यायची आहे. या पार्श्वभूमीवर माझ्या मुलीचे पालकत्व कोण स्वीकारेल, याच विचारात मी आहे. आपण माझ्यासाठी काय करू शकता?

पतंगरावांनी माझ्या बोलण्यावर त्यांची खाली असलेली मान वर केली, माझ्याकडे पाहिले. त्यांच्या त्या पाहण्यात मला एक विश्वास दिसला. माझे काम या ठिकाणी नक्की होणार याची खात्री पटली. त्यांनी भराभर स्वत:च्या हाताने पत्र लिहिले. माझ्या मुलीची क्षणात जबाबदारी स्वीकारली. दोन तास स्टेशनवर बसून आलेल्या माझ्या मुलीला भारती विद्यापीठाने मायेचे छत्र दिले. तेव्हा मला पुण्यात घर नव्हते. मायेची माणसे नव्हती. ओळखीचे असे कोणीच नव्हते, त्या वेळी पतंगरावांनी माझ्या मुलीला पदरात घेतले. तिला एम.एस.डब्ल्यू.करण्यासाठी महाविद्यालयात प्रवेश मिळवून दिला. तिचा राहण्याच्या, खाण्याच्या खर्चाचा भार भारती विद्यापीठाने उचलला म्हणून मी निश्चिंत मनाने अनेक अनाथांची आई होऊ शकले. माझ्या ठरवलेल्या कामात मन लावून काम करू शकले. पतंगरावांनी आणि भारती विद्यापीठाने हे पालकत्व स्वीकारले नसते तर एका द्विधा मनोवस्थेत मला काम करावे लागले असते. पतंगराव हे 'आईचं काळीज असणारा नेता होते, कुलपती होते.' समोरच्यांच्या अंत:करणात काय खळबळ चाललेली आहे, हे त्यांना माणूस पाहताक्षणी समजायचं, त्याची वेदना समजायची आणि त्या वेदनेवर फुंकर घालण्यासाठी ते सर्वतोपरी धावून जायचे. हा अनुभव मी केवळ




एकटीनेच घेतलेला आहे असे नाही. नात्यागोत्यातल्या माणसांसाठी मदतीसाठी कुणीही तयार असते, पण ज्यांची कुठेही ओळख नाही, वशिला नाही, पाठराखण करणारे कोणी नाही, शिफारस करणारे कोणी नाही, अशा गरजू माणसांच्या पाठीशी आभाळाएवढे मन असणारा हा माणूस कायम उभा राहत आलेला आहे. हे विद्यापीठ माणुसकीचे मंदिर आहे. या मंदिरात एका हाताने केलेले दान दुसऱ्या हाताला कळत नाही. केलेल्या मदतीचा कुठेही उल्लेख नसतो. सहानुभूतीची भावना नसते. केवळ माणसाला मदत करायची एवढाच एक भाव असतो. म्हणून या विद्यापीठातली माणसे मला खूप भावतात. इथे आल्यानंतर आपण ग्रामीण भागातले आहोत, सामान्य परिस्थितीतले आहोत, याचे कसलेही दडपण येत नाही. इतक्या मोकळेपणाने आणि माणुसकीने इथे वागणूक दिली जाते. कुठेही दिखाऊगिरीचा अंश नसतो. हा पतंगरावांचा संस्कार आहे.

आज मी १,१०० अनाथ लेकरांची आई आहे. मला २०० जावई आहेत आणि ५० सुनांची मी सासू आहे. माझ्या संस्थेतली ५–१० मुले मुली दरवर्षी भारती विद्यापीठात उच्च-शिक्षण घेतात. त्यांचा संपूर्ण खर्च भारती विद्यापीठाने उचललेला असतो. माझ्या लेकरांवर पोटच्या पोरांप्रमाणे माया करणारे हे विद्यापीठ आहे.

पतंगरावांची वाटचाल साधी, सोपी आणि सरळ कधीच नव्हती. चांगल्या माणसाला काम करताना काट्याकुट्यांचाच रस्ता तुडवावा लागतो. संघर्ष करावा लागतो. पतंगरावांनाही तो करावा लागला. त्यांनी दगडधोंडे स्वत:च्या अंगावर घेतले. हे सारे झेलत असताना मनातली मायेची ऊब थोडीदेखील कमी होऊ दिली नाही. सतत जगाचे भले चिंतणाऱ्या या माणसाचा हातातोंडाशी आलेला घास दैवाने हिसकावून नेला. तरणाताठा पोरगा या जगातून गेला. काळजाला चटका लावणारी ही जखम कशानीही भरून येणारी नाही. तरुण वयाचा पोरगा जाण्याचे दु:ख काय असते, हे आईवडिलांखेरीज कुणालाही समजणार नाही. पतंगराव आणि आमच्या विजयमाला वहिनी यांनी या दु:खातूनही वाट शोधली आणि मुलाच्या नावे 'अभिजित कदम मेमोरियल फौंडेशन'ची स्थापना केली. आपला मुलगा गेला तरी या जगात अशी हजारो मुले आहेत, ज्यांना मायेच्या पंखाची गरज आहे, अशा मुलांच्या पाठीशी पतंगराव आणि वहिनीसाहेब सातत्याने उभे राहिले आहेत. त्यांना मायेची ऊब दिली आहे. त्यांचे पालकत्व त्यांनी स्वीकारलेले आहे. वेगळ्याच वाटेने जाऊन सतत समाजाचा विचार करणारी ही माणसे आहेत. आपल्या दु:खालाही त्यांनी सामाजिक बांधिलकीचे अधिष्ठान दिलेले आहे.

पतंगराव नावाच्या महात्म्याच्या विजयमालावहिनी हीच खरी ऊर्जा. महाराष्ट्रात महात्मे नेहमी अंडर ग्राउंड असतात. सावित्रीला मात्र आसवांनी पदर भिजवून नवऱ्याचे काळीज ओले ठेवावे लागते. वहिनीसाहेबांनी डोळ्यात तेल घालून पतंगरावांना आजवर जपले. भारती विद्यापीठाचे मातृत्व त्यांनी स्वीकारले. पतंगरावांच्या जाण्याने या विद्यापीठाचा बापच गेला. आम्ही सारेच पोरके झालो आहेत.



# कर्तृत्वाचा महामेरू

स्मरणगंध साहेबांचा

सतीश राऊत

१२ डिसेंबर, २००८चा तो दिवस! कोल्हापूरच्या पोलीस मैदानात मला वाटतं घोरपडे सरकारांच्या घरातलं लग्न होतं. वधू-वर बोहल्यावर येण्याच्या प्रतीक्षेत इतर निमंत्रितांप्रमाणे मीदेखील खुर्चीवर आरामात बसलो होतो, तोच नागपूरचे जिल्हाधिकारी प्रवीण दराडे यांचा मोबाईलवरून फोन आला. ''सतीश, काल हिवाळी अधिवेशनात महसूलमंत्री डॉ. पतंगराव कदम साहेब भेटले. ओ.एस.डी. म्हणून कुणी चांगला महसूल अधिकारी असेल तर सुचव म्हटले मला. आणि मी तुझं नाव सुचवलं. येतोस का भेटायला त्यांना?'' मी आनंदलो आणि बावरलोदेखील.

''सर, मी तहसीलदार आहे, उपजिल्हाधिकारी नाही, चालेल का त्यांना?''

''अरे, त्यांना मी म्हटलंय की, जरी तू तहसीलदार असला तरी, महसूलमधला किडा आहेस, 'He will be asset for you' असं म्हटलंय मी तुझ्याबाबतीत! ये लवकरात लवकर.''

मी येतो असं सांगितल्यावर त्यांनी बाय म्हणत फोन बंद केला. आणि माझ्या मनाचा प्रवास नागपूरच्या दिशेने सुरू झाला. खुराणा ट्रॅव्हल्सचं १५ डिसेंबरचं तिकीट बुक केलं. मी कामकाजात नियमांवर बोट ठेवत असल्याने एका आमदार महोदयांनी 'राऊत साहेब, तुमची खरी आवश्यकता मंत्रालयात आहे, धोरणं ठरवायला' असं उपहासानं की मजेत म्हटलं होतं. अन् पाहा! खरंच मला मंत्रालयात, तेही माझं मायबाप खातं महसूल खात्यात कॅबिनेट मंत्र्याचा विशेष कार्याधिकारी म्हणून जाण्याची नामी संधी चालून आली होती. आमदार महोदयांचं मजेत म्हणणं मला शुभदायी ठरलं होतं. माझं नागपूरला जाण्याचं प्रयोजन समजल्यावर काही जणांनी 'जरा जपून बरं का, फार बोलतात ते, तू कविमनाचा मनाला लावून घेशील फार,' असा सल्ला दिला.

मी धाकधुकीतच १४ डिसेंबरच्या संध्याकाळी खुराणा ट्रॅव्हल्सच्या बसमध्ये बसलो. सकाळी पोहोचलो. नागपूरचा मित्र विनोद तुरक याच्या घरी फ्रेश झालो. नागपुरातील रवीभवन परिसरातील मंत्री महोदयांचे बंगले विनोदला माहीत होते. दराडे सरांनी सांगितल्याप्रमाणे मी सकाळी ९च्या सुमारास डॉ. पतंगराव कदम यांच्या बंगल्यावर पोहोचलो. दराडे सर आत होते. त्यांनी आतूनच थोडं थांबण्याची सूचना केली. महसूलमंत्री असल्याने बंगल्यावर गर्दी अमाप होती. कदम साहेबांच्या लोकसंग्रहाची ती चुणूक होती. दराडे सरांनी मंत्री महोदयांना ब्रीफ केलं असावं. कदम साहेबांचे जावई आणि माझे मित्र राजेंद्र जगताप यांनाही माझ्याबद्दल विश्वजित कदम यांच्याकडे विषय काढावयास विनवलं होतं. थोड्याच वेळात मला आत बोलावण्यात आलं. मी 'नमस्ते सर' म्हणून फौजी स्टाईलने विश्राम अवस्थेत उभा राहिलो. मला अजूनही चांगलं आठवतं. त्यांनी मला नखशिखांत न्याहाळलं. उंचापुरा राऊत त्यांना अकलेनंही उंच वाटला असावा. त्यांनी बायोडाटाही पाहिला नाही. तात्काळ म्हणाले, ''प्रवीण, केस इज कंसिडरेबल, ऑर्डर काढा रे सतीशची!''

मी अवाक्‌च झालो! मुलाखत नाही; जात-पात नाही विचारली; मला कधी काळा की गोरा पाहिलं नाही; मी गावाकडचा नाही; कधी सांगलीला नोकरी केली नाही! तरी माझी वर्णी लागावी कदम साहेबांकडे! सगळंच अविश्वसनीय होतं. बरं मी केवळ तहसीलदार, कितीतरी उपजिल्हाधिकारी या पदाच्या प्रतीक्षेत असणार! तरी ही माझी निवड! बाहेर आल्यावर दराडे सरांनी माझा अवाक् चेहरा पाहिला आणि म्हणाले की, ''सतीश, त्यांना मी असं सांगितलं की, तू माझा प्रोबेशनर होता आणि माझ्याकडे कोल्हापूरला तहसीलदार होतास. 'You are the officer of best integrity' असं सांगून त्याचं चुकलं तर माझे कान धरा, अशी हमी दिली. त्यामुळे त्यांनी नि:शंक निवडलं तुला.''

कदम साहेबांनी इतका विश्वास ठेवला दराडे सरांच्या शब्दांवर, खरंच किती अविश्वसनीय होतं हे सारं! अधिकाऱ्यांवर विश्वास ठेवणं तर आलंच परंतु कामाचा तुकडा किती पटकन पाडतात. उगीच नाही भारती विद्यापीठाचं एवढं प्रचंड जाळं महाराष्ट्रात पसरवलं, देशात आणि देशाबाहेरदेखील पाय रोवले.

दुपारपर्यंत आदेश हातात आला, त्याची एक प्रत मुंबईला फॅक्सने रवाना झाली. मला कदम साहेबांनी पुन्हा बोलवून घेतलं आणि सांगितलं की, 'मुंबईला मंत्रालयात जायचं आणि बंद कपाटाची चावी घेऊन सगळ्या फाईल्सचा ताबा घ्यायचा. आत्ताच्या आता निघ मुंबईला.' दराडे सरांना फोनवरून सांगितलं. त्यांनी ऑफीसला बोलावून घेतलं. अभिनंदन करून हातात अडीच हजार रुपयांचं विमानाचं तिकीट दिलं. कृतज्ञता दाटून आली पण दाखवली नाही चेहऱ्यावर. मिठी मारून त्यांनी 'ऑल दि बेस्ट' केलं आणि मी विमानतळाच्या दिशेने कूच केली. आयुष्यातला दुसरा विमानप्रवास, संध्याकाळची दिवेलागणीची वेळ, अंधाराची

**माझ्या काव्यसंग्रह प्रकाशन कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका देण्यासाठी गेलो. बंगल्यावर कुणीही नव्हते. मी एका कर्मचाऱ्याकडे पत्रिका दिली. आणि नंतर विश्वजित कदमांशी बोललो. त्यांनी सांगितलं की, ''मी येतो, कदम साहेब आजारी आहेत आणि खरंच येऊ शकत नाहीत. नाहीतर तुम्हाला माहीत आहे की, तुमच्या कार्यक्रमाला त्यांनी टाळलं नसतं.'' मला वाटलं, नक्कीच ते न येण्याइतकं काहीतरी कारण असावं. पण केवळ महिनाभरात मृत्यूच्या द्वारी घेऊन जाण्याइतपत असेल असं कधी मनाला शिवलं नव्हतं. माझं किती भरभरून कौतुक केलं असतं त्यांनी, हे वेगळं सांगायला नको.**

घनगंभीरता माझ्याही चेहऱ्यावर दाटली होती. विमानाची चाकं घरघर करत बाहेर आली आणि माझी विचाराची तंद्री तुटली. विमान लँडिंगसाठी तयार झालं. रस्त्यावरील आणि उंचच उंच इमारतींमधील झगमगाट डोळ्यांत साठवला. विमानानं मान खाली करून हळूहळू धावपट्टी आपल्या पखालीखाली घेतली आणि घर्षण करीत चाकांनी मला जमिनीवर आणलं.

रात्रीचा मुक्काम मनोरा आमदार निवासात तुळजापूरचे आमदार मधुकरराव चव्हाण यांच्या रूमवर केला. सकाळी मंत्रालयातील चौथ्या मजल्यावरील महसूल मंत्री कार्यालयात गेलो. पहिल्या दिवशीच सुनील चव्हाण ह्या मृदू मनाच्या, संवेदनशील पीए शी माझी वेव्हलेन्थ जुळली. मंत्रालयीन स्टाफला सूचना आधीच मिळाल्या असाव्यात. मला महसुली केसेसच्या फाईल्सचे कपाट ताब्यात मिळाले. कपाट जेव्हा उघडले, तेव्हा केवढी मोठी जबाबदारी माझ्यावर सोपवण्यात आली, याची जाणीव झाली. मुंबई, ठाणे, पुण्यासह अवघ्या महाराष्ट्रातील विविध महसुली प्रकरणांचा खच त्या फाईल्समध्ये होता. डॉ. पतंगराव कदम साहेबांनी माझ्यावर केवढी मोठी जबाबदारी दिली होती! आता वेळ होती त्यांच्या विश्वासाला पात्र ठरण्याची.

हिवाळी अधिवेशन दोन एक दिवसांत संपलं असावं. कदम साहेब मुंबईला आले. तोपर्यंत कामाचा प्रकार, कामाची व्याप्ती, मंत्रालयातील महसुली दावे चालविण्याच्या पद्धती यांची माहिती घेतली होती. दोनच दिवसांत कदम साहेबांचा निरोप आला की, मी आमदार निवासावरील चंबुगबाळं बांधायचं आणि त्यांच्या मलबार हिलवरील हँगिंग गार्डन परिसरातील 'अग्रदूत' या बंगल्यावर राहायला यायचं. मी बंगल्यावर पोहोचल्यावर पहिल्या मजल्यावरील त्यांच्या बैठकीच्या खोलीत मला बोलावून घेतलं. ''राऊत, मला कायम सल्लामसलत करण्यासाठी, रेव्हेन्यूच्या केसेसची माहिती देण्यासाठी तू इथे पाहिजेस.'' मीही सहकुटुंब मुंबईला शिफ्ट होणार नव्हतोच, त्यामुळे तत्काळ हो म्हणालो.

कदम साहेबांचा जनसंपर्क खूप दांडगा, 'अग्रदूत' वर सकाळी सकाळी जनता दरबार भरायचा. आम्ही सगळी पीए, पीएस, ओएसडी कदम साहेबांच्या डाव्या-उजव्या बाजूला पडेल तो शब्द झेलण्यासाठी उभे असू. भेटीला येणाऱ्या लोकांच्या कामाच्या प्रकाराप्रमाणे आम्हांमध्ये जबाबदाऱ्यांचे जाग्यावरच वाटप होई. कामाशी संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ फोन होई. लगेच भेटलेल्या व्यक्तीला त्या अधिकाऱ्याला जोडून दिले जाई. सगळं कसं झटपट. केसेस चालवण्याच्या प्रक्रियेवेळी कदम साहेबांच्या खूप जवळ आलो. पक्षकारांच्या आमिषाला बळी न पडता मेरीट प्रमाणे केसेस चालवल्या जाव्यात, असं मला वाटायचं. कदम साहेबांनी त्यात राजकीय मर्यादा कधी आड येऊ दिली नाही. मेरीट सोडून अजिबात केस चालवायची नाही, हा दंडक त्यांनी पाळला. मी आणि तत्कालीन अतिरिक्त मुख्य सचिवांचे ओएसडी राजेश कुलकर्णी सर आम्ही दोघांनी एखाद्या केसबाबत



सकारात्मक मत दिले की, ते बिनधास्त निकालावर किंवा आदेशावर सही करीत. कदम साहेब तसे सावध असत. प्रकरणातील क्लिष्टता ते बारकाईने पाहत, एखाद्याच्या बाबतीत दृढ विश्वास निर्माण झाल्याखेरीज बिनधास्तपणा दाखवत नसत.

मतदारसंघातील जनता म्हणजे घरची माणसं. त्यांची कामं प्राधान्याने करण्याकडे साहेबांचा कल असायचा. भारती विद्यापीठाचे संस्थापक व कुलपती असल्याने प्रवेशासाठी, फी कमी करण्यासाठी खूपजण अर्ज घेऊन येत. कदम साहेब हिरव्या शाईच्या पेनने मतदारसंघातला पाहिला की, दणादण १/२, ३/४ असे लिहीत. मला ते पहिल्यांदा लक्षात आलं नाही. सुनीलने सांगितले की, ते कमी केलेल्या शैक्षणिक शुल्काचे प्रमाण आहे. माझ्या लक्षात आले की, मतदारसंघातील जनतेवर कदम साहेबांचे किती प्रेम आहे.

कदम साहेबांच्या प्रदीर्घ राजकीय वाटचालीत प्रशासकीय यंत्रणांशी त्यांचा घनिष्ठ संबंध आला. ते बऱ्याच अधिकाऱ्यांना एकेरीने संबोधित करायचे. यात त्या अधिकाऱ्याला गौण समजणं हा अजिबात भाग नव्हता. प्रेम आणि जिव्हाळ्याचं नातंच असं निर्माण केलं होतं त्यांनी. अधिकाऱ्यांची ते सतत पाठराखण करीत. हा अनुभव मला सहावा वेतन आयोग लागू होण्याच्या प्रक्रियेवेळी आला. सहाव्या वेतन आयोगामध्ये तहसीलदार आणि गट विकास अधिकाऱ्यांच्या वेतनामध्ये तफावत पडत होती. तहसीलदार तालुक्याचा दंडाधिकारी असताना देखील त्याचा पगार कमी असणं हे प्रशासकीय संतुलनाच्या दृष्टीने हिताचं नव्हते. कदम साहेबांनी महसूलमंत्री या नात्याने यात पुढाकार घेतला. तहसीलदार संघटनेने लिहिलेल्या निवेदनावर नेहमीच्याच गतिशीलतेने मंत्रिमंडळ बैठकीत 'ठेवा' म्हणून शेरा लिहिला. आणि दोहोंच्या वेतनात समानता आली. तहसीलदार संवर्गाने त्यांचे आयुष्यभर आभार मानावयास हवेत.

आम्ही नायब तहसीलदार-तहसीलदार संघटनेचं अधिवेशन नाशिकला घ्यायचं ठरवलं. अधिवेशन आलं की, मागण्या आल्या, ठराव आले. मागण्या मान्य होण्यासाठी प्रमुख पाहुणाही त्याच दर्जाचा असावा, म्हणून संघटनेने माझ्याकडे कदम साहेबांना आणण्याची गळ घातली. कदम साहेबांनी 'तू कधीपासून संघटनेत कामं करतोस' असं आश्चर्य व्यक्त करून निमंत्रण स्वीकारलं. मग काय, संघटनेने थेट हेलिकॉप्टरच केलं साहेबांसाठी. मी कदम साहेबांसोबत पहिला प्रवास हेलिकॉप्टरने केला. संघटनेने कार्यक्रम झोकात केला, माझंही मूठभर मांस वाढलं. प्रमोशन्स वेगाने व्हावीत ही एक प्रमुख मागणी त्यात होती. ती पूर्ण करण्याचं त्यांनी आश्वासन दिलं आणि थोड्या दिवसांत पूर्णदेखील केलं.

मुंबईला परतल्यावर कदम साहेबांनी तत्कालीन अतिरिक्त मुख्य सचिव, महसूल नीला सत्यनारायण मॅडम ह्यांना सूचना दिल्या आणि त्यांनी मोलाची मदत केली. डि.पी.सी. खात्यांतर्गत बढती समितीची बैठक अवर सचिव गोखले साहेबांच्या प्रयत्नाने मंत्रालयीन कर्मचाऱ्यांचा काही कारणाने बहिष्कार असतानादेखील डि.पी.सी. झाली. डि.पी.सी. झाली खरी पण खरी कसोटी नंतर लागते. बढतीची फाईल मंत्रालयाच्या मजल्यांची बऱ्याचदा चढ-उतार करते. एके दिवशी माझी खूप धावपळ झाली. त्या दिवशी चार खात्यांच्या सचिव व मंत्रीमहोदयांच्या सह्या घ्यायच्या होत्या. मी आणि माझा मित्र अजित देशमुख आम्ही चंग बांधला. माझी ह्या मजल्यावरून त्या मजल्यावर माझं नेहमीचं काम सोडून होणारी धावपळ कदम साहेबांच्या लक्षात आली. एका सहीसाठी मी त्यांच्याकडे आलो. तेव्हा माझा घामाघूम देह आणि हातात जाडजूड फाइल पाहून इतर स्टाफला म्हणाले, ''बघा कशी धावपळ करतोय सतीश, मी पण फाईली घेऊन अशीच धावपळ करायचो. उगीच नाही भारती विद्यापीठाची १८० शाळा-कॉलेजेस काढली.'' माझ्या धावपळीकडे पाहून त्यांना त्यांची धावपळ आठवली याचं खूप समाधान वाटलं होतं मनाला त्या वेळी. कदम साहेबांमुळेच आमच्या रखडलेल्या प्रमोशन्सचा मार्ग मोकळा झाला. त्यांच्या सहीनेच मी उपजिल्हाधिकारी झालो.

बढती मिळाली आणि सोबत अजून एक झेप घ्यायची संधी मिळाली. संधी होती दिल्लीला जाण्याची. आदरणीय शरद पवार साहेबांकडे अतिरिक्त खासगी सचिव म्हणून जाण्याची संधी आली आणि मला दिल्लीची संसद खुणावू लागली. महाभारत काळापासून ऐतिहासिक, सांस्कृतिक वारसा असलेली, कित्येक शतके अनेक स्थित्यंतरे पाहिलेली, उत्कर्ष-ऱ्हास अनुभवलेली, समृद्धी-विनाश पाहिलेली दिल्ली जवळून पाहण्याची मोठी संधी होती. विशेष म्हणजे कन्याकुमारी ते हिमाचल, कच्छ ते अरुणाचल देशाचा कारभार कसा चालतो, हे पाहावयास मिळणार होते, खूप काही शिकावयास मिळणार होते. कदम साहेबांचा खूप विश्वास संपादला होता, ते सहजा-सहजी सोडण्यास तयार होतील अशी शक्यता नव्हती. मी पहिल्यांदा सुनील चव्हाण या मित्राला हा विषय काढावयास सांगितला. सुनीलने कदम साहेब आणि चिरंजीव बाळासाहेब ऊर्फ विश्वजित यांच्याकडे विषय काढला. सुनीलकडून समजलं की, कदम साहेब गंभीर झाले. त्यांनी सुनीलकडे रोष प्रकट केला. पण त्यामागे मला न सोडण्याची भूमिका होती. यापेक्षा काय हवं असतं अधिकाऱ्याला? पुन्हा आपलंच सरकार येणार आहे. जाऊ नकोस, असा सल्ला पण दिला. मी कसंबसं चिरंजीवांना राजी केलं. ते म्हणाले की, ''पवार साहेबांकडे तुम्ही जाताय म्हणून नाही म्हणता येत नाही.'' त्यांनी वडिलांना राजी केलं आणि मी दिल्लीची वाट धरली. आदल्या रात्री सुनील गळ्यात पडून रडला. 'अग्रदूत'शी ऋणानुबंध असे काही जुळले होते की, ड्रायव्हर, ऑपरेटर, पोलीस स्टाफ, नोकर मंडळी या सर्वांना वाईट वाटले.

कदम साहेब दिल्लीत साहेबांकडे आले की, त्यांची भेट व्हायची. मला पाहिलं की, त्यांचा जीव मोठा होई. आपला माणूस म्हणून मला हाताला धरून जवळ ओढीत. महाराष्ट्रातदेखील कार्यक्रमांच्या ठिकाणी भेट झाली की, हात धरून गाडीपर्यंत नेत. अवतीभवतीची गर्दी हे पाहून चकित व्हायची. असे प्रसंग वारंवार आले. सत्तांतर झाल्यानंतर तीन साहेबांनी आणि मी एकत्र प्रवास केला. शिरोळच्या दत्त साखर कारखान्याचा मोळी टाकण्याचा कार्यक्रम

होता. पवार साहेब, कदम साहेब आणि बाळासाहेब (थोरात) आणि मी एकाच हेलिकॉप्टर मध्ये होतो. महाराष्ट्र आणि देशाच्या राजकारणावर कदम साहेब मिश्किल, रांगड्या भाषेत मत मांडीत होते, पवार साहेब मंद स्मित करून ऐकून घेत होते. हेलिकॉप्टर हेलिपॅडवर घिरट्या घालून उतरण्याची तयारी करू लागलं, तशी कदम साहेबांची काहीतरी घालमेल झाली. त्यांच्या स्वरात आर्तता होती. पवार साहेबांना ते हृदगत भावाने म्हणाले, ''साहेब, आपली काळजी घ्या, आपण आहात तर दिल्लीत महाराष्ट्र आहे. आपली गरज आहे महाराष्ट्राला आणि देशाला. आपण खूप-खूप जगलं पाहिजे साहेब.'' मी गहिवरलो. तोपर्यंत हेलिकॉप्टर जमिनीवर येऊन विसावलं.

पवार साहेबांविषयीची आपुलकी, साहेबांनी देशाचे नेतृत्व करावे ही भावना ते उघडपणे भाषणातून व्यक्त करायचे. कितीतरी कार्यक्रमात साहेबांनी पंतप्रधान व्हावं, समान विचारांच्या पक्ष आघाडीचं नेतृत्व करावं, असं उघडपणे बिनदिक्कत जोशात म्हणायचे. पवार साहेबांनी सकाळी ११ वाजता मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आणि संध्याकाळी ५ वाजता कदम साहेबांच्या मेडीकल कॉलेजला मान्यता दिली, याचा ते कृतज्ञतेने उल्लेख करीत.

२६ नोव्हेंबर २०१७ रोजी माजी खासदार अशोक मोहोळ यांच्या वाढदिवसानिमित्त पवार साहेबांसोबत तेही हजर होते. माजी खासदार नानासाहेब नवले यांच्या ताथवडे येथील घरी दुपारच्या जेवणाचा बेत होता. पवार साहेब आणि ज्येष्ठ मंडळींसाठी घरात व्यवस्था केली होती. मी काही कारणानिमित्त पवार साहेबांकडे गेलो. मला पाहून मोठ्या आवाजात शेजारच्या खुर्चीवर थाप मारत म्हणाले, ''सतीश, ये की, इथे माझ्या शेजारी बस जेवायला.'' साहेबांच्या नजरेच्या टप्प्यात मी जेवायला बसायचं टाळतो. मी बावरलो. कसंबसं टाळत बाहेर व्यवस्था आहे केलेली, असं सांगून काढता पाय घेतला. मात्र ही त्यांची आणि माझी शेवटचीच भेट ठरली.

२७ जानेवारी रोजीच्या आदल्या दिवशी




म्हणजे मागील भेटीच्या बरोबर दोन महिन्यांनंतर मी कदम साहेबांच्या पुण्यातील बी.एम.सी.सी. कॉलेजजवळील सिंहगड निवासस्थानी माझ्या काव्यसंग्रह प्रकाशन कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका देण्यासाठी गेलो. बंगल्यावर कुणीही नव्हते. मी एका कर्मचाऱ्याकडे पत्रिका दिली. आणि नंतर विश्वजित कदमांशी बोललो. त्यांनी सांगितलं की, ''मी येतो, कदम साहेब आजारी आहेत आणि खरंच येऊ शकत नाहीत. नाहीतर तुम्हाला माहीत आहे की, तुमच्या कार्यक्रमाला त्यांनी टाळलं नसतं.'' मला वाटलं, नक्कीच ते न येण्याइतकं काहीतरी कारण असावं. पण केवळ महिन्याभरात मृत्यूच्या द्वारी घेऊन जाण्याइतपत असेल असं कधी मनाला शिवलं नव्हतं. माझं किती भरभरून कौतुक केलं असतं त्यांनी, हे वेगळं सांगायला नको.

२ मार्च रोजी सकाळी ११.३०च्या दरम्यान विश्वजित कदमांचा मला फोन आला की, त्यांना साहेबांशी तातडीने काहीतरी बोलायचंय. साहेब मांजरी येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट कार्यालयात थोडे व्यस्त होते. गाडीतून घरी निघाल्यावर मी त्यांच्या बोलण्याची व्यवस्था केली. साहेबांनी तात्काळ दिवसभराचे कार्यक्रम रद्द केले. आणि मुंबईचे लीलावती रुग्णालय गाठले. कदम साहेब माझेही एकेकाळचे बॉस असल्याने मनाने मलाही खेचत सहाव्या मजल्यावरील अतिदक्षता विभागात नेले. त्यांची ती अवस्था पाहवली नाही. ते काही दिवसांचे सोबती असल्याचं जाणवलं. ईश्वरानेदेखील त्यांची हालातून सुटका केली आणि ९ मार्चच्या रात्री त्यांची प्राणज्योत मावळली. मला समजले, तेव्हा मी बाहेरगावी होतो. मध्यरात्री घरी आलो. रात्र कशीबशी काढली आणि सकाळी स्वत: ड्रायव्हिंग करत धनकवडीचे भारती विद्यापीठ गाठले. सकाळी ११च्या सुमारास कदम साहेबांचे पार्थिव विद्यापीठात आणले. लोकांचा अलोट समुदाय त्यांच्या अंत्यदर्शनासाठी लोटला होता. चेंगराचेंगरी होते की काय, इतकी गर्दी उसळली. कुटुंबीय व नातेवाईक दु:खात होते. मन घट्ट करून गर्दी नियंत्रित करण्यासाठी कुणीतरी पुढं येणं गरजेचं होतं. मी काही वेळ पुन्हा दिवंगत कदम साहेबांच्या ओएसडीची भूमिका घेतली. आणि लोकांना प्रेमाने पांगवू लागलो. खरं सांगायचं तर माझा पाय बराच वेळ निघत नव्हता. गर्दी नियंत्रणात आल्यावर मी विश्वजित कदम साहेबांचे सांत्वन करून निरोप घेतला.

कदम साहेबांच्या रूपाने एक वेगवान कर्तृत्वाचा महामेरू आपल्यातून निघून गेला. चिरंजीव विश्वजित व वहिनीसाहेब आणि राम-लक्ष्मणासारखे एकीने राहणारे सर्व कदम बंधू यांच्या दु:खात मी सामील आहे.



# चार हातांची वज्रमूठ!

## स्मरणगंध साहेबांचा

सुनील चव्हाण

मराठी साहित्यविश्वाच्या नभांगणावर अविरतपणे अधिराज्य गाजवणारा ध्रुवतारा, अवघ्या महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व म्हणजे पु. ल. देशपांडे! डॉ. पतंगराव कदम साहेबांच्या कार्यकर्तृत्वाने अक्षरशः भारावून गेलेले पु.ल. विद्येच्या माहेरघरात अर्थात पुण्यनगरीत जाहीर समारंभात ते साहेबांना 'पतंगराव नव्हे रॉकेटराव' म्हणायचे. आपले साहेब म्हणजे अजब रसायन होते. तो क्षितिजापार धावणारा अश्वमेध होता. तो काळाचा वेध, निसर्गाचा शोध आणि बोध होता. तो फक्त भारती विद्यापीठाचा धनी नव्हे तर वसंतदादा पाटील, राजारामबापू पाटील, यशवंतराव चव्हाण साहेब, या परंपरेचा 'मुकुटमणी' होता. तो सोनहिऱ्याचा रिवाज आणि भारती भवन ते विधानभवन दणाणून सोडणारा बुलंद आवाज होता.

साहेब सहकारमंत्री असताना यशवंतराव मोहिते भाऊंच्या आठवांचा जागर करायचे. आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण सहकाराच्या पायावरच उभी आहे, याची जाण आणि भान त्यांना सदैव असायचे.



राज्यातील साखर कारखाने वाचले पाहिजेत ही त्यांची तळमळ होती. आजारी साखर कारखान्यांच्या दुरवस्थेबद्दल त्यांनी आवाज उठवला. कारखान्यांचे पुनरुज्जीवन झाले पाहिजे ही त्यांची हाक होती. महाराष्ट्राचे जाणते नेते शरद पवार साहेबांनी त्यांना केंद्रातून मदतीचा हात दिला. पुढे याच चार हातांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी जिवाचे रान केले.

रयत शिक्षण संस्थेच्या व्यासपीठावर या दोन्ही साहेबांनी विधायक भूमिकेचाच जागर केला. विशेष म्हणजे ज्येष्ठ नेते एन. डी. पाटील साहेब आणि शरद पवार साहेब या दोन ध्रुवांना जोडणारे कदम साहेब एक दुवा होते.

एकदा रयत शिक्षण संस्थेचा ९ मे वर्धापनदिनाचा कार्यक्रम आटोपून साहेब साताऱ्यातून पुण्यास चालले होते. मी त्यांच्या सोबत होतो. दुसऱ्या दिवशीच भारती विद्यापीठाचा वर्धापनदिन होता. जुन्या स्मृतींना उजाळा देत साहेब म्हणाले, ''कर्मवीर अण्णा माझे आदर्श आहेत. संस्थेसाठी त्यांनी सर्वस्व वाहिले. मी त्यांच्या प्रकाशवाटेने चाललो आहे. मला गोरगरिबांच्या मुलांपासून तत्कालीन पंतप्रधान नरसिंहराव यांच्या नातीपर्यंत सर्वांना शिक्षण देता आले, याचा अभिमान वाटतो.'' यावर मी साहेबांना म्हणालो, ''साहेब, भाकरीला मोताद झालेल्या गोरगरिबांच्या लेकरा-बाळांपासून देशातीलच नाही तर जगभरातील विद्यार्थ्यांना आपण शिक्षण दिलेत, पण यापेक्षाही मला आपला अभिमान एका वेगळ्याच गोष्टीसाठी वाटतो.'' साहेब निःस्तब्ध होऊन ऐकत होते आणि मी

**'लीलावती'ला सहाव्या मजल्यावर साहेबांनी अखेरचा श्वास घेतल्यावर सुप्रियाताई आणि बाळासाहेबांना धाय मोकलून रडताना, पवारसाहेबांच्या पापण्यांच्या कडा ओलावताना मी पाहत होतो. काळाच्या पुलाखालून खूपच पाणी वाहून गेलेय, आता फक्त अश्रू वाहत आहेत.**



बोलत होतो, ''साहेब, आशिया खंडातील सर्वांत मोठी महाकाय संस्था कर्मवीरांनी स्थापन केली, आजपर्यंत जगाला सर्वांत जास्त शहाणे करण्याचे काम अण्णांनी केलेय. त्या कर्मवीर अण्णांच्या नातवंडं-पतवंडांना शिक्षण देण्याचे महान काम आपण केलेत.'' साहेब अवाक् होते. मी पुढे म्हटले, ''साहेब, मी लहान तोंडी मोठा घास घेतोय, पण एक प्रश्न विचारू का?'' साहेबांच्या होकार-नकाराअगोदरच मी म्हणालो, ''साहेब, रयतेच्या व्यासपीठावर पवार साहेब आणि आपणास एकत्र पाहिले की खूप बरे वाटते. सोनसळ व काटेवाडीची राजकीय वाट एकच असती तर राज्याचे राजकारण वेगळे नसते का?'' एका क्षणाचाही विलंब न करता साहेब म्हणाले, ''काँग्रेस माझा जीव आहे म्हणून मी काँग्रेसमध्ये आहे. पण राज्याच्या राजकारणाचे मी नाही सांगू शकत. पण आम्ही एकत्र असतो तर राज्याचे समाजकारण, सहकार आणि शिक्षणक्षेत्र नक्कीच एका वेगळ्या उंचीवर असते.''

महाराष्ट्र राज्यातील या दोन कर्तबगार नेत्यांच्या चार हातांची वज्रमूठ एकत्र पाहण्याचे भाग्य आपल्याला लाभले नाही. कदाचित एका म्यानात दोन तलवारींचे ते समीकरणही असेल. पण 'लीलावती'ला सहाव्या मजल्यावर साहेबांनी अखेरचा श्वास घेतल्यावर सुप्रियाताई आणि बाळासाहेबांना धाय मोकलून रडताना, पवारसाहेबांच्या पापण्यांच्या कडा ओलावताना मी पाहत होतो. काळाच्या पुलाखालून खूपच पाणी वाहून गेलेय, आता फक्त अश्रू वाहत आहेत.

## सेवा करण्याची संधी मिळाली हे भाग्य

मा. साहेब यांची एक आठवण. एक दिवस साहेब सकाळी १० वाजता आले. आल्यानंतर नेहमीप्रमाणे जाऊन खुर्चीमध्ये बसले व बोलावून म्हणाले, ''पोरा, मला आजपासून तासानंतर विश्रांती घेण्यास सांगायची.'' त्याप्रमाणे मीही 'होय' असे म्हणालो. परंतु साहेबांनी नेहमीप्रमाणे लोकांना भेटण्यास सुरुवात केली की त्यांना वेळेचे भान नसायचे. ते लोकांत इतके रमायचे, मग काय, लोकांचे कोणतेही काम असो. साहेब काम आधी करायचे. प्रत्येक कामामध्ये बारकाईने लक्ष घालायचे व आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करायचे. आपण त्यांना विश्रांतीची आठवण करून दिली की ते म्हणायचे, लोक संपले की थांबू. त्यांना लोकांच्या विषयी अतिशय ओढ असायची. मी भाग्यवान की मला साहेबांची सेवा करण्याची संधी मिळाली.

**- शिवाजी मोगरे**



स्मरणगंध साहेबांचा

# असा मित्र आता होणे नाही

९ मार्च २०१८ रोजी भारती विद्यापीठाचे सर्वेसर्वा डॉ. पतंगराव कदम यांचे दुःखद निधन झाले. सर्वांना मोठा धक्का बसला. एक युग संपले, वादळ शांत झाले.

सांगली जिल्ह्यातील सोनसळमध्ये, ७१२ लोकसंख्येच्या खेडेगावात शेतकरी कुटुंबात डॉ. पतंगराव कदम यांचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदेच्या सोनसळ व शिरसगाव येथील प्राथमिक शाळेमध्ये झाले आणि हायस्कूल शिक्षणासाठी ते कुंडल, जिल्हा सांगली येथे आले. प्रतिनिधी हायस्कूल, कुंडलमध्ये हायस्कूल शिक्षण घेत असताना त्यांचे वास्तव्य क्रांतिसिंह नाना पाटील बोर्डिंग, कुंडल या ठिकाणी होते. त्या वेळी मीही प्रतिनिधी हायस्कूलमध्ये शिकत होतो. ते बोर्डिंग म्हणजे एक पत्र्याची शेड होती आणि खाली शेणाने सारवलेली जमीन होती. दोन वेळेस जेवण मिळायचे आमटी आणि भाकरी. त्या आमटीमध्ये वरचे आढे दिसायचे अन् त्यात डाळीचा शोध घ्यायला लागायचा. क्रांतिसिंह नाना पाटील बोर्डिंगच्या समोरच माझे घर होते. त्यामुळे बोर्डिंगमध्ये माझे येणे-जाणे नेहमीच असायचे. त्यामुळे तेव्हापासून आमची मैत्री झाली. त्या वेळी वसंतराव माने बोर्डिंगमध्ये त्यांच्या बरोबर होते. १९५५पासून ते अखेरपर्यंत गेली ६३ वर्षे डॉ. पतंगरावजी कदम यांची अन् माझी जिवलग मैत्री होती.

हायस्कूल शिक्षण पूर्ण झाल्यानंतर रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा या ठिकाणी 'कमवा व शिका' या लेबर स्कीमच्या योजनेमध्ये होस्टेलमध्ये राहून शिवाजी कॉलेजमध्ये महाविद्यालयीन शिक्षणास डॉ. पतंगरावजी कदम यांनी सुरुवात केली. पी.डी.ला असताना जिमखाना कमिटीची निवडणूक जिंकून ते जिमखाना कमिटीचे मेंबर झाले. त्या वेळी छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये मी शास्त्र विद्याशाखेमध्ये शिक्षण घेत होतो. 'कमवा आणि शिका' योजनेमध्ये ते रमले नाहीत. घरची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने घरून पैसे मिळण्याची अजिबात शक्यता नव्हती. तेव्हा शिवाजी कॉलेजमधून पी.डी. झाल्यानंतर स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी डॉ. पतंगरावजी कदम शिवाजी कॉलेजचे प्राध्यापक ए. ए. पाटील यांची चिठ्ठी घेऊन मुख्याध्यापक श्री. एल. एम. सुभेदार यांच्याकडे साधना विद्यालय, हडपसर, पुणे येथे आले. त्या ठिकाणी पार्टटाईम शिक्षक म्हणून काम करून त्यांनी वाडिया महाविद्यालय येथून टी.डी.ची पदविका प्राप्त केली. १९६४ साली साधना विद्यालयामध्ये ते शिक्षक म्हणून काम करीत होते. त्या वेळी साधना विद्यालयात बी.एस्सी. झालेला सायन्स शिक्षक नव्हता. त्या वेळचे मुख्याध्यापक ए. डी. साळुंखे यांनी डॉ. पतंगरावजी कदम यांच्यावर सायन्स शिक्षक आणण्याची जबाबदारी सोपविली. पतंगराव कदम मुख्याध्यापकांना म्हणाले, ''माझा एक मित्र बी.एस्सी. झालेला आहे, त्याला मी घेऊन येतो.'' पतंगराव कदम हे माझ्या गावी कुंडल या ठिकाणी आले. आणि जून १९६४ मध्ये माझ्या हातात शिवाजी हायस्कूल, कराड या हायस्कूलची शिक्षकाची ऑर्डर असताना ती बाजूला ठेवून मला पुण्याला हडपसर येथे घेऊन आले. त्या वेळेपासून मी पतंगराव यांच्याशी एकनिष्ठ राहण्याचा निर्णय घेतला. हडपसर, पुणे येथे विधाते कॉलनीमध्ये त्यांनी माझ्या राहण्याची सोय केली.



डॉ. पतंगराव कदम यांनी माझ्या सर्व सुख-दुःखाच्या प्रसंगी मदत केली. सन २०१०मध्ये मला जेव्हा हार्टअॅटक आला,

**डॉ. पतंगराव कदम यांचा परीसस्पर्श झाल्यावर मातीचेही सोने व्हायचे. दैव त्यांच्या पाठीशी होता. कारण ते सतत कार्यमग्न व उद्योगात असायचे. त्यांना स्वस्थ बसलेले कधीही पाहिले नाही. त्यांनी अनेक वेळा साहसी निर्णय घेतले. त्यांच्या अंगी धैर्य होते. ९ मार्च २०१८ हा भारती विद्यापीठाच्या इतिहासातील काळा दिवस होता. मा. डॉ. पतंगराव कदम हे आम्हां सर्वांना सोडून गेले. संपूर्ण महाराष्ट्राला, भारती विद्यापीठ परिवाराला, कदम कुटुंबीयांना आणि व्यक्तिशः मला फार मोठा धक्का बसला. हे दुःख सहन करणे केवळ अशक्य आहे. त्यांना श्रद्धांजली वाहण्याची वेळ माझ्यावर आली हे माझे दुर्दैव.**

■ **व. भा. म्हेत्रे**
सहकार्यवाह, भारती विद्यापीठ, पुणे

तेव्हा माझे जावई डॉक्टर सुहास तारळेकर व मुलगी डॉ. वैशाली तारळेकर हे मला प्राथमिक उपचारानंतर रुबी हॉस्पिटलमध्ये घेऊन गेले. त्या वेळी तेथे डॉ. शिवाजीराव कदम माझे हार्ट ऑपरेशन होईपर्यंत उपस्थित होते. त्या वेळी डॉ. पतंगराव कदम मुंबईला होते. ते मुंबईहून घरी जाण्यापूर्वी मला भेटायला आले व त्यानंतर चार वेळा ते मला भेटावयास आले. माझ्या सर्व उपचाराच्या खर्चाची जबाबदारी त्यांनी उचलली. त्यानंतर सौ. वहिनीसाहेब, सौ. ताईसाहेब व डॉ. विश्वजित मला भेटावयास आले.

डॉ. पतंगराव कदम हे हडपसरला असताना माझ्या घरी जेवायला असायचे. त्या वेळी माझी आई प्रयागाबाई भागवत म्हेत्रे व मी असे दोघेच माझ्या घरी राहत होतो. मासे खाण्याची आवड त्यांना लहानपणापासून होती. कसबा पेठेतील भारती विद्यापीठाचे कामकाज संपवून परत येताना दर शुक्रवारी ते कॅन्टोन्मेंटच्या शिवाजी मार्केटमधून घरी मासे आणून द्यायचे. दि. १० सप्टेंबर २०१६ रोजी भारती सहकारी बँक व भारती मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडाराची जनरल बॉडीची मीटिंग संपवून मा. साहेब माझ्या आईला भेटण्यासाठी भारतीनगर येथे आले व आईच्या तब्येतीची स्थिती पाहून त्यांना अश्रू आवरेनासे झाले आणि आमच्या घरातून ते रडत बाहेर आले. थोड्या वेळाने सौ. विजयमाला कदम (वहिनीसाहेब) आईला भेटण्यासाठी आल्या आणि त्याच दिवशी रात्री १० वाजता माझ्या आईचे निधन झाले.

भारती विद्यापीठाचे तहहयात अध्यक्ष, डॉ. पतंगराव कदम यांचे राजकीय गुरू आणि महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन परिवहनमंत्री यशवंतराव मोहिते यांनी १९६८ साली एस.टी.



बोर्डाचे मेंबर म्हणून डॉ. पतंगराव कदम यांना संधी दिली. त्या वेळी डॉ. पतंगराव कदम यांना मिळालेल्या संधीचे त्यांनी सोने केले. एस.टी. बोर्ड मेंबर यापूर्वी महाराष्ट्राला माहिती नव्हते. त्यांनी महाराष्ट्रभर फिरून 'रस्ता तेथे एस.टी.' हा उपक्रम राबविला आणि महाराष्ट्रभर एस.टी.चे जाळे पसरविले. ग्रामीण भागातील तरुणांना रोजगाराची संधी दिली. एस.टी. बोर्ड मेंबर झाल्यानंतर आवर्जून ते निरोप देऊन माझ्या घरी जेवायला यायचे. त्यांच्या तिन्ही मुलांच्या जन्माच्या वेळी माझ्या आईचा डॉ. पतंगराव कदम यांच्या घरी मुक्काम असायचा. त्यांचे १९७५ साली लग्न झाल्यानंतर आगरकरनगरमध्ये साहेब व वहिनीसाहेब दोघेच असायचे. तेव्हा माझी आई त्यांच्याकडे होती. त्यांनी माझ्या जीवनामध्ये माझ्यासाठी सर्व प्रकारे मदत केली. 'मानव ही जात आणि माणुसकी हा धर्म' हा विचार सुरुवातीपासून त्यांनी आचरणात आणला. त्यामुळे माझ्यासारख्या गरीब निराधार कोष्ट्याच्या मुलाला ते पुण्यात घेऊन आले. मी त्यांच्या ना जातीचा ना पातीचा, ना नात्यातला ना गोत्यातला. त्यांनी जात-पात, धर्म, प्रांत यांचा भेद कधीही मानला नाही. संस्थेचा विकास झाल्यानंतरही शेवटपर्यंत त्यांनी हा विचार अमलात आणला. माझ्या पुढच्या पिढीसाठी म्हणजेच माझ्या तिन्ही मुलांच्या शिक्षण, नोकरी व लग्न यांची जबाबदारी डॉ. पतंगराव कदम यांनी पार पाडली. माझी मोठी मुलगी डॉ. वैशाली एम.बी.बी.एस., एम.डी., लहान मुलगी डॉ.दीपाली एम.ई.,पीएच.डी. आणि मुलगा मंदार बी.ई.,एम.बी.ए. असून सध्या तो अमेरिकेत असतो. दोन्ही मुली भारती विद्यापीठात मेडिकल कॉलेज व वुमेन्स इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्राध्यापक आहेत.

१० मे १९६४ साली वयाच्या १९ व्या वर्षी डॉ. पतंगरावजी कदम यांनी 'गतिमान शिक्षणातून समाजपरिवर्तन' करण्यासाठी भारती विद्यापीठाची स्थापना केली आणि रयत शिक्षण संस्थेतील शिक्षकाची नोकरी सोडून त्यांनी भारती विद्यापीठाला पूर्णपणे वाहून घेतले. साधारणत: याच वयामध्ये संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी लिहिली व छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याची स्थापना केली. भारती विद्यापीठाच्या घटनेमध्ये त्यांनी एक ध्येय भारती विद्यापीठाला स्वतंत्र विद्यापीठाचा दर्जा प्राप्त करून देण्याचे नमूद केले होते. त्यांचे हे स्वप्न २६ एप्रिल १९९६ रोजी सत्यात आले. आणि डॉ. पतंगराव कदम या विद्यापीठाचे तहहयात कुलपती झाले. आज भारती विद्यापीठ देशातील एक नामवंत विद्यापीठ म्हणून नावारूपाला आले आहे.

१९६८ साली भारती विद्यापीठाची रिजेक्टेड ३२ विद्यार्थ्यांनिशी पहिली प्रायोगिक शाखा शंकरराव मोरे विद्यालय, पुणे येथील पौडफाट्यावरील एका भाड्याच्या खोलीत सुरू झाली. १९६९ मध्ये साधना विद्यालयातील शिक्षक महादार सर यांची शंकरराव मोरे विद्यालयाच्या मुख्याध्यापकपदी डॉ. पतंगराव कदम यांनी नेमणूक केली. १९७१ साली मी व निलाखे सर शंकरराव मोरे विद्यालयामध्ये रुजू झालो. १९६९ साली भारती विद्यापीठास पहिली जमीन एरंडवणे, पुणे येथे तीन एकर एकोणचाळीस गुंठे तत्कालीन महसूलमंत्री बाळासाहेब देसाई यांच्याकडून डॉ. पतंगराव कदम यांनी प्रयत्न करून मिळवून दिली. आणि एक वर्षाच्या आत शंकरराव मोरे विद्यालयाची पत्र्याच्या शेडची इमारत उभी राहिली. त्याचे उद्‌घाटन तत्कालीन महसूलमंत्री बाळासाहेब देसाई यांना बोलावून केले.

१९७२ साली परीक्षा विभागाचा प्रमुख, १९७२ ते १९८३ अखेर इंटर्नल ऑडिटर व फायनान्स ऑफिसर म्हणून डॉ. पतंगराव कदम यांनी माझी नेमणूक केली. १९८३ साली महादार सर सेवानिवृत्त झाल्यानंतर शंकरराव मोरे विद्यालयाच्या मुख्याध्यापकपदी डॉ. पतंगरावजी कदम यांनी माझी नेमणूक केली. मुख्याध्यापक पदाचा चार्ज देतेवेळी ते स्वत: विद्यालयाच्या ऑफिसमध्ये आले. त्या वेळेस शंकरराव मोरे विद्यालयातील शिक्षकांची राहण्याची सोय करण्यासाठी पौड रोडवरील जागा अल्प किमतीत घेऊन त्या ठिकाणी शिक्षकांसाठी बंगले बांधण्यासाठी डॉ. पतंगराव कदम यांनी मोलाची मदत व मार्गदर्शन केले व 'भारतीनगर' असे त्याचे नामकरण केले. मी फ्लॅटमध्ये राहतो पण माझ्या शिक्षकांचे बंगले झाले पाहिजेत, असे ते म्हणत.

१९८४ पासून डॉ. पतंगराव कदम यांचा वाढदिवस आणि शंकरराव मोरे विद्यालयाचे स्नेहसंमेलन असा संयुक्त कार्यक्रम मी मुख्याध्यापक असताना सुरू केला. तेव्हापासून डॉ. पतंगराव कदम यांचा वाढदिवस सार्वजनिकरीत्या सुरू करण्याची प्रथा सुरू झाली. भागातील सर्व कार्यकर्ते, भारती विद्यापीठाचे प्राचार्य, मुख्याध्यापक व डॉ. पतंगराव कदम यांचे आई-वडील त्या वेळी मोरे विद्यालयात उपस्थित राहायचे. १९८४च्या पहिल्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. शंकरराव खरात उपस्थित होते.

१९८८मध्ये महादार सर आजारी पडल्यामुळे सहकार्यवाह म्हणून भारती विद्यापीठामध्ये कोणाची नेमणूक करावयाची, असा डॉ. पतंगराव कदम यांच्यापुढे प्रश्न होता. डॉ. शिवाजीराव कदम यांनी माझे नाव सुचविले आणि माझी नेमणूक डॉ. पतंगराव कदम यांनी केली व गेली ३० वर्षे जनरल, शालेय शिक्षण, इस्टेट, अर्थ, ऑडिट, अकौंट्स इत्यादी भारती विद्यापीठाच्या कार्याची जबाबदारी डॉ. पतंगराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली मी प्रयत्नपूर्वक पार पाडीत आहे.

त्वमेव माता च पिता त्वमेव । त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ।

त्वमेव विद्या द्रविणम् त्वमेव । त्वमेव सर्वम् मम देव देव ।।

वरील भावनेने सुरुवातीपासून डॉ. पतंगराव कदम यांच्यावर अविरत निष्ठा ठेवून काम केल्यामुळे त्यांनी मला अनेक ठिकाणी संधी दिल्या. त्यांनी ज्या ट्रस्ट स्थापन केल्या, त्यामध्ये पतंगराव कदम प्रतिष्ठान, भारती विद्यापीठ मेडिकल फौंडेशन, भारती कला ॲकॅडमी, यशवंतराव चव्हाण स्मृती न्यास, यशवंतराव मोहिते प्रतिष्ठान, सोनहिरा फौंडेशन फॉर रूरल डेव्हलपमेंट अशा अनेक ट्रस्टमध्ये त्यांनी माझी ट्रस्टी म्हणून नेमणूक केली.

१९८०पासून आमदारकीच्या सर्व निवडणुकांमध्ये आर्थिक व्यवहाराची

जबाबदारी त्यांनी माझ्यावर सोपविली होती. आणि मी ती निष्ठापूर्वक पार पाडली. महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात २० वर्षे ते विविध खात्यांचे मंत्री होते. शिक्षण, महसूल, उद्योग, सहकार, जलसंधारण, वने, मदतकार्य व पुनर्वसन मंत्री म्हणून त्यांनी महाराष्ट्राच्या विकासाला सर्वतोपरी योगदान दिले.

भारती विद्यापीठाचे आजीव सदस्य, कार्यकारी व नियामक मंडळ सदस्य, भारती विद्यापीठाचा ट्रस्टी म्हणून काम करण्याची संधी डॉ. पतंगराव कदम यांनी मला दिली.

विलासराव देशमुख शिक्षणमंत्री असताना त्यांच्या ऑफिसमध्ये माझा बायोडाटा स्वत: लिहून देऊन एस.एस.सी. बोर्डाचा बोर्ड मेंबर म्हणून काम करण्याची संधी त्यांनी मला दिली.

भारती सहकारी बँकेमध्ये २० वर्षे संचालक, १४ वर्षे व्हाईस चेअरमन म्हणून काम करण्याची संधी त्यांनी मला दिली. त्या वेळी नामदेवराव बढे, डॉ. एच. के. तोडमल व डॉ. शिवाजीराव कदम हे चेअरमन होते.

गेली ३२ वर्षे भारती मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडाराचे संचालक म्हणून, १२ वर्षे चेअरमन म्हणून व २० वर्षे व्हाईस चेअरमन म्हणून काम करण्याची संधी डॉ. पतंगराव कदम यांनी मला दिली. उद्यम: साहसं धैर्यम् बुध्दि:, शक्ती:, पराक्रम: । षड्रेते यत्र वर्तते तत्र देवता सहाय्यीकृतम् ।। हे सहा गुण ज्यांच्या ठायी आहेत, त्यालाच परमेश्वर मदत करतो.

डॉ. पतंगराव कदम यांचा परीसस्पर्श झाल्यावर मातीचेही सोने व्हायचे. देव त्यांच्या पाठीशी होता. कारण ते सतत कार्यमग्न व उद्योगात असायचे. त्यांना स्वस्थ बसलेले कधीही पाहिले नाही. त्यांनी अनेक वेळा साहसी निर्णय घेतले. त्यांच्या अंगी धैर्य होते. १९८० साली आमदारकीच्या निवडणुकीमध्ये पराभव होऊनही ते खचले नाहीत. १९८५च्या निवडणुकीमध्ये विरोधी उमेदवारांमध्ये सर्वाधिक मते मिळवून आमदार म्हणून पहिल्यांदा निवडून आले. त्यांचे थोरले चिरंजीव अभिजित यांचे अपघाती निधन झाले तरीही ते खचले नाहीत. त्यांच्याकडे अफाट बुद्धिमत्ता होती. काही वेळा शक्तीचा वापर करूनही त्यांनी यश मिळविले. त्यांच्याकडे पराक्रम तर अफाट होता. अशी ही कर्तृत्वसंपन्न व्यक्ती आपल्या सर्वांना सोडून गेली.

९ मार्च २०१८ हा भारती विद्यापीठाच्या इतिहासातील काळा दिवस होता. मा. डॉ. पतंगराव कदम हे आम्हां सर्वांना सोडून गेले. संपूर्ण महाराष्ट्राला, भारती विद्यापीठ परिवाराला, कदम कुटुंबीयांना आणि व्यक्तिश: मला फार मोठा धक्का बसला. त्यांच्या जाण्याने भारती विद्यापीठामध्ये फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ती भरून येणे केवळ अशक्य आहे. हे दु:ख सहन करणे केवळ अशक्य आहे. त्यांना श्रद्धांजली वाहण्याची वेळ माझ्यावर आली हे माझे दुर्दैव. त्यांच्या आत्म्याला चिरशांती व सद्‍गती लाभो एवढीच परमेश्वरचरणी प्रार्थना करतो आणि त्यांना भावूपर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

---

# सांत्वनासाठी साहेब घरी आले

भारती विद्यापीठात विधी (कायदा) अधिकारी म्हणून कार्यरत असल्यामुळे मला नेहमीच साहेबांशी संवाद साधण्याचा योग यायचा. कायद्याच्या क्षेत्रातल्या बारीक सारीक गोष्टींचीही त्यांना तपशीलवार माहिती असायची. त्यांच्याकडे जाताना पूर्ण तयारीनिशी आणि अभ्यास करून जावं लागायचं. स्पष्ट भूमिका आणि तत्काळ निर्णय यामुळे कामं वेगानं पुढं जायची.


एकदा काही कामाच्या निमित्ताने मी मुंबईला गेलो होतो. तेव्हा साहेब मंत्री होते. दिवसभराची कामे उरकून निघायला बराच उशीर झाला. जाताना साहेबांनी जेवण कुठं करणार इथपासून सगळ्या गोष्टींची आपुलकीने चौकशी केली. मी पुण्याला बसने जातोय हे समजल्यानंतर त्यांनी मला त्यांच्या गाडीतून पुण्याला जायला सांगितले. त्यांची गाडी पुण्याला जाणारच होती. मला संकोच वाटत होता पण साहेबांनी खूप आग्रह केला. साहेब पुण्याला येणार नव्हते. त्यांच्या त्या गाडीतून मी आणि चालक दोघेच पुण्याला आलो. आपल्या कर्मचारी, सहकाऱ्यांविषयी साहेबांना खूप आस्था होती. घरातल्या मोठ्या माणसाने घ्यावी तशी ते कर्मचाऱ्यांची, सहकाऱ्यांची काळजी घेत असत.

माझ्या वडिलांचे सुमारे एक वर्षापूर्वी दुःखद निधन झाले. साहेबांना ही बातमी समजली. साहेब माझं सांत्वन करण्यासाठी घरी आले. घरातल्या सगळ्यांची मायेने विचारपूस केली. खरंतर ऑफिसात भेटल्यानंतरही साहेबांना माझं सांत्वन करता आलं असतं. आपल्या भारती परिवारातल्या एखाद्या माणसावर दुःखद प्रसंग आल्यानंतर घरी जाऊन त्याचं सांत्वन करण्याचं काम कुटुंबप्रमुख म्हणून आपणच केलं पाहिजे, अशी साहेबांची भूमिका होती. आत एक बाहेर एक असा त्यांचा स्वभाव नव्हता. खूप रागावलेले साहेब जसे आम्ही पाहिले आहेत तसेच हळवे होऊन मायेचं छत्र धरणारे साहेबही पाहिले आहेत. त्यांच्या जाण्यामुळे मायेचं छत्र हरपलं आहे, अशीच भारती विद्यापीठ परिवारातील सर्वांची भावना आहे.

ॲड. संजय पेंढारकर

# स्मरणगंध साहेबांचा

डॉ. उत्तम भोईटे





# तुमच्यासारखे तुम्हीच ; तुम्हाला उपमा तुमचीच

> एकदा त्यांच्या कार्यालयात एक गरीब दिसणारा इसम आला. तो म्हणाला, ''माझ्या मुलीचे सिझेरिन करण्याची आवश्यकता आहे असे डॉक्टर म्हणतात, माझ्याकडे पैसे नाहीत, मला मदत करा.'' साहेबांनी खिशात हात घालून जेवढे पैसे होते तेवढे त्या इसमाला दिले. माझ्या कल्पनेप्रमाणे काही हजार असावेत. पाया पडून तो इसम निघून गेला. मी साहेबांना म्हणालो, ''या इसमाने जे तुम्हाला सांगितले ते खोटे कशावरून नसेल?'' ते म्हणाले, ''त्याने खोटे सांगून माझ्याकडून पैसे घेतले तर मला त्याचा दोष लागणार नाही. परंतु, खरोखरच त्याला गरज असताना मी त्याला पैसे दिले नाही, तर त्याचा दोष निश्चितपणे मला लागेल.'' इतका उदारपणा त्यांच्या मनात होता.

सन १९७९ च्या जुलै-ऑगस्टमध्ये मी पुणे विद्यापीठामध्ये समाजशास्त्र विभागात प्रपाठक म्हणून रुजू झालो. मी पुणे विद्यापीठाचा विद्यार्थी, परंतु नोकरीसाठी अन्यत्र गेलो होतो. पुणे विद्यापीठात आल्यानंतर हळूहळू येथील व्यक्ती आणि संस्था यांचा परिचय होऊ लागला. लोकांच्या बोलण्यामध्ये आदरणीय डॉ.पतंगराव कदम साहेब यांचे नाव वारंवार येत होते. त्यांच्या कार्याविषयी लोक आदराने बोलत होते. त्यामुळे त्यांच्याबद्दल औत्सुक्य निर्माण झाले आणि त्यांची ओळख व्हावी अशी इच्छा मनात निर्माण झाली. विद्यापीठाच्या कामानिमित्त भारती विद्यापीठाच्या यशवंतराव मोहिते महाविद्यालयामध्ये वेळोवेळी जाण्याचा योग आला. त्यामध्ये मा. साहेबांच्या भेटी झाल्या. त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आणि अफाट कर्तृत्व यामुळे मी भारावून गेलो. ग्रामीण विभागातून आलेली एक व्यक्ती, दृढनिश्चयाने किती महान कार्य करू शकते, याचे साहेब हे मूर्तिमंत उदाहरण. माझ्या मनातील त्यांच्याबद्दल आदराची भावना ही सातत्याने वृद्धिंगत होत गेली आणि एका भेटीत मी त्यांना म्हणालो की, ''जेव्हा मी पुणे विद्यापीठातून सेवानिवृत्त होईन, तेव्हा मला तुमच्या संस्थेमध्ये तुमच्याबरोबर काम करणे आवडेल. मला भारती विद्यापीठ भवनच्या आठव्या मजल्यावर बसण्यासाठी एक खोली द्यावी, अन्य माझी काही अपेक्षा नाही.'' त्यावर साहेब 'पाहू' म्हणाले. पुढे वेळोवेळी भेटी होत गेल्या.

सन १९९६ मध्ये भारती विद्यापीठाच्या संस्थासमूहाला अभिमत विश्वविद्यालयाचा दर्जा मिळाला. त्यांचे बंधू डॉ.शिवाजीराव कदम हे माझे स्नेही व पुणे विद्यापीठातील सहकारी. ते मला मा.साहेबांकडे घेऊन गेले. मी भारती विद्यापीठाला विश्वविद्यालयाचा दर्जा मिळाल्याबद्दल साहेबांचे अभिनंदन केले. डॉ.शिवाजीराव कदम यांनी माझा बायोडेटा मागवून घेतला. त्या वेळी मी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामध्ये कुलगुरू म्हणून काम करीत होतो.

एका रविवारी मी पुण्यात आलो होतो. त्याचवेळी साहेबांचा घरी फोन आला आणि म्हणाले, ''पुण्यात असाल तर इकडे रविराज हॉटेलमध्ये या. मी पत्रकार परिषद घेतो आहे आणि आमच्या अभिमत विश्वविद्यालयाचे प्रथम कुलगुरू म्हणून तुमचे नाव जाहीर करतो आहे.'' मला आनंदाचा आणि आश्चर्याचा धक्का बसला. त्या वेळी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल आणि विद्यापीठाचे कुलपती डॉ. अलेक्झांडर पुण्यात होते. त्यांना मी दुसऱ्या दिवशी सकाळी जाऊन भेटलो. मला पाहताच ते म्हणाले, ''तुमच्या निवडीच्या बातम्या सर्व वृत्तपत्रांत आल्या आहेत. तुमचा राजीनामा स्वीकारण्याखेरीज माझ्याकडे दुसरा पर्याय नाही.'' मी मुक्त विद्यापीठाच्या कुलगुरुपदाचा राजीनामा देऊन दि.९ ऑगस्ट १९९६ रोजी भारती विद्यापीठाचा प्रथम कुलगुरू म्हणून रुजू झालो. त्या वेळी मा.साहेब पुण्यात नव्हते. ते मला फोनवर म्हणाले, ''आज ९ ऑगस्ट. आज क्रांतिदिन आहे. आपण आपल्या नव्या विश्वविद्यालयाच्या माध्यमातून क्रांती घडवून आणू.''

पुढे पाच वर्षे या विश्वविद्यालयाचा कुलगुरू म्हणून मी काम केले. या कालखंडामध्ये मला मा.साहेबांनी पूर्णपणे शैक्षणिक स्वायत्तता दिली होती. नवे विद्यापीठ म्हणून मी सर्व कारभार कायदेकानू, नियम यांना धरून करण्याचा प्रयत्न करीत असे. एकदा मला ते म्हणाले, ''तुम्ही कायद्याच्या काना, मात्रा, वेलांटी याच्यावर

फार भर देता.'' मी त्यांना म्हणालो, ''तसे करू नको असे तुम्ही सांगा.'' त्यावर ते म्हणाले, ''अहो तसे नाही, आपल्याला विद्यापीठाचे सर्व व्यवहार नियमाप्रमाणेच करावयाचे आहेत.'' आणि त्या वेळी दिलेले हे आश्वासन त्यांनी पुढील पाच वर्षे बांधिलकीच्या भावनेतून पाळले. नवीन विद्यापीठ थोडेसे खासगी स्वरूपाचे, त्यामुळे त्यांच्यावर विविध प्रकारची दडपणे येत असत, परंतु मी अगदी प्रामाणिकपणे सांगतो की, पाच वर्षांच्या कालखंडात त्यांनी मला एकही नियमबाह्य गोष्ट करायला सांगितली नाही.

मा. साहेबांच्या या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा परिचय अवघ्या महाराष्ट्रातील सर्व जाणकारांना झालेला आहे. गुणवत्तेवरील निष्ठा, अडल्या-नडलेल्यांच्याबद्दल मनामध्ये असलेला आंतरिक जिव्हाळा, विविध क्षेत्रांमध्ये नावीन्यपूर्ण, अघटित, अपूर्व असे काहीतरी करण्याची जिद्द. भारती विद्यापीठातून केवळ आर्थिक अडचणींमुळे विद्यार्थी शिक्षण सोडून जाता कामा नये, याकडे त्यांनी कटाक्षाने लक्ष दिले. त्यांच्या दत्तक विद्यार्थी योजना, शैक्षणिक शुल्कातून भरपूर सवलती वगैरेंमुळे अनेक गरीब मुलांना शिक्षण घेता आले. आज त्यांच्यापैकी अनेकजण मोठमोठ्या पदांवर काम करीत आहेत.

एकदा त्यांच्या कार्यालयात एक गरीब दिसणारा इसम आला. तो म्हणाला, ''माझ्या मुलीचे सिझेरिन करण्याची आवश्यकता आहे असे डॉक्टर म्हणतात, माझ्याकडे पैसे नाहीत, मला मदत करा.'' साहेबांनी खिशात हात घालून जेवढे पैसे होते तेवढे त्या इसमाला दिले. माझ्या कल्पनेप्रमाणे काही हजार असावेत. पाया पडून तो इसम निघून गेला. मी साहेबांना म्हणालो, ''या इसमाने जे तुम्हाला सांगितले ते खोटे कशावरून नसेल?'' ते म्हणाले, ''त्याने खोटे सांगून माझ्याकडून पैसे घेतले तर मला त्याचा दोष लागणार नाही. परंतु, खरोखरच त्याला गरज असताना मी त्याला पैसे दिले नाही, तर त्याचा दोष निश्चितपणे मला लागेल.'' इतका उदारपणा त्यांच्या मनात होता.

भारती विद्यापीठाबद्दल मा. साहेबांना विलक्षण आत्मीयता आणि अभिमान होता. आपली ही शिक्षणसंस्था अग्रगण्य व्हावी, इतरांपेक्षा आगळी-वेगळी व्हावी यासाठी त्यांनी आयुष्यभर कष्ट घेतले. त्यांची गुणग्राहकता पराकोटीची होती. भारती विद्यापीठाशी संलग्न असलेल्या कोणीही काहीही विशेष कामगिरी केली की, ते त्यांचे आवर्जून कौतुक करत असत. आपल्या शिक्षणसंस्थेमधून विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे अद्ययावत शिक्षण उत्कृष्ट शैक्षणिक वातावरणात मिळावे यासाठी त्यांनी अविरत प्रयत्न केले. अनेक नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम भारती विद्यापीठात मा. साहेबांच्या प्रेरणेने सुरू झाले.

कुठल्यातरी एका समारंभाला त्यांना कुणीतरी म्हटले की, ''एवढी मोठी तुमची संस्था अन् तुमच्याकडे ऑप्ट्रोमेट्री कोर्स कसा नाही?'' समारंभाहून परत आल्यानंतर त्यांनी ताबडतोब मला फोन करून सांगितले, ''पुढच्या शैक्षणिक वर्षापासून आपल्याकडे ऑप्ट्रोमेट्री पदवी अभ्यासक्रम सुरू झाला पाहिजे.'' शैक्षणिक वर्ष सुरू व्हायला तीन महिन्यांचा अवधी होता. आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करून तो कोर्स वेळेवर सुरू केला. मधल्या काळात अनेकदा त्यांनी फोन करून त्या कोर्सचे काय झाले, अशी विचारणा केली.

मा. साहेबांना इच्छापूर्तीचे वरदान असले पाहिजे. दिल्लीसारख्या शहरामध्ये संस्था सुरू करण्याकरिता जागेचा मोठा प्रश्न होता. परंतु साहेबांनी तिथे आवश्यक तेवढी जागा मिळविली. पुढे दिल्लीला इंजिनिअरिंग कॉलेज सुरू करण्याचा विचार त्यांच्या मनामध्ये आला. मी त्यांना म्हणालो, ''त्यासाठी आता नवीन जागा कशी मिळणार? आपण तेथे इंजिनिअरिंग कॉलेज काढणे गरजेचे आहे काय?'' परंतु अगोदरच्या जागेशेजारी एक विस्तृत जागा मा.साहेबांनी मिळविली. तेथे भारती विद्यापीठाचे इंजिनिअरिंग कॉलेज दिमाखदार पद्धतीने सुरू झाले. असे नकारात्मक सल्ले त्यांना देण्याच्या भानगडीत मी पुन्हा कधी पडलो नाही.

त्यांच्या अनेक गुणवैशिष्ट्यांपैकी काही वैशिष्ट्ये मला प्रकर्षाने भावली. त्यातील एक म्हणजे संस्थेची उभारणी करताना त्यांना ज्यांनी ज्यांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदत केली, त्या सर्वांबद्दल त्यांच्या मनात कृतज्ञतेची भावना असे. निरनिराळ्या प्रसंगी तिला ते आविष्कारित करत असत. भारती विद्यापीठाच्या सुरुवातीच्या काळात आर्थिक चणचण भासायची, त्यासाठी ते निरनिराळ्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करायचे. त्यातील एक कार्यक्रम प्रसिद्ध सिनेतारका उषा चव्हाण यांनी दिला होता. साहेबांना त्याची आठवण होती. पुढे अनेक वर्षांनी साहेबांनी त्यांना संस्थेचा 'जीवनसाधना गौरव पुरस्कार' देऊन सन्मान केला. अशाच प्रकारचा सन्मान त्यांनी गरिबांची नेत्रसेवा करणारे डॉ. तात्याराव लहाने, प्रसिद्ध दलित नेते व लेखक नामदेव ढसाळ यांसारख्या अनेक व्यक्तींचा केला.

भारती विद्यापीठाप्रमाणेच मा. साहेबांनी इतर अनेक संस्था स्थापन केल्या आणि त्या यशस्वीरीत्या चालविल्या. भारती विद्यापीठाच्या सुरुवातीच्या काळात एका कामाकरिता २५-३० हजार रुपये कर्जाची गरज होती. एका बँकेने साहेबांना कर्ज द्यायला नकार दिला. साहेबांनी लगेच भारती सहकारी बँकेची स्थापना केली. त्या वेळी त्यांचे वय २६ वर्षांचे होते.

भारती विद्यापीठाची दहा मजली इमारत ही पुण्यातील पहिली बहुमजली इमारत. ही इमारत बांधण्याच्या वेळी मा. साहेबांकडे कुठलेही सत्तेचे अथवा उत्पन्नाचे पद नव्हते. तोट्यात चालणाऱ्या चार-पाच शाळा एवढाच त्यांचा संस्थाविस्तार होता. परंतु मोठ्या हिमतीने ही इमारत त्यांनी बांधली. आपण पुढे एवढे मोठे होऊ की, या इमारतीत आपल्याला बैठका घेण्यासाठी सभागृह लागेल, स्वत:साठी कार्यालय लागेल, सल्लामसलतीसाठी विशेष कक्ष लागेल, हे सर्व लक्षात घेऊन त्यांनी इमारतीची रचना केली, त्यांच्या स्वकर्तृत्वावरील विलक्षण विश्वासाचा आणि दूरदृष्टीचा प्रत्यय येथे येतो.

माझी कुलगुरुपदाची मुदत संपल्यानंतर त्यांनी माझ्यावर भारती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली. बँकिंग व्यवसायाशी माझा वेळोवेळी पैसे काढणे यापेक्षा अधिक संबंध नव्हता. मी मा. साहेबांना तसे सांगितले. मला ते म्हणाले, ''मेडिकल, इंजिनिअरिंग कॉलेजेस काढताना सुद्धा माझ्याकडे एम.बी.बी.एस., बी.ई. डिग्री नव्हत्या तरी मी ती कॉलेजेस काढली. तुम्हालाही हळूहळू बँकिंगमधील समजेल आणि अडचण आली तर मी तुमच्या पाठीशी आहे.''

एक स्वतंत्र विस्तृत ग्रंथ होईल एवढे साहेबांचे कर्तृत्व व दूरदृष्टी. अचंबा वाटेल एवढे त्यांचे दातृत्व आणि वंचितांबद्दल असलेले मातेच्या मायेसारखे त्यांचे ममत्व. त्यांच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहवासात आलेल्या कुणालाही त्यांचा विसर पडू शकत नाही.





स्मरणगंध साहेबांचा

# खळाळते चैतन्य

डॉ. आनंद भालेराव

**“ज्याला जे काम दिलेले आहे, ते त्याने प्रामाणिकपणे व निष्ठेने पूर्ण करावे. अशा सेवकांची इथे नक्की प्रगती होईल, लौकिकदृष्ट्या सुद्धा.’’**

– डॉ. पतंगराव कदम

भारती विद्यापीठाचे संस्थापक मा. डॉ. पतंगरावजी कदम साहेब यांच्या १९८९ सालच्या सेवक मेळाव्यातील भाषणाने मी खूपच प्रोत्साहित झालो होतो. १९८६ सालापासून संस्थेत काम करत असताना साहेबांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अशा विविध पैलूंनी मी अचंबित होत होतो. त्या वेळी अभियांत्रिकी महाविद्यालयातील स्थापत्य विभागात अधिव्याख्याता म्हणून काम करत असताना १५ ऑगस्ट व २६ जानेवारी रोजी होणाऱ्या सेवक मेळाव्याचे अतिशय अप्रूप असे. वर्षातील या दोन दिवशी संस्थेतील सर्व सेवकांचा एकत्रित मेळावा घेणे ही कल्पनाच खूपच प्रेरणादायी होती. या सेवक मेळाव्यामुळे संस्थेत रुजू झालेल्या नवीन सेवकांची ओळख होई तसेच नामवंत व्यक्ती एस.एम. जोशी, ना.ग. गोरे, डॉ. प्र.चिं. शेजवलकर यांचे विचारधन लुटायला मिळत असे. संस्थेतील सेवकांचा मानसिक, वैचारिक आणि लौकिक विकास घडला पाहिजे या विचारातून साहेब स्वतः असे विविध उपक्रम राबवत. माझ्या तीस वर्षांच्या संस्थेतील कार्यकालामध्ये अनेक जणांचा सर्व प्रकारचा विकास झाल्याचे मी पाहिलेले आहे. अशा सेवक मेळाव्यामध्ये साहेब नेहमी म्हणायचे, ‘‘महाराष्ट्रात पुणे आहे पण पुण्यात महाराष्ट्र नाही.’’ ग्रामीण आणि शहरी संस्कृतींना एकत्र आणण्याचे काम भारती विद्यापीठाच्या माध्यमातून करून खऱ्या अर्थाने पुण्यात महाराष्ट्र आणण्याचे काम साहेबांनी केले. लिहिताना या गोष्टी जरी सोप्या वाटल्या तरी त्या करताना अनेक खस्ता खाव्या लागतात, कष्ट घ्यावे लागतात आणि दिवस-रात्र सामान्यांच्यामध्ये परमेश्वर पाहण्याची वृत्ती असावी लागते. अशी वृत्ती मा. साहेबांच्या अंतःकरणात असल्याचा प्रत्यय सातत्याने येत असे.

‘भान ठेवून योजना आखणे आणि बेभान होऊन त्या कार्यान्वित करणे’ या वाक्याचा खरा अर्थ त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिला. कोणत्याही नवीन योजना अमलात आणण्याच्या विचारांचे सर्व आयाम लक्षात घेऊन साहेब त्याचा एक कृतिकार्यक्रम आखत असत आणि अतिशय शिस्तीने विशिष्ट कालमर्यादेत ठरलेल्या गोष्टी पूर्ण करण्याचा त्यांचा ध्यास असे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या चुंबकीय शक्तीचा परिघ फार मोठा होता आणि त्या परिघात एकदा आलेली व्यक्ती कधीही बाहेर जात नसे.

आपल्या सहकाऱ्याला-सेवकांना दिलेले काम, त्या कामाची प्रगती आणि त्या कामात सहकाऱ्याला येणाऱ्या अडचणी याविषयी साहेब अत्यंत संवेदनशील असत. तो सेवक संस्थेत कोणत्याही पदावर असला, तरी त्याच्याकडून त्याला दिलेल्या कामासंदर्भात योग्य तो वेळ देत असत. १९९२-९३ साली मला व माझ्या सहकाऱ्यांना संस्थेच्या पाचगणीच्या जागेसंदर्भात सर्व्हे करून अहवाल देण्यास सांगितले होते. तो अहवाल सादर करायला त्यांनी आम्हाला प्रत्यक्ष बोलवले. मला येथे नमूद करायला खूप आनंद होतो की, त्या जागेच्या केलेल्या सर्व्हेचा अहवाल साहेबांनी अतिशय शांतपणाने समजून घेतला, आमचे कौतुक केले आणि जागेवरून उठून येऊन पाठ थोपटून म्हणाले, ‘‘तुम्ही अतिशय छान काम केले आहे आणि संस्थेला अशा माणसांची खूप गरज आहे.’’ सेवकांच्या गुणांचे, कामाचे अंतःकरणापासून कौतुक करणे हा त्यांचा स्थायीभाव होता.

साहेब शिस्तीबाबत खूप कडक होते आणि त्यांचे ‘रागावणे’ अथवा ‘प्रेम करणे’ हे अत्यंत प्रामाणिकपणे असे. २००८ सालचा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षाचा कार्यक्रम मला आठवतो. या कार्यक्रमास त्या वेळचे काँग्रेसचे सरचिटणीस दिग्विजय सिंह हे आले होते. साहेब, पाहुणे व इतर अधिकारी मंडळी वाहनाने कार्यक्रम स्थळी वेळेपूर्वी पोहोचल्यामुळे मंडप अर्धाच भरला होता. त्या वेळी साहेबांनी नाराजी व्यक्त केली पण पुढच्या पाचच मिनिटात संपूर्ण मंडप विद्यार्थी, प्राध्यापक, इतर सेवक व पालक यांनी भरून गेला. कार्यक्रम झाल्यावर साहेब मला जवळ घेऊन म्हणाले, ‘‘भालेराव, सुरुवातीला गडबड झाली पण कार्यक्रम उत्तम झाला आणि आयुष्यभर माझ्या स्मरणात राहील.’’ या क्षणी आम्ही सर्वांनी मिळून गेले तीन महिने या कार्यक्रमाच्या तयारीसाठी जे अपार कष्ट घेतले होते, त्याचे चीज झाल्यासारखे वाटले.

असे चैतन्यमयी साहेब आपल्यामधून ९ मार्च रोजी जिथून परत कधीही येणार नाहीत अशा प्रवासासाठी गेले. माझी खात्री आहे शेवटच्या श्वासापर्यंत त्यांच्या अंतःकरणात भारती विद्यापीठ, भारती विद्यापीठ परिवार याविषयीचे विचार, तळमळ व आणखी काही करण्याची इच्छा असेल. त्यांच्या अशा आकस्मिक निधनाने संस्थेतील सर्वजण व महाराष्ट्रातील लाखो जन शोकाकुल आहेत. ज्या विचारातून, आदर्शवादातून व उद्देशातून भारती विद्यापीठाची स्थापना साहेबांनी केली व त्याचा वटवृक्ष केला; तो विचार, तो आदर्शवाद आणि तो उद्देश अमलात आणण्यामध्ये त्यांना खरी आदरांजली असणार आहे.

**आदरणीय साहेब आणि वहिनीसाहेब माझे गुरू आणि श्रद्धास्थान आहेत. या दोघांचे ऋण फिटता फिटणार नाही. माझ्या प्रत्येक सुखदु:खाच्या प्रसंगात ते आपलेपणाने सामील झाले. साहेबांनी आपल्या संपूर्ण आयुष्यामध्ये कधीही ज्येष्ठ-कनिष्ठ, श्रीमंत-गरीब, मालक-नोकर असा भेद केला नाही. साहेबांबद्दल कितीही सांगितले, कितीही लिहिले तरी ते कमीच होईल. समाजातील शेवटच्या घटकाचे अश्रू पुसणे हेच त्यांच्या जीवनाचे सार होते. प्रत्येक माणसाचे दु:खाशी नाते असतेच, परंतु स्वत:च्या व्यथांपलीकडे जाऊन दुसऱ्यांचे दु:ख समजून घेणे हेच त्यांचे जीवन होते. साहेबांनी कायमच गरजवंतांना मदतीचा हात दिला. 'संकटात सापडलेल्यांची दया करणे हा मानवी गुण आहे, पण त्यांना संकटातून सोडवणे हा मात्र ईश्वरी गुण आहे.' साहेब या ईश्वरी गुणाची खाण होते. त्यांच्या औदार्याला कधीच मर्यादा नव्हत्या.**

शनिवार दि. १७ मार्च २०१८ रोजी सकाळी मा. डॉ. शिवाजीराव कदम सरांना भेटायला गेले. तेव्हा अत्यंत सद्‌गदित स्वरात सरांनी विचारले, ''वडके मॅडम, तुम्ही साहेबांबरोबर किती वर्षे काम केलंत?'' मी म्हणाले, ''३४ वर्षे!'' आणि बराच वेळ पाळलेला माझा संयम सुटला आणि मी अश्रूंना वाट मोकळी करून दिली. मन ३४ वर्षे मागे गेलं आणि मा.साहेबांच्या अनेक आठवणींनी मन दाटून आलं.

मी ऑक्टोबर १९८१ मध्ये वयाच्या १९ व्या वर्षी भारती विद्यापीठ मध्यवर्ती कार्यालयात मराठी स्टेनोग्राफर म्हणून दरमहा ३००/- रुपये वेतनावर सेवेत रुजू झाले. तेव्हाचा एक किस्सा आठवतोय. माझ्या अगोदर दोन महिने कु.भारती काळे या इंग्रजी स्टेनोग्राफर पदावर नोकरीस लागल्या होत्या. त्यांना पगार होता दरमहा २५०/- रुपये. जेव्हा काळेबाईंना समजले की, नंदा पुरोहित (माझे पूर्वाश्रमीचे नाव) या आत्ता जॉईन होऊनसुद्धा त्यांना ५० रुपये जास्त पगार? .... म्हणून त्या रडायला लागल्या. त्या वेळी सेंट्रल ऑफिस मोरे विद्यालयाच्या इमारतीत होते. मा.साहेबांची छोटीशीच केबीन, प्रशासकीय सेवकांसाठी ४ टेबल्स, टेलिफोन ऑपरेटरचे छोटेसे युनिट आणि मा.आनंदराव पाटील साहेब, मा.एम.आर.चिटणीस सर आणि मा.दे.मु. महादार सर यांच्या छोट्या-छोट्या केबिन्स! त्याचबरोबर भारती विद्यापीठ गणित व इंग्रजी विषयांच्या बाह्य परीक्षांचे कामकाजही तेथूनच चाले. त्या वेळी या विभागाचे प्रमुख म्हणून डॉ. शिवाजीराव कदम सर काम पाहत होते. तर सांगायचे म्हणजे तेव्हा सेंट्रल ऑफिसचे अत्यंत छोटेसे स्वरूप असल्यामुळे साहेबांना काळेबाई रडल्या ही गोष्ट लगेच समजली. त्यांनी आम्हा दोघींना लगेच बोलवून घेतले आणि चिटणीस सरांना सांगितले, ''अरे, काळेबाईंचा पगार पण ३०० रुपये करा!'' सांगायचा मुद्दा असा की, तेव्हाची ५० रुपयांची किंमत ही आत्ताच्या ५,००० रुपयांप्रमाणे होती आणि त्यांनी माझा पगार कमी केला नाही तर काळेबाईंचा पगार लगेच वाढवून दिला. असे आपले दिलदार साहेब!




मी भारती विद्यापीठाच्या सेवेत रुजू झाल्यापासूनच साहेबांच्या पर्सनल स्टाफमध्ये होते. त्यामुळे कदम परिवाराचे अनेक सुखदु:खांचे प्रसंग मी जवळून पाहिले आणि अनुभवले आहेत.

२७ नोव्हेंबर १९९९ ची काळरात्र मी अजूनही विसरू शकत नाही. आपल्या सर्वांचे लाडके अभिजितदादा यांच्या अपघाती निधनाने भारती विद्यापीठ परिवारामध्ये फार मोठी पोकळी निर्माण झाली. ते दु:खद दिवस मला अजूनही आठवतात. दादांच्या अकाली जाण्याने मा.वहिनीसाहेब, मा.ताईसाहेब व मा.बाळासाहेब पूर्णपणे कोलमडून गेले होते. वयात आलेला मुलगा अचानक गेल्याने आभाळाएवढे दु:ख असूनही साहेब मात्र खंबीर राहिले आणि त्यांनी संपूर्ण कदम कुटुंबीयांना सावरले. कारण त्यांनी शोक केला असता तर, संपूर्ण कदम परिवार आणि भारती विद्यापीठ परिवार शोकसागरात बुडून गेला असता. अशा या धीरोदात्त गुरूला माझे शतश: प्रणाम!

व्यक्ती जन्माला येते ती तीन ऋणांना घेऊनच! 'देवऋण - मातृपितृऋण - गुरुऋण.'

आदरणीय साहेब आणि वहिनीसाहेब माझे गुरू आणि श्रद्धास्थान आहेत. या



स्मरणगंध साहेबांचा

# 'ते' आहेत..
# आपल्यासोबत...
# सदैव आपल्या अंत:करणात !

- राजश्री राजेंद्र वडके

दोघांचे ऋण फिटता फिटणार नाही. माझ्या प्रत्येक सुखदु:खाच्या प्रसंगात ते आपलेपणाने सामील झाले. साहेबांनी आपल्या संपूर्ण आयुष्यामध्ये कधीही ज्येष्ठ-कनिष्ठ, श्रीमंत-गरीब, मालक-नोकर असा भेद केला नाही. सप्टेंबर १९९३ मधील एक आनंदाचा प्रसंग! कसबा पेठेतील आमच्या त्वष्टा कासार समाजसंस्थेच्या गणेशोत्सवाचे शताब्दी वर्ष होते. आमच्या विश्वस्त मंडळाच्या वतीने साहेब व वहिनींना या कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवण्यात आली होती. अत्यंत व्यस्त दिनक्रम असूनही दोघांनीही येण्यासाठी त्वरित संमती दर्शविली आणि या कार्यक्रमाला ते अगत्यपूर्वक उपस्थितही राहिले. भारती विद्यापीठाची सुरुवात कसबा पेठेमध्येच झाल्याने अनेक ज्येष्ठ व्यक्ती त्या वेळी साहेबांना समक्ष भेटल्या आणि त्यांच्यामध्ये जुन्या आठवणींचा फडच रंगला. कार्यक्रम संपल्यानंतर दोघेही आमच्या घरी आले होते. तो दिवस आम्हा वडके कुटुंबीयांसाठी खूपच आनंदाचा आणि दिवाळी-दसरा साजरा करण्याचा होता.

नंतर १९९४ पासून कसबा पेठेतून आम्ही कुटुंबीय कोथरूड येथे राहावयास आलो. त्यानंतरचा एक प्रसंग - तेव्हा यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाचे उद्घाटन संध्याकाळी ५.३० वाजता मा.साहेबांच्या शुभहस्ते संपन्न होणार होते. त्या दिवशी ४.०० वाजता साहेब मला म्हणाले, ''वडके, तू कोथरूडला राहायला आलीस ना! मी संध्याकाळी नाट्यगृहाच्या उद्घाटनाला येणार आहे. कार्यक्रम संपल्यानंतर तुझ्याकडे येईन.'' साहेब अचानक घरी येणार म्हटल्यावर मी थोडीशी कावरीबावरी झाले. ते त्यांनी नजरेने टिपले आणि म्हणाले, ''काही तयारी करायची गरज नाही. मला फक्त सुंठ टाकून चहा कर!'' तेव्हा अत्यंत अल्प वेळेत आम्ही कुटुंबीयांनी त्यांच्या स्वागताची तयारी केली. त्यांच्या आगमनाने आम्ही कुटुंबीय खूपच आनंदित झालो कारण माझ्या विठूरायाची पावले पुन्हा एकदा माझ्या घराला लागली होती.

अशीच आणखी एक आनंददायी आठवण! ९ एप्रिल २०१० ला सकाळी ११.३० वाजता माझी मोठी कन्या गायत्रीचा विवाह पुण्यात आयोजित केला होता. त्या दिवशी मा. बाळासाहेब यांना सकाळी नवी मुंबई येथे स्टाफ सिलेक्शन कमिटीची मिटिंग होती म्हणून ते व मा.के.डी. जाधव सर सकाळी लवकरच मंगल कार्यालयात येऊन आम्हा कुटुंबीयांना शुभेच्छा देऊन नवी मुंबईला गेले. मला बाळासाहेबांचे नेहमीच कौतुक वाटते. मी संस्थेत आले ते वर्ष आणि बाळासाहेबांचे जन्मवर्ष एकच आहे. त्यांना लहानाचे मोठे होताना मी बघितले आहे. खेळण्या-बागडण्याच्या वयामध्ये त्यांच्यावर अनेक जबाबदा-या आल्या. मोठ्या माणसाच्या पोटी जन्माला येणे भाग्याचे असते खरे, पण त्यांचा वारसा पुढे चालवत तो वाढविण्याचीही मोठी जबाबदारी येत असते. भाग्य सुखाचे वाटले, तरी ती जबाबदारी पेलणे खूप अवघड असते. अनेकांच्या शोधक नजरा सतत तुमच्यावर रोखलेल्या असतात. ती जबाबदारी समर्थपणे पेलणारे आणि अभिमानाने सांगता यावे असे नाव म्हणजे मा.डॉ.विश्वजित कदम - आपल्या सर्वांचे लाडके बाळासाहेब! तर सांगायचे म्हणजे बाळासाहेब येऊन गेल्यानंतर, विवाह समारंभास मा.वहिनीसाहेब, मा.शिवाजीराव कदम सर, मा.ताईसाहेब आणि मा. सागरभैया हे कदम कुटुंबीय उपस्थित होते. साहेब तेव्हा मुंबईला होते आणि दुपारी ३.०० वाजता त्यांना सांगलीला DPDC मीटिंगला उपस्थित राहायचे होते. त्यांच्या नियोजित शासकीय कार्यक्रमानुसार मुंबई ते सांगली असा प्रवास होता. पण गायत्रीच्या विवाहास उपस्थित राहण्यासाठी त्यांनी अचानकपणे कार्यक्रमात बदल केला आणि मुंबईवरून ते विमानाने पुण्याला आले, विवाहास उपस्थित राहिले आणि नंतर ताबडतोब सांगलीला रवाना झाले. किती हा आपलेपणा! या प्रसंगाने ऊर अभिमानाने भरून आला आणि डोळ्यांत आनंदाश्रू दाटले.

असाच प्रसंग माझी धाकटी कन्या अमृताच्या साखरपुड्याच्या वेळचा! २५ जानेवारी २०१५ रोजी सायंकाळी ६.०० वाजता अमृताचा साखरपुडा कर्वे रोड येथील एका मंगल कार्यालयात आयोजित केला होता. याच दिवशी सायंकाळी ६.०० वाजता अस्मितताईंच्या धाकट्या बाळाचा नामकरण विधी संपन्न होणार होता. त्यामुळे माझ्याकडील कार्यक्रमास उपस्थित राहणे साहेबांना अशक्य होते. परंतु इतकी घाई-गडबड असूनही साहेब ५.३० वाजता कार्यालयात आले, आमची सर्वांची भेट घेऊन, अमृताला आशीर्वाद देऊन मगच पुढच्या कार्यक्रमास गेले. त्यांच्या या उपस्थितीने आम्ही सर्वजण धन्य झालो.

संस्थेतील माझ्या सेवेबद्दल सांगायचे झाले तर, मी ऑक्टोबर १९८१ ते १९८३ पर्यंत मोरे विद्यालय इमारतीतील संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयात, त्यानंतर १९८४ ते १९९४ पर्यंत भारती विद्यापीठ भवन येथे ८ व्या मजल्यावरील कॉर्पोरेट ऑफिसमध्ये आणि १९९५ नंतर भारती विद्यापीठ निवासी कार्यालयाच्या सेवेत होते. निवासी कार्यालयात आल्यानंतर, साहेब, वहिनीसाहेब, अभिजितदादा, बाळासाहेब, ताईसाहेब आणि आता स्वप्नालीताई यांच्या पर्सनल स्टाफ यंत्रणेत काम करताना आम्ही सर्व सहकारी एका कुटुंबाप्रमाणे राहत होतो. साहेब आणि वहिनीसाहेब आमच्या सर्वांचे माता-पिता आणि माझ्यासाठी ते माझे विठ्ठल-रखुमाई! माता-पित्याच्या नात्याने चांगल्या कामाबद्दल आम्हांला शाबासकी मिळायची, मात्र कधी चुकलो तर कानउघाडणीही व्हायची. या कृपाछत्राखाली आम्ही वाढलो, शिकत गेलो आणि घडत गेलो. साहेब मंत्रिपदावर असताना त्या त्या खात्यातील शासकीय अधिका-यांचेही आमच्या सर्वांशी जिव्हाळ्याचे संबंध आहेत ते साहेबांच्या आपुलकीच्या नात्यामुळेच!

संस्थेच्या सर्वोच्च पदांवरील व्यक्तींची सेवा करण्याची संधी मला मिळाली. त्यामुळे माझ्यासारखी भाग्यवान मीच! साहेब-बाईसाहेब, कदम कुटुंबीय, शिंदे कुटुंबीय या सर्वांबरोबरच या दोघांच्या माता-पित्यांना समक्ष बघण्याचे, भेटण्याचे आणि अनेकदा त्यांच्याशी संवाद साधण्याचे भाग्य मला लाभले. त्याचबरोबर चौथ्या पिढीतील अभिश्रीदिदी, रेवादिदी, अवीर बाळ व राघवेंद्र बाळ यांच्याबरोबर खेळण्याची मजाही मी लुटली.

आज प्रत्येक क्षेत्रातील मा. साहेबांचा यशाचा उंचावत जाणारा आलेख आपण बघतोय. तो प्राप्त करण्यासाठी वहिनीसाहेबांची खंबीर साथ त्यांना लाभली. कुटुंबीयांचा सकारात्मक पाठिंबा असेल तर, आव्हानांच्या समुद्रात उडी घेऊन त्यांच्या



बऱ्यावाईट परिणामांशी ठामपणे दोन हात करून व्यक्ती आपले कर्तृत्व सिद्ध करून यशाची उंचउंच शिखरे काबीज करू शकतो, हे साहेबांनी सिद्ध करून दाखवले. त्यांच्या या जीवनप्रवासात डॉ. शिवाजीराव कदम सरांची त्यांना लक्ष्मणासारखी साथ लाभली.

साहेब आणि वहिनींचा दराराच वेगळा! त्यांच्याबद्दल कायम भीती वाटत असे. पण ही भीती आदरयुक्त भीती होती. येथे काम करताना कायम सतर्क राहावे लागे. सर्व पत्रव्यवहार बघताना, पत्रांना उत्तरे पाठवताना मी बुद्धीचा कस लावत असे. खूप गोष्टी कायम स्मरणात ठेवाव्या लागायच्या, कारण कधी काय विचारले जाईल, याचा नेम नसायचा. कितीही अलर्ट राहिले तरी कधीतरी काहीतरी चुकायचेच. त्या वेळी वहिनींनी 'वडके ऽऽऽऽऽऽ' अशी हाक मारली की समजायचे, काहीतरी घोळ झालाय..... अशा वेळी त्या बोलवून घेऊन समजावून सांगायच्या. तसेच काम आवडले तर कौतुकही करायच्या. साहेबही एखादे पत्र आवडले की, मनापासून दाद द्यायचे आणि म्हणायचे, ''हुषार आहेस!'' मात्र अनवधानाने काही चूक झाल्यास चिडून म्हणायचे, ''नुसती खुळी आहेस. तुला स्वत:ला काही समजत नाही आणि दुसऱ्या कुणाचे तू ऐकत नाहीस.'' तेव्हा मी हळूच म्हणायची, ''खुळी म्हणा, शहाणी म्हणा, पण मला आपली म्हणा!'' ....दुस-या मिनिटाला त्यांचा चढलेला पारा खाली उतरायचा आणि त्यांच्या चेहऱ्यावर एक मिश्कील स्मितहास्य झळकायचे. हा आपलेपणा साहेबांनी आणि वहिनींनी कायम जपला याबद्दल मी खूप समाधानी आहे. त्यांच्या अनंत आठवणींचा समृद्ध खजिना माझ्याकडे आहे. त्यातील निम्म्या आठवणी जरी सांगायच्या झाल्या तरी त्या लेखास आरंभ असेल पण अंत नसेल.

मा.साहेब मंत्रिपदावर असताना शासकीय प्रोटोकॉलनुसार, सर्वांत प्रथम प्रायव्हेट सेक्रेटरी, त्यानंतर ऑफिसर ऑन स्पेशल ड्युटी आणि नंतर पर्सनल असिस्टंट असे शासकीय अधिकारी सेवेत असायचे. साहेब मला 'वडकेबाई' असे क्वचित म्हणत. कारण मला ते नेहमी 'हेड बाई' अशी हाक मारत असत. ते पुढे असेही म्हणायचे, ''वडकेबाई, तुम्ही निवासी कार्यालयाच्या हेड बाई आणि बाईसाहेबांच्या प्रायव्हेट सेक्रेटरी आहात!'' असे हे माझ्या आयुष्यातील खूप छान सोनेरी दिवस होते. पर्सनल स्टाफ म्हणून काम करताना येथे कधी वेळेचे भानच राहायचे नाही. इथल्या कामाचीही एक नशा होती, तिच्या आधीन मी झाले होते. यासाठी माझ्या परिवाराचीही बहुमोल साथ मला लाभली, म्हणूनच कामाची ही झिंग मी बेभानपणे अनुभवली. साहेब-वहिनीसाहेब यांच्याकडून मी खूप गोष्टी शिकले. माझे हे गुरु-दांपत्य माझे श्रद्धास्थान, प्रेरणास्थान आणि ऊर्जास्रोत आहे. 'परमेश्वराच्या चरणावरचे तीर्थ जेवढे पवित्र असते, तितकेच पवित्र स्थान त्यांचे माझ्या आयुष्यात आहे!'

साहेबांबद्दल कितीही सांगितले, कितीही लिहिले तरी ते कमीच होईल. समाजातील शेवटच्या घटकाचे अश्रू पुसणे हेच त्यांच्या जीवनाचे सार होते. प्रत्येक माणसाचे दु:खाशी नाते असतेच, परंतु स्वत:च्या व्यथांपलीकडे जाऊन दुसऱ्यांचे दु:ख समजून घेणे हेच त्यांचे जीवन होते. साहेबांनी कायमच गरजवंतांना मदतीचा हात दिला. 'संकटात सापडलेल्यांची दया करणे हा मानवी गुण आहे, पण त्यांना संकटातून सोडवणे हा मात्र ईश्वरी गुण आहे.' साहेब या ईश्वरी गुणाची खाण होते. त्यांच्या औदार्याला कधीच मर्यादा नव्हत्या.

ते जगातील एक आनंदी व्यक्तिमत्त्व होते. आनंदी माणसाकडे जगातील सर्वोत्तम गोष्टी असतात, म्हणून तो आनंदी असतो असे नाही, तर मार्गात येणाऱ्या सर्व गोष्टींना तो सर्वोत्तम बनवतो. आपले साहेब याचे मूर्तिमंत उदाहरण आहेत. त्यांच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाला त्यांनी भरभरून आनंद दिला. औदासीन्य आलेल्या व्यक्ती त्यांच्या सान्निध्यात आल्या की, त्यांना नवचैतन्य प्राप्त होत असे. गावाकडील अनेक गमतीशीर म्हणी, वाक्प्रचार आणि शब्दप्रयोग यांची प्रसंगानुसार ग्रामीण ढंगात मुक्तपणे उधळण करून ते गंभीर माहोल एकदम आनंदी आणि प्रसन्न करायचे. 'चांगभलं, खुळ्यांची जत्रा, येड्यांची जत्रा' यासारखे शब्दप्रयोग आणि 'सख्ख्याला दिला धक्का अन् परक्याचा घेतला मुक्का', 'मुदलाला मुकली अन् याजाला सुकली!' अशा म्हणी – मुदलाला म्हणजे मुद्दलाला आणि याजाला म्हणजे व्याजाला असा हसतहसत खुलासाही करून सांगायचे. क्षणात उपस्थितांमध्ये हास्यलहरी, हास्यकारंजे यांचे उंचचउंच फवारे उडायचे. त्यांची ती अदा आणि ग्रामीण बाजातील शब्दफेक कायम सर्वांच्या स्मरणात राहील. ही किमया सर्वांनाच साध्य करता येत नाही. असे सकारात्मक जादूई शक्तीचे सूर्यासारखे प्रचंड ऊर्जास्रोत म्हणजे आपले साहेब!

'सूर्याच्या बाबतीत एक गोष्ट खरी असते–

उगवताना आणि मावळतानाही
त्याच्या रूपाला तेजाची झालर असते!'
असे हे तेज:पुंज युगपुरुष

आपल्या सर्वांचे लाडके मा. डॉ. पतंगराव कदम साहेब....आपल्यासोबत आहेत....

सदैव आपल्या हृदयात !!!



स्मरणगंध साहेबांचा

# साहेबांच्या सोबतचा माझा अविस्मरणीय हेलिकॉप्टर प्रवास

माणसाच्या आयुष्यात काही माणसं अशी असतात की त्यांनी फक्त आपल्याला जन्म दिलेला नसतो, मात्र ते जन्मदात्याएवढीच जिवापाड काळजी घेत असतात. जगात अशी माणसं फारच कमी असतात. म्हणूनच ती आपल्या हृदयात घर करून बसतात. माझ्या आयुष्यात असाच एक देवमाणूस आला. त्या देवमाणसाचे नाव म्हणजे मा. डॉ. पतंगराव कदम साहेब. आपल्या संस्थेतला सेवक हा आपल्या कुटुंबातलाच एक घटक आहे, अशी भावना ठेवणारे आणि माझा सेवक म्हणजे माझ्या भारती परिवारातील सेवक असा व्यापक दृष्टिकोन साहेबांचा होता. माझ्या संस्थेतला सेवक म्हणजे माझ्या कुटुंबातील एक अविभाज्य घटक आहे, असे मानणारे मा. डॉ. पतंगराव कदम आपल्या सेवकाची आपुलकीने चौकशी करत असत. एवढेच नव्हे तर आपला सेवक त्याच्या घरातील आई-वडिलांची काळजी घेतो की नाही, याकडे बारीक लक्ष असे. ते म्हणत की, अरे गावाकडे कधी जातोस की नाही? गावाला विसरू नकोस. आपल्या आई-वडिलांची काळजी घ्या. जाहीर सभेत म्हणत की जे सेवक आपल्या आई-वडिलांची काळजी घेत नाहीत, त्यांचा पगार आई-वडिलांच्या नावावर जमा केला पाहिजे. असा सेवकाची काळजी घेणारा, एवढेच नव्हे तर सेवकांच्या घरातल्यांची विचारपूस करणारा माणसातला माणूस म्हणजे मा. डॉ. पतंगराव कदम साहेब.

माझ्या आयुष्यात एक प्रसंग आला की ज्यातून मला साहेबांच्यातला देवमाणूस दिसला. त्यांना माझ्या आयुष्यात कधीच विसरता येणे शक्य नाही. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे वार्षिक अधिवेशन सोलापूर जिल्ह्यातील शिवाजी कॉलेज, बार्शी येथे दि. २, ३ व ४ नोव्हेंबर २००७ रोजी आयोजित केले होते. मी व माझे सहकारी अधिवेशनाला गेलो होतो. मी एका मिटिंगच्या निमित्ताने आदल्या दिवशी स्वतः गाडी चालवून कोल्हापूर-पुणे-सांगली आणि पुन्हा बार्शी असा प्रवास करून बार्शीत पोहोचलो होतो. २ नोव्हेंबर २००७ रोजी सकाळी १० वाजता अधिवेशनास सुरुवात झाली. मी सभागृहात पुढच्या रांगेत बसलो होतो. सलग दोन दिवस प्रवास व ड्राइविंगमुळे मला फार थकवा आला होता. त्यातच ॲसिडिटीमुळे अचानक चक्कर आली व मी खुर्चीतून खाली पडलो. व्यासपीठावर बसलेले संस्थेचे अध्यक्ष डॉ. बबन यादव यांनी ते पाहिले अन् ते पटकन व्यासपीठावरून खाली आले. डॉ. बबन यादव व प्राचार्य डॉ. मधुकर फरतडे यांनी मला लगेच जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. आयुष्यात आजारी पडण्याचा पहिलाच प्रसंग होता. मी तीन दिवस हॉस्पिटलमध्ये होतो. या काळात शिवाजी कॉलेजचे अधिकारी, पदाधिकारी व प्राध्यापकांनी त्याचबरोबर आमचे बंधू मित्र प्रा. सुभाष दगडे यांनी जी मदत व सेवा केली, ती मी आयुष्यात विसरू शकत नाही.

अधिवेशनाच्या समारोप कार्यक्रमास डॉ. पतंगराव कदम पाहुणे होते. साहेब हेलिकॉप्टरनी समारंभ ठिकाणी आले. नेमके त्याचवेळी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील सरांनी पतंगराव साहेबांना हळूच कानात सांगितले की, ''तुमच्या भारती विद्यापीठातील प्रा. संजय ठिगळे नावाचा सेवक हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहे.'' पतंगराव कदम साहेब पाटील सरांना म्हणाले, ''मी त्याला हेलिकॉप्टरने सांगलीला घेऊन जातो.'' लगेच मला घेण्यासाठी लाल दिव्याची गाडी हॉस्पिटलमध्ये आली. वास्तविक मला याची काहीच कल्पना नसल्यामुळे मी फक्त गाडीत बसलो. गाडी सरळ हेलिपॅडवर आली. मी गाडीतून खाली उतरलो. समोर पाहतो तो काय! मा. डॉ पतंगराव कदम साहेब! मला काहीच कळेना. साहेब माझ्याकडे बघत म्हणाले, ''अरे एवढा तगडा माणूस, तुला काय झालं रे आजारी पडायला? अरे चल, बस हेलिकॉप्टरमध्ये, तुला सांगलीला घेऊन जातो.'' घरचा माणूस भेटल्याचे समाधान झाले. माझ्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. साहेबांनी खांद्यावर हात ठेवला. त्यांचा हात म्हणजे मायेचा हात होता आणि आत्मविश्वास होता असे म्हटले तर फारसे वावगे होणार नाही. हेलिकॉप्टरमध्ये बसण्याचा आयुष्यातील पहिलाच प्रसंग. हेलिकॉप्टरमध्ये कसाबसा बसलो, तेवढ्यात साहेबांचा दुसरा प्रश्न ''जेवलास का नाही?'' मी म्हणालो, ''नाही.'' साहेबांनी लगेच त्यांच्या पंढरपूरमधील मेव्हणीला फोन केला. मी पंढरपूरला येतोय, हेलिपॅडवर भाजी-भाकरीचा डबा पाठवा. मला साहेबांच्या डोळ्यांत ममतेची भावना दिसत होती. आम्ही पंढरपूरमध्ये पोहोचलो. साहेब पंढरपूर मधील एक कार्यक्रम करून आले. मी हेलिकॉप्टरमध्येच बसून होतो. पुन्हा आम्ही पंढरपूरहून तासगावला निघालो. हेलिकॉप्टरमध्ये साहेबांनी मला एक भाकरी व मेथीची भाजी दिली व म्हणाले, ''एवढे खा म्हणजे बरे वाटेल.'' मला माझ्या आईवडिलांची आठवण आली. डोळ्यांतून पाणी आले. त्या प्रसंगी मला साहेब म्हणजे पंढरीचा विठ्ठलराया वाटले. भाकरी खात खात मी कवठे महांकाळ व तासगाव तालुक्यातील दुष्काळग्रस्त गावे बघत होतो. मला वाटले, दुष्काळी भागात पतंगराव कदम साहेबांसारखी जिंदादिल माणसं आहेत म्हणूनच हे सगळं चाललंय. या माणसांच्या

> माझ्या आयुष्यात एक प्रसंग आला की ज्यातून मला साहेबांच्यातला देवमाणूस दिसला. मी आजारी असताना मला साहेब हेलिकॉप्टरने सांगलीला घेऊन आले. वडिलकीचा धाक आणि मायेचा हात असलेल्या साहेबांना माझ्या आयुष्यात कधीच विसरता येणे शक्य नाही.
> डॉ. पतंगराव कदम साहेब म्हणजे  देवमाणूस. आज ते आपल्यात नाहीत, हे दुःख शब्दात व्यक्त करणे अशक्य आहे. असे म्हटले जाते की, 'देवमाणसात देव बघावा.' मला मात्र बार्शीच्या प्रसंगातून साहेबांच्यात देव दिसला. खरंतर साहेबांच्या आकस्मित जाण्यामुळे आमच्या ह्दयातला देवच निघून गेला.....

■ प्रा. संजय ठिगळे

भागात दुष्काळ असला तरी मायेत व डोक्यात दुष्काळ नाही; हे मात्र नक्की, असा विचार डोक्यात घोळत असतानाच आम्ही तासगावजवळ पोहोचत आहोत हे लक्षात आले. अगदी काही मिनिटातच तासगाव कारखाना दिसू लागला. तासगाव साखर कारखान्याचे हेलिपॅड आले., आम्ही उतरलो तर पुढे मा. आर. आर. आबा पाटील व सहकार खात्यातील अधिकारी साहेबांच्या स्वागताला उभे होते. साहेब मला म्हणाले, ''तू आता सांगलीला जा, मी पुण्यास जाणार आहे.'' त्यांनी सहकार खात्यातील अधिकाऱ्यांना जवळ बोलवले आणि मला सांगलीला सोडण्यासंबंधी सूचना दिल्या. मला अधिकाऱ्यांनी घरी पोहोचवले.

हा माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय प्रसंग. डॉ. पतंगराव कदम साहेबांनी वडीलकीच्या नात्याने हेलिकॉप्टरने आणले, एवढेच नव्हे तर ममतेने भाजी-भाकरी खाऊ घातली तर जगदाळे मामांच्या संस्कारात वाढलेल्या बार्शीकरांनी तीन दिवस सेवा केली. कुणाकुणाचे आभार मानायचे? या प्रसंगातून डॉ. पतंगराव कदम साहेबांच्यातला देवमाणूस दिसला. साहेबांना माझ्या आयुष्यात कधीच विसरता येणे शक्य नाही. डॉ. पतंगराव कदम साहेब म्हणजे देवमाणूस. आज ते आपल्यात  नाहीत हे दुःख शब्दात व्यक्त करणे अशक्य आहे. असे म्हटले जाते की, 'देवमाणसात देव बघावा', मला मात्र बार्शीच्या प्रसंगातून साहेबांच्यात देव दिसला. खरंतर साहेबांच्या आकस्मिक जाण्यामुळे आमच्या ह्दयातला देवच निघून गेला...






स्मरणगंध साहेबांचा

# माणुसकीचा मूर्तिमंत झरा आटला सह्याद्री पुन्हा पोरका झाला

**बाळकृष्ण याद्व**

**यशवंतराव व वसंतदादांच्या नंतर साहेबांच्या रूपात फुलेवादी, आंबेडकरवादी, शाहुवादी सत्यशोधकी एक सेनापती झाला. 'या सम हाच दुजा होणे नाही' सांगली जिल्ह्यात लोकशाहीतील दुसरे शाहूच होऊन गेले.**

दि. ०९/०३/२०१८च्या शुक्रवारी दगाबाज काळाने मानवाची क्रूर चेष्टा करीत दाखवून दिले की, 'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा' आणि अकस्मात उंच भरारी मारणाऱ्या चैतन्य पतंगावर झडप घातली. बया माउलीची निद्रा भंगली, ती हंबरडा फोडून औदुंबराकडे धावली, सागरोबाने धीर दिला पण वाया गेला.

महाराष्ट्राचे समाजमन पोरके झाले, सोनसळच्या सोनहिऱ्याने मृत्युंजयी बनून काळगड काबीज केला. विजयमालाताईंचे सौभाग्यलेणे काळाने दूर केले. त्यांचा शोक-आक्रोश पाहावेनासा झाला. पुत्र विश्वजित स्वतःला, मातेला, सर्वांना धीर देत होता पण मनोमनी आक्रंदत होता.

बंधूंच्या शोकाला तर पारावार राहिलाच नाही. एवढेच काय पण मंदिरांचे कळस झुकले. कृष्णा-कोयना, नांदणी, येरळा, सोनहिऱ्याचा प्रवाह दुःखद अतिरेकाने काही काळ थांबला. कुलदैवत म्हसवडात देवाने पुष्पपूजा नाकारली. ग्रामदैवत उदगिरीला 'दरदर' घाम सुटला. चौरंगीनाथाने बेल पुष्पहार नाकारला.

आपल्या पुण्यवान धन्यासाठी मुक्या जनावरांनी चाऱ्याचा घाससुद्धा घेतला नाही. पंढरपुरात विठुचरणी वीट थरारली. पुण्यातील सिंहगड व कडेगावी विश्रांतिस्थळ सुने होऊन ओस पडले. पलुस-कडेगाव-विटा-कराड व तालुक्यांच्या ठिकाणी व्यवहार ठप्प झाले, उत्स्फूर्त बंद पाळण्यात आला. अखेर 'सोनहिऱ्याचा शुक्रतारा निखळला,' सोनहिराच्या या लाडक्या पुत्राने, 'इवलेसे रोप



लावले सोनहिरी त्याचा वेलु गेला सह्यागिरी,' भारती विद्यापीठाचा वेलु सह्यागिरी काय हिमगिरी ओलांडून साता समुद्रापार पोहोचवण्याचा आणि मानांकन हासील करण्याचा चमत्कार या शिक्षणसम्राटाने घडवून दाखविला.

हे सर्व करताना कर्मवीरांच्या शिकवणीचा विसर न पाडता आपल्या माय-मातीतील वंचित तरुण शिक्षणापासून वंचित राहू नये, या करिता उदार दातृत्वाने हात देऊन वरती उचलले आणि हजारोंचा उद्धार केला, त्यांची बरोबरी आजपर्यंत कोणी केली नाही.

रचनात्मक समाजकारणासाठी राजकारण करताना शिवघडीच्या यशवंतराव साहेबांचा आदर्श विचार आचरणात आणून सांगली जिल्ह्याचा, तालुक्याचा भौगोलिक आणि आर्थिक इतिहास नव्याने घडवण्याचे सामर्थ्य दाखवून दिले. तसेच एस.टी. बोर्ड मेंबरपासून झंजावाती सुरुवात करून हजारो लोकांच्या बेरोजगारीचा प्रश्न सोडविला. पुढे आमदार आणि अनेक महत्त्वाची मंत्रिपदे भूषवताना, शिक्षणमंत्री, उद्योगमंत्री, सहकार व महसूल मंत्री, पुनर्वसन मंत्री अशा महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडताना घेतलेल्या तत्काळ निर्णयक्षमतेमुळे त्या प्रत्येक विभागाचा चेहरा मोहरा बदलून टाकला. हे करताना निर्विवाद निर्णयाची अंमलबजावणी हे त्यांचे वैशिष्ट्य, विरोधकसुद्धा हातचे न ठेवता कबूल करतात. सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री असताना त्या काळात तालुक्यातील आणि सांगलीतील सर्व शासकीय प्रशासनाच्या अद्ययावत इमारती व कोर्टाची व्यवस्था अत्यंत अल्प काळात घडवून आणली.

स्वर्गीय वसंतदादांचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवून दुष्काळी भागातील पिढ्यान्‌पिढ्या वंचित शेतकऱ्यांसाठी ताकारी, टेंभू, म्हैसाळ सारख्या जिव्हाळ्याच्या योजना कार्यान्वित केल्या.

आदर्श सहकारी बँक, कारखानदारी, हॉस्पिटल निर्माण करून उच्चांकी लाभ मिळवून देण्याचा आणि ग्रामीण भागातील सामान्यातील सामान्य माणसांना नेतृत्व देऊन परिवर्तनाच्या प्रक्रियेत सहभागी करून सक्षम बनविले.

जात-पात-धर्म न पाहता अनेक धार्मिक स्थळांचा उद्धार केला. सांस्कृतिक, शैक्षणिक कार्यात प्रत्येकास भरीव मदत व मार्गदर्शन केले. हे सर्व करीत असताना प्रथमपासून साम्यवादी विचारसरणीचे अभ्यासक स्व. यशवंतराव मोहिते भाऊंची सुरुवातीच्या जडणघडणीत मिळालेली मोलाची आधाराची साथ, त्यांच्या विचारांचा व कार्याचा विसर न पाडता सतत कृतज्ञपणे उतराई होण्याचे भान ठेवले.

समाजवादी समाजरचनेचा पुरस्कार करणारा व धर्मनिरपेक्ष व देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या काँग्रेस पक्षाची साथ कधी सोडली नाही. किंबहुना १९९९मध्ये जिल्ह्यातील संपलेली काँग्रेस आ. मोहनरावदादांच्या हाती देऊन पुन्हा भक्कम करून जिल्ह्याच्या व राज्याच्या राजकारणात एक वेगळाच दबदबा निर्माण केला. त्याचाच परिपाक म्हणून त्यांच्या एका चिरंजीवांच्या अकाली निधनाचे अपार असे दुःख पचवून दुसरे चिरंजीव डॉ. विश्वजितरावांना पुरेपूर स्वातंत्र्य देऊन समाजकारणाच्या व राजकारणाच्या संग्रामात सामील होण्यास वाव दिला. संपूर्ण महाराष्ट्राला व दिल्लीला सुद्धा अचंबित करणारे दोनदा म.यु. काँ. नेतृत्व करण्याचा मान मिळविला व काळाची पावले ओळखून की काय, आज डॉ. विश्वजित एक सामर्थ्यवान, ज्ञानी, कर्तृत्ववान नेतृत्व साहेबांचा वसा पेलण्यास सज्ज झाले आहे.

हे सर्व करीत असताना गेली ५० वर्षे काँग्रेसचे आणि समाजसेवेचे, सहकाराचे काम करणारे ज्येष्ठ बंधू श्री. मोहनराव (दादा) ना लोकाग्रहास्तव सांगली-सातारा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून विक्रमी मतांनी आमदार म्हणून निवडून आणले. हा त्यांच्या व दादांच्या समाजमान्यतेचा आणि प्रेमळ स्वभावाचा परिणाम आहे.

त्यांचे दुसरे बंधू डॉ. शिवाजीराव एक ज्ञानी, शिक्षण-साहित्यक्षेत्रात आपल्या बंधूंच्या कर्तृत्वाला शोभेल असे कार्य करणारा उमदा माणूस कुलगुरुपद भूषवून आज प्र. कुलपती म्हणून साहेबांच्या स्वप्नातील विद्यापीठ उंचावरती नेण्याच्या कामात मग्न आहे.

कदम कुटुंबाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक पुरुष, महिला, मुले सर्व आपल्या ठायी साहेबांचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवून वाटचाल करीत आहेत.

एवढेच काय, पण त्यांचा स्पर्श झालेला प्रत्येक कार्यकर्ता एका वेगळ्याच सामाजिक जाणिवेने भारल्यासारखा वागतो. कारण त्याच्या जडण-घडणीसाठी साहेबांनी त्याला दिलेला आधार लाख मोलाचा होता, त्याचा त्याला विसर पडत नाही. कार्यकर्त्यांना तळहाताच्या फोडासारखा जपणारा साहेबांच्या सारखा नेता होणे नाही.

या सिद्ध पुरुषाने शिक्षण-सांस्कृतिक, कला-क्रीडाक्षेत्राचा उद्धार करताना कधी जाती, पंथ, पक्षभेदाचा विचार न करता प्रोत्साहन द्यावे, त्याला आश्रय द्यावा. याच दिलदार कलापूजक उदार कर्णाने युक्तीने व सौजन्यपूर्ण संयमाने, शालीनतेच्या स्पर्शाने विरोधकांवर मोहिनी घालावी. याच अजातशत्रूने अफाट तेजस्वी देदीप्यमान पण निश्चयी स्वाभिमानी भूमिपुत्राने मातीच्या कणाकणाला जागृत केले. सांगली-सातारा जिल्ह्याला व महाराष्ट्राला पुढे नेण्याचा विडा उचलला व साकारला. आकस, द्वेषबुद्धी व कपटाचा स्पर्शही न होऊ देता अखंडपणे समाज सुधारण्यासाठी जिवाचे रान केले.

यशवंतराव व वसंतदादांच्या नंतर फुलेवादी, आंबेडकरवादी, शाहुवादी सत्यशोधकी शूर कर्मवीर हाच एक सेनापती झाला.

'या सम हाच दुजा होणे नाही' सांगली जिल्ह्यात लोकशाहीतील दुसरे शाहूच होऊन गेले.

दि. १० मार्चला लीलावती हॉस्पिटल ते पुणे कर्मभूमी, पुढे सोनसळ ग्रामी व शेवटी कृष्णा सोनहिराच्या परिसरात सायंकाळी मुख्यमंत्री व अवघे विधानभवन धावले. लाखोंच्या उपस्थितीने, शासकीय सन्मानाने चिरनिद्रा घेत भूमिपुत्र पहुडला व या भेसूर दुःखद कातरवेळी दाटलेल्या लाखोंच्या कंठातील हुंदका उसळला व अनावर होऊन या महामानवास कोटी-कोटी अभिवादन करीत स्मृतींना उजाळा देत, हा मानवी महापूर मार्गस्थ झाला.

'ज्ञानी गुणी राजा रयतेचा समाधिस्थ झाला.'



स्मरणगंध साहेबांचा

# ऐतिहासिक निर्णय घेणारा नेता

## नितीन माने

सुमारे दीड वर्षांपूर्वी भारती विद्यापीठाच्या पुढाकाराने आणि विशेषतः डॉ. पतंगराव कदम साहेबांच्या प्रेरणेने कडेगाव येथील शैक्षणिक परिसरात 'अभिजित कदम प्रबोधिनी' नावाची संस्था सुरू केली. सदर संस्था ग्रामीण भागातील युवक-युवतींना स्पर्धा परीक्षांची माहिती व्हावी व त्यांना पुणे, मुंबई येथे ज्या सुविधा मिळतात, त्याच प्रकारच्या सोई-सुविधा ग्रामीण भागातील उमेदवारांना उपलब्ध व्हाव्यात, अशी त्यामागची भूमिका होती. ग्रामीण भागातील उमेदवारांमध्ये बुद्धिमत्ता, अपार कष्ट करण्याची क्षमता असते. त्यांना फक्त दिशा व वातावरण आणि आर्थिक कमजोरीमुळे उत्तम सुविधा उपलब्ध होत नसल्याने ते स्पर्धेत मागे राहतात आणि याच हेतूने आमच्या साहेबांनी अभिजीत कदम प्रबोधिनीची स्थापना केली. या अंतर्गत उत्तम अभ्यासिका, जी २४ तास ७ दिवसही चालू असते. दर्जेदार उत्तम बैठक व्यवस्था व प्रकाश-योजना असलेली अभ्यासिका, सर्व दर्जेदार स्पर्धा परीक्षांसंबंधित वाचनसाहित्यानी युक्त समृद्ध ग्रंथालय, संगणक व इंटरनेट अत्यंत माफक शुल्कात उपलब्ध करून दिले आहे. येथे कडेगाव तालुक्यातील तसेच इतर जिल्ह्यातील उमेदवार प्रशिक्षण घेत आहेत.

वरील प्रबोधिनीची, मी केंद्रसमन्वयक म्हणून जबाबदारी घेतल्यानंतर प्रथम त्यांना भेटायला कडेगाव येथील विश्रामगृहात गेलो असता, ते मला माणसांच्या गराड्यात आढळले. त्यातच मी माझी ओळख करून दिली, शिक्षण सांगितले, पूर्ण अनुभव सांगितला. यावर ते म्हणाले, ''खूप छान, आपल्या प्रबोधिनीसाठी उत्तम काम करायचे आहे, तसेच उमेदवारांना त्यांचे करीअर घडविण्यासाठी शक्य तेवढी मदत पुरवायची आहे.'' तसेच तिथे उपस्थित इतर राजकीय, सामाजिक क्षेत्रातील बऱ्याच मान्यवरांशी माझी ओळखही करून दिली. हा त्यांचा आपलेसे करण्याचा स्वभाव, सतत प्रोत्साहन देणारा स्वभाव, धडाडी मला खूपच प्रभावित करून गेली.

मी त्यांना राजकीय सभांतून यापूर्वी दुरून अनेकदा पाहिले होते, परंतु या वेळी खूप जवळून पाहिले व बातचीतही केली. शिक्षण, राजकारण, सहकार, कला, क्रीडा या क्षेत्रांत भरगच्च काम करणारा माणूस, शिक्षणतपस्वी, त्याला भेटण्याची एक स्वाभाविक ओढ होती, ती पूर्ण झाली. तो अनुभव माझ्यासाठी खूपच प्रेरणादायी व विलक्षण होता.

हा शिक्षणतपस्वी माणसाच्या समस्या सोडविण्यात अखंड रममाण होता, जो येईल त्याला मदत, फी माफी, नोकरी, बदली, शिफारस 'कल्पवृक्षच जणू'. दुसरा अनुभव सांगली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. काळम-पाटील हे भारती विद्यापीठाच्या कन्या महाविद्यालयात मतदान जागृती, नाव नोंदणी अभियानाचे प्रमुख पाहुणे म्हणून आले होते. त्या वेळी ते डॉ. पतंगराव कदम साहेबांना भेटले. त्याप्रसंगी मी तिथे उपस्थित होतो. त्यांच्या चर्चेनंतर साहेब एक वाक्य बोलले, की ''ज्या दुर्बलांना, आवाज नसलेल्यांना, ज्यांना कोणालाही नेतृत्व लाभत नाही, त्यांचे नेतृत्व हे तुमच्यासारख्या अधिकाऱ्यांनी केले पाहिजे.'' हा विचार त्यांनी यापूर्वीही अनेक जाहीर कार्यक्रमांमध्ये मांडलेला आहे. ह्या वाक्यातून साहेबांची समाजाप्रती चिंतनशीलता, समाजाविषयी कळकळ, संवेदनशीलता व भूमिकांची स्पष्टता अनुभवास येते. यावर श्री. काळम-पाटील यांनीदेखील सहमती दर्शविली.

या विचाराने झपाटलेला, सतत कार्यमग्न, उत्साही, धाडसी, जिगरबाज, माणुसकीचा निर्मळ झरा, लोकनायक, लोकश्री डॉ. पतंगराव कदम साहेबांचे शब्दांत व्यक्त न करता येणारे असे महान व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचे इतर अनेक पैलू आहेत. त्यांनी विविध खात्यांचे मंत्री म्हणून घेतलेले खालील निर्णय म्हणजे महाराष्ट्राची लक्षणीय नवनिर्मितीच होय.

मा.ना.डॉ. पतंगराव कदम यांनी विविध खात्यांचे मंत्री म्हणून घेतलेले महत्त्वपूर्ण निर्णय

१. राज्यातील २०१० ते २०१४ या काळातील दुष्काळ, अतिवृष्टी यांसारखे संवेदनशील विषय प्रभावीपणे हाताळून आपत्तिग्रस्त जनतेला १३,३३३ कोटी रु. एवढी भरीव मदत वितरीत केली.

२. राज्याच्या इतिहासात प्रथमच टंचाई निधीतून कायमस्वरूपी दुष्काळी भागास, उस्मानाबाद पाणीपुरवठा योजना, जालना शहराची पाणीपुरवठा योजना, बिरनाळ योजना यांसारख्या योजनांना मदत केली.

३. टंचाई निधीतून १५ दुष्काळी तालुक्यांत साखळी बंधारे घेऊन दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी उपाययोजना केल्या.

४. पश्चिम महाराष्ट्रात वन विभागाची पहिली प्रशिक्षण संस्था, कुंडल, ता. पलूस,



जि. सांगली येथे सुरू केली. भारतातील ही पाचवी प्रशिक्षण संस्था असून या ठिकाणी भारतातील वन अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाची सोय असून त्यामुळे कुंडलचे नाव भारताच्या नकाशावर आले आहे.

५. वनखात्याचे मंत्री म्हणून राज्यात सलग तीन वर्षे दुष्काळ असतानाही ४५ कोटी रोपांची लागवड करून प्रत्येक रोपाच्या अवस्थेची माहिती इंटरनेटवर उपलब्ध करून रोपांच्या जतनाचे प्रमाण वाढविले.

६. राज्यात १२,६६१ संयुक्त वन व्यवस्थापन साहित्यांमार्फत गावातील वनांमध्ये आमूलाग्र बदल घडवून निसर्ग पर्यटन व वनउपज, यामुळे हजारो कुटुंबांना रोजगाराच्या नवीन वाटा उपलब्ध करून दिल्या.

७. वनांवरील जनतेचा ताण कमी होण्यासाठी सुमारे ६०,००० कुटुंबांना स्वयंपाकाचा गॅस देऊन जंगलतोड कमी करण्यासाठी यशस्वी योजना राबविली.

८. वनखात्यात मानसिंगदेव अभयारण्य घोषित करण्याचा प्रस्ताव सुमारे २१ वर्षे प्रलंबित असताना त्या प्रकरणी निर्णय घेऊन अधिकची ९ अभयारण्ये घोषित करून अभयारण्यांची संख्या महाराष्ट्राच्या इतिहासात प्रथमच ४१ वरून ५० केली.

९. नागपूर येथे ऐतिहासिक गोरेवाडा प्राणिसंग्रहालय व आरे येथील प्राणिसंग्रहालय सुरू करण्यास मंजुरी दिली.

१०. राज्यांत वाघांची संख्या वाढल्यामुळे शासनाचा 'बेस्ट टायगर स्टेट २०१२' या पुरस्काराने सन्मान झाला.

११. वर्षानुवर्षे रखडलेल्या अभयारण्यातील १२ गावांचे पुनर्वसन करून ताडोबा, पेंच, मेळघाट यांसारखे व्याघ्र-प्रकल्प विकसित करून जगाच्या नकाशावर आणले.

१२. राज्यातील ताकारी, टेंभू, म्हैसाळ, जानाई-शिरसाई व मुक्ताईनगर यांसारख्या उपसा सिंचन योजनांची बिले टंचाई निधीतून भरून दुष्काळी भागास पाणीपुरवठा केला.

१३. उत्तराखंडमधील पूर परिस्थिती मा. साहेबांच्या नेतृत्वाखाली शासनाने प्रभावीपणे हाताळली.

१४. नवीन भूसंपादन कायद्याची अंमलबजावणी तसेच नियमावली तयार करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला.

१५. उद्योगमंत्री असताना राज्यातील क्षेत्राचे विकासानुसार अ,ब,क,ड वर्गानुसार विभाजन करून अविकसित भागास न्याय दिला. यामुळे ग्रामीण भागात उद्योग येण्यास मदत झाली.

१६. राज्यात २००३ साठी माहिती व तंत्रज्ञान धोरण घोषित केले. हिंजवडीसारखे आंतरराष्ट्रीय प्रकल्प यामुळे तयार झाले.

१७. इंग्रजी माध्यमासहित सर्व शाळांमध्ये मराठी विषय बंधनकारक करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला.

१८. सहकारमंत्री या नात्याने शेतकऱ्यांना अल्प दराने पीककर्ज देण्याचा पुरोगामी निर्णय घेतला.

१९. महसूलमंत्री या नात्याने भोगे समितीचे गठन करून महसूल खात्यातील कालबाह्य झालेले कायदे बदलण्यासाठी समिती नेमून सुधारणा सुरू केल्या. यामुळे अनेक लोकोपयोगी सुधारणा कायद्यात झाल्या.

२०. महसूल खात्याची पुनर्रचना करून वाढत्या लोकसंख्येनुसार अनेक नवीन तलाठी व मंडल अधिकारी या कायद्याची निर्मिती केली.

अशा प्रकारे प्रबोधिनीमार्फत लावलेले रोपटे येथील तरुण-तरुणींना आपल्या करिअरला आकार देण्यासाठी खूप फायद्याचे ठरत आहे. अनेक पिढ्यांना वरदान ठरेल अशी खात्री आहे व या कामना आमच्या साहेबांची प्रेरणा म्हणून काम करतील. इतर क्षेत्रांतील त्यांची कामेही त्यांच्या भरीव योगदानाची पावती देणारी आहेत. असे हे महान व्यक्तिमत्त्व त्यांच्या कर्तृत्व, नेतृत्व, दातृत्व यांच्या रूपात सदैव आपणा सर्वांस दिशा व ऊर्जा देत राहील!



स्मरणगंध साहेबांचा

# सामान्यांमध्ये देवत्व निर्माण करणारा देवदूत

■ अनिल दांडेकर

भारती विद्यापीठाचा एक चाहता, साहेबांचा स्नेही, आउटसायडर म्हणून १९७१ ते २०१७ डिसेंबर अखेर मी संबंधित होतो. साहेबांशी वेळोवेळी भेटी होत, वैयक्तिक चर्चेतून विद्यापीठाचा उंचावणारा गुणालेख ज्ञात होई. मागे वळून पाहता त्यांच्या संदर्भात प्रसंग आठवतात. एका देवदूताशी जुळलेला स्नेह, आत्मीयता, माणुसकीचे मूर्तिमंत प्रतीक याला कायमस्वरूपी पूर्णविराम मिळाला. हे स्वीकारण्याची मानसिक तयारी करण्यासाठी ही भावांजली लेखरूपात सादर करीत आहे.

५ सप्टेंबर १९७१. शिक्षक दिन. स्थळ : टिळकरोडवरील न्यू इंग्लिश स्कूलच्या प्रवेशद्वाराच्या लगतच्या बोळात एका इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील दोन खोल्या. 'भारती विद्यापीठ मध्यवर्ती कार्यालय,पुणे' अशी झळकणारी पाटी. छोटा जिना आणि पहिल्या मजल्यावर कार्यक्रम होता, काही शिक्षकांचा शिक्षकदिनानिमित्त सत्कार. मी आणि साहेबांचे स्नेही प्रा. शां. ब. मुजूमदार यांचे समवेत तेथे पोहोचलो. हसतमुख चेहऱ्याने शुभ्र वेषातील पतंगरावांनी आमचे स्वागत केले. सतरंजीवर दहा बारा जण मांडी घालून बसलेले. पतंगरावांनी आपुलकीने माझा हात हातात घेतला आणि विचारले, ''आपण?'' त्या हस्तांदोलनांतून साधेपणा, आपुलकीयुक्त ऊर्जा सामावलेले व्यक्तिमत्त्व समजून आले. ''मी अनिल दांडेकर, नू.म.वि. प्रशालेत विज्ञान शिक्षक आहे.'' ''अरे वा!'' उत्स्फूर्ततेने पतंगराव उद्गारले. ''अप्पा बळवंत चौकातील एकदम नंबर वन शाळा.''

समारंभ सुरू झाला. पतंगरावांनी शिक्षकदिनाचे महत्त्व आणि भारती विद्यापीठाची ध्येयं, शैक्षणिक वाटचाल इ. ओघवत्या भाषेत विषय विशद करून सांगितला. शिक्षकांचा यथोचित सत्कारही करण्यात आला. त्यांनी स्पष्टपणे सांगितले, ''पुण्याच्या विद्येच्या माहेरघरी महाविद्यालय सुरू करायचे आहेत. ज्यांना या शैक्षणिक कार्यात सहभागी व्हायचे आहे, त्यांनी बिनधास्त 'जॉइन' व्हा. तुमची कोणत्याही प्रकारे फसवणूक व्हायची नाही!'' माझ्या मनात जबरदस्त विचारच सुरू झाले. पण नू.म.वि. मध्ये कायमस्वरूपी शिक्षकाची मिळालेली अॅपॉइंटमेंट, त्याचवेळी सिंबायोसिसच्या कार्यात विशेष करून परदेशी विद्यार्थी सांस्कृतिक कार्यक्रमात निर्माण झालेली आवड त्यामुळे पतंगरावांच्या 'ऑफर'चा विचार कष्टाने सोडून द्यावा लागला.

काही वर्षांपूर्वी त्यांच्या चिरंजिवांचे अपघाती निधन झाल्याची बातमी धडकली. सांत्वनासाठी सिंहगडवर पोहोचलो. साहेब काळा सफारी घालून शांतपणे भेटत होते. त्यांच्या शेजारी बसलो. दोन मिनिटे मूकपणे वार्तालाप झाला. तेवढ्या गर्दीतही मला पुन्हा बसवून घेतले. गॉगल काढून अश्रू पुसत मला विचारले, ''दांडेकर ठीक चालले आहे ना?'' मी मानेनेच होकार दिला. जड अंतःकरणाने माघारी परतलो. मनात विचार थैमान घालीत होते. स्वतः एवढ्या परमदुःखात असूनही माझी किती आत्मीयतेने चौकशी! त्याला फार मोठे मन लागते हेच खरे.

त्यानंतर मुलाखत घडली २००५ सप्टेंबर, पोर्ट ब्लेअर अंदमानमध्ये, राजभवनात. पुण्याचे चार संशोधक निकोबारवर आलेल्या त्सुनामी लाटांमध्ये बेपत्ता झाले. त्यांच्या शोध घेण्याच्या कार्याचे मा. साहेब प्रमुख होते. तेव्हा ते महाराष्ट्र राज्याचे पुनर्वसन मंत्री होते. मी तेथील त्सुनामीग्रस्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन, पुनर्वसन करण्याच्या शासकीय स्कीमनुसार कार्यरत होतो. मिटिंग झाल्यानंतर मुद्दाम त्यांना भेटलो. त्यांना आनंद झाला. पुण्याला परतल्यावर भेट असे म्हणत निरोप घेतला.

२००८पासून मी आपत्ती आणि व्यवस्थापन, त्सुनामी याविषयी सटीप व्याख्याने शैक्षणिक संस्था, रोटरी क्लब वगैरे ठिकाणी देऊ लागलो. त्याच सुमारास छोट्या १०८ देशांचे माहितीपूर्ण, एक ज्ञानवर्धक पुस्तक मी तयार केले. त्यांची प्रत भेट देण्यासाठी 'सिंहगड'वर गेलो. साहेबांनी पुस्तक चाळले. पॅलेस्टाईनबद्दलची माहिती मुद्दाम वाचली. छान कलेक्शन आहे, असे म्हणत पी.ए. कडून शंभर रुपयाची नोट मागून घेऊन दिली. नको नको म्हणत असताना हसत उद्गारले, ''अरे याच्यामागे तुझे श्रम, संशोधन आहे.'' या कृत्यातून महान मनाचे मनोहारी दर्शन घडले!

त्यानंतर भेट झाली डिसेंबर २०१७ मध्ये, अचानकपणे सिंहगड बंगल्याच्या मागील बाजूस असलेल्या कॅनॉल रोडवर ते दोघातिघांच्या समवेत सिक्युरिटी गार्डसह येताना दिसले. थांबले. नमस्कार केला. उत्स्फूर्तपणे नेहमीच्या खळाळत्या आवेगात साहेब म्हणाले, ''अरे किती वर्षांनी? तब्येत अशी का रोडावली?'' मी सांगितले, ''डायबेटिसने पकडले मला. इन्सुलीन टोचून घेतो रोज.'' साहेब एकदम गंभीर झाले. हात हातात घेऊन जवळच्या बाकावर शेजारी शेजारी बसलो. ''अरे त्या डायबेटिसला काय घाबरायचे? मला पण आहे, पण मी मस्त राहतो. कामे करतो.''

क्षणात त्यांनी विषय बदलला. त्यांना माहिती होते. मी ठिकठिकाणी आपत्ती व्यवस्थापन विषयावर व्याख्याने देतो. ''आमच्या भारती विद्यापीठात दिली का?''





मी स्पष्ट सांगितले, ''तिकडे माझी ओळख नाही.'' ''अरे असे कसे? उद्या सकाळी ८ वाजता भवनला ये.'' ठरल्याप्रमाणे मी भवनला १० व्या मजल्यावर जाऊन थांबलो. साहेब आले. त्यांच्या समवेत भरपूर गर्दी नेहमीप्रमाणे होती. मला पाहताच 'जरा थांबा' म्हणत कार्यालयात गेले. पंधरा मिनिटांनी बोलावणे आले. त्यांच्या समोर प्रतिष्ठित मंडळी बसली होती. हास्यविनोदात काम करीत पत्रांवर सह्या सुरू होत्या. त्यांनी ताबडतोब डॉ. भोईटे सरांना पाचारण केले.

सर्वांच्या देखत डॉ. भोईटेंना सांगितले, ''दांडेकर माझा ४० वर्षांपासूनचा मित्र आहे, भाषणे देतो. भारतीच्या सर्व महाविद्यालयांमध्ये व्याख्यानाचे परिपत्रक काढा. डिटेल्स डिस्कस करा. स्पष्ट उल्लेख करा संस्थापक कुलपती यांनी सांगितल्यानुसार व्याख्याने आयोजित करायचा.'' विषय संपला. मी बाहेर पडून डॉ. भोईटेंच्या कार्यालयात शिरताना म्हणाले, ''पुण्यातील व्याख्याने पूर्ण झाल्यावर रिपोर्ट दे. जुलै-ऑगस्टमध्ये सांगली, कोल्हापूर येथे व्याख्याने द्यायची.'' भवन कार्यालयातील साहेबांची ती भेट अखेरचीच ठरली!

२७ डिसेंबर २०१७ रोजी परिपत्रक मिळाले. त्यानुसार ३० डिसेंबर ते १४ फेब्रुवारी २०१७ पर्यंत १६ महाविद्यालयांमध्ये व्याख्यानपूर्ती केली. रीतसर रिपोर्ट २८ फेब्रुवारी १८ रोजी डॉ. भोईटे सरांना सादर केला. दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रात बातमी वाचली. पतंगरावांना लीलावती इस्पितळात दाखल केले आहे. उपचारांना प्रतिसाद देत आहेत. मला चर्र झाले. आणि तो अशुभ दिवस उजाडला. सायंकाळी ७ वाजता कळले, पतंगराव गेले. १० मार्चला सकाळी ८ वाजता 'सिंहगड'वर अंत्यदर्शनाला गर्दी उसळली होती. काचपेटीतील तेजस्वी चेहऱ्यावर गांधी टोपी घातलेला, निश्चल देह पाहिला. हात जोडले. जोरात ओरडावेसे वाटले. 'साहेब चला कॅनॉल ट्रॅकवर फिरून येऊ.'

चहूबाजूला साश्रू नयनांनी विश्वजित दादा, सर कितीजण.... पायऱ्या उतरताना मनात आले, 'जो आवडतो सर्वांना तोची आवडे देवाला. पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा, मरण कल्पनेशी थांबे तर्क जाणत्याचा.'

मन सुन्न निःशब्द होते म्हणजे काय, ते गेले आठ दिवस अनुभवत आहे. पतंगराव शरीराने येथून गेले पण मनाने ते इथेच आहेत. बहुतेक त्यांना परमेश्वराने स्वर्गात ॲडिशनल चार्ज दिला असेल. असंख्य कार्यविभागांचा!

तब्बल ५५ वर्षे अहोरात्र शिक्षण, राजकारण, समाजकारण, शेती, सांस्कृतिक क्षेत्रांत बेधडक गतिशील महान कार्य करणारा शंभर नंबरी बुलंद नेता विसावला. जनसामान्यांच्या कल्याणासाठी तनमनधन अर्पून विविध, आधुनिक कार्यक्षेत्रे उपलब्ध केली. लक्षावधींना संधी मिळवून दिली. हजारोंच्या कुटुंबाचा धनी ठरला. समजून उमजून आयुष्य वेचले. भारती विद्यापीठ विश्वरूपी होणे ही जबाबदारी तुमच्याआमच्यावर सोपवून मार्गस्थ झाले. सांभाळा बाबांनो, म्हणत निघून गेले, पुन्हा न येण्यासाठी. पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या उत्तुंग आयुष्याला साजेसे अत्याधुनिकतेने कल्पिलेले, स्मृतिसंग्रहालय पुणे, सोनहिरा परिसरात उभारावे हीच अपेक्षा. पतंगरावाच्या पवित्र स्मृतीस अभिवादन.



स्मरणगंध साहेबांचा

# दीनदुबळ्यांचा श्वास


डॉ. महेश शितोळे



**हसतहसत जगणाऱ्याला**
**आयुष्य दगा देत नाही**
**कारण त्यांना जगण्यासाठी**
**नुसतं सुखच लागत नाही**

या कवितेप्रमाणे साहेब खऱ्या अर्थाने जगले ..साहेब म्हणजे एक अजब रसायन आहे, त्यांना इच्छाशक्तीचे वरदान आहे. हे साहेबांबद्दल मी माझ्या वडिलांकडून अनेकदा ऐकले होते. भारती विद्यापीठात नोकरी सुरू झाल्यानंतर ते प्रकर्षाने जाणवले आणि ते बघितलेही. वयाच्या १९ व्या वर्षी भारती विद्यापीठ स्थापन करून पुढे त्याचे रूपांतर विश्वविद्यालयात होईल असं कुणी म्हटलं असतं. तर यावर कुणीही विश्वास ठेवला नसता. परंतु साहेबांनी ते करून दाखवलं. बरं नुसतं करून दाखवलं नाही. गेली ५० वर्ष ज्ञानदानाची सेवा अविरत सुरू आहे.

शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात एवढं प्रचंड काम करत असलेल्या व्यक्तीबरोबर काम करायला मिळालं, ही माझ्यासाठी खूप मोठी संधी होती. साहेबांची काम करण्याची पद्धत खूप वेगळी होती. त्यांना कामामध्ये सगळं व्यवस्थित लागतं याचं दडपण मला होतं. परंतु प्रत्यक्षात मात्र साहेब खूप वेगळे आहेत, हे सुद्धा थोड्या दिवसांतच कळालं. साहेब खूप हळवे होते, साहेबांना दुसऱ्याचं दुःख पाहवत नव्हतं. सामान्य माणसाची दुःखं ज्यांना कळतात. असे जे काही नेते महाराष्ट्रात आहेत त्यामध्ये साहेब अग्रभागी होते, असं म्हटलं तर ते चुकीचं ठरणार नाही. हे मला खूप वेळा जाणवलं आहे. किंबहुना मी प्रत्यक्षात पाहिलेलं आहे. साहेब भवनला येणार म्हटल्यानंतर भवनचं वातवरण प्रसन्न ,आनंदी असायचं, अगदी सिक्युरिटीपासून ते सर्व अधिकाऱ्यापर्यंत सगळे तयारीत असायचे. कारण साहेब कधी कुणाला काय मागतील, हे सगळ्यांना ठाऊक होतं. साहेबांना भेटायला येणारी माणसं ही वेगवेगळ्या प्रकारची असायची, वेगवेगळे प्रश्न घेऊन येणारी मतदारसंघातील माणसं, ज्यांचा मतदारसंघाशी काहीही संबंध नाही अशी संपूर्ण महाराष्ट्रातून माणसं भेटायला यायची. भेटायला येणाऱ्या माणसांची संख्या कितीही असली, तरी साहेब सगळ्यांना भेटल्याशिवाय दुसऱ्या कामाला जात नसत. साहेब केबिन बाहेर येऊन बघत असत कोणी आहे का. हे साहेबांचं वेगळेपण होतं. काम होणार असेल तर लगेच फोन करून त्याचं काम मार्गी लावत असत. एकदा एक वयस्कर बाई साहेबांना भेटण्यासाठी येऊन थांबल्या होत्या. साहेब आल्यानंतर त्या साहेबांना बघताच रडायला लागल्या ...साहेब केबिनमध्ये गेल्या नंतर म्हणाले शितोळे, पहिल्यांदा त्या बाई ना बोलवा, त्या बाईंना बोलावल्या नंतर त्या पुन्हा रडू लागल्या व सांगू लागल्या माझ्याकडे हॉस्पिटलचे बिल भरण्यासाठी पैसे नाहीत आणि माझे मिस्टर वारले






आहेत. हे ऐकताच साहेबांनी संबंधितांना फोन लावून त्या बाईचं पूर्ण बिल माफ करायला लावले व आमच्या अकाउंट विभागातील व्यक्तींना बोलावून त्यांना काही पैसे सुद्धा दिले. त्या बाई गेल्यानंतर साहेब म्हणाले, शितोळे अशी माणसं खऱ्या अर्थाने माझा श्वास आहेत. खरं तर साहेबच दीन, दुबळ्यांसाठी श्वास होते. साहेबांची गरिबांबद्दल जी तळमळ होती. ती अनेकदा त्यांच्या बोलण्यातून मला जाणवत असे. आपण जे भोगलं आहे, ते इतरांच्या वाट्याला येऊ नये यासाठी तर साहेबांनी हजारो विद्यार्थ्यांची कोट्यवधी रुपयांची फी माफ केली.

साहेबांची निर्णयक्षमता आणि निरीक्षण करण्याची पद्धत ही वेगळ्या ताकदीची होती. एखाद्या कामाच्या मागे लागलं की ते पूर्ण केल्याशिवाय गप्प बसत नसत. विद्यापीठाचा कुठलाही कार्यक्रम असला तरी साहेब स्वतः लक्ष देऊन बघत असत. असाच एक अनुभव मला मानवता पुररस्कार वितरण समारंभावेळी आला. या कार्यक्रमाला माजी मंत्री एकनाथराव खडसे येणार होते. त्यांच्या पी.ए. कडून सांगण्यात आले की साहेबांची तब्येत ठीक नाही त्यामुळे ते कार्यक्रमाला येऊ शकणार नाहीत, परंतु खडसे साहेबांचे आणि साहेबांचे मैत्रीचे संबंध असल्यामुळे ते म्हणाले, ''शितोळे चला आपण खडसेंना भेटायला जाऊ. ते कार्यक्रमाला का येत नाहीत ते पाहू.'' त्यांना भेटायला गेल्यानंतर साहेब अशा पद्धतीने बोलले की खडसे साहेबांनी कार्यक्रमासाठी होकार दिला व खडसे साहेब मानवता पुरस्कारासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आले साहेबांच्या पूर्ण लक्षात होते की खडसे साहेब आजारी असतांना सुद्धा आपल्या मैत्रीखातर कार्यक्रमाला आले आहेत. म्हणून साहेब कार्यक्रम संपला की खडसे साहेबांना भारती हॉस्पिटलमध्ये चेकअप साठी स्वतः घेऊन गेले. साहेबांमधला असा दिलदार मित्र महाराष्ट्राने पाहिला आहे. साहेब जशी इतरांची काळजी घेत असत. तशीच ते मित्रांची काळजी घेत असत खरंच साहेबांकडून अनेक गोष्टी मी शिकलो आहे. या ठिकाणी मला एक कविता आठवते

**असे जगावे दुनियेमध्ये,**
**आव्हानाचे लावून अत्तर**
**नजर रोखुनी नजरेमध्ये,**
**आयुष्याला द्यावे उत्तर**



स्मरणगंध साहेबांचा

# गुणग्राहक डॉ. पतंगराव कदम

डॉ. कल्याणी दिवेकर

**माननीय डॉ. पतंगराव कदम यांच्या नावामागे 'कैलासवासी' लावण्याचा धीरच होत नाही. याचे एक कारण, त्यांचे विचार मनात अजूनही जागे आहेत; आणि 'भारती विद्यापीठा'च्या रूपाने त्यांनी जो 'ज्ञानवृक्ष' जोपासला, त्यातून ज्ञानोपासना आणि ज्ञानवृद्धी होतच राहणार आहे.**

माननीय डॉ. पतंगराव कदम यांच्या नावामागे 'कैलासवासी' लावण्याचा धीरच होत नाही. याचे एक कारण, त्यांचे विचार मनात अजूनही जागे आहेत; आणि 'भारती विद्यापीठा'च्या रूपाने त्यांनी जो 'ज्ञानवृक्ष' जोपासला, त्यातून ज्ञानोपासना आणि ज्ञानवृद्धी होतच राहणार आहे.

माननीय साहेबांचे वर्णन एका शब्दात करायचे, तर 'लाखांचा पोशिंदा' असे करावे लागेल. या 'रयते'च्या राजाने अनेकांना जसे काम मिळवून दिले, तसे आयुष्यभराचे ध्येयही समोर ठेवले. एखाद्या व्यक्तीमधली गुणवत्ता नेमकी हेरून त्याच्याकडून गुणवत्तापूर्ण काम करून घेण्याची त्यांची हातोटी विलक्षणच म्हणावी लागेल. 'माणूस ही जात आणि माणुसकी हा धर्म' हे त्यांच्या आणि पर्यायाने भारती विद्यापीठाच्या कार्यशैलीचे मुख्य सूत्र म्हणावे लागेल.

भारती विद्यापीठाच्या कार्याविषयी बोलताना पुनरुक्ती होईल, पण अतिशयोक्ती नाही. ग्रामीण आणि नागरी जीवनातील दरी मिटविण्याचे मोलाचे काम साहेबांनी केलेच, शिवाय विनोबाजी म्हणत त्याप्रमाणे जात, पंथ, धर्म यापलीकडे जाऊन माणुसकी जोपासण्याचे काम केले. फुले, शाहू, आंबेडकर आणि कर्मवीरांच्या कार्याचे उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवून भारती विद्यापीठाच्या प्रगतीचा ध्यास सतत मनात जागा ठेवला.

मा. साहेबांच्या कार्याविषयी ऐकून होते. भारती विद्यापीठाचे पूर्वाध्यक्ष मा. यशवंतराव





मोहिते यांनी सहकार, कृषी आणि औद्योगिक क्षेत्रात केलेल्या कामगिरीबद्दलही माहिती होती; पण भारती विद्यापीठाशी प्रत्यक्ष जोडले जाण्याची शक्यता नव्हती. १९८५ पर्यंत अपंग आणि गतिमंद मुलांसाठी काम करण्याचा अनुभवच केवळ पाठीशी होता. १९८३ मध्ये पौड रस्त्यालगत घर बांधल्यानंतर शंकरराव मोरे विद्यालयाच्या एका कार्यक्रमाला हजर राहिले होते. भारती विद्यापीठाच्या यशवंतराव मोहिते महाविद्यालयात माझा प्रवेश झाला, तोही योगायोगाने. 'नवऱ्याच्या जिवावर समाजकार्य करणारी बाई' अशी माझी ओळख एका मैत्रिणीने करून दिल्यावर मी जागी झाले. घराजवळचे महाविद्यालय आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांविषयी आपुलकी या भांडवलावर मी कामाला सुरुवात केली.

यशवंतराव मोहिते महाविद्यालयात 'अर्धवेळ अधिव्याख्याता' या पदासाठी निवड झाल्यानंतरची साहेबांशी झालेली पहिली भेट आठवते. शंकरराव मोरे विद्यालयात त्यांच्या कार्यालयात गेल्यावर त्यांनी पहिलाच प्रश्न विचारला. ''इथे कशासाठी आलायत? सामाजिक कार्य करण्याच्या दृष्टीने आला असलात, तर तुम्हाला इथे भरपूर वाव मिळेल. एरवी मराठी विषय शिकवणारे आम्हांला भरपूर मिळतील.''

पुढच्या काळात त्यांनी अनेक जबाबदाऱ्या सोपवल्या. 'भारती विद्यापीठाच्या सहकारी ग्राहक भांडारात दाखल व्हा.' असा आदेश मिळाल्यावर प्रथम 'सहकारा'विषयीचे कायदेकानून आणि स्वरूप समजावून घेण्यासाठी फर्ग्युसन रस्त्यावरील 'सहकार संघा'च्या कार्यालयात धाव घेतली. कै. नरुभाऊ लिमये यांच्या कार्यालयाशेजारी असलेल्या ग्रंथालयात बसून 'सहकारा'विषयी माहिती जमा केली. यानंतर भारती विद्यापीठाचे मुखपत्र असलेल्या 'विचार भारती' या अंकासाठी काम करण्याची संधीही दिली गेली.

यानंतर भारती विद्यापीठाच्या शालेय समितीच्या अध्यक्ष मा. विजयमाला कदम ऊर्फ वहिनीसाहेब यांच्या आदेशानुसार भारती विद्यापीठाच्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांच्या तपासणी पथकात सामील होण्याची संधी मिळाली. 'विचार भारती'मधील अहवालातून जी माहिती समोर येते, त्यापेक्षाही महत्त्वपूर्ण कार्य भारती विद्यापीठाच्या या सर्व शाखांमधून घडते आहे, त्याचा प्रत्यक्ष अनुभव आला.

मा. साहेब आज आपल्यात नाहीत. याचे दुःख पचवून ''त्यांनी उभ्या केलेल्या 'ज्ञानवृक्षा'च्या संवर्धनासाठी आपण सगळे मिळून काम करूया,'' ही प्रतिज्ञा करूया.



अखेरचा प्रवास

**रजाअली पिरजादे**

सांगली जिल्ह्यातील नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील एक सच्चा, दिलदार, स्वकर्तृत्ववान नेता हरपल्याने समाजकारणात, राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. डॉ.पतंगराव कदम ही व्यक्ती नव्हती तर एक शक्ती होती. या शक्तीच्या ऊर्जेत जे कोणी आले, त्यांचे कल्याण झाले.

८ जानेवारी १९४४ साली सोनसळसारख्या डोंगराळ गावात डॉ. पतंगराव कदम यांचा आदर्श माता बयाबाई आणि आदर्श पिता श्रीपतराव तात्या कदम यांच्या पोटी जन्म झाला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जन्माला आलेल्या डॉ. पतंगराव कदम यांनी धाडसाने, जिद्दीने आलेल्या प्रत्येक संकटावर मात करीत आपले बालपण सह्याद्रीच्या कुशीत घालवले.

प्राथमिक शिक्षण घेतल्यावर त्यांनी 'कमवा आणि शिका' या योजनेखाली कुंडल येथील बोर्डिंगमध्ये राहून हायस्कूलचे शिक्षण पूर्ण केले. कुंडलमध्ये शिकत असताना त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील, राजर्षी शाहू महाराज, म. फुले, आणि क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या विचारांचा पगडा पडला. लहानपणापासून समाजसेवेची आवड डॉ. पतंगराव कदम यांना होती. आई-वडिलांची संस्कारांची शिदोरी घेऊन पतंगरावांनी त्या वेळी डोक्यावर पत्र्याची पेटी घेऊन पुणे गाठले. विजार शर्ट घालून टीचर्स डिप्लोमा केला. हडपसर येथे रयतमध्ये अर्धवेळ शिक्षकाची नोकरी केली. ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणात मागे पडतात, त्यांच्यासाठी काहीतरी करावे म्हणून त्यांनी इंग्रजी आणि गणित विषयाच्या परीक्षा सुरू केल्या.

डॉ.पतंगराव कदम यांनी १० मे १९६४

# अखेरचा प्रवास







साली भारती विद्यापीठाची स्थापना आपले पाच सवंगडी घेऊन केली. त्या वेळी हे पाच सवंगडी नव्हे तर पाच रत्ने होती. या पाच रत्नांच्या जीवावर अत्यंत जिद्दीने आणि चिकाटीने भारती विद्यापीठ उभे केले. बघता बघता गल्लीतले विद्यापीठ दिल्लीत आणि तेथून सातासमुद्रापार जाऊन पोहोचले. डॉ. कदम यांनी विद्यापीठात किंवा अन्यत्र हजारो लोकांना नोकऱ्या लावल्या परंतु नोकरी लावताना साहेबांनी कोणाचा चहासुद्धा घेतला नाही.

१९६८ साली ते एस. टी. बोर्ड मेंबर झाले. 'गाव तेथे एस. टी.' हे ब्रीदवाक्य घेऊन त्यांनी गावोगावी एस. टी. सुरू केली. एस. टी. मध्ये त्यांनी सुमारे आठ हजार नोकऱ्या लावल्या. त्यानंतर समाजकारणासाठी राजकारणाची गरज ओळखून साहेबांनी १९८० साली सर्वप्रथम राजकारणात उडी घेतली. पूर्वीचा भिलवडी-वांगी, आजचा कडेगाव-पलूस मतदारसंघाचे त्यांनी नेतृत्व केले. आज अखेर ते या मतदारसंघात अविरतपणे काम करीत राहिले. पहिल्यांदा त्यांनी वचनपूर्तीचे राजकारण केले. 'दिलेले वचन पाळणारा नेता' म्हणून ते संपूर्ण महाराष्ट्रात ओळखले जात होते. त्यांनी मतदारसंघात आणि भारती विद्यापीठात भान ठेवून योजना आखल्या आणि बेभान होऊन त्या पूर्ण केल्या. सत्ता समाजसेवेसाठी असते, हे त्यांनी दाखवून दिले. आमदार म्हणजे काय, मंत्री म्हणजे काय, विकासनिधी कसा खेचून आणला जातो हे त्यांनी प्रत्यक्ष कृतीद्वारे करून दाखवले.

ग्रामीण विकास, सहकार, शिक्षण, क्रीडा, उद्योग, कृषी या सर्वच गोष्टी त्यांनी एका छताखाली आणल्या. भारती विद्यापीठ सर्वांसाठी खुले ठेवून ते राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असल्याचे दाखवून दिले. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवून शिक्षणक्षेत्रात भारती विद्यापीठाच्या रूपाने उत्तुंग भरारी घेतली. महिलांसाठी खास शिक्षणाची सोय केली. गोरगरीब विद्यार्थ्यांची कोट्यवधींची फी माफ केली. त्यामुळेच मतदारसंघातील महिला आज सबला बनल्या आहेत.

राजकारणात कै. यशवंतराव चव्हाण आणि कै. वसंतदादा पाटील यांच्यानंतर सांगली जिल्ह्याचे काय होणार, असा प्रश्न निर्माण झाला होता. सहकार चळवळ कोलमडून पडली होती. परंतु साहेबांनी कै. यशवंतराव चव्हाण आणि कै. वसंतदादा यांच्या विचारांचा वारसा पुढे चालवला. मोडकळीस आलेली सहकार चळवळ त्यांनी मोठ्या जोमाने, हिमतीने आणि जिद्दीने सावरली, उभी केली आणि यशस्वी करून दाखवली. मतदारसंघात शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी साखर कारखाने, सूतगिरण्या, कुक्कुटपालन संस्था, दूध संघ आणि विविध सहकारी संस्थांचे जाळे निर्माण केले आणि ते यशस्वी करून दाखवले. राजकारण, समाजकारण करताना कोणाचा द्वेष, मत्सर केला नाही. विकासकामात त्यांनी विरोधकांनाही मदत केली. त्यामुळे ते 'अजातशत्रू' म्हणून ओळखले जातात. खुर्चीमुळे त्या खुर्चीवर बसणाऱ्या व्यक्तीचे मोठेपण ओळखले जाते, असे म्हटले जाते. परंतु साहेबांच्या बाबतीत उलटे होते. साहेब ज्या खुर्चीवर बसत, त्या खुर्चीला किंमत येत असे. साहेब मंत्री असताना आघाडी शासनाच्या काळात त्यांनी दुष्काळाच्या काळात, अतिवृष्टीच्या काळात भरीव मदत दिली. दुष्काळी भागातील सिंचन योजना त्यांनी बंद पडू दिल्या नाहीत. सतत त्यांनी त्याबाबत पाठपुरावा केला.

कडेगाव-पलूस मतदारसंघाचा गेल्या ५० वर्षांपासून ते सातत्याने विकास करत होते. या पन्नास वर्षांच्या काळात त्यांनी या मतदारसंघाचा चेहरा मोहरा बदलून टाकला. साहेबांचे हात म्हणजे परीस होता. त्यांचा हात ज्याला लागत असे, ती व्यक्ती किंवा परिसर यांचे सोने होऊन जात असे.

**साहेबांचा अखेरचा प्रवास**


कोणाचाही आधार नसताना पुण्यात आलेल्या डॉ. पतंगराव कदमांनी स्वकर्तृत्वावर जे वैभव निर्माण केले, ते खरोखर कौतुकास्पद म्हणावे लागेल. एक चांगला मित्र, एक चांगला भाऊ, एक चांगला लोकप्रतिनिधी, एक उत्साहाचा खळाळता झरा, वादळात दिवा लावणारा नेता म्हणून त्यांची संपूर्ण महाराष्ट्रात ओळख होती. आणि असे हे साहेब अचानक आजारी पडल्याची वार्ता कानी आली आणि जोराचा धक्का बसला.

डॉ. पतंगराव कदम साहेब हे आजारी पडल्याचे वृत्त समजताच सर्वत्र हळहळ व्यक्त होत होती. साहेब बरे व्हावे म्हणून सर्वत्र प्रार्थना सुरू झाल्या. कडेगाव-पलूस मतदारसंघासह संपूर्ण सांगली जिल्ह्यात आणि महाराष्ट्रात त्यांच्यासाठी प्रार्थना केली जात होती. ठिकठिकाणी होमहवन सुरू झाले. मुस्लीम बांधवांनी अजमेरपासून गुलबर्ग्यापर्यंत धाव घेऊन प्रार्थना केल्या. 'देवा, माझ्या देवाला बर कर' अशा प्रकारच्या प्रार्थनांच्या हाका ऐकू येऊ लागल्या. अशा परिस्थितीतही डॉ. पतंगराव कदम यांचा मतदारसंघाच्या विकासकामाचा ध्यास दिसून येत होता. ते सतत मला कडेगावला जायचे आहे, मतदारसंघातील लोकांना भेटायचं आहे, असं सांगत होते. अचानक एक दिवशी १९ फेब्रुवारी रोजी साहेबांचा मला फोन आला, 'रजाअली, तुझ्या वडिलांची तब्येत कशी आहे,' असे बोलून तालुक्यातील विकासकामांची विचारपूस केली. ''एक दोन दिवसात तुम्ही सर्व पत्रकार मला भेटायला पुण्याला या. आपण सर्वजण जरा तालुक्यातील विकासकामाबाबत गप्पा मारत बसू.'' साहेबांचे हे बोलणे ऐकून मला आश्चर्याचा धक्का बसला. स्वतः आजारी असताना मतदारसंघातील लोकांची आणि विकासकामांची तळमळ पाहून मी स्तब्ध झालो. त्यानंतर काही दिवसांतच डॉ.पतंगराव कदम साहेबांची प्रकृती अचानक गंभीर झाली. त्यांना मुंबई येथील लीलावती रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान साहेबांना पाहण्यासाठी कडेगाव-पलूस मतदारसंघासह संपूर्ण महाराष्ट्रातून चाहत्यांची, कार्यकर्त्यांची आणि दिग्गज नेते मंडळींची झुंबड उडाली. राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षा सोनिया गांधी यादेखील साहेबांची प्रकृती पाहण्यासाठी मुंबई येथे आल्या.



दरम्यान साहेब बरे व्हावे यासाठी सर्वत्र सर्व धर्मीयांकडून प्रार्थना सुरू होत्या. अशा परिस्थितीत ९ मार्च रोजी रात्री ९.३० च्या दरम्यान अचानक साहेबांच्या दुःखद निधनाची बातमी आली आणि मन सुन्न झाले. कडेगाव-पलूस मतदारसंघासह संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली. कडेगाव-पलूस तालुक्यात सर्वत्र शुकशुकाट पसरला. साहेबांचे निधन झाले, यावर कोणाचा विश्वास बसत नव्हता. दुसऱ्या दिवशी साहेबांचे पार्थिव सकाळी पुण्याला आणण्यात आले. त्यांचे अंत्यदर्शन घेताना लोकांनी टाहो फोडला. अनेकांना आपले अश्रू अनावर झाले. कदम कुटुंबीयांवर तर दुःखाचा डोंगर कोसळला होता. हजारो विद्यार्थ्यांनी, चाहत्यांनी आणि लोकांनी पुण्यात साहेबांचे अंत्यदर्शन घेतले.

कडेगाव तालुक्यात आपल्या लाडक्या नेत्याच्या अखेरच्या दर्शनासाठी सोनसळ व सोनहिरा कारखाना परिसरात जनसागर



लोटला होता. त्यानंतर दुपारी २.३० च्या दरम्यान पार्थिव पुणे येथून त्यांच्या मूळ गावी सोनसळ येथे हेलिकॉप्टरने आणण्यात आले. त्या वेळी लोकांचा अश्रूंचा बांध फुटला. ते दृश्य मन हेलावणारे होते. त्यांच्या घरी पार्थिव येताच घरातील लोकांनी एकच आक्रोश केला. हा प्रसंग हृदय हेलावणारा होता. कुटुंबातील महिलांनी हंबरडा फोडला. ‘साहेब आम्हाला पोरकं करून का गेलात, साहेब परत या,’ अशा हाकांनी सोनसळ गाव अश्रूंच्या सागरात बुडून गेले होते. येथे येणाऱ्या प्रत्येकाच्या डोळ्यांत अश्रू होते. ‘डॉ. पतंगराव कदम साहेब अमर रहे’ च्या घोषणा दिल्या जात होत्या.







त्यानंतर सोनहिरा कारखाना कार्यस्थळावर पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार होते. त्यासाठी सर्व राजकीय पक्षांचे नेते-पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून महाराष्ट्र एकवटला होता. ‘न भूतो न भविष्यति’ अशी गर्दी सोनसळ व सोनहिरा कारखान्याच्या रस्त्या-रस्त्यांवर पाहायला मिळाली. काहींनी तर शनिवारी सकाळपासून सोनहिरा कारखाना परिसरात ठाण मांडले होते. येथे येणाऱ्या प्रत्येकाच्या डोळ्यांत अश्रू तरारले होते, तर ओठांत ‘साहेब अमर रहे’चा घोष होता. आमचा देव हरपला असा आवाज दाटून आलेल्या कंठातून निघत होता. नेत्याच्या दर्शनासाठी प्रतीक्षेचा बांध फुटल्याने पोलीस बंदोबस्त झुगारून जनसागर कारखान्यात शिरला. गर्दीचा महासागर पाहून पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यास फाटा देण्यात आला आणि रुग्णवाहिकेतून वांगी येथे कारखाना परिसरात अंत्यसंस्कार स्थळावर नेण्यात आले. यावेळी अंत्ययात्रेच्या मार्गावर शिरसगाव, सोनकिरे, चिंचणी येथे रस्त्याच्या दुतर्फा मोठी गर्दी झाली होती. मोठ्या गर्दीत लोक साहेबांचे दर्शन घेण्याचा प्रयत्न करत होते. साहेबांचा चेहरा दिसावा, त्यांना हात जोडून वंदन करता यावे, आपल्या दैवताचे रूप मनात साठवून ठेवता यावे, यासाठी साऱ्यांचेच डोळे आसुसलेले होते.

कडेगाव व पलूस तालुक्यात व परिसरात सन्नाटा पसरला होता. दोन्ही तालुक्यांत कडकडीत बंद पाळण्यात आला होता. तालुक्यातील अनेक शाळांना व विद्यालयांना सुट्या देण्यात आल्या होत्या. ज्या नेत्याने ताकारी टेंभू योजनांच्या माध्यमातून या दुष्काळी भागात हरितक्रांती केली, रोजगारनिर्मितीमधून हजारो कुटुंबांचे संसार फुलविले, त्यामुळे इथल्या प्रत्येक घरात कर्ता पुरुष गमावल्याचे चित्र दिसत होते. शनिवारी साहेबांच्या निधनाचे वृत्त या ठिकाणी पोहोचल्यानंतर एकच शांतता परिसरात पसरली, तर अनेकांच्या घरातली चूलही पेटली नाही. चाहत्यांच्या आक्रोशाने सोनहिरा हेलावला. कंठात दाटलेले हुंदके, डोळ्यांतून ओघळणारे अश्रू आणि भावनावेगाने फोडलेला हंबरडा यामुळे सोनहिरा कारखाना परिसरातील वातावरण रविवारी कमालीचे भावूक झाले होते. साहेबांचा अंतिम प्रवास पाहताना लाखो चाहत्यांनी केलेल्या आक्रोशाने अक्षरश: सोनहिरा कारखाना परिसर हेलावला. सर्वत्र ‘साहेब अमर रहे’च्या घोषणा दिल्या जात होत्या. ते वातावरण अत्यंत शोकाकुल व सुन्न करणारे होते.

**शासकीय इतमामात अंत्यसंस्कार**

सायंकाळी सुमारे ५.३० च्या सुमारास शासकीय इतमामात अंत्यसंस्काराला सुरुवात



झाली. पोलिसांनी हवेत बंदुकीच्या फैरी झाडून व पोलीस बँडने त्यांना सलामी दिली. डॉ. विश्वजित कदम यांनी ज्या वेळी त्यांना मुखाग्नी दिला, त्या वेळी लाखोंच्या उपस्थित जनसमुदायाला अश्रू आवरता आले नाहीत. लाखोंच्या जनसमुदायात महाराष्ट्राचे लाडके नेते डॉ. पतंगराव कदम अनंतात विलीन झाले.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, माजी मंत्री सुशीलकुमार शिंदे, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अशोक चव्हाण, काँग्रेसचे मोहन प्रकाश, शेकापचे ज्येष्ठ नेते प्रा. एन. डी. पाटील, महसूलमंत्री चंद्रकांतदादा पाटील, विधान परिषदेचे उपसभापती माणिकराव ठाकरे, पालकमंत्री सुभाष देशमुख, राष्ट्रवादीचे नेते अजित पवार, आ. जयंत पाटील, ग्रामविकास मंत्री पंकजा मुंढे, कृषी राज्यमंत्री सदाभाऊ खोत, खासदार उदयनराजे भोसले, खासदार संजयकाका पाटील, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, विशाल पाटील, भाजपा जिल्हाध्यक्ष पृथ्वीराज देशमुख यांनी आपल्या भाषणात श्रद्धांजली वाहिली.

खासदार राजीव सातव, माजी मंत्री प्रतीक पाटील, माजी मंत्री विनय कोरे, आमदार अनिल बाबर, शेकापचे आमदार जयंत पाटील, आमदार सुधीर गाडगीळ, शिवाजीराव नाईक, सुमनताई पाटील, विजयसिंह मोहिते पाटील, शंभूराजे देसाई, जयकुमार गोरे, आनंदराव पाटील, आमदार बाळासाहेब पाटील, आ. सदाशिव पाटील, माजी मंत्री बबनराव पाचपुते, जिल्हा बँकेचे अध्यक्ष दिलीप तात्या पाटील, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष संग्रामसिंह देशमुख, संजय बजाज यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. तसेच भारती विद्यापीठ आणि डॉ. पतंगराव कदम साहेबांनी निर्माण केलेल्या प्रत्येक संस्थेतील पदाधिकारी, कर्मचारी, शिपाई, कार्यकर्ते, चाहते, लाखोंच्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. पतंगराव कदम साहेबांच्या या काळात श्रीरामाला त्यांचे बंधू लक्ष्मण यांनी मोठी साथ दिली होती. त्याप्रमाणे आधुनिक काळातील श्रीरामाला म्हणजे डॉ. पतंगराव कदम यांना त्यांचे बंधू आमदार मोहनराव कदम, भारती विद्यापीठाचे प्र-कुलपती डॉ. शिवाजीराव कदम सर, कै. सुबराव कदम, रघुनाथ कदम, आत्माराम कदम या बंधूंनी त्यांना मोलाची साथ दिली. तर श्रीराम यांना सीता माईंनी जशी साथ दिली होती, तशीच साथ पतंगरावांच्या पत्नी विजयमाला कदम यांनी दिली, हे विसरता येणार नाही. डॉ. पतंगराव कदम यांच्या प्रत्येक गोष्टीत त्यांचे बंधू आणि पत्नीची साथ राहिली. डॉ. पतंगराव कदम असे भाग्यवान की, त्यांना विजयमालांसारख्या पत्नी लाभल्या. सार्वजनिक जीवनकार्यात पूर्ण गुंतवून घेतलेल्या पतंगरावांचा संसार व घरप्रपंच फुलला तो केवळ वहिनीसाहेबांच्या मुळेच.

डॉ. कदम यांच्या सुरुवातीच्या काळात त्यांना आनंदराव पाटील सर, बा. ग. पवार सर, म्हेत्रे सर, निलाखे सर, प्रा. शं. मा. डिंगणे सर यांनी साथ दिली. साहेबांनीही त्यांना आपल्या बरोबरचा मानसन्मान दिला. साहेबांना दोन मुले. अभिजित कदम आणि विश्वजित कदम दुर्दैवाने अभिजित कदम यांचे निधन झाले परंतु डॉ. विश्वजित कदम हे डॉ. पतंगराव कदम यांच्या पावलावर पाऊल ठेवून काम करताना दिसत आहेत. त्यांची जिद्द, चिकाटी आणि काम करण्याची पद्धत साहेबांसाखीच आहे. डॉ. विश्वजित कदम यांनी सर्वांना बरोबर घेऊन काम करणार असल्याचे सांगितले आहे. शेवटी साहेबांच्या बाबतीत एवढेच सांगता येईल साहेब म्हणत असतील, 'असेन मी नसेन मी, परंतु कर्तृत्वाच्या रूपाने दिसेन मी.'







“मी लहान असतांना गावात फिरत असे. अनेकांच्या चुली पेटायच्याच नाहीत हे मी माझ्या डोळ्यांनी पाहिले आहे. माझी आई लोकांना पायलीनं ज्वारी देण्याचं काम करायची. मी तिच्याकडं बघत बसत असे. माझ्यात जी सामाजिक जाणीव दिसते, त्याचं बीजारोपण आईच्या त्या वेळच्या व्यवहारात आहे.

आयुष्यभर भारती विद्यापीठासाठी लढत राहिलो. या धामधुमीत घरच्यांसाठी - मुलाबाळांसाठी काहीही केलं नाही. माझ्या पत्नीनेच घर चालविले. मुलांचे शिक्षण तिनेच केले. आज भारती विद्यापीठाच्या भव्य इमारती सगळ्यांना दिसतात; परंतु त्यामागे कुटुंबाचे मोठे योगदान आहे.

यापुढचा काळ सोपा नाही. शिक्षणावर काळाची नजर असेल. कोणीच गाफील राहू नये. आपण नवीन काय करतो? जे करतोय ते समाजापर्यंत पोहोचतंय का? वेगळं काय करतो? या प्रश्नांना सगळ्यांनाच सामोरे जावे लागेल. भारती विद्यापीठात आज किती मेंदू आहेत? तीच आपली संपत्ती. सगळ्यांनी डोकं चालवलं तर जगाला धक्का देता येईल.’’

”

**डॉ. पतंगराव कदम साहेब**

**संस्थापक- भारती विद्यापीठ**



## साहेब, सर्वांना पोरके करून असे का गेलात?

